
# अनमोल वारसा

('अनमोल विरासत' या मुळ हिंदी ग्रंथाचा मराठी अनुवाद)

खंड - तिसरा

## गांधी : व्यक्तित्व आणि परिवार




मुळ लेखिका
सुमित्रा कुलकर्णी

भाषांतर
भगवंत देशमुख



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# अनमोल वारसा

## खंड तिसरा

## गांधी : व्यक्तित्व आणि परिवार

मूळ लेखिका

**सुमित्रा कुलकर्णी**

भाषांतर

**भगवंत देशमुख**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ४२-१

■ **पुस्तकाचे नाव :** अनमोल वारसा
खंड ३ रा - गांधी : व्यक्तित्व आणि परिवार

■ **मूळ लेखिका :** सुमित्रा कुलकर्णी

■ **भाषांतर :** भगवंत देशमुख

■ **प्रथमावृत्ती : २०१९**

■ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

■ © **प्रकाशकाधीन :**

■ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

■ **किंमत : रु. २०७/-**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄

# अर्पणपत्रिका

आपले श्वशुर महात्मा गांधी यांच्या
आदर्शांची मूर्तिमंत प्रतीक असलेल्या
ऐंशी वर्षे वयाच्या निर्मला गांधी या
माझ्या कर्मठ आणि तपस्विनी आईस
सादर सप्रेम समर्पण

❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄❄

# अध्यक्षांचे मनोगत....

आपला वारसा धन-संपत्ती, शेती-उद्योग अन् साहित्य, कला या सांस्कृतिक-ऐतिहासिक परंपरेच्या संस्कारातही असतो. भारताला हा समृद्ध वारसा लाभलेला आहे. यात इतिहासातील युगपुरुषांचाही मोठा वाटा असतो. पारतंत्र्याच्या दीडशे वर्षांच्या बेड्या झुगारून देण्याचे कार्य करणाऱ्या स्वातंत्र्यप्रेमीत महात्मा गांधींच्या कार्याचा अनमोल वारसा लाभला आहे. वयाच्या सदतिसाव्या वर्षी संसार आणि कौटुंबिक जीवनात संन्यास स्वीकारून पूर्ण आयुष्य देशसेवेत घालविलेले ते अनमोल व्रतस्थ होते. या योग्याने स्वत:साठी आणि परिवारासाठी कसलीही ऐहिक संपत्ती न ठेवता फक्त देशसेवेचे व्रत आयुष्यभर पाळले. त्यामुळेच त्यांचे जीवन एक आदर्श अनमोल वारसा ठरले आहे. हजारो वर्षांच्या या देशाच्या इतिहासात मोहनदास करमचंद गांधींचे आदर्श जीवन एक गाथाच ठरले आहे. त्यांचे जीवन म्हणजे सत्याचा शोधच होते. सत्यदर्शन हाच त्यांचा ईश्वरी साक्षात्कार होता. या देशातील हीन-दीन दुबळ्यांच्या ठायीच त्यांना परमेश्वराचे दर्शन घडल्याने त्यांनी त्यांच्यासाठीच झोकून देऊन हे कार्य केले.

अनमोल वारसा प्रकाशनाची कहाणी ही अद्‌भुत आहे. आदरणीय डॉ. सुधीर रसाळ यांनी एके दिवशी सहज सांगितले, "महात्मा गांधीजींची नात सुमित्रा कुलकर्णी यांनी 'अनमोल विरासत' हे तीन खंडांतील गांधी चरित्र लिहिले. या हिंदी चरित्राचे मराठीत भाषांतर व्हावे असे मा. अनंत भालेराव यांची इच्छा होती. त्यांनी भगवंतराव देशमुखांना हे काम करावे, असा आग्रह केला. सुमित्राबाई कुलकर्णी आणि त्यांचे पती श्री. गजानन कुलकर्णी यांच्याशी बोलून संमती मिळवली होती. भगवंतराव यांनी मराठीत भाषांतर केले. प्रसिद्ध विचारवंत श्री. वसंत पळसीकरांना अभिप्रायासाठी पाठविले. पळसीकरांनी ते चरित्र वाचून उत्तम असे पत्र पाठविले. महात्मा गांधींच्या या महत्त्वाच्या चरित्र ग्रंथांचे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशन व्हावे, अशी आमची इच्छा होती; पण ते काम या ना त्या कारणाने झाले नाही. तुम्ही मंडळाचे अध्यक्ष झालात. तुमच्या काळात हे महत्त्वाचे वाङ्मयीन काम व्हावे."

आदरणीय प्रा. भगवंतराव देशमुख इ.स. २००९ मध्ये वारले. अनमोल विरासतचे मराठी भाषांतर अप्रकाशित राहिले. हा चरित्र ग्रंथ प्रकाशित करणे मला जबाबदारीचे काम वाटू लागले. प्रा. भगवंतरावांचे बंधू श्री. सुंदरकांत आणि चिरंजीव अजय यांच्याकडून

'अनमोल वारसा' मिळविला. हस्तलिखितासोबत श्री. भगवंतराव देशमुखांनी श्री. वसंत पळशीकर यांना दि. १५-१२-१९९७ रोजी लिहिलेले एक आंतरदेशीय पत्र आढळले. त्यात श्री. भगवंतरावांनी लिहिले होते, "हे भाषांतर मी केले, तेव्हा डोळ्यांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया व्हायची होती. त्यामुळे वाचण्याचा त्रास होत असे. सौ. देशमुख हिंदी वाचून दाखवायच्या आणि मी ऐकून भाषांतर करायचो." या प्रकारे त्यांनी आठशेहून अधिक पृष्ठांचे भाषांतर केले. त्यांनी लिहिलेल्या या पत्रात पुढे म्हटले, "भाषांतर संपविल्यानंतर मी स्वतः ते पुन्हा वाचू शकलो नाही. कारण सुमित्रा कुलकर्णी यांनी त्याच्या प्रकाशनाचा प्रयत्न करण्यासाठी स्वतःकडे हस्तलिखित मागवून घेतले होते. त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे पाठवायचे ठरले तेव्हा मंडळाकडे ते पाठविण्यापूर्वी दोन दिवसातच ते माझ्याकडे परत आले."

इ.स. १९९७ पासून अनमोल वारसाचे भाषांतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून का होऊ शकले नाही, याचा तपास घेण्यापेक्षा हा महत्त्वाचा चरित्र ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित करायचे मी ठरविले. डॉ. सुधीर रसाळ सरांकडून मंडळाच्या नावे अभिप्राय पत्र घेतले. मा. वसंत पळसीकरांसारख्या मान्यवरांशी श्री. भगवंतराव देशमुखांचा पत्रव्यवहारसुद्धा अभिप्राय समजून हा चरित्र ग्रंथ मंडळाने प्रकाशनार्थ स्वीकारून शासकीय मुद्रणालयाकडे सोपविला. अनमोल वारसा चरित्र खंड पहिल्यात गांधीजींचे बालपण आणि सत्याग्रहाचे प्रयोग, खंड दुसऱ्यात कथा गांधी आणि स्वातंत्र्याची आणि खंड तिसऱ्यात गांधी : व्यक्तिमत्त्व आणि परिवार या संदर्भात सुमित्राताई यांनी लेखन केले आहे. मुद्रणाचे काम सुरू झाले. पहिले, दुसरे प्रूफ तपासून झाले. पुस्तकाची अंतिम छपाई आदेश देताना सुमित्राताईंचे भाषांतर संमतिपत्र अथवा पहिल्या हिंदी आवृत्तीच्या प्रकाशनाची परवानगी हवी, असा शासकीय तांत्रिक मुद्दा समोर आला.

अनमोल विरासतची पहिली आवृत्ती प्रभात प्रकाशन दिल्ली यांनी इ.स. १९८८ मध्ये प्रकाशित केली होती. प्रभात प्रकाशनच्या मित्रास फोन करून या ग्रंथाच्या भाषांतराची परवानगी मागताच ते म्हणाले, "आम्ही फक्त पहिलीच आवृत्ती काढली. पुढील आवृत्त्या दुसऱ्यांनी प्रकाशित केल्या. भाषांतराचे हक्क मा. सुमित्राताई यांच्याकडे आहेत." सुमित्राताईंच्या अहमदाबाद येथील पत्त्यावर पत्र टाकले. चौकशी केली तेव्हा समजले की, त्या बंगलोर येथे राहतात. त्यांच्या फोनवर मा. गजानन कुलकर्णी यांच्याशी मी बोललो. महाराष्ट्र शासन भाषांतर प्रकाशित करत आहे, हे आवर्जून सांगताच, ते म्हणाले, "मा. अनंत भालेरावांनी यासाठी आग्रह धरला होता. सुमित्राबाईंनी परवानगी दिली; पण पुढे काय झाले कळले नाही." महाराष्ट्र शासन प्रकाशन करु इच्छिते हे ऐकून त्यांना समाधान झाले. रीतसर पत्र पाठवा.

आम्ही परवानगी देत आहोत, असे सांगून त्यांनी पत्ता व ईमेलही कळविला. आनंदाची गोष्ट अशी की, माझ्या पत्राला तात्काळ उत्तरही आले आणि प्रकाशनाचे काम मार्गी लागले.

महात्मा गांधी समजून घेणे जेवढे सोपे आहे, तेवढेच अवघडही आहे. त्यांचे जीवन म्हणजे एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्थ आणि विसाव्या शतकाचे अर्धशतक हा महात्मा गांधींच्या जीवनाचा महत्त्वाचा कालखंड आहे. जगातील त्या काळातले समाजवास्तव आणि भारतीय समाजवास्तवाचा त्यांनी बारकाईने अभ्यास करून त्यावर कृतीतून सखोल चिंतन, स्वतःचे व्रतस्थ आचरण करत देशकल्याणाचे व्रत पाळले. याचे दर्शन त्यांच्या सत्याचे शोध अर्थात आत्मकथेत आले. 'अनमोल वारसा' या चरित्र ग्रंथात त्यांची नात सुमित्राताई कुलकर्णी-गांधी यांनी तटस्थ अन् समर्थपणे या युगपुरुषाचे तीन खंडांत चरित्र मांडले आहे. त्याचे भाषांतर आदरणीय प्रा. भगवंतराव देशमुखांनी तेवढ्याच सहज सरळपणे मराठी वाचकांसाठी केले होते; पण तो प्रकाशित ग्रंथ बघण्यासाठी ते आज आपल्यात नाहीत, ही रुखरुख मनाशी आहे. शेवटच्या खंडात सहाव्या प्रकरणात म. गांधींचा १४ वर्षांचा मुलगा हरीलालची नववधू गुलाबने त्याला पत्ररूपी कविता लिहिली. त्या कवितेचे भाषांतर डॉ. सुषमा करोगल, बडोदे यांनी केले आहे.

सुमित्राताई आणि गजाननराव कुलकर्णी यांनी मराठी अनुवाद प्रकाशनास अनुमती दिल्यामुळेच मराठी वाचकांसाठी हा सांस्कृतिक वारसा आम्ही उपलब्ध करून देऊ शकलो, त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार, महात्मा गांधींचा हा अनमोल वारसा मराठी वाचकांना सादर करताना खूप आनंद होत आहे.

५ डिसेंबर, २०१८



**बाबा भांड**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# लेखिकेचे प्रास्ताविक निवेदन

काही वर्षापूर्वी एका अमेरिकन मित्राने विचारले होते, "गांधी स्वतः काही लिहीत होते काय?" या सद्‌गृहस्थाला गांधींनी स्वतः लिहिलेले पुस्तक वाचावयाची इच्छा होती. त्यावेळी या प्रश्नाचे मला आश्चर्य वाटले होते. ते गृहस्थ तर परदेशी होते; पण भारतातही कधीकधी असे प्रश्न समोर आले आहेत. आज तर अशी स्थिती आहे की, देशाची बिघडलेली अवस्था आणि सांप्रदायिक अशांतता यांसाठी, उच्च शिक्षण घेतलेले तरुणही गांधींनाच जबाबदार समजतो, शाळा-कॉलेजांतून, सरकारी नोकऱ्यांतून आरक्षण इत्यादीमुळे जी समस्या निर्माण झाली आहे तिचे जनक गांधीच होत व त्यांच्यामुळेच सुशिक्षित तरुणांच्या उन्नतीस व भरभराटीस बाधा निर्माण झाली आहे; अशी या तरुणांची सर्वसामान्य धारणा आहे. या तरुणांच्या दृष्टीने, खलिस्तानची मागणी म्हणजे पाकिस्तानच्या निर्मितीच्या राजकारणाचे नवे रूप असून त्याचा दोषही गांधींच्याच माथी मारला जातो. अशा गोष्टींनी मी प्रक्षुब्ध होते; पण सारे ऐकून घेते. ही चर्चा पुढे वाढवून जर मी प्रतिप्रश्न करू लागले तर आढळते की, या युवकांचे वस्तुस्थितीचे ज्ञ ाान जवळजवळ शून्य आहे. यात त्यांचा दोष आहे असे मला वाटत नाही. त्यांनी गांधींचे सत्याचे प्रयोग वाचलेलेच नसते. शिवाय गांधींची ही आत्मकथाही १९२२ पर्यंतचीच आहे. महादेवभाई देसाईंनी मोठ्या परिश्रमांनी गांधींच्या चरित्राची सामग्री एकत्रित केली होती, परंतु त्यांचा तर गांधीजींच्या आधीच मृत्यू झाला. गांधींच्या पश्चात्, त्यांचे दुसरे सेक्रेटरी, प्यारेलाल नायर यांनी गांधींवर चार बृहद्‌ग्रंथ लिहिले व ते प्रकाशितही झाले. परंतु आजच्या युवकाजवळ वेळ, शक्ती आणि निग्रहाचा एवढा अभाव आहे की, तो या ग्रंथांचा लाभ घेऊ शकत नाही. 'गांधी' चित्रपटाने बऱ्याचअंशी ही उणीव भरून काढली असली तरी, चित्रपटाला स्वतःची अशी एक मर्यादा असते. आणि त्यातून सिद्धांतांचे सुस्पष्ट प्रकटीकरण अत्यंत कठीण असते.

मागल्या दोन वर्षांपासून माझे पती श्री गजानन कुलकर्णी काबुल येथे कामानिमित्त होते. आंतरराष्ट्रीय क्लबमध्ये तेव्हा गांधी चित्रपट दाखविण्यात आला. सर्व प्रेक्षक अत्यंत प्रभावित

झाले होते. त्यानंतर दोनएक दिवसांनी आमचे एक इंग्रज मित्र श्री. लरीश म्हणाले, गांधींचे व्यक्तिमत्त्व विलक्षण होते. परंतु एक गोष्ट मानली पाहिजे की, प्रतिपक्षी इंग्रज असल्यामुळेच गांधींचा सत्याग्रह यशस्वी होऊ शकला. इंग्रज आपल्या चोख लोकशाहीसाठी व कायद्याच्या राज्यासाठी जगभर विख्यात आहेत. हिटलर किंवा स्टालिनशी सामना असता तर गांधींची अहिंसा उन्मळून पडली असती व एखाद्या यातनाघर वा छळ-छावणीमध्ये त्यांचे जीवन संपले असते. गांधींच्या सैद्धांतिक भूमिकेच्या प्रामाण्यावर हा तीक्ष्ण आघात होता. अत्याचारांपुढे कोमेजून जाईल तो सत्याग्रहच कसला? 'सत्य' असेल तर ते शाश्वतच असले पाहिजे. लहानपणी मी नैतिक मूल्यांचे प्रयोग बघितले होते व त्यांचे शुभ परिणामही पाहिले होते. सत्याग्रह कधी पराभूत होऊच शकत नाही. त्याची शुद्धता मात्र निर्विवाद असली पाहिजे. मनात दुर्हेतू बाळगून सत्याग्रह होऊ शकत नाही. असा दुबळा सत्याग्रह ऐनवेळी मोडून पडतो. पण आजच्या पिढीला तर हे माहीतच नाही. आजच्या दिखाऊ, चारित्र्यहीन नेत्यांना बघूनच ते गांधींना जोखू पाहतात. अशा स्थितीत त्यांनी चुकीची धारणा स्वीकारली तर त्यांचे अज्ञान क्षम्य होय.

इंग्रजीत एक म्हण आहे की, "परमेश्वर संतांना अनुयायी देऊन शिक्षा करीत असतो." महात्मा गांधीदेखील त्यांच्या नावाचा टिळा लावणाऱ्या गांधीवाद्यांच्या पाखंडाची शिक्षा भोगीत आहेत. अशा वातावरणात प्रतिकूल परिस्थितीने गांजलेला आजचा दुर्दैवी तरुण जर संभ्रमात सापडून गांधींना दोष देत असेल तर त्याचा रोष करणे उचित नव्हे. दोष आहे परिस्थितीचा! ही परिस्थिती मी बदलू शकते, असा दावा करण्याचे धारिष्ट्य माझ्यात नाही. परंतु वारंवार असे प्रश्न ऐकून बापूजींचे जीवन आणि स्वातंत्र्य संग्रामाची खरी हकीगत सांगणे माझे कर्तव्य होय. त्यासाठीच साध्या सरळ भाषेत खरा इतिहास वाचकांसमोर ठेवण्याचे साहस मी करीत आहे.

प्रस्तुत पुस्तकात अशा अनेक गोष्टींचा उल्लेख आहे ज्या मी माझे वडील, काका किंवा आजोबा यांच्या तोंडून ऐकल्या आहेत अथवा तत्कालीन वातावरणात मला जाणवल्या आहेत. अतिशयोक्ती आणि असत्य यांपासून दूर राहण्याचा मी शक्य तेवढा प्रयत्न केला आहे. किमानपक्षी बापूजींच्या व्यक्तित्वावर अन्याय न व्हावा याचे सतत भान ठेवले आहे. बापू या देशाचे पिता म्हणविले जातात. मुलांना आपल्या माता-पित्यांच्या चरित्राचे समालोचन करण्याचे स्वातंत्र्य असते. त्यादृष्टीने बापूजींची समालोचना करण्याचा, त्यांचे दोष दाखविण्याचा आजच्या तरुणांना पूर्ण अधिकार आहे. परंतु दोष दाखविण्यापूर्वी आपल्या पितामहाची वास्तव कथा जाणून घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावर आहे. यासाठीच मी आपल्या कुटुंबातील प्रथा सोडून हे पुस्तक लिहून प्रदर्शन प्रवृत्ती प्रकट करण्याचा व काही अंशी अहंची पुष्टी करण्याचा अपराध केला आहे. वाचक हे क्षम्य समजतील ही नम्र अपेक्षा!

हे पुस्तक मीच लिहिलेय हे खरे पण त्याचे प्रेरक बापूजीच होत; ते आम्हा मुलांच्या रक्तात भिनलेले आहेत. त्यांनी केलेल्या नैतिकतेच्या संस्काराच्या बळावरच आम्ही हा अनमोल वारसा ओळखू शकलो व त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करू शकलो. कुठे पाय अडखळले असतील तर दोष आमचा आहे. आमच्या हजार चुका असल्या तरी आज जे काही आम्ही आहोत ते बापूजींमुळेच! त्यांच्या वैचारिकतेने आमचे व्यक्तित्व सावरलेले आहे. त्यांना धन्यवाद देणे हे तर दुस्साहसच! परंतु आमचे व्यक्तिसर्वस्वच बापूजींमुळे साकारलेले होते तेव्हाही कहाणीही त्यांच्या चरणीच अर्पण आहे.

ज्या आत्मिक भरणपोषणामुळे हे पुस्तक हातून लिहून झाले त्याचे श्रेय माझे वडील रामदास गांधी आणि काकांना तर आहेच, पण त्यांच्याबरोबरच महादेव देसाई, स्वामी आनंद, नरहरी पारीख, किशोरलाल मश्रूवाला, प्यारेलालजी, सुरतचे कल्याणजी मेहता, मीठूबेन पिटीट, मृदुला बहन साराभाई, राजकुमारी अमृत कौर, मीराबहन, दादाभाई नवरोजजींची कन्या खुर्शीदबहन, सरोजिनी नायडू, उत्तर प्रदेशचे आचार्य नरेंद्रदेव आणि बाबू त्रिलोकीसिंह, जयप्रकाश नारायण, जवाहरलाल नेहरू यांसारख्या गुरुजनांकडेही हे श्रेय जाते. याशिवाय आमचे मित्र भालचंद्रभाई शाह, देविकाबहन पटेल, वसुबेन शाह, सुमित्रा हायनर्ट, चंद्रचूडनजी, काबुलनिवासी पॉलमॅथ्यू व त्यांची पत्नी लीला मॅथ्यू इत्यादी अनेकांचा उल्लेख केला पाहिजे, कारण त्यांच्या आग्रहाने व शुभेच्छांनीच हे पुस्तक लिहिले गेले. यासर्व आप्तस्वकीयांची मी कृपापात्र आहे.

हे पुस्तक लिहिताना, मी माझे पती श्री. गजानन यांच्यावर मोठा अन्याय केला आहे. काबुलच्या अपरिचित वातावरणात, त्यांच्या सुखसोयींचा बळी देऊन हे पुस्तक लिहिले गेले आहे. एवढी शिक्षा पुरी नव्हती म्हणूनच की काय, प्रत्येक दिवशी लिहून झालेल्या भागाचे वाचन करून त्यांत सुधारणा करण्याचे कामही त्यांना करावे लागले. परंतु माझ्या परमसहिष्णू पतीने माझा हा अपरिपक्व प्रयत्न उदारतेने केवळ सहनच केला असे नव्हे तर, मला या प्रयत्नात साथही दिली. काबुलमध्ये हिंदी टंकलेखनाची सोय उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत माझ्या पतींनी एका एका पानाची स्वहस्ते झेरॉक्स प्रत करून दिली तसेच माझे अव्यवस्थित लेखन आपल्या सूचनांनी परिष्कृतही केले. त्यांना धन्यवाद देण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही आणि असे करून त्यांना मी जे सोसायला लावले त्याचे ओझे हलके करण्याची माझी इच्छाही नाही.

मी आणि माझे पती तर आता वृद्ध होऊ लागलो आहोत. आमच्या विचारांनी समाजाचे काही बरे अथवा वाईट होणे नाही. समाजाला उंचावण्याची खरी जबाबदारी तर आजच्या तरुणवर्गावर आहे. आमची तीन अपत्ये, राम, कृष्ण आणि सोनाली अद्याप पंचवीस वर्षांची

झालेली नाहीत. तिन्ही मुलांनी आपल्या खेळण्या-बागडण्याच्या व मनोरंजनाच्या काळात आपल्या आईचा हा कंटाळवाणा वाटणारा उद्योग सहन केला; इतकेच नव्हे तर, सारे लेखन बसून ऐकलेही आहे. हे तिघे माझे श्रेष्ठ टीकाकारही आहेत. त्यांच्या टीकेने या पुस्तकाला खूपच साहाय्य केले आहे.

काही मित्रांचा आग्रह होता की, हे पुस्तक इंग्रजीत लिहावे म्हणजे त्याची सर्वत्र ख्याती होईल व आर्थिक लाभही चांगला होईल. प्रसिद्धी आणि पैसा दोन्ही मला प्रिय आहेत; पण माझा देश मला त्याहूनही प्रिय आहे. गुजराती माझी मातृभाषा आहे व इंग्रजी मला आवडते. या दोन्ही भाषांचा मोह सोडून मी हिंदीत लिहिण्याचा मार्ग अवलंबिला आहे. भारतातील पंचेचाळीस कोटी जनतेला हिंदुस्थानी भाषा समजते. माझे विचारविश्व घडविण्यात या लोकांचा विशेष वाटा आहे. हे पुस्तक वाचून निदान एक टक्का लोक जरी आपल्या विस्मृत वारसाचे महत्त्व पुनरपि ओळखू शकले व तो आपलासा करू शकले तर मला कृतकृत्य झाल्यासारखे वाटेल. या करताच हे पुस्तक मी गुजराती अथवा इंग्रजी ऐवजी हिंदीमध्ये लिहिले आहे. माझी हिंदी एकीकडे संस्कृतनिष्ठ आहे तर दुसरीकडे ती फारसी शब्दांनी प्रभावितही आहे. संस्कृत व फारसी भाषांतील जे शब्द नेमके व अर्थपूर्ण आहेत त्यांचा हिंदीत जसाच्या तसा उपयोग केल्याने भाषाशुद्धीच्या दृष्टीने अपराध ठरतो असे मला वाटत नाही. अन्य भाषांतील अशा शब्दांच्या वापरानेच हिंदी समृद्ध होईल असा माझा दृढ विश्वास आहे.

जगाच्या एका आडवळणी कोपऱ्यात, काबुलमध्ये, सर्व सामग्री एकत्र करणे कठीण होते. परंतु भारतीय दूतावासातील प्रथम सचिव श्री. विद्यासागर वर्मा यांनी आरंभापासूनच मला प्रोत्साहन दिले व दूतावासाच्या ग्रंथालयात साऱ्या सोयी उपलब्ध करून दिल्या त्यामुळे माझे काम पुष्कळच सोपे झाले. मी त्यांची ऋणी आहे.

माझे वडील रामदास गांधी आज या जगात नाहीत, पण माझी आई निर्मला गांधी हयात आहे. माझ्या सफलतेचा व संपन्नतेचा मूक स्त्रोत माझी आईच आहे. अजाण अशा मला आपल्या कुशीत घेऊन तिने मला वाढविले. आणि आज जे काही ऐश्वर्य मला लाभले आहे त्याचे फार मोठे श्रेय तिचे आहे. हे पुस्तक तिला आवडले तर मी कृतार्थ होईन.

या पुस्तकाच्या प्रकाशनात आमचे मित्र जगपाल किसन किचलू आणि त्यांची पत्नी सौभाग्यवती शीलाजी यांचे खूपच सहकार्य लाभले आहे. त्यांच्या आणि माजी संसद सदस्य

श्री. शंकर दयाळ शर्मा यांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. माझी बहीण तारा भट्टाचार्य हिच्या सूचनांचाही मला लाभ झाला आहे.

प्रारंभी असा विचार होता की, संपूर्ण ग्रंथ एकत्र प्रसिद्ध करावा पण तसे केले तर पुस्तक फार मोठे होत होते, म्हणून वाचकांच्या सोयीसाठी त्याची तीन खंडांत विभागणी केली आहे.

या पुस्तकांतील उणिवांची जबाबदारी व्यक्तिशः माझी असून ज्या उणिवा राहून गेल्या असतील त्यांच्यासाठी हात जोडून मी क्षमा मागते.

**सुमित्रा कुलकर्णी**

३० जानेवारी, १९८८
११, स्टर्लिंग पार्क,
अहमदाबाद, ३८० ०५२

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| अध्यक्षांचे मनोगत | .. | पाच ते आठ |
| लेखिकेचे प्रास्ताविक निवेदन | .. | नऊ ते चौदा |
| १. आमचे आजोबा | .. | १-११ |
| २. संस्कार-सिंचन | .. | १२-१९ |
| ३. कस्तुरबा गांधी | .. | २०-३६ |
| ४. आमची आजी | .. | ३७-४८ |
| ५. महाशिवरात्र | .. | ४९-६४ |
| ६. हरिलाल गांधी | .. | ६५-७९ |
| ७. एक दु:खी आत्मा | .. | ८०-९० |
| ८. मणिलाल गांधी | .. | ९१-१०४ |
| ९. माझे वडील रामदास गांधी | .. | १०५-११८ |
| १०. करुणामूर्ती रामदास | .. | ११९-१२६ |
| ११. नैष्ठिक रामदास गांधी | .. | १२७-१४४ |
| १२. देवदास गांधी | .. | १४५-१५७ |
| १३. पत्रकार देवदास | .. | १५८-१६७ |
| १४. प्रेमाची परंपरा | .. | १६८-१७० |


-------

# १

# आमचे आजोबा

आपल्या सत्य आणि अहिंसेच्या प्रयोगामुळे महात्मा गांधी जगभर एवढे प्रसिद्ध आहेत की, कधीकाळी तेही एक कुटुंबवत्सल गृहस्थ असतील हे लोकांना जाणवतच नाही. गांधीजी एक तपस्वी साधक होते आणि म्हणून साऱ्या सांसारिक संबंधांकडे त्यांनी पाठ वळविली होती; अशीच सामान्यतः लोकांची धारणा असते. गांधीजींची सत्याची साधना पराकाष्ठेची होती आणि सत्याच्या वेदीवर त्यांनी सारे काही ओवाळून टाकले होते, यात शंका नाही. परंतु या मुमुक्षू अवस्थेतही त्यांच्यामध्ये एवढे माधुर्य आणि एवढी करुणा होती की, आपल्या अनासक्तिसाधनेबरोबरच ते आपली कौटुंबिक भूमिकाही यथोचितरीतीने निभावीत असत. संसारापासून सर्वथा अलिप्त असूनही ते आपल्या परिवाराला साथ देत असत आणि आध्यात्मिक विकासात सक्रिय मार्गदर्शनही करीत असत. त्यामुळे जगासाठी ते महात्मा असले तरी आम्हा मुलांसाठी मात्र ते आजोबा होते.

बापूजी आयुष्यभर एवढे प्रवासात राहिले की, त्यांच्या कुटुंबीयांना त्यांचे सतत सान्निध्य लाभणे कठीण होते. आम्हालाही त्यामुळेच आमच्या आजी-आजोबांचा निरंतर सहवास लाभू शकला नाही. आजोबा कधी कुठे निवांत बसून गप्पागोष्टी करू शकतात अथवा मुलांना मांडीवर घेऊन त्यांचे लाड करू शकतात; याचा आम्हाला पत्ताच नव्हता. गांधीजींच्या चार मुलांसाठी आणि त्यांच्या आम्हा चौदा मुलांसाठी (म्हणजे गांधीजींच्या नातवंडांसाठी) त्या त्या वेळी गांधीजींचे वास्तव्य जेथे असेल तेच आमचे घर बनून जाई. आम्हा सर्वांच्या जीवनात त्यांचे स्थान श्रेष्ठ होते. मनाने ते इतके उदार होते की, आपल्या चारी मुलांना, एका वयानंतर त्यांनी स्वतःच्या इच्छेप्रमाणे आपापले जीवन जगण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. आपली मुले कधीच नीति-नियमांचे उल्लंघन करणार नाहीत आणि निष्ठापूर्ण जीवन जगतील अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांची ही श्रद्धा सार्थ होती. हरिलालकाका व्यसनी होते परंतु त्यांनी इतरांना कधी ताप दिला नाही. स्वतः नाना तऱ्हेची दुःखे सोशीत ते एकाकीपणाची शिक्षा भोगीत राहिले; पण त्यांनी कधी कुणाचा विश्वासघात केला नाही, कोणावर अन्याय केला नाही. कधी स्वार्थ-साधना केली नाही. इतर तिन्ही मुलांचे चारित्र्य तर निर्विवादच होते.

२० सप्टेंबर, १९२४ ला गांधीजींना हिंदुमुस्लिम ऐक्यासाठी उपवास सुरू केला होता. उपवासाच्या चौथ्या दिवशी त्यांनी माझे वडील रामदास गांधी यांना पाठविलेल्या पत्रात

लिहिले, "ईश्वराने मला असे पुत्र दिले आहेत की त्यांच्या पुण्यप्रभावाने मी जगणार आहे." मुलांवरील ही श्रद्धा व त्यांना दिलेले स्वातंत्र्य यामुळे गांधीजी आणि त्यांच्या मुलांत अपार प्रेम होते. आम्हा नातवंडांनाही ते लाभत होते आणि त्यामुळेच, आम्ही जवळ अथवा दूर कुठेही असलो तरी, गांधीजींशी आमचा आंतरिक संबंध अतूट होता. त्यांचे श्रेय मात्र प्रामुख्याने गांधीजींचेच होते. कामामध्ये अत्यंत व्यस्त असूनही आम्हा सर्वांना ते प्रत्येक आठवड्याला पत्रे लिहीत असत व आमची सुखदुःखें माहिती करून घेत. एवढ्या प्रवासाच्या व एवढ्या कामांच्या घाईगर्दीतही ते आमची आठवण ठेवत, याचे मला फार आश्चर्य वाटते. त्यातून पत्रलेखनाला तर आणखीच श्रम-शक्तीची गरज असते. मात्र गांधीजींनी मृत्यूपर्यंत आपल्या परिवाराशी निकटतम संबंध राखले होते. त्यांनी आमच्या व्यक्तित्व विकासात अतीव रस घेतला आणि आम्हाला सदैव मार्गदर्शन केले. आमच्या जीवनातील लहानात लहान समस्याही त्यांनी समजून घेतल्या, त्यांवर विचार केला आणि त्यांची सोडवणूकही केली यामुळेच आम्हा चौदा भावंडांना गांधीजींविषयी कमालीची ओढ व जवळीक वाटे. फेब्रुवारी, १९२९ मध्ये रसिकभाईचा मृत्यू झाला, पण शेवटपर्यंत तो सांगत होता की त्याला बापूजींच्या जवळ पोहोचविल्यास तो बरा होईल. रसिकला साबरमतीस आपल्या जवळ पाठविले असते तर तो बरा झाला असता असा गांधीजींनाही विश्वास वाटत होता. परंतु होणारे कोणाला टाळता येत नाही हेच खरे ! रसिकभाईच्या अकालीमृत्यूनंतर आम्ही तेरा भावंडे उरलो.

रामीबहेनचा जन्म आफ्रिकेत झाला होता आणि आपली सून गुलाब व नात रामीबहेन विषयी गांधीजींना फार प्रेम होते. त्यांनी जेलमधूनही मणिलाल काकांना बजावले होते की, "तुझी वहिणीची उदास अवस्था असेल (कारण हरिलाल काकाही तेव्हा जेलमध्ये होते) यासाठी तिची विशेष काळजी घे." आपल्या अन्य सुनांविषयीही त्यांना अशीच चिंता व आत्मीयता वाटत असे. आपल्या मुलांपेक्षा त्यांना सुना अधिक प्रिय होत्या व आपल्या सुनांना ते मुलीप्रमाणे वागवीत.

आमच्याप्रमाणेच, जगातील अन्य असंख्य लोकांशी बापूजींचा पत्रव्यवहार असे. ही बहुतेक पत्रे हस्तलिखित असत. आमच्या आश्रमात एक इंग्रजी टंकलेखन यंत्र होते. हिंदी टंकलेखक तेव्हा उपलब्ध नव्हता. राजकीय कार्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाची पत्रे तेवढी या टंकलेखकावर टंकलिखित केली जात. इतर सर्व पत्रे बापूजी स्वहस्ते लिहीत व त्याची हस्तलिखित स्थळप्रतही तयार केली जाई. त्यावेळी आजच्याप्रमाणे झेरॉक्सची सोय नव्हती. एवढे सारे करण्यासाठी त्यांना कधी वेळ कमी पडत नसे. वेळेचे महत्त्व आणि मूल्य त्यांनी पुरेपूर जाणले होते आणि म्हणूनच प्रत्येक क्षणाचा ते यथायोग्य उपयोग करीत ते सर्वांचे

समाधान करीत परंतु कोणत्या कामासाठी व व्यक्तीसाठी किती वेळ द्यायचा याची मर्यादा मात्र कटाक्षाने पाळीत.

५ नोव्हेंबर, १९२९ ला बापूजींनी अलिगढहून माझ्या वडिलांना एक पत्र लिहिले होते. आजही त्या पत्रातील आशय प्रत्येक व्यक्तीला तेवढाच उपयुक्त ठरणारा असल्यामुळे ते पत्र उद्‌धृत करणे मला आवश्यक वाटते.

अलिगढ
५-११-२९

चि. रामदास,

तुम्हा तिघांना (रामदास, निर्मला, सुमित्रा)

नवे वर्ष सुखाचे जावो, असे म्हणण्याला काही अर्थ तर नाही हे मला माहीत आहे; कारण नवे-जुने हा भेद मनाने पुसून टाकला आहे. जिथे नव्या वर्षागमनाचा आनंद नाही आणि जुने संपल्याचा खेदही नाही तिथे नववर्ष सुखाचे जावो या म्हणण्याला काय अर्थ असू शकणार? पण एका दृष्टीने यालाही अर्थ आहे. नवे वर्ष सुखाचे जावो, या माझ्या शब्दांनी माझे आशीर्वाद सदैव तुमच्यापाशी जमा राहतील. नवे, जुने असा भेद माझ्याजवळ नसला तरी, ज्याला अजून पाठबळाची, आधाराची गरज आहे त्याच्यापाशी वडीलधाऱ्याचे प्रतिज्ञापत्र (आशीर्वाद) असले तर ते आश्वासक ठरेल. हे पत्र नीमूलाही उद्देशून आहे.

तुझे पडसे आता केव्हाच संपले असेल. पोटाची अवस्था आता कशी आहे? आजकाल काही वाचतोस का? यासाठी (वाचनासाठी) पाच मिनिटे जरी राखून ठेवली तरी त्याचा मोठा फायदा होतो. एका एका मिनिटाचा संग्रह करणारा आपले आयुष्य दीर्घ करीत असतो. आपले ओझे हलके करीत असतो आणि ज्ञानवृद्धी करीत असतो. एका मिनिटाचे काय, असे म्हणून अनेक लोक हजारो मिनिटे वाया घालवीत असतात. एक मिनिट मिळाले तर तेवढ्यात नीट बसून परमेश्वराचे ध्यान केले जाऊ शकते; किंवा जवळ टकळी असेल तर तेवढ्या वेळात सूत कातले जाऊ शकते; जवळ गीता असेल तर तेवढ्या वेळात गीतेचा एक श्लोक वाचला जाऊ शकतो. जी निर्मळ गोष्ट आवडत असेल ती या वेळात करता येईल. केवळ उदाहरण म्हणून मी या सूचना केल्या आहेत. खरी महत्त्वाची गोष्ट ही की कामाच्या मिनिटामिनिटाचा हिशेब दिल्याने माणूस आपल्यावरील ओझे कमी करीत असतो, आणि जे नवीन काम हाती घ्यावे लागेल ते त्याला ओझे वाटत नाही; नव्या कामासाठी मिळेल तेवढा वेळ तो उपयोगात आणतो. असे प्रामाणिकपणे व चोखपणे काम करूनही जर ते सफल झाले नाहीतरी त्याच्या

मनाची शांती ढळत नाही. त्याला त्याचे दुःख होत नाही. मला असे आढळून आले आहे की, अशी सवय लावून घेताना प्रारंभी कठीण जाते परंतु नंतर ही गोष्ट सहज, स्वाभाविक होऊन जाते आणि मग ती मुळीच कठीण वाटत नाही.

बापूचा आशीर्वाद

कस्तु. गांधींच्या आजारात त्यांची शुश्रूषा करताकरता बापूजींना वैद्यकशास्त्रही समजू लागले होते. नंतर डरबनमध्ये वकिली करीत असताना ते एका धर्मार्थ दवाखान्यात कंपाऊंडर आणि नर्सचे काम रोज दोनएक तास विनावेतन करीत. तसेच हीनदीन गरिबांची सेवाशुश्रूषा स्वतःही करीत. यामुळे त्यांना आजार, त्याचे निदान व त्यावरील उपचार चांगले कळत असत. रामदास आणि देवदास यांचे संगोपन बापूजींनी स्वतः केले होते त्यामुळे त्यांचे लहान मुलांसंबंधीचे निरीक्षण सखोल व त्यांचा अनुभव खूपच विस्तृत होता. माझ्या जन्माच्यावेळी बापूजींनी माझ्या आईवडिलांना अनेक उपयुक्त सूचना लिहून कळविल्या होत्या. माझी आई सांगत असे की लहान मुलांचे कपडे कसे शिवावे हे बापूजींनीच तिला शिकविले होते. माझ्या उपयोगाची पहिली दोन तीन आंगडी शिवण्यासाठी बापूजींनीच माझ्या आईला कापड बेतून कापून दिले होते. तसेच आम्हा सर्व भावाबहिणींची नावेही त्यांनीच ठरविली होती. जगासाठी बापूजी महात्मा होते. पण आमच्यासाठी मात्र ते मोठे प्रेमळ आजोबा होते. हरिलाल काकांची मुले बरीच मोठी असल्याने त्यांना बापूजींचा सहवासही बराच लाभला होता आणि रामीबहेन आणि मनूबहेनचे विवाहही त्यांच्या अनुमतीनेच झाले होते. कांतीभाई आणि रसिकभाई तर साबरमती आश्रमातच वाढले होते आणि त्यांनी बापूजींचे सर्व प्रयोग समजून घेऊन आपलेसेही केले होते. ही मोठी चार मुले व उरलेली आम्ही दहा भावंडे यांत वयाचे बरेच अंतर होते.

मणिलाल देवदास आणि रामदास यांचे विवाह उशिरा झाले होते व त्यांची मुलेही लहान होती. आमच्यापैकी माझा भाऊ कनू दीर्घकाळ बापूजी आणि मोठ्या आईच्या सहवासात राहिला होता. १९३६ मध्ये जेव्हा माझे वडील मुंबईत नोकरीत होते तेव्हा कनू देखील त्यांच्याजवळ होता परंतु त्या तीन वर्षाच्या बालकाला मुंबईची गर्दी आणि कृत्रिमता मानवली नाही; हे कळल्यावर बापूजींनी आजीला मुंबईस पाठविले होते व ती त्याला सेवाग्रामला घेऊन गेली होती. तेव्हापासून पाचसहा वर्षे कनू बापूजींच्या बरोबर राहिला व प्रवासातही प्रत्येकवेळी त्यांच्याबरोबरच तो असे. १९३७ च्या मे महिन्यात बापूजी सूरत जवळच्या तिथलच्या समुद्रकिनारी विश्रांतीसाठी गेले होते तेव्हाही कनू त्यांच्या बरोबर होता. त्यावेळी प्रत्येक दिवशी कनूला घेऊन ते समुद्रकाठाने पाण्यातून चालत असत व कनूला पळवीत असत. या दृश्याचे कुणा कुशल छायाचित्रकाराने

छायाचित्र काढले होते. या छायाचित्राला 'नेत्याचे नेतृत्व' असा मथळा देण्यात आला होता. बापूजींचे ते जगप्रसिद्ध छायाचित्र आहे.

कनू आजीचा विशेष लाडका होता. कनूचा खोडकरपणा तर साऱ्या देशात प्रसिद्ध होता. त्याने सेवाग्रामच्या शेतीत बघितले होते की, काहीही पेरले तरी त्याचे रोप उगवते. एकदिवस आजीच्या खोलीतील घड्याळ बेपत्ता झाले. जेव्हा घड्याळ कोठेच सापडेना तेव्हा कनूला विचारण्यात आले. तेव्हा कळाले की, घड्याळाचे झाड यावे म्हणून त्याने ते घड्याळ जमिनीत पेरले होते. पुष्कळ शोध घेण्यात आला, शेतजमीन बरीच उकरली गेली परंतु आपण घड्याळ कुठे पुरले ते कनू विसरून गेला होता. कदाचित आजही ते घड्याळ त्या जमिनीत कुठेतरी गंजत पडले असेल. एवढा अवखळपणा करूनही, आजीने त्याला चापटही मारली नाही की ती त्याला रागेसुद्धा भरली नाही. बापूजींनी त्याला जवळ घेऊन कोणती वस्तू उगवू शकते व कोणती नाही ते नीट समजावून सांगितले.

१९१७ मध्ये आजी राजकोटच्या तुरुंगात होती; तेव्हा आजीच्या वियोगात कनूने खाणेपिणे सोडून दिले होते. बापूजी अत्यंत चिंतित होते मोठ्या मिन्नतवारीने संध्याकाळी त्याला मोसंबीचा रस पाजण्यात ते यशस्वी झाले. परंतु कनू मात्र सारखा तणतणत होता की त्याला न विचारता आजी कुठे गेली होती? बापूजींनी शेवटी त्याला सांगितले की आजीच्या नावाचा जप केल्याने ती परत येईल. काही वेळ कनूने ध्यान लावून आजीचे नामोच्चारण सुरू ठेवले. परंतु आजी काही आली नाही तेव्हा कनू अत्यंत निराश झाला; आणि त्या रात्री तो बापूजींच्या कुशीतच झोपला. बापूजींनाही आपल्या 'कानम्'चा खूप लळा होता. त्याचा सारा अवखळपणा क्षम्य होता. आम्हा मुलांच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकासासंबंधी बापूजी नेहमी जागरूक असत. स्वत: अनेक कामांत व्यस्त असत त्यामुळे अनेकदा ते आजीला आपल्या मुलांकडे पाठवून देत असत. माझे वडील आणि देवदास काका जेव्हा जेव्हा आजारी पडले, तेव्हा-तेव्हा आजीने इतर सारी कामें सोडून त्यांची सेवा केली आणि जेव्हा तारा, रामू किंवा मोहनला बरे नसे तेव्हा आजीने स्वत: दिल्लीस जाऊन देवदास काकांना व काकींना आधार दिला. दिल्लीच्या वाऱ्या तर नेहमीच होत, त्यामुळे प्रारंभीच्या काळात बापूजी देवदास काकांकडेच थांबत असत.

तुरुंगात असतानाही बापूजींना व आजीला आम्हा मुलांची सतत काळजी वाटत असे. ते आमच्या आईवडिलांना आमच्याविषयी तपशिलवार सूचना करीत असत. बापूजींचे हस्ताक्षर वाईट होते आणि याची त्यांना जन्मभर खंत होती. त्यांचे पत्रातील अक्षर वाचणे हे मोठे कौशल्याचे काम असे. सारखे लिहूनलिहून त्यांचा हात आणि खांदा दुखू लागे. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी डाव्या हाताने लिहिण्याचा सराव केला होता. जेव्हा त्यांच्या पत्रातले

अक्षर सुवाच्च असे तेव्हा ते डाव्या हाताने लिहिले गेल्याचे आम्ही तात्काळ ओळखत असू. स्वतःचे अक्षर वाईट असल्यामुळे आमचे लेखन स्वच्छ, सुंदर असावे याचा ते आग्रह धरीत. १९४५ मध्ये त्यांनी माझी बहीण उषा हिला अक्षर सुधारण्यासंबंधी लिहिले होते. मला तर पेन्सिलीने लिहिण्यासंबंधी ते सतत टोकीत असत. माझा डोळा अधू असल्याने त्यांनी मला मोठ्या अक्षरांत लिहिण्यास शिकविले होते आणि आजही माझी ती सवय टिकून आहे.

भाषा शुद्धीविषयी बापूजींचा विशेष आग्रह असे. आम्ही मुलांनी, हिंदी, इंग्रजी, गुजराती शब्दांची खिचडी करून बोलणे अथवा लिहिणे त्यांना पसंत नव्हते. जी कोणती भाषा वापरावयाची ती शुद्ध असावी असे त्यांचे सांगणे असे. या संदर्भात वारंवार त्यांनी माझ्या चुका सुधारल्या होत्या आणि अनेकदा चेष्टा करून माझ्या चुका हास्यास्पद ठरविल्या होत्या. मी पिलानीच्या बालिका विद्यापीठात शिकत होते. आम्ही त्यांना प्रत्येक आठवड्यास पत्र लिहिलेच पाहिजे व त्यात वसतिगृहातील दिनचर्येचे वर्णन अवश्य असले पाहिजे; असा त्यांचा आदेशच होता. त्यावेळी मला 'स्टडी' या इंग्रजी शब्दाला हिंदी पर्याय माहीत नव्हता त्यांनी पत्रातून 'अभ्यास' हा शब्द कळविला होता. अशारीतीने, दूर प्रवासात असतानाही ते आमच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवित. वर्षातून एक सुटी तरी त्यांच्याबरोबर घालविली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. या काळात ते आमच्या उठण्या-बसण्यावर, बोलण्या-चालण्यावर चौकस नजर ठेवून असत. शंभर कामे असली तरी ते आम्हाला प्रोत्साहित करून चांगले वळण लावण्याचा प्रयत्न करीत त्यांच्या सहवासात राहणे हेच स्वयंसिद्ध जितेजागते शिक्षण असे. आम्हा मुलांवर त्यांचे विशेष प्रेम असल्यामुळे, सहजभावाने आमच्यावर त्यांच्याकडून सुसंस्कार घडत.

बरोबरच्या इतर मुलांचे बघून पिलानीच्या विद्यालयात असताना मीही, आईकडे सोन्याच्या बांगड्यांची मागणी केली. बापूजींना जेव्हा हे कळाले तेव्हा अलंकारांची आवश्यकताच काय यासंबंधी व विशेषतः बांगडी म्हणजे तर हातकडीचेच आधुनिक रूप असल्यासंबंधी त्यांनी मला पत्रात तर लिहिलेच पण एवढ्यावर न थांबता, आमच्या विद्यालयाच्या प्राचार्या देवकी अम्मा यांनाही एक लांबलचक पत्र लिहिले की, विद्याभ्यास करणाऱ्या मुलींनी अलंकार घालावेत, त्यांची मागणी करावी हा शिक्षण पद्धतीचा दोष असून, त्यांनी अशा आकर्षण व लालसेपासून मुलींना वाचविले पाहिजे. देवकी अम्माने आजही ते पत्र एक मौल्यवान ठेवा म्हणून जतन करून ठेवले आहे. आमच्या वडिलांनीही नागपुरातच राहण्याचा खास निर्णय घेतला तो, आम्हा मुलांना बापूजी व आजीची जवळीक लाभावी, त्यांच्या गाठीभेटी सोयीस्कर व्हाव्यात याचा हेतूने त्या काळी प्रत्येक शनिवार-रविवार आम्ही सेवाग्रामला जात असू. सेवाग्राममध्ये आम्ही तीन भावंडे, बापूजींच्या दोन्ही बाजूस व आजीच्या जवळ जेवावयास बसत असू. आमची प्रकृती कशी आहे आणि आम्ही काय खाल्ले पाहिजे याकडे बापूजी बारकाईने लक्ष देत.

आजी जेव्हा तुरुंगात असे तेव्हा ती आम्हा मुलांना पाळीपाळीने पत्र लिहीत असे. वर्गात आमचा नंबर खाली आला तर हळुवार प्रेमाने टोमणा मारून विचारीत असे की, "दुसरा नंबर का आला? पहिला नंबर कुठे निसटला?" मी वयात येत होते तेव्हा आजीने आगाखान पॅलेसमधील बंदिवासामधून स्वतः कातलेल्या सुताची, चटणी रंगाची सुंदर किनार असलेली साडी माझ्यासाठी पाठविली होती. माझ्या आईच्या तर बहुधा माझे वयात येणे लक्षातही आले नसावे परंतु इंग्रजी राज्याच्या तुरुंगात काटेरी तारांमागे बंदिस्त असलेल्या आजीने मात्र आपल्या नातीविषयीच्या प्रेमाची व जबाबदारीची पूर्तता केली होती. मी इतकी नालायक होते की ती साडी नेसून थोड्याच अवधीत तिची लक्तरे करून टाकली. आज तिचा एक तुकडाही उरलेला नाही परंतु तिची गोड आठवण आजही माझे मन प्रसन्न करते.

एकदा कनूने बापूजींकडे कॅमेरा मागितला तेव्हा १९४० मध्ये बापूजींनी त्याला लिहिले-

चि. कानम,

अभ्यासात तू जेव्हा सर्वांचे समाधान करशील तेव्हा कॅमेरा तुझ्या खिशात असेल असे समजावे,

बापूजींचे आशीर्वाद.

त्याच पत्रात उषासाठीही दोन ओळी लिहिल्या आहे. १९४४ मध्ये माझी आई माझ्या डोळ्यांवरील उपचारांसाठी मला मुंबईस घेऊन गेली होती. कनू आणि उषा नागपुरात वडिलांजवळ होते. त्यावेळी बापूजींनी माझ्या वडिलांवर ताण न पडावा म्हणून त्या दोघांनाही आग्रहपूर्वक सेवाग्रामला बोलावून घेतले होते. संपूर्ण दोन महिने, कनू आणि उषा आजीबरोबर सेवाग्रामला राहिले होते. डोळ्याच्या ऑपरेशननंतर सात महिने वाचनाची मला मनाई करण्यात आली होती. तेव्हाही बापूजींनी मला आपल्याजवळ ठेवून घेतले होते. अशारीतीने आजी-आजोबांजवळ राहण्याने व त्यांच्यासह प्रवास केल्याने आमच्या शाळा वारंवार बुडत असे. यामुळे आमचे शालेय शिक्षण काहीसे उणे पडले असेलही. पण त्यांचा आम्हाला लाभलेला सहवास व त्यातून झालेले संस्कार यांचे मोल करणे शक्य नाही.

माझ्या वडिलांचे अथवा देवदास काकांचे पत्र ठरल्या दिवशी मिळाले नाही तर लागलीच बापूजींचे पत्र येत असे व ते दोघेही ओशाळल्यागत होत असत. एका ओळीचे पोस्टकार्ड आले तरी बापूजींचे समाधान होई, परंतु मुलांच्या अथवा नातवांच्या खबरबातीवाचून राहावयास ते तयार नसत. सततचा प्रवास आणि राजकीय कार्याची व्यस्तता यांमधूनही वेळ काढून ते आम्हा सर्वांना सर्व गोष्टींचे सविस्तर पत्र लिहीत असत. कस्तुरबांच्या मृत्यूनंतर मणिलाल काकांनी बापूजींनी कस्तुरबांना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह प्रसिद्ध केला होता. त्या पत्रांतून अपार प्रेम, चिंता आणि अनुराग व तत्परता प्रकट झालेली आहे. हा संग्रह अद्वितीय

आहे. एक महात्मा आपल्या अशिक्षित सहचारिणीला प्रेमाने व आदराने लहानसहान घरगुती गोष्टी लिहून तिची जिज्ञासापूर्ती करी. या गोष्टींवर सहजासहजी विश्वास बसणार नाही, पण ही सत्य हकिकत आहे. अनन्य समर्पणाचे हे मोठे विलक्षण उदाहरण होय! कस्तुरबा आजीच्या मृत्यूनंतर बापूजी आतल्याआत सुन्न झाले होते. आपले एकाकीपण सहन करीत ते सतत कार्यरत राहत होते परंतु मनोमन कस्तुरबाचे स्मरण केले नाही असा क्वचितच एखादा दिवस उलटला असेल. आमचा सर्वांत लहान भाऊ गोपू फारच गोड पोरगा होता. आम्हा सर्वांचा तो अत्यंत लाडका होता. बापूजींचे त्याच्यावर विशेष प्रेम होते. सप्टेंबर १९४७ मध्ये गोपू तीन वर्षांचा होता. रोज सायंकाळी रामू, मोहन, तारा आणि गोपू बिर्ला हाऊसला बापूजींच्या भेटीसाठी जात असत आणि आपल्या फिरण्याच्या नित्यक्रमात बापूजी या नातवंडांना बरोबर घेत असत. त्यांचे जीवन सार्वजनिक असल्यामुळे यावेळीही इतर लोक त्यांच्या भोवती गोळा झालेले असतच. पण तशातही बापूजी वेळ काढून या आपल्या सर्वांत लहान नातवाशी खेळत असत. आपले आजोबा आपले सगळे दात तोंडातून काढून हातावर घेण्याची करामत करू लागतात याचे गोपूला अत्यंत आश्चर्य वाटत असे. बापूजी जवळ येताच गोपू त्यांच्या खोट्या दातांना हात लावत असे व त्यांना आपले दात बाहेर काढावयास लावीत असे आणि नंतर त्यांच्या बोळक्यासारख्या तोंडाची नक्कल करीत असे. आपले स्वत:चे दात असे बाहेर काढून हातात घेण्यासाठी अनेकदा गोपू हट्ट करीत असे. एके दिवशी अशा प्रसंगीच जवाहर लालजी गांधींना भेटावयास आले होते. बापूजी आणि गोपूचा संवाद ऐकून त्यांनी गोपूला आश्वासन दिले होते की तो जेव्हा बापूजी एवढा मोठा होईल तेव्हा त्यालाही आपले दात काढता-घालता येतील. सहजच एखाद्या दिवशी जर गोपू बापूजींना भेटू शकला नाही तर त्यांना सारखे चुकल्या-चुकल्यासारखे वाटे व त्या रात्री देवदास काका आणि काकींना हमखास 'गोपू का आला नाही?' अशी विचारणा होई.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या लगतच्या गहन गंभीर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गोपू बापूजींचा एक मोठा विरंगुळा बनला होता. त्याच्याशी हसण्याबोलण्यात ते आपल्या हृदयाची व्यथा आणि विषाद काही क्षणांसाठी तरी विसरून जात. फाळणीची वेदनादायक भीषणता आणि जातीय वैमनस्याची विकृतता यांनी विधुण्ण झालेल्या बापूजींच्या मनाला, आपला हा नातू विसाव्याचे स्थान बनला होता. मला वाटते हीच त्यांची विलक्षणता होय. एकीकडे ते सुख दु:खाबाबत समलोष्ठकांचन वृत्तीचे अनासक्त, नि:स्पृह स्थितप्रज्ञ होते. सत्याचे प्रखर साधक आणि अहिंसेचे अनन्य उपासक होते. तर दुसरीकडे, त्यांच्या हाती मनुष्यसुलभ भावना एवढ्या प्रबळ होत्या की आपल्या नातवांशी एकरूप होऊन ते खेळू शकत होते आणि घटकाभराच्या या हास-परिहासाने, देशाच्या साऱ्या समस्यांपासून मुक्त होऊन निरागस आनंदाचा उपभोग घेऊन ते मनाचे सांत्वन करू शकत होते.

आम्ही आपल्या लहान जगात डाळ-तांदूळ आणि तेल-तुपाच्या घरगुती गोष्टींनी हसू विसरून, सारखे चिडचिडू लागतो तेव्हा, परिस्थितीचे गांभीर्य पूर्णतया ओळखूनही जीवनाचा निरामय आनंद मोकळेपणाने घेण्याची त्यांची साधना आणि सिद्धी जाणवल्याविना राहत नाही. बापूजींच्यासारखे मुक्त आणि मधुर हास्य मी अन्यत्र ऐकलेले नाही. देशी-विदेशी सत्तेविरुद्धची त्यांची लढाई अहिंसक असली तरी मोठी कठीण होती. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणे व तीस कोटीच्या देशाला सत्याग्रहाच्या मार्गावर आणणे महाकर्म कठीण होते. त्या बांबू आणि ताडपत्रीच्या सेवाग्राममधील झोपडीत देशातल्या साऱ्या नेत्यांना बापूजींशी चर्चा करताना मी बघितले होते. हे सारे लोक चिंताग्रस्त असल्याचे माझ्या बालबुद्धीलाही जाणवत असे. परंतु दुसऱ्याच क्षणी बापूजींचा हास्यविनोद कानी पडे व भोवतालच्या सर्व लोकांचे चेहरे चिंतामुक्त होऊन प्रसन्न दिसू लागत. गंभीर वातावरणाचे गडद ढग बापूजींच्या खळखळत्या हास्याने पांगून जात असत. त्यांची स्थितप्रज्ञता एवढी होती की कठीण समस्येतूनही मनाला अलिप्त करून ते जीवनातील ताण कमी करू शकत असत. या विनोदप्रियतेत आणि मुक्त प्रसन्नतेत सरदार पटेल त्यांचे साथीदार असत. दोघांचेही बुद्धिचापल्य प्रत्येक स्थितीत विनोद हुडकण्यात समर्थ होते. आम्हा मुलांबरोबरही हास्यविनोद केल्यावाचून बापूजींना राहवत नसे. आम्हा सर्व भावंडात, मुक्त आनंद घेण्याचा आणि परस्परांना हलकेच चिडविण्याचा हा आनुवंशिक गुण उतरला आहे. बापूजींसारखा वत्सल, नम्र आणि साधासरळ पिता क्वचितच आढळतो. माझ्या आई-वडिलांच्या पत्रांत त्यांचे एक वाक्य पुन्हा पुन्हा आढळते, "तुमच्या सुखातच माझे सुख आहे." हे ते वाक्य. ते किती प्रेमळ पिता होते याचे एकच उदाहरण पर्याप्त ठरावे.

११ मार्च, १९३० ला साबरमती आश्रम आणि सारा देशच, दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या दांडीयात्रा आणि मिठाच्या सत्याग्रहाच्या प्रतीक्षेत उत्कंठित होता. त्या रात्री क्वचितच कोणी झोपला असेल असे मीरा बहेनने म्हटले आहे. अफवांचा सुळसुळाट माजला होता. देशाचे आणि जगाचे डोळे बापूजींच्या संकल्पित महायात्रेवरील पहिल्या पदन्यासाकडे लागले होते. अशा वेळी कौटुंबिक पत्र व्यवहारास कुठून वेळ सापडणार? परंतु या साऱ्या खळबळीतही गांधीजी शांतपणे झोपू शकले होते आणि झोपण्यापूर्वी त्यांनी माझ्या वडिलांना पत्रही लिहिले होते. ते पत्र येथे उद्धृत करण्याचा मोह मी आवरू शकत नाही.

"चि. रामदास,

तुझे पत्र मिळाले. माझे हे पत्र कदाचित शेवटचेच असेल! मला संकलित यात्रा आरंभ करता येईल याचा मुळीच संभव दिसत नाही. आज रात्रीच माझा काय तो निकाल लागेल याचा दाट संभव आहे. तसे झाले तर मग पत्र लिहिणे जेव्हा जमेल तेव्हा जमेल! मी कशाही

स्थितीत असलो तरी सुखादुखांच्या गोष्टी लिहिता येतील; त्यामुळे अवसर मिळेल तेव्हा पत्र अवश्य लिहावे. नीमू (निर्मला गांधी, माझी आई) सध्या तुला सोडीत नाही हे बरोबरच आहे. तुला अटक झाली तरी तिने तेथेच (बार्डोली आश्रमात) राहणे उचित होय. तिने अंगावर पडेल ती जबाबदारी पार पाडावी. पण तिच्यात जर तेवढी हिंमत नसेल तर तिने सुखाने लखतरला (माहेरी) जावे. सध्यातरी तिचे येथे (साबरमती आश्रमात) राहणे योग्य वाटत नाही. कारण मी जर येथे नसलो तर बा (कस्तुरबा) अस्वस्थ झाल्याविना राहणार नाही आणि बहुधा तीही तुरुंगात जाईल. आश्रमातील इतर स्त्रियाही तुरुंगात जाण्याच्या कामात व्यस्त असतील. या परिस्थितीत नीमूने लखतरला राहणेच उत्तम होय. ही लढाईही दीर्घकाळ चालली आणि सुमी (सुमित्रा-लेखिका) मोठी झाली तर खुशाल तिने सत्याग्रहात उडी घ्यावी. नीमूचा सेवा करण्याचा काळ अजून संपलेला नाही; त्यामुळे तुरुंगात जाण्याची जराही हौस तिने बाळगू नये. सुमीला व्यवस्थित सांभाळणे हीदेखील एक प्रकारची समाजसेवाच होय. ते तिचे कर्तव्यही आहे. तुम्ही दोघे आपली प्रकृती सांभाळून राहाल तर ते पुरेसे आहे. कारण, तुला तर तुरुंगात जावे लागणार (बार्डोली आश्रमाचे व्यवस्थापक म्हणून) असे मला दिसते आहे आणि ते उचितही आहे. येथे माणसांची एवढी गर्दी झालीय सध्या की साबरमती आश्रम अगदी उफाळून आलाय. नीमूला निराळे पत्र लिहिण्यासारखी परिस्थिती नाही".

बापूचे आशीर्वाद.

प्रारंभी तर माझी आई बार्डोली आश्रमातच राहिली. परंतु नंतर तिचे राहते घर सरकारने जप्त केले आणि आश्रमासाठी सील लावले तेव्हा काही दिवस साबरमती आश्रमातील खादी भांडार ती सांभाळू लागली. काही दिवसांनी हे भांडारही सरकारने जप्त केले तेव्हा, मला घेऊन ती, सुरेंद्रनगर जवळच्या लखतर या आपल्या माहेरी गेली. तिथे तिचे आजोबा (आईचे वडील) तलकसिंह बेचरजी हे नगरशेठ होते. आपल्या माहेरी असताना आमची आई, सकाळी चार वाजता मुलामुलींची प्रभातफेरी काढीत असे व या प्रभात फेरीत राष्ट्रप्रेमाची गीते गाईली जात. दुपारी महिलांचा चरखा चालविण्याचा सराव होत असे आणि रात्री प्रौढ शिक्षण वर्ग ती चालवीत असे. लखतरचे राजे साहेब मोठे धर्मपरायण वैष्णव होते. गांधींच्या या सुनेचा नगरशेठजींच्या नातीचा ते मोठा सन्मान करीत. सत्याग्रहाच्या त्या दिवसांत, इंग्रज रेसिडेन्टची भीती न बाळगता राजेसाहेब माझ्या आईच्या रचनात्मक कार्याला प्रोत्साहन देत असत. त्यावेळी माझी आई केवळ वीस वर्षांची होती.

विनोदप्रियता आणि नम्रतेबरोबरच बापूजींच्या स्वभावात शालीनताही पुरेपूर होती. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत त्यांच्या आचार विचारांतील सभ्यता ढळली नाही. १९३१ च्या गोलमेज परिषदेसाठी, बापूजीं हे एकमेव भारतीय जनतेचे प्रतिनिधी होते. बाकी सारे ब्रिटिश

सरकारने निवडलेले होते. लंडनमध्ये सम्राट पंचम जॉर्ज यांनी, गोलमेज परिषदेच्या सदस्यांच्या सन्मानार्थ एका मेजवानीचे आयोजन केले होते. या मेजवानीलाही बापूजीं आपल्या नेहमीच्या पोशाखातच (तोटका पंचा व उपरणे) गेले होते. बापूजींनी नमस्कार केल्यावर ब्रिटिश साम्राज्याच्या या अधिपतीने काहीशा रोषानेच बापूजींना म्हटले, "माझ्या पोलीस दलावर आपले अधिक आक्रमण मी इत:पर सहन करणार नाही." हा इशारा होता आणि मुद्दा वादाचा होता. सामान्य तर अशा मेजवानीच्या प्रसंगी सन्मानाच्या हेतूने बोलावलेल्या पाहुण्याला असा इशारा देणे अथवा त्याच्याशी वाद करणे सभ्यतेचे मानले जात नाही. इंग्रजांना आपल्या सभ्यतेचा आणि आचारसंहितेचा मोठा गर्व आहे आणि त्यातून त्यांच्या राजाच्या वर्तनातील सुसंस्कृततेविषयी तर दुमत असताच कामा नये. परंतु या अर्धनग्न फकिराच्या कारवायांनी सम्राट अत्यंत त्रस्त होते. त्यांनी निमंत्रित पाहुणा असलेल्या गांधींना धमकी दिली. मात्र गांधीजींची शालीनता अधिकच श्रेष्ठप्रतीची होती. नि:संकोचपणे पण सभ्यतेने बापूजी म्हणाले, "महाराज, आपला पाहुणा आहे तोपर्यंत असल्या वादात मी पडू इच्छिणार नाही." एका अर्ध नग्न फकिराच्या तोंडून असे शालीन शब्द ऐकून सम्राट पंचम जॉर्ज मनोमन संकोचले आणि त्या भारतीयास प्रतापी भारतीयाला तेथेच सोडून, अन्य तोंडपुज्यांची सुलभ संगत शोधण्यास निघून गेले.

# २

# संस्कार-सिंचन

जगातील सारेच आजोबा आपल्या नातवंडावर प्रेम करतात. कधीकधी फाजील लाड करून या मुलांना बिघडवितातही. परंतु बापूजींचे प्रेम मात्र आमच्या सुप्त संस्कारांना सुदृढ करीत असे. त्यांच्या महात्मतेच्या असीम प्रभावाच्या छायेत आम्ही मुले असभ्य लफंगे बनलो नाहीत हा त्यांच्या आणि त्यांच्या चारही पुत्रांच्या शिकवणीचाच सुपरिणाम होता. अप्रतिम प्रेमाबरोबरच बापूजीं आम्हा मुलांना शालीनतेची निःशब्द शिदोरीही देत असत. आमच्या वागण्या-बोलण्याच्या पद्धतीविषयी बापूजी अत्यंत जागरूक असत. आम्हा सर्व मुलांत, प्रत्येक स्तरावर एक अदम्य निर्भयता आहे आणि आमच्या मुलांतही ती उतरलेली आहे. आम्हाला एकदम कधी कसली भीती वाटत नाही तसेच चिंताग्रस्त होऊन आम्ही कधी व्याकूळही होत नाही आणि त्यामुळेच एका अव्यक्त समाधानाने व धैर्याने आम्ही आपले जीवन व्यतीत करू शकतो. जीवन म्हटले की, समस्या तर असणारच! कधी गुंतागुंतीचे प्रश्न गुरफटून टाकतात, तर कधी निराशा घेरून टाकते. दुःख, वेदना, आजार हे तर नेहमीच अनुभवाला येतात. परंतु या झंझावातातही आम्ही या ना त्या रीतीने टिकूनच राहतो. बापूजींच्या अनासक्ती योगाचाच हा अव्यक्त महिमा म्हटला पाहिजे, जो पावलोपावली आमचा आधार बनून नियतीच्या आघातांपासून आमचे रक्षण करतो.

घरचे अथवा समाजाचे असे कोणतेही काम नाही की, जे करताना आम्हाला कधी संकोच अथवा लाज वाटते. संडाससफाईपासून ते राष्ट्रपती भवनातील ऐटबाज शिष्टाचारापर्यंत सारे प्रसंग आम्ही यथोचित निभावून नेऊ शकतो. घरातील भांडी घासणे, कपडे धुणे उरकल्यानंतरही कार्यालयीन कामे करताना काहीच अडल्यासारखे वाटत नाही. बापूजीं कर्मयोगी होते आणि श्रमाच्या श्रेष्ठतेवर विश्वास ठेवणारे होते. त्यामुळेच आम्हा मुलांनाही कोणतेही काम हलके अथवा लज्जादायक वाटत नाही. माझे वडील आणि मणिलालकाका व देवदासकाका संडाससफाई करीत असतानाही अत्यंत सुंदर व शालीन वाटत असत. माझे वडील संडास साफ करताना देवाचे नामस्मरण करीत व गीतेचे श्लोकही म्हणत. देवदासकाकांचे ललित वाङ्‌मयाचे प्रेम आणि त्यांची साहित्यिक चर्चा, संडास सफाईच्या प्रसंगीही प्रकट होत असे. मणिलालकाका मोठ्या गांभीर्याने अत्यंत उत्तम सफाई करीत. आम्ही तेरा नातवंडे, त्यांच्याप्रमाणे श्रेष्ठ नसलो तरी आमच्या कामावरही कोणाला देखरेख

करण्याची गरज नसते, तसेच सांगितल्या कामाची आम्हाला पुन्हा आठवणही करून देण्याची आवश्यकता पडत नाही. जे करणे योग्य असते ते आमच्या कुवतीनुसार साऱ्या कौशल्याने करण्याची आमची इच्छा असते व बहुधा आम्ही त्याप्रमाणे करूनही दाखवितो.

आम्ही सर्वजण महत्त्वाकांक्षी आहोत व आमची भरभराट व्हावी अशी आमची इच्छा पण असते. आम्हाला द्रव्यार्जनाचा मोहही आहे; तसे आम्ही कोणी साधू नव्हत. परंतु इतरांचे शोषण करून वा इतरांवर अन्याय करून, स्वतःच्या विकासासाठी निर्दय स्पर्धा करण्याइतक्या आमच्या आशा आणि अभिलाषा बेलगाम व स्वैर नाहीत. योग्य आणि अयोग्य यांतील सूक्ष्म सीमारेषा ओळखण्याइतके धैर्य, समज आणि समतोलपणा आमच्यात आहे या सीमारेषेची असिधारा अक्षुण्ण ठेवण्यात आम्हाला बहुधा यश येते. हातून काही गैर कृत्य घडलेच तर आमचे मन आतल्या आत स्वतःला खाऊ लागते आणि वेळ येताच पश्चात्ताप व्यक्त करून क्षमायाचना करून शिक्षा भोगण्यासही आम्ही सिद्ध असतो.

आम्हा सर्वांत निर्भयता असल्यामुळे खोटे बोलण्याची आम्हाला क्वचितच गरज पडते. याचा अर्थ आम्ही सत्यवादी राजा हरिश्चंद्र आहोत असा मात्र नव्हे. जीवनातील जटिल समस्या, सत्यभाषणानेच सुलभतेने सोडविता येतात असा आमचा दृढ विश्वास आहे. सामान्य माणसाप्रमाणे आमच्यातही अनेक त्रुटी आहेत; परंतु आपल्या चुका कबूल करण्यात आम्हाला काहीच अडचण वा गैरसोय वाटत नाही. खऱ्या खोट्याच्या फेऱ्यात सापडावे इतके आम्हाला कोणाचे भयही नसते व कसली लालसाही नसते. परिणामांच्या भीतीने, असत्याचा आश्रय घेऊन आम्ही आमचे जीवन व्यर्थ नासवू इच्छित नाही. आमच्यावरील खोलवर अहिंसेचे संस्कार रुजलेले आहेत आणि त्यामुळे एकदम हिंसेकडे आमचे मन वळत नाही. प्रत्यक्ष हिंसेपेक्षा हृदयात दडलेली हिंसा कितीतरी कुटिल असते. आम्ही या साऱ्यातून मुक्त आहोत असे नव्हे पण हृदयात हिंसेला थारा न देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असतो. आमच्या परिवारात, वर्णभेद, जात-पात, स्पृश्यास्पृश्य या भेदभावांचा सर्वथा अभाव आहे. परवापरवापर्यंत मला आपल्या जातीचा पत्ता नव्हता. अलीकडे राजकारणाचा जवळून परिचय होण्याची संधी लाभल्यामुळे मात्र जातिभेदाचे प्रथमदर्शन झाले. त्यानंतर बाबू जगजीवन रामांनी यासंबंधी बरेच काही सांगितले. त्यामुळे आता या विषयाची समज वाढलीय. पण आमची जात कोणती, याचा आम्हाला आजही पत्ता नाही. आम्ही वाणी आहोत, ब्राह्मण आहोत की, क्षत्रिय हे सांगता येत नाही. माझी बहीण तारा हिचा विवाह ब्राह्मणाबरोबर झाला; उषाचा विवाह क्षत्रियाशी झाला आणि मी एका सारस्वत ब्राह्मणाची पत्नी आहे. केवळ चेष्टा विनोद करण्यापलीकडे या जातिभेदांची आम्हाला कधी जाणीव होत नाही. आम्ही तर हरिजन पितामहाची आणि शेतकरी कुटुंबातील मुले आहोत. आम्ही केवळ आमच्या पुरुषार्थाच्या

बळावर समाजात उभे आहोत. आम्ही जे काही मिळविले ते आमच्या निढळाच्या घामाने मिळविले असून, यात इतरांची सद्भावना आम्हाला लाभली असली तरी कोणाचा आधार वा आश्रय आम्हाला लाभलेला नाही व आम्ही त्याची अपेक्षा बाळगलेली नाही.

अन्याय सहन न करणे ही आम्हा सर्वांची सवय असून अन्यायाच्या प्रतिकारार्थ आम्ही तुटून पडतो. आजच्या समाजात प्रत्येक स्तरावर व्यक्तीच्या स्वाभिमानाचे खंडन होत असते. जिथे जात तिथे गरिबाला झिडकारले जाते. टेलिफोन ऑपरेटर असो, बँकेचा क्लार्क असो, पोस्टातील कारकून असो, गरीब माणसाशी कोणीही धड वागत नाही. विमानाचे, रेल्वेचे अथवा बसचे तिकीट काढावयाचे असो, प्रत्येक ठिकाणी सामान्य माणसाला अपमानाला तोंड द्यावे लागते. ज्याच्या पैशाच्या बळावर हे कर्मचारी जगत असतात त्या नागरिकांचीच हे कर्मचारी अवहेलना करीत असतात. ज्या कोणाकडे थोडीशीही सत्ता असते तो इतरांवर रूबाब गाजवीत असतो. त्यातच भ्रष्टाचाराची तर सर्वदूर चलती आहेच! बिचारा नागरिक आपल्याच सरकारकडून व समाजाकडून प्रताडित, शोषित होऊन निराश जिणे जगत असतो. आजच्या समाजात गरीब माणसाचे सर्वतोपरी अवमूल्यन झालेले आहे. त्याची बेइज्जती होते व त्याला पदोपदी ठोकर बसत असते. मध्यमवर्गही जवळपास याच अवस्थेत आहे. ज्याच्याजवळ काळापैसा आहे तो एकाच्या ठिकाणी दोन देऊन आपले काम करून घेतो, पण त्याबरोबरच लाखो गरिबांचे अस्तित्व धुळीस मिळविले जाते. गरिबी असल्याबद्दल तक्रार करता येणार नाही कारण ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाचा, कदाचित दैवाचाही तो परिणाम आहे असे म्हणता येईल. परंतु स्वाभिमानावर होणारा आघात मात्र सहन करणे कठीण असते. कनिष्ठ-वरिष्ठ, राजा-रंक हा भेदभाव आम्हा गांधी परिवारांतील मुलांना सहन होत नाही आणि म्हणून आम्ही अडून बसतो. आमच्या कुटुंबियांना कधीकधी त्याचा त्रास सोसावा लागतो, परंतु आमची ती जित्त्याची खोड आहे; त्याला उपाय नाही.

गुजरातीत एक मोठी सुंदर म्हण आहे, 'उछीना श्राद्ध लेना.' म्हणजे उसने श्राद्ध घेणे. या प्रकारात वेळ, शक्ती आणि पैशाचा व्यय होणे अपरिहार्य असते. परंतु आमची ही सवय पिढ्यान् पिढ्या चालत आलेली आहे. १८९३ मध्ये बापूजींनी दक्षिण आफ्रिकेत केलेले कार्य याच प्रकाराचे होते. बापूजींची चारही मुले, जन्मभर अन्यायाचा निर्भयपणे प्रतिकार करीत राहिली. मणिलालकाका दक्षिण आफ्रिकेत झुंजत राहिले. माझे वडील, समाज आणि राजकारणातील अनीतीला विरोध करीत राहिले आणि बदनाम झाले. आणि देवदासकाकांनी ब्लिट्झचे मालक करंजिया यांच्यासारख्या धनाढ्याविरुद्ध अब्रुनुकसानीचा खटला करून आणखी एक विकतचे श्राद्ध घेतले होते. चिंताग्रस्त आणि अनेक अडचणींनी वेढलेला समाजातील सामान्य माणूस भ्रष्ट, अन्यायी सत्तेविरुद्ध किती आणि कसा लढू शकेल? परंतु

देवदास काकांनी समाजसेवेच्या उद्देशाने आपली सारी शक्ती पणाला लावून हा खटला लढविला आणि सुदैवाने तो जिंकलाही. मात्र त्यात आमचे परमप्रिय काका विद्ध आणि उद्ध्वस्त झाले आणि वयाच्या केवळ सत्तावन्नाव्या वर्षी त्यांनी या जगाचा अकालीच निरोप घेतला. आजही हीच परंपरा आमच्या घराण्याचे श्रेष्ठ लक्षण आहे. याचं अगदी अलीकडचं उदाहरण म्हणून आमचे बंधू रामू (डॉ. रामचंद्र गांधी) यांच्या संदर्भात लंडनच्या विमानतळावर घडलेली घटना सांगता येईल. काही क्षुल्लक नियमांचा विचित्र तांत्रिक अर्थ लावून ब्रिटिश सरकारने रामूला इंग्लंडमधून निष्कासित केले होते. २५ डिसेंबर, १९८६ ला रामूने या संदर्भात लंडनच्या वृत्तपत्रांतून एक पत्र प्रसिद्ध केले. या पत्राने मोठ्या चर्चेला तोंड फुटले. भारतीयांवर इंग्लंडमध्ये होणारा अन्याय आणि त्यांना मिळणारी भेदभावाची वागणूक रामूने अशारीतीने जगजाहीर केली. असा प्रतिकार करणारी माणसे आजकाल कमी आढळतात. अशीच आणखी एक घटना लक्षणीय आहे. अमेरिकेतील सुप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापीठाच्या निमंत्रणावरून, भारतीय तत्त्वज्ञानाच्या अध्ययनासाठी रामू अमेरिकेला जाणार होता परंतु त्याला जाणवले की, त्याच्या ज्ञानाचे महत्त्व वाटत नसल्याने अत्यंत 'कमी मानधना'चा प्रस्ताव या विद्यापीठाने केला होता. हे खरे की, या डॉलरमधील मानधनाचे रुपयामध्ये होणारे मूल्य तसे कमी नव्हते. परंतु रामू तर एक अकिंचन तत्त्वचिंतक असल्याचे सर्व ज्ञात आहे. स्वाभिमानाचा बळी देऊन त्याला सन्मानही नको होता आणि पैसाही. हॉर्वर्ड विद्यापीठाचे हे निमंत्रण नाकरून तो लंडनहून जानेवारी, १९८७ मध्ये भारतात परत आला. रामूजवळ पैशाचा नेहमीच अभाव असतो. रात्री अडीच वाजता कडाक्याच्या थंडीत, ऑटो रिक्षात बसून, दिल्ली विमानतळावरून तो शहराकडे निघाला. टॅक्सीचे भाडे त्याला परवडणे शक्य नव्हते. रस्त्यावर एक माणूस पडलेला असल्याचे त्याने बघितले. आंतरराष्ट्रीय विमान प्रवासाने अपार थकवा आलेला असतानाही, त्या कडाक्याच्या थंडीतही त्याने रिक्षा थांबविली; त्या जखमी माणसाला इस्पितळात भरती केले आणि सकाळी चार वाजता तो दिल्लीतील गांधी शांती प्रतिष्ठानमध्ये आला. त्या जखमी माणसाची विचारपूस केल्यावर कळाले की, बेछूट वेगाने चाललेल्या लष्कराच्या एका ट्रकने धडक दिल्यामुळे त्याचा पाय मोडला होता. वेदनेमुळे त्याला उठता येत नव्हते. परंतु दिल्लीतील मोटार मालकांना भीषण थंडीत त्या बिचाऱ्या गरिबाला मदत करण्यास वेळ नव्हता. अशा विचित्र वेळेस साऱ्या गैरसोयी आणि कष्ट सोसून गांधींच्या नातवाने एका जखमी व्यक्तीला आधार देण्याचा प्रयत्न केला होता.

कोणत्याही मापाने मोजले तरी असे आढळून येईल की, आम्हा लोकांचे जीवन सुखासमाधानात व्यतीत झालेले नाही. आम्ही सर्वांनी आपापल्या वाट्याचे दु:ख, वेदना,

निराशा, मानभंग, अपमान, निंदा आणि दारिद्र्य सहन केले आहे व आजही सहन करीत आहोत. माणसाचे जीवन असेच असते. त्याची तक्रार तरी काय करावयाची? परंतु या साऱ्या विपदांनी आम्हाला कधी विचलित केलेले नाही. आम्ही अनेक कष्ट भोगले आहेत; परंतु आमच्यापैकी कोणीही कधी हताश झालेला नाही की घाबरलेला नाही. आमच्यात एवढी अभिजातता शिल्लक आहे की, आम्ही आमच्या कृतकर्मांची सजा मुकाट्याने सहन करतो आणि आमच्या परिवाराला अथवा भोवतीच्या समाजाला त्रस्त न करण्याचा कसोशीने प्रयत्न करतो. एवढ्या महापुरुषाच्या छायेत वाढलो असतानाही, आमच्या अहंकारास आमच्यापैकी कोणी कधी खतपाणी घातलेले नाही. आमच्यात अहंभाव नाहीच असा दावा मी कशी करू? परंतु प्रतापी आजोबांच्या आशीर्वादाने आमचा अहंभाव पोसला गेला, असे मात्र नाही. अज्ञानजन्य अहंभावाचे ओझे आमचे आम्हीच वाहत आहोत. आमचे आई-वडील किंवा आजी-आजोबा त्यासाठी थोडेही जबाबदार नाहीत. गांधीजींनी आपल्या चारही मुलांना व आम्हा नातवंडांना, 'बडे बाप के बेटे' असण्याच्या अहंकाररूपी गर्तेपासून, विशेष खल न करता, निःशब्दपणे पण जागरूकतेने वाचविले आहे.

अनेकदा लोक असे म्हणतात की, महात्माजींचा एकही मुलगा त्यांच्यासारखा तेजस्वी बनू शकला नाही, तसेच त्यांच्या नाती-नातवांनीही काही विशेष कर्तृत्व गाजविले नाही. मला असे वाटते की, अशा निराशेच्या उद्‌गारांना अवसर नाही. एकतर असे की, कोणीही अन्य कोणासारखा बनूच शकत नसतो. प्रत्येकाचे आपापले वेगळे व्यक्तित्व असते आणि त्याचा स्वतःचा विकासक्रमही असतो. दुसरे असे की, आमचे आजोबा तर या शतकातील युगपुरुष मानले गेले आहेत व विशाल भारताचे ते राष्ट्रपिता आहेत. आमच्या प्रत्येक पिढीत जर एक महापुरुष निपजला आणि राष्ट्रपिता असल्याचा दावा करू लागला तर बिचारे देशवासी त्रस्त होऊन जातील. हे तर झाले साधे सोपे उत्तर; परंतु याच्या मागे एक लक्षणीय साधना दडलेली आहे त्याचा कुणी फारसा विचार करीत नाही. बापूजी विसाव्या शतकातील असे एकमेव नेते आहेत ज्यांनी एक दोन नव्हे तर हजारो शिष्यांना तयार केले. हे त्यांचे सर्व सहकारी त्यांचे केवळ अनुयायी अथवा शिष्य न राहता, आपल्यापरीने समाजमान्य नेते बनले. बापूजींनी पंधरा-वीस मोठ्या प्रांतातील प्रत्येक गावात दहा-वीस असे निष्ठावान कायकर्ते तयार केले ज्यांना सत्याग्रहाचे यथार्थ आकलन होते व जे अहिंसक आंदोलनात आपला जीव ओवाळून टाकण्यास सिद्ध झाले. देशाच्या स्वातंत्र्याच्याक्षणी प्रत्येक प्रांतात, एक नव्हे तर आठ-आठ, दहा-दहा असे प्रतिभावान नेते होते जे त्या त्या प्रांताचे मुख्यमंत्री बनण्यास पात्र होते. त्यांचा त्याग बलिदान आणि कार्य-कौशल्य यांचा कोणत्याही समाजाला

आदरच वाटला असता. या लोकांत एवढी शिस्त होती की, आपल्यातील स्पर्धा आणि ईर्ष्येच्या आहारी जाऊन ते परस्परांच्या जिवावर उठले नाहीत. उलट आपल्या शुद्ध निःस्वार्थ सेवेने व निष्ठेने त्यांनी स्वातंत्र्याच्या आरंभकालीन कठीण समस्यांच्या भोवऱ्यांपासून देशाला सुरक्षित ठेवले. जी व्यक्ती अपरिचित अशा लोकांना सत्य अहिंसेच्या प्रखर मार्गावर चालण्यास प्रोत्साहित आणि प्रशिक्षित करू शकत होती तिने मनात आणले असते तर आपल्या चारही मुलांनाही हां हां म्हणता तयार करणे अवघड नव्हते. परंतु बापूजींनी स्वतःला व देशाच्या भविष्यालाही, या गंभीर प्रसादाच्या मोहापासून वाचविले होते. बापूजींची चारही मुले, चतुर, निष्ठावान, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाची होती. आपापल्या क्षेत्रात प्रगती करून हे चौघेही समाजाचे नेतृत्व करू शकत होते. सत्तापदांवर विराजमान होण्याची पूर्ण क्षमता त्यांच्यात होती. मात्र त्यासाठी स्वार्थसाधनेला थोडाअवसर मिळण्याची आवश्यकता होती, परंतु बापूजींनी अत्यंत विचारपूर्वक आपल्या मुलांना हेतुतः मागे ठेवले. सामाजिक परंपरेला सोडून आपल्या मुलांना त्यांनी जाणूनबुजून सत्तेपासून दूर ठेवले. एक प्रकारे त्यांच्यावर उघडउघड अन्याय केला. हरिलालकाका जर बॅरिस्टर झाले असते, महात्माजींनी तशी संधी जर त्यांना मिळू दिली असती तर निश्चितच एखाद्या भल्या माणसाने त्यांच्यावर पक्षपाताचा आरोप केला असता. अशा आरोपाला घाबरून निःपक्षपातीपणा स्वीकारण्याइतके बापूजीं भित्रे नव्हते. परंतु त्यांना याची जाणीव होती की, सत्याची साधना हे असिधारा व्रत आहे. त्यामुळे बापूजींनी आपल्या मुलांना स्वेच्छेने, डोळे उघडे ठेवून, मागे ठेवले. वाटलं तर तुम्ही असं म्हणा की, त्यांनी मुलांना जिवंत गाडले. हरिलालकाका विलक्षण होते. बॅरिस्टर बनून करोडो कमविण्याची व लाखो लुटविण्याची त्यांच्यात धमक होती. मणिलालकाका सहजच आफ्रिकेतील धनाढ्य व्यक्ती बनू शकत होते. माझ्या वडिलांसारखा साधू वृत्तीचा आरोग्यमंत्री लाभून देशाचे आरोग्य खाते निश्चितच सुदृढ झाले असते. देवदास काकांची पत्रिका तर एवढी तेजस्वी होती की, जर बापूजींनी अनुमती दिली असती तर ते त्यांचे सचिवही बनले असते. तसे होते तर देवदास काकाही महादेव देसाई व प्यारेलाल यांच्याप्रमाणेच 'आदरणीय' ठरले व ख्यातनाम झाले असते. जर थोडीशी पुष्टी मिळती तर देवदासकाका आणि हरिलालकाका काँग्रेसचे अग्रगण्य पुढारी बनू शकले असते व केंद्रीय सरकारचे प्रधानमंत्री म्हणूनही पात्रता सिद्ध करू शकले असते. पित्याच्या अव्यक्त पाठबळावरच पुत्र पुढे आल्याची जगाच्या इतिहासात, विशेषतः भारतात तर सर्वज्ञात उदाहरणे आहेत. परंतु बापूजींनी ही परंपरा सोडून वेगळा मार्ग चोखाळला आणि आपल्या व्यक्तिगत जीवनात तो कधी सोडला नाही. बापूजींनी अशी निर्भय निःस्पृहता अंगीकारली नसती तर आज आमच्या सरकारला, राष्ट्राला आम्ही समाजाला कलंकित करणारी घराणेशाहीची विषारी प्रथा शंभर

वर्षांपूर्वीच सुरू झाली असती आणि गुलामीच्या जोखडातून देश कधी स्वतंत्रच होऊ शकला नसता. बापूजींनी आपल्या कठोर निर्णयाने घराणेशाहीच्या धोक्यापासून देशाचे स्वातंत्र्य, सुरक्षित ठेवले आणि त्यामुळेच सत्याग्रहाचे आंदोलन सफल होऊ शकले.

आम्ही भारतवासीय महात्म्याचा आदर जितका सहजतेने करू शकतो तितक्याच उत्सुकतेने निंदाशील बनून आम्ही मनुष्यद्वेषही करू शकतो, हे सर्वांना ठाऊक आहे. चारित्र्यहननातील आमचे लाघव सुप्रसिद्ध आहे. देवदासकाका किंवा हरिलालकाका कोणाही राजकारणी व्यक्तीच्या प्रतिभा आणि चातुर्याशी टक्कर घेऊ शकत होते. परंतु बापूजींनी आपल्या चारही मुलांत असे सच्चारित्र्य निर्माण केले होते की, समाजाची उपेक्षा सहन करूनही त्यांनी आपल्या महात्मा पित्याची प्रतिमा डागळली नाही. या चारही मुलांनी आपल्या पित्याशी कदाचित वाद केला असेल, आपला असंतोष प्रकट केला असेल पण परंतु नियतीच्या त्या अदृश्य लक्ष्मणरेषेचे कधीही कृतीने, वाणीने अथवा मनाने उल्लंघन केले नाही. आपल्या पित्याच्या शाश्वत प्रतिमेशी मूक सहकार्य करण्यात बापूजींच्या मुलांचे मोठेपण होते. परिणामतः आपल्या महात्मा पित्याच्या सत्यसाधनेच्या महायज्ञात त्यांनी आपल्या महत्त्वाकांक्षेचे स्वखुशीने बलिदान केले. अयोग्य, दुर्बल, निःसत्त्व, वेडसर, नवाब इत्यादी उपनामे वापरून या चारी मुलांची समाजाने निर्भर्त्सना करण्याचा प्रयत्न केला. परंतु या बिचाऱ्या मुलांचे पितृप्रेम इतके उत्कट होते की, त्यांनी हे सारे सहन केले. या पितृप्रेमामुळेच त्यांनी महात्माजींच्या राजकीय वा आध्यात्मिक विरोधकांचीही कधी आलोचना केली नाही. अगणित लोकांच्या नजरेत बापूजीं महात्मा होते. तेवढेच त्यांचे प्रखर विरोधकही अनेकजण होते. म्हणून तर त्यांची हत्या झाली. हे विरोधक कोण होते याचे विवरण येथे अनावश्यक आहे. परंतु चारही मुलांनी ही वस्तुस्थिती जाणून समजूनही, बापूजींच्या प्रतिष्ठेला व सहृदयतेला अनुरूप नसलेला असा एक शब्दही मुखातून काढला नाही. आम्ही तेरा भावंडे एवढ्या उंचीवर पोहोचल्याचा दावा करण्यास समर्थ नसलो तरी, बापूजींच्या धवल, श्रेष्ठ कीर्तीला कलंक लागेल असे आजपर्यंत आम्ही काही केलेले नाही.

आमच्या आजोबांनी या आदिमूल्यांच्या संस्कारांचे आमच्या मनावर सिंचन केले. परंतु आमच्या व्यक्तित्वाच्या दैनंदिन विकासावर देखरेख करणे, अपार कार्यबाहुल्याने त्यांना शक्य नव्हते. परंतु बापूजींइतकीच त्यांची चारही मुले आणि आमची आजी याबाबतीत जागरूक होती. आम्हा मुलांना वळण लावण्याच्या बाबतीत या पाचही व्यक्ती अत्यंत दक्ष होत्या, काटेकोर आग्रही होत्या. याबाबतीत आमचे काका किंवा आजी यांना आमच्या आई-वडिलांपेक्षा जणू वेगळे अस्तित्वच नव्हते. बापूजींच्या या चारही मुलांत परस्परांविषयी अपार आदर

आणि प्रेम होते. त्यामुळे त्यांनी आम्हा तेराही भावंडांना समान लेखून सारख्याच प्रेमाने आमचे लालन-पालन केले. या प्रेमाची पराकाष्ठा अशी की, हे चौघेही एकमेकांच्या मुलांना निर्वेधपणे रागावू शकत आणि आमच्या चुका सुधारू शकत.

आमच्या वरील संस्कारांचा हा वैयक्तिक पैलू होय. आमची आजी आणि तिच्या चारही मुलांमध्ये एक प्रकारची सुंदर अभिजातता होती. बापूजींच्या तेजस्वितेपुढे या मुलांनी जाणीवपूर्वक आपले व्यक्तिमत्त्व दडपून ठेवले, मात्र बापूजींच्या महात्मायनात त्यांची पत्नी कस्तुरबा आणि त्यांच्या चारही मुलांचा लक्षणीय वाटा आहे.

# ३

# कस्तुरबा गांधी

ब्रह्मर्षी वसिष्ठांची पत्नी अरुंधती वेदकालीन विदुषींत प्रमुख मानली जाते. युवराज रामचंद्रांचे प्रतापी पिता महाराजा दशरथांचे गुरू असलेले ऋषी वसिष्ठ त्रिकालज्ञ म्हणून ख्यात होते. हजारो वर्षांपूर्वीच्या मंत्रदृष्ट्या ऋषींनी त्यांना आकाशस्थ सप्तर्षींच्या तारकासमूहात त्यांना गौरवाचे स्थान लाभले. सप्तर्षींचे हे तारामंडल, रात्रीच्या अंधारात, एखाद्या राणीच्या कर्णफुलाप्रमाणे आकाशात लकाकत असते. या सात ताऱ्यांतील मधल्या ताऱ्याजवळच एक लहानशी तारका आपले सौम्य तेज भोवताली पसरीत असलेली दिसून येते. ही तारका म्हणजे देवी अरुंधती होय, अशी लोकोक्ती आहे. गार्गी, मैत्रेयी अशा अनेक विदुषी शास्त्रर्गातील नैपुण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. मात्र सूर्यमंडळातील सप्तर्षींबरोबर बसण्याचा मान मात्र केवळ देवी अरुंधतीलाच लाभलेला आहे. याचे कारण हे की, ती एक श्रेष्ठ पत्नी होती. राजगुरू वसिष्ठ समाजात न्याय-नीतीचा ज्ञानयज्ञ करीत आणि त्यात अरुंधती त्यांची अभिन्न सहचरी होती. ऐहिक ऐश्वर्याच्या अभावातही भगवती अरुंधती आपल्या पतीच्या आश्रमाची अधिष्ठात्री होती आणि प्रकांडतपस्वी वसिष्ठांच्या योगसाधनेची निष्कंप दीपशिखा होती. माझा असा विश्वास आहे की, आदिकालीन देवी अरुंधतीप्रमाणेच, वर्तमान काळातील कस्तुरबा ही आपल्या तेजस्वी, सत्यनिष्ठ पतीची सुयोग्य अर्धांगिनी होती. कस्तुरबाने आपल्या निरपेक्षतेने, सेवानिष्ठेने, प्रखर चारित्र्याने आणि समंजस उदारतेने, बापूजींचे सारे देशीविदेशी आश्रम उजळून टाकले होते.

कस्तुर कापडियाचा जन्म एप्रिल, १८६९ मध्ये पोरबंदर येथे झाला. त्यांचे व्यापारी असलेले पिता गोकुळदास मकनजी आणि माता व्रजकुंवर, हे संभ्रान्त वैष्णव कुटुंबातील जोडपे होते. त्यांचा कापडाच्या अडत्याचा व्यापार होता. पाच भावंडात कस्तुर मधली होती. दुर्दैवाने, धाकटा भाऊ माधवदास वगळता अन्य भावंडे लहान वयातच कालवश झाली होती. तीन मुले अकाल मृत्यूच्या आधीन झाल्याने उदास झालेल्या गोकुळदासांनी आपली लाडकी कन्या कस्तुर हिचा विवाह तिच्या सहाव्या वर्षीच नगरातील प्रसिद्ध दिवाण करमचंद गांधींचे कनिष्ठ पुत्र मोहन यांच्याशी निश्चित केला. विवाह निश्चितीचा टिळा लागल्यानंतर कन्या परक्याचे धन होईल व अशारीतीने तिच्यावर देवाची कृपा राहील व ती सुरक्षित राहील. अशा श्रद्धेतूनच ही विवाह निश्चिती झाली असावी. करमचंद गांधी सत्तासंपन्न असले तरी श्रीमंत

नाहीत हे सर्व ज्ञात होते. पण कुटुंब चांगले होते. गांधी कुटुंबही वैष्णवच असल्याने निदान मुलगी दु:खी होणार नाही अशी अपेक्षा होती व तेवढे पुरे होते. या विवाहनिश्चितीनंतर तब्बल सात वर्षांनंतर, इ.स. १८८३ मध्ये मोहन आणि कस्तुर विवाहबद्ध झाले. त्यावेळी मोहनचे वय १३ वर्षांचे होते. कस्तुर आपल्या पतीपेक्षा ६ महिन्यांनी मोठी होती. लग्नानंतर आपल्या वडिलांचे सुंदर घर सोडून कस्तुर आपल्या सासरच्या साधारण घरात आली. मी आजीचे माहेरचे घर बघितले आहे. आमच्या गांधी परिवाराच्या लहानशा साधारण घराच्या तुलनेत, गोकुळदास मकनजीचे घर मला मोठे आणि अधिक व्यवस्थित असल्याचे जाणवले. आजीच्या माहेरच्या या घराला सुंदर नक्षीदार सागवानी दरवाजे आहेत, आणि त्यांवरील हळदीकुंकवाची स्वस्तिक चिन्हे, आजही घराच्या ऐश्वर्याची साक्ष देतात.

कस्तुर आणि मोहनची झोपण्याची खोली घराच्या तिसऱ्या मजल्यावर होती. जागा वाचविण्यासाठी जिना अत्यंत अरुंद व सरळ उभा बांधण्यात आलेला होता. याच जिन्यावरून कस्तुरला दिवसातून दहा-वीस वेळा खाली-वर, यावे-जावे लागे. त्याकाळी काठेवाड्यात पडदा पाळण्याची प्रथा होती. आपला घुंगट सांभाळीत ही नववधू या कठीण जिन्यावरून कशी ये-जा करीत असेल, याची कल्पनाच केलेली बरी! विवाहानंतर लागलीच हे नवे जोडपे राजकोटला गेले, कारण मोहनचे पिता त्यावेळी राजकोट नरेशाचे दिवाण होते. राजकोटचे घर जरा मोठे होते व अधिक सोयी त्यात होत्या. या घरी दोन जावा आणि सासू-सासरे होते. एक नणंद होती. ती जवळच आपल्या परिवारासह निराळ्या घरात राहत होती. परंतु मोठ्या कुटुंबातील आप्तेष्टांनी घरी येऊन महिनोनमहिने मुक्काम करावा अशी या परिवारात पद्धत होती. घरच्या या वातावरणात नववधूचे चांगलेच भुस्कट पडत असे. मोठ्या दिरांनी शिक्षण सोडले होते; पण मोहनला तर आपले शिक्षण चालू ठेवावयाचे होते आणि त्यामुळेही कस्तुरवर अधिक जबाबदारी होती. लग्नसमारंभाच्या वेळी सासऱ्याचा छकडा उलटल्यामुळे त्यांना चांगलाच मार लागला होता. अशा स्थितीत मोहन वडिलांची शुश्रूषा करीत असत आणि त्यासाठी आवश्यक ते लेप तयार करणे, शिजविणे, त्या लेपासाठी वापरलेले कपडे धुणे आदी कामे कस्तुरच करीत असे. कस्तुर वैष्णव कुटुंबाच्या शिस्तीत वाढलेली होती. त्यामुळे लहानपणापासूनच सहनशील आणि संयमी होती. मनोबलाच्या जोरावर ती या साऱ्या कामांतही शांत आणि प्रसन्न असे. सासऱ्यांच्या मृत्यूनंतर घरची परिस्थिती अधिकच कठीण झाली. या प्रतिकूलतेतही तिच्या पतीची विद्याराधना बळकट होती. पती प्रेमळ असले तरी त्यांचा हट्टी स्वभाव खूपच कठीण होता. मोहनची अपेक्षा असे की, आपल्या आज्ञेशिवाय कस्तुरने घराच्या बाहेरही जाऊ नये व रोज रात्री लिहिणे-वाचणे शिकावे. खरे म्हणजे कस्तुरच्या बाबतीत हे तिच्यावरही जरा अती बळजबरीच होती. दिवसभराचे स्वयंपाकघरातील सारे

काम आटोपून, करमणुकीऐवजी लेखन-वाचन ही कठीण गोष्ट होती; परंतु मोहन आपल्या नवरेपणाचा अधिकार गाजविण्याचा आग्रह धरीत असे. वस्तुतः आपल्या रूपवती सखीचा मोहनला खूपच मोह होता. कमनीय कस्तुरबावर अन्य कुणाची दृष्टीही न पडावी असे त्याला वाटत असे आणि म्हणूनच आपल्याला न विचारता तिने बाहेरही जाऊ नये असा त्यांचा आदेश होता. कस्तुर मृदू अंतःकरणाची परंतु स्वतंत्र विचार करणारी युवती होती. देवदर्शनासाठी अथवा एखाद्या आजारी व्यक्तीला भेटण्यासाठी बाहेर जाण्यात काही गुन्हा नव्हता. अशा निरागस गोष्टींतही पतीने आपला अधिकार गाजवावा हे कस्तुरच्या मान-मर्यादेत बसत नसे. न विचारता बाहेर जाण्याच्या घटनांवरून या नवदांपत्यात अनेकदा बोलाचाली आणि भांडण होत असे. दिवसभर घरकामात राबल्यावर मेणबत्तीच्या मिणमिणत्या प्रकाशात बाराखडी शिकणे कस्तुरबाला असाध्य आणि अनावश्यक वाटत असे. परंतु आपल्या पत्नीला लिहावाचायला शिकवून प्रवीण करण्याचा पतीचा उत्साह आणि निर्धार दांडगा होता. कस्तुर काही प्रत्युत्तर तर देत नसे पण मनोमन दुःखी मात्र होत असे, मात्र देवळात जायला कधी चुकत नसे. पतीची अशी अनधिकाराची आज्ञा ती कानाआड टाकीत असे. नाराज आणि निराश झालेला पती, कस्तुरच्या या वागण्याला हट्टीपणा म्हणून झिडकारीत असे. नवऱ्याचे हे निराधार आरोप सहन करूनही, आवश्यक असेल तेथे बाहेर जाण्याचे आपले स्वातंत्र्य मात्र कस्तुरने राखून ठेवले होते. अल्पवयीन जोडप्यांतील अशा धुसफुशी चालत असल्या तरी या किशोर पतिपत्नीमध्ये मोठे प्रेम आणि आकर्षण होते.

पित्याच्या मृत्यूनंतर एक वर्षाने मोहन मॅट्रिक पास झाला. घरची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून मोहनला बॅरिस्टर व्हावयाचे होते. थोड्या बहुत भांड्यांव्यतिरिक्त घरात अन्य कसल्या मोलाच्या वस्तू नव्हत्या. जो काही पैसा गाठी होता तो सारा पित्याच्या आजारात खर्च झाला होता. कबा गांधींनी एवढ्या मोठ्या परिवाराचे पालनपोषण केले होते, सर्वांना नोकरीला लावले होते, त्यांची लग्ने लावून दिली होती. ही सारी मंडळी महिनामहिना घरी मुक्काम ठोकून खातपीत असे, परंतु त्यापैकी एकानेही कबा गांधींच्या या धाकट्या मुलाला एका रुपयाचीही मदत केली नाही. चुलत्यांनी तर अगदीच पाठ फिरविली होती. आपल्या धाकट्या भावास शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य करण्याची मोहनच्या मोठ्या भावांची तर कुवतच नव्हती. नुकत्याच विधवा झालेल्या आपल्या आईच्या साहाय्याने त्याने पाच हजार रुपये उधार घेतलेही होते. परंतु आणखी कमीतकमी तीन हजार रुपयांची गरज होती. त्याशिवाय मोहनला विलायतेस जाणे शक्य नव्हते. पैशाची व्यवस्था कशी व्हावी, हा मोठा बिकट प्रश्न होता. त्यावेळी, अशिक्षित आणि मनस्वी कस्तुरने, विशेष काही न बोलता, आपले सारे अलंकार पतीला देऊन टाकले. ती शिक्षित नव्हती पण आपल्या पतीवर तिची

अपार श्रद्धा होती व त्याच्या उत्कट इच्छेच्या पूर्ततेसाठी ती आपले सर्वस्व देण्यास तयार होती हे अलंकार विकून मोहनला तीन हजार रुपये मिळाले आणि विलायतेस जाण्यातील आर्थिक अडथळा दूर झाला. विवाहप्रसंगी कबा गांधींनी सुनेच्या मुखावलोकन विधीच्यावेळी, कस्तुरला दोन सुवर्ण कंकणे दिली होती. त्याशिवाय तिच्या गळ्यात सोन्याची साखळी होती आणि हातातील हस्तिदंती बांगड्यांमध्ये सोन्याचा पातळ पत्रा जडविलेला होता. या वस्तू मात्र, मृत सासऱ्याच्या प्रेमाची व आशीर्वादाची आठवण म्हणून कस्तुरने आपल्याजवळ राखून ठेवल्या होत्या.

दोन वर्षांपूर्वी (१९८५ साली) मुंबईचे जवाहिरांचे प्रसिद्ध दुकान नरोत्तम भाईचे मालक नंदूभाई जव्हेरी यांना मी विचारले की, शंभर वर्षांपूर्वी १८८५ मध्ये सोन्याचा भाव काय होता आणि जुने दागिने कोणत्या भावाने विकले जात? आपल्या दुकानातील शंभर वर्षांपूर्वीच्या खातेवह्या काढून आम्ही दोघांनी हिशेब केला की, त्यावेळी सोने १२ रु. तोळा होते त्यामुळे जुने दागिने ११ रु. तोळा या भावाने विकले गेले असावेत. या हिशेबाने २७३ तोळ्यांचे दागिने विकले गेले असावेत; म्हणजे अडीच किलो सोने असावे. आजच्या चार हजार रु. तोळा भावाने या सोन्याची किंमत दहा लाख रुपये होते असे तोंडी हिशेब करून नंदूभाईंनी सांगितले. आमच्या अशिक्षित आजीने एवढे दागिने आपल्या पतीच्या शिक्षणासाठी देऊन टाकले होते. त्या स्त्रीने न काही वायदा करविला न या विदेश यात्रेचा वस्तुतः लाभ काय याचा विचार केला. आपले पती अडचणीत आहेत एवढे कारण तिला पुरेसे हाते. अशा स्थितीत, दागिन्यांचा याहून सदुपयोग तो काय होऊ शकतो? अलंकाराचे आकर्षण कमी नसते. परंतु कस्तुरमध्ये समय आणि परिस्थितीची निकड जाणण्याइतका समंजसपणा होता. पती विदेशी गेल्यावर कस्तुर आपल्या माहेरी न जाता सासरीच राहिली व घराची सारी जबाबदारी सांभाळू लागली. मोठे दीर लक्ष्मीदास गांधी यांची पत्नी नेहमी पूजापाठात मग्न असे आणि करसनदास भावजीने तर पत्नीच्या मोहात शिक्षण सोडून दिले होते. ते दोघेही आपल्यातच मस्त असत. कस्तुरचे पती गावात नव्हते. ती सर्वात लहानही होती. तेव्हा सर्वांची सेवा करणे हे तिचेच कर्तव्य होते! जावांच्या मुलांची देखरेख व सकाळ संध्याकाळचे चारीठाव भोजन ही तिचीच जिम्मेदारी होती. लक्ष्मीदास गांधींची पत्नी तर म्हणतच असे "बिचारी कस्तुर तर एवढी कामात असते की, लहानगा हरिलाल तसाच उघडानागडा हिंडत असे, मुलाचं तोंड धुण्याइतकीही सवड तिला मिळत नसे."

कामाच्या या रगाड्यातही कस्तुर उद्विग्न न होता जीवन कंठीत होती आणि सासू व जावेची मनापासून सेवा करीत होती. तीन वर्षानंतर बॅरिस्टर होऊन मोहन मायदेशी परतले तेव्हाही कस्तुरबाला विशेष काही सुख मिळाले नाही. एक वर्षानंतर मोहन आफ्रिकेत गेले

आणि पुऱ्या तीन वर्षांनी मायदेशी परतले. अशारीतीने कस्तुरने पतीच्या अनुपस्थितीत अनेक मानसिक, शारीरिक आणि आर्थिक कष्ट भोगले. परंतु आमची आजी वृत्तीने निःस्पृह असल्यामुळे हे सारे सहन करूनही मनाने कधी पराभूत झाली नाही. या अवधीतच त्यांचा दुसरा मुलगा मणिलालही जन्मला होता. १८९६ मध्ये कस्तुर आपली दोन मुले व नुकत्याच विधवा झालेल्या नणंदेचा मुलगा यांच्यासह पतीबरोबर प्रथमच आफ्रिकेस गेली. तिथे ५ वर्षे राहून १९०१ मध्ये बापूजी परिवारासह मायदेशी परतले. परंतु कसेबसे वर्षभर मुंबईत राहिले नसतील तोच आफ्रिकेतील मंडळीने त्यांना पुन्हा आफ्रिकेत बोलावून घेतले. त्यानंतर १९०३ मध्ये कस्तुरबा आजी पुन्हा आफ्रिकेत गेली. अशारीतीने जीवनाची १८ वर्षे कस्तुरबांनी आफ्रिकेत काढली. त्यांनी आपले स्वतंत्र घर तेथेच खऱ्या अर्थाने प्रथम निर्माण केले. मात्र तेथेही पाहुण्यांची सतत वर्दळ असे व एकांत सहवासाला अवसर नव्हता. १८९८ मध्ये माझ्या वडिलांचा आणि १९०० मध्ये देवदासकाकांचा दरबानमध्ये जन्म झाला. कस्तुरला चार मुलगेच; आफ्रिकेतील घरात सारे काम बहुधा स्वतःच करावे लागे. हा बापूजींचा प्रयोग आणि साधनेचा काळ होता. त्यामुळे नित्य नवा विचार आणि त्याची प्रत्यक्ष आचरणात पडताळणी घेणे हा जीवनक्रम बनला होता. नव्या विचारांची प्रखरताही जुन्या विचारांची आमची आजी निभावून नेत असे. जोहान्सबर्गमध्ये ख्रिश्चन, मुसलमान, हिंदू, बनिया, ब्राह्मण, हरिजन असे सर्व जातिधर्माचे लोक गांधीजींच्या कार्यालयात काम करीत असत, त्यापैकी बऱ्याच जणांना बापूजींनी आपल्या घरातच ठेवून घेतले होते. तेव्हा त्या साऱ्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था आजीच करीत असे. माझ्या वडिलांनी लिहिलेल्या 'संस्मरण' नावाच्या पुस्तकात आफ्रिकेतील या घराचे चांगले वर्णन केलेले आहे. घरातील सारी कामे स्वहस्ते होत असत आणि संडास साफ करण्याची जबाबदारी गृहस्वामी आणि गृहस्वामिनीची होती. रात्रीच्यावेळी मलमूत्राची पात्रे उचलण्यात आजीला सामान्यतः काही अडचण वाटत नसे. परंतु एकदोन वेळेस घरी असे काही लोक राहिले होते ज्यांना आपली स्वतःची स्वच्छता करण्याचे ध्यानात येत नसे. अशा परिस्थितीत आजीला एकदा वाईट वाटले की, या परक्या लोकांचे मलमूत्र का उचलावे? बापूजी स्वतः हे काम करण्यास तयार होते. परंतु आपल्या पतीने असे काम करावे हे कस्तुरसारख्या पतिव्रतेला सहन होत नव्हते. ती रडू लागली. बापूजींना आपल्या माणसावर संतापण्याची सवय होती. ते तापले आणि गरजले, "करायचे तर हसतखेळत हे काम करा, नाहीतर माझ्या घरात ही कटकट चालणार नाही." हे कटुवचन आजीच्या मनाला चांगलेच झोंबले. ती ताडकन फणकारली, "तुमचं घर तुमच्याजवळ ठेवा. मी चालले." बापूजींचा स्वतःवरचा ताबा सुटला. आजीच्या दंडाला धरून ओढत त्यांनी तिला दारापर्यंत आणले. अर्धे दारही उघडले. तेव्हा डोळ्यांतून गंगायमुना वाहत असलेल्या

आजीने म्हटले, "तुम्हाला तर काही लाज, शरम नाही; पण मला आहे. कुणी बघितले तर त्याला काय वाटेल? जरा लाज बाळगा. या परदेशात मी कुठे जाणार? आईवडीलही नाहीत की त्यांच्याकडे जाता यावे?" बापूजी मनोमन खजील झाले. आणि खरेच, पत्नी जशी कुठे जाऊ शकत नव्हती तसा पतीही तिला सोडू शकत नव्हता. आजीने त्या दिवशी आपल्या अद्‌भुत सहनशीलतेने घराला बेअब्रूपासून वाचविले आणि बापूजींनाही आपल्या चुकीची जाणीव झाली.

आमची आजी नेहमी म्हणत असे की, नवराबायको दोघेही भांडू लागले तर जीवनाची नाव चालू शकत नाही. दोघापैकी कोणातरी एकाला प्रसंगानुसार वागावेच लागते आणि तेव्हाच दांपत्याचा निभाव लागू शकतो. आपल्या भारतीय परंपरेत मानवी जीवन चार कालखंडात विभागण्यात आले आहे. वयाच्या २५ व्या वर्षापर्यंतचा विद्याभ्यासाचा पहिला कालखंड, हा ब्रह्मचर्याश्रम; २५ ते ५० वर्षांपर्यंतचा गृहस्थाश्रम यात माणूस वैवाहिक जीवन जगत समाजातील आपले कर्तव्य पूर्ण करतो. त्यानंतर वानप्रस्थ आणि संन्यासाश्रम. गृहस्थाश्रम सर्वांत कठीण होय. दिसायला हा काल भोग विलासाचा वाटत असला तरी वस्तुतः या काळात गृहस्थाश्रमी पतिपत्नी विविध सामाजिक परिस्थितीत राहून आपल्या जटिल जबाबदाऱ्यांचे पालन करीत असतात आणि हाच धर्म होय. गृहस्थाश्रमातच मानवी सद्‌गुणांचा विकास होत असल्यामुळे प्राचीन ऋषिमुनीही गृहस्थाश्रमी असत. आजीने बापूजींच्या साधनेत व महाव्रतांच्या पालनात कधी बाधा निर्माण केली नाही. उलट सहकार्य मात्र केले. आपल्या पतीचे आदर्श हळूहळू आत्मसात करून आजीने आपला स्वतःचा विकास करून घेतला आणि त्यामुळेच तिचे चारित्र्य उजळून निघाले. तिला स्वतः मोक्षसाधनेची महत्त्वाकांक्षा नव्हती; आपल्या पतीच्या सेवेतच ती संतुष्ट होती.

आजी स्वतःत संतुष्ट असली तरी पतीची प्रत्येक इच्छा हे तिने आपल्या जीवनाचे लक्ष्य बनविले होते. पातिव्रत्याच्या भौतिक रूपापलीकडे एक आध्यात्मिक परिमाणही असते आणि या विसाव्या शतकात आमच्या आजीने आध्यात्मिक भूमिकेवरील पातिव्रत्याचा हा आदर्श आपल्या आचरणात साकार केला होता आणि त्यासाठी तिने आपले वेगळे अस्तित्वच मिटवून टाकले होते. असे करताना तिला अनेक आघात सोसावे लागले व अपार त्याग करावा लागला. बापूजींच्या प्रखर तपस्येचा ताप दुःसह होता. सामान्य माणसे तर त्यांच्या सत्याग्रहाच्या प्रयोगांना पचवूच शकत नव्हती. परंतु आजीने अद्वितीय प्रीती, सहनशीलता आणि धैर्याच्या बळावर बापूजींची तपस्या ही आपलेच अनुष्ठान बनविली होती. त्यामुळेच आजीचा गृहस्थाश्रम एवढा सर्वांगसुंदर, सुदृढ आणि सुशोभित होता. प्रत्येक परिस्थितीत तिने आपल्या पतीला साथ दिली आणि स्वतःला बापूजींत विलीन करून टाकले. तिने असे केले नसते तर बापूजींच्या सत्यसाधनेत विक्षेप निर्माण झाला असता.

बापूजी एवढे विद्वान आणि विचारवंत होते तर आजी मात्र अशिक्षित होती. शिवाय बापूजींनी जीवनात अनेक परिवर्तने घडवून आणली आणि त्यानुसार आचरणाचा आग्रह बाळगला. साहजिकच आजीची अशावेळी कसोटीच असे. यामुळे काही लोकांना वाटते की, कस्तुरबाला जीवनात सुख लाभले नसावे, ती दुःखी असावी. या संदर्भातच एका महिलेला तिने लिहिलेले पत्र लक्षणीय आहे.

अखंड सौभाग्यवती लीलावती शुक्रवार

तुमचे पत्र मला फार खटकले. तुमच्याशी तर प्रत्यक्ष बोलण्याचाही कधी प्रसंग आलेला नाही. मग गांधीजी मला फार दुःख देतात, हे तुम्हाला कसे कळाले? माझा चेहरा उतरलेला असतो, ते मला खाण्यापिण्याच्या संदर्भात दुःख देतात, हे तुम्ही आपल्या डोळ्यांनी बघितले आहे काय? माझ्या पतीसारखा पती तर जगात कुणालाही लाभला नसेल! सत्यामुळे साऱ्या जगात तो वंदनीय ठरला आहे. हजारो लोक त्यांचा सल्ला घेण्यासाठी येतात. माझी चूक नसताना त्यांनी कधीच माझ्यावर दोषारोप केलेला नाही. मी दूरचा विचार करू शकत नाही, माझी दृष्टी संकुचित असते तेव्हा ते म्हणतात, असे तर साऱ्या जगातच घडत आले आहे. गांधीजी वृत्तपत्रांतून चर्चा करतात. अन्य (पती) मात्र आपल्या घरात कलह माजवितात. आपल्या पतीमुळे तर मलाही जगात वंदनीय मानले जात आहे. माझ्या आप्तस्वकीयांत, मित्रांत माझ्याविषयी खूप प्रेम आहे. मित्रमंडळीत माझा मोठा मान आहे. तुम्ही माझ्यावर खोटा आरोप केला तर कोणी मानणार नाही. तुमच्याप्रमाणे मी आजकालच्या जमान्यातली नाही. खूप स्वातंत्र्य घेणे. पती ताब्यात राहिला तर ठीक नाहीतर तुझी नि माझी वाट वेगळी! परंतु सनातनी हिंदूला हे शोभून दिसत नाही.

पार्वतीचा तर हा पण होता की जन्मोजन्म शंकरच माझे पती आहेत.

( लि. कसूर गांधी मूळ गुजराती पत्र)

गुजरातीतले हे मूळ पत्र वाचल्यानंतर जाणवते की, या पत्रातील विचार आणि भाषा कस्तुरबाचीच आहे. हृदयात निर्मळ भाव असणारीच असे सरळ स्पष्ट पत्र लिहू शकते. अन्य कोणी सुशिक्षित स्त्री अशी एकदम मुख्य विषयाला हात घालणार नाही आणि अंतःकरणातील भाव इतक्या सरळ व सहजतेने व्यक्तही करू शकणार नाही. आपले हे पत्र वृत्तपत्रांतून प्रसिद्ध व्हावे व त्यामुळे चुकीचा विचार करणाऱ्यांचा भ्रम दूर व्हावा, अशी आजीची इच्छा होती. अशा स्पष्टीकरणांनी, चुकीच्या विचारांना खतपाणी घालणे बापूजींना पसंत नव्हते म्हणून त्यांनी हे पत्र वृत्तपत्रांकडे दिले नाही, परंतु महादेवकाकांनी, एरव्ही फाडून टाकले जाणारे हे पत्र काळजीपूर्वक आपल्या फाईलीत सुरक्षित ठेवले. एरव्ही आमची आजी जशी

स्पष्ट बोलणारी होती तशीच स्पष्ट विचार करणारी व स्पष्ट लिहिणारीही होती याचा आम्हाला पत्ता लागला नसता.

माझे वडील सांगत की, जोहान्सबर्गच्या चांगल्या श्रीमंत वस्तीत आमचे घर होते, आणि शेजारच्या इंग्रज व जर्मन परिवारांसह त्यांची ऊठबस असे. विशेषत: 'टोश' नावाच्या जर्मन जोडप्याशी त्यांचा निकटचा संबंध होता. हे जर्मन जोडपे राजवंशी दिमाखाने व श्रीमंती थाटाने राहत होते. आजीची मिसेस टोशशी खूप मैत्री होती. माझे वडील आपल्या 'संस्मरणा'त लिहितात की, अनेकदा ते बापूजी व आजीसह टोश पतीपत्नींच्या घरी जात असत व तेथे चहा-कॉफी घेत असत. ते जोडपेही आजीकडे चहा नाश्त्याला वा भोजनाला येत असे आणि आवडीने शाकाहारी पदार्थ खात असे. मिसेस टोश भारतात राहिलेली असल्यामुळे आपल्या मोडक्या तोडक्या हिंदीत आजीला इंग्रजी बोलावयास शिकवीत असे. मिसेस टोश भरतकाम करीत असे आणि आजीही तिच्या सोबतीने भरतकाम करू लागली होती. या युरोपीय परिवारात काळ्या गोऱ्याचा भेदभाव नव्हता. ते लोक, बापूजी, आजी, मणिलालकाका, देवदासकाका आणि माझ्या वडिलांशी आदराने, सन्मानाने व स्नेहाने वागत असत. माझे वडील सांगत की, या साऱ्या डामडौलात राहणाऱ्या लोकांत आजी नि:संकोचपणे मोठ्या अदबशीरपणे वागत असे. तिच्या बोलण्या-चालण्याच्या पद्धतीवरून कधी असे वाटत नसे की, ती अशिक्षित आहे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांशी आणि घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांशी अत्यंत शालीनतेने आमची आजी निकटचे संबंध ठेवीत असे. आपल्या बॅरिस्टर पतीच्या प्रतिष्ठेला ती कधी धक्का लागू देत नसे.

जोहान्सबर्गमध्ये मि. पोलाकांचा विवाह झाल्यानंतर, त्यांची पत्नीही त्यांच्यासह बापूजींच्याच घरी राहू लागली होती. आजी आणि मिसेस मिली पोलाक या दोघींनाही हा अनुभव नवीन होता; परंतु आजीने या इंग्रज महिलेलाही आपलेसे केले होते. मिसेस पोलाक आपल्या पुस्तकात लिहितात की, त्या दिवसांत घरात किमान सोळासतरा माणसांचा स्वयंपाक होत असे आणि सारेजण एकत्र बसून भोजन करीत असत. जेवण तसे साधेच असे पण विविध तऱ्हेच्या आठ-दहा भाज्या, चटण्या कोशिंबिरी इ. बनत असत हा सारा स्वयंपाक आजी एकटी उरकीत असे. एकदा काही अपरिचित इंग्रज घरी भोजनास आले. प्रारंभा पासूनच ते लोक अहंकार, तिरस्कार आणि चेष्टेच्या सुरात वेडेवाकडे प्रश्न विचारीत होते. आजीला हे सहन झाले नाही. दिवाणखान्यातून उठून ती वरच्या मजल्यावरील आपल्या खोलीत निघून गेली. सर्वांबरोबर जेवायलाही ती आली नाही. बापूजी तिला बोलावण्यास गेले परंतु आजीने ऐकले नाही. पाहुणे घरात होते तोपर्यंत आजी आपल्या खोलीच्या बाहेर आली नाही. आलेली मंडळी निघून गेल्यावर मिसेस पोलाकला ती इंग्रजीत म्हणाली, "अशा उर्मट

माणसांनी माझ्या घरात येऊन माझा उपहास करावा हे मला सहन होणे नाही." (To make laugh of me and my home.) "अशा लोकांना मी मुळीच भेटणार नाही; बापूजींना भेटायचे तर त्यांनी भेटावे." आजीला इंग्रजी तर येत नव्हते परंतु सारांशाने तिला ते कळत असे व आपणास जे सांगायचे ते इंग्रजीतून कळेल असे सांगू शकत होती.

आजी इतके दिवस आफ्रिकेत राहिली परंतु आपले सणवार, एकादशी, पौर्णिमा, शिवरात्री, जन्माष्टमी न चुकता सांभाळीत असे आणि प्रत्येक सोमवारी आणि सोमवती अमावस्येचे व्रत पाळीत होती. बापूजींप्रमाणेच तिही पक्की शाकाहारी होती. आफ्रिकेत एकदा ती आजारी झाली. डॉक्टरने ऑपरेशनचा सल्ला दिला. अशारीतीने शरीराची कापाकापी आजीला पसंत नव्हती. पण शेवटी ती तयार झाली. कसलेही इंजेक्शन न घेता किंवा क्लोरोफॉर्म न वापरता, कस्तुरबाने पूर्ण शुद्धीत हे ऑपरेशन करवून घेतले होते. एवढ्या भयानक वेदना कुणी सहन करू शकतो, हे बघून तेथले गोरे डॉक्टर, त्यांचे सारे साहाय्यक आणि स्वतः बापूजीही अत्यंत आश्चर्यचकित झाले होते. आजी अत्यंत क्षीण झाली होती त्यामुळे डॉक्टरांनी तिला कोंबडीचा रस्सा देण्यास सांगितले. बापूजींना तर हे पसंत नव्हतेच परंतु त्यांनी आजीला विचारले तेव्हा तिनेही साफ नकार दिला. "माणसाचा देह पुन्हापुन्हा तर लाभत नसतो. तुमच्या मांडीवर मला मृत्यू आला तरी चालेल पण माझा देह मी भ्रष्ट करणार नाही." डॉक्टरांनी सांगितले की, अशा स्थितीत ते रुग्णांची जबाबदारी घेऊ शकत नाहीत. गांधींनी कस्तुरबाईंना अन्यत्र कोठे तरी नेले पाहिजे. दरबानहून फिनिक्सला स्थलांतर करणे अत्यंत कष्टाचे होते परंतु जीवहत्या करून जिवंत राहाणे आजीला मान्य नव्हते. कोसळत्या पावसात आजीला रिक्षात बसवून बापूजी दरबान स्टेशनला घेऊन गेले. तिथला प्लॅटफॉर्म खूपच विस्तीर्ण होता. त्यामुळे आजीला दोन्ही हातांवर उचलून ते गाडीच्या डब्यापर्यंत घेऊन गेले. त्यावेळी मणिलालकाका किंवा माझे वडील, कोणीतरी बरोबर होते. दोघा बापलेकांना काळजी वाटत होती की, या धकाधकीत कस्तुरबाचा प्राण न जावो. परंतु आजी पतीला व मुलाला, दोघांनाही धीर देत होती की, "तुम्ही काळजी करू नका, मला काही होणार नाही." या श्रद्धेच्या बळावरच बापूजी आजीला फिनिक्स आश्रमात घेऊन गेले. तेथे रात्रंदिवस सेवा करून बापूजींनी तिला अगदी खडखडीत बरे केले. आजीवरील उपचार, तिला स्नान घालणे, धुणे आदी सर्व कामे बापूजी स्वतः करीत असत. तिचे केस विंचरणे मात्र त्यांना जमत नसे; त्यामुळे आश्रमातील एक महिला तिची वेणीफणी करीत असे. आजीचा हा कायाकल्प तिच्या मनोबलाचा व बापूजींच्या सेवेचा परिणाम होता. आजीच्या या आजाराच्या काळात, आर्य समाजाचे प्रचारक स्वामी शंकरानंद फिनिक्स आश्रमात आले होते. आजीची खालावलेली प्रकृती बघून त्यांनी मांसाहाराच्या निर्दोषतेचे वेद-पुराणांधारे प्रमाण देण्यास आरंभ केला.

बापूजी, मणिलालकाका आणि माझे वडील जवळ उभे होते. स्वामीजींचे पाल्हाळीक बोलणे ऐकून आजी संत्रस्त झाली. ती म्हणाली, "स्वामीजी, आपण काय वाटेल ते सांगा; मला मांस भक्षण करून बरे व्हावयाचे नाही. आता आपण माझे डोके अधिक न खाल तर माझ्यावर कृपा होईल. तुम्हाला आणखी काही सांगायचे असेल तर या मुलांच्या वडिलांना नंतर सांगा. माझा निश्चय मी सांगितला आहे."

बापूजींनी आजीचा जीव वाचविला तसेच आजीनेही त्यांची सेवा करण्यात कसली उणीव राहू दिली नव्हती. खेडा सत्याग्रहानंतर बापूजी जुलाबांनी अगदीच क्षीण झाले होते. गाईम्हशींचे दूध काढण्याची अत्याचारी पद्धत आणि मूक प्राण्यांची जी हत्या होत असे त्यामुळे १९०७ पासून बापूजींनी गाईम्हशींचे दूध वर्ज्य केले होते. डॉक्टरांचे म्हणणे होते की, बापूजींनी दूध न घेतले तर त्यांची प्रकृती सुधारणार नाही. आजीने डॉक्टर आणि बापूजी दोघांनाही समजाविले की, गाईम्हशींचे दूध काढणारे ज्या 'फक्का' पद्धतीचा अवलंब करतात, वासरांची उपासमार करून अधिक दूध मिळवितात, तसे शेळीच्या बाबतीत होत नाही त्यामुळे गाईम्हशींच्या दुधाच्या निषेधाचे व्रत शेळीच्या दुधाने भंग पावण्याचे कारण नाही. त्यानंतर पूर्ण सत्तावीस वर्षे बापूजींनी राष्ट्रसेवा केली याचे श्रेय आजीला दिले पाहिजे. बापूजींच्या सुरक्षिततेसंबंधी जागरूक असलेल्या आजीची इच्छा असे की, त्यांच्या दुखण्या-खुपण्याच्या प्रसंगी तिने नेहमी जवळ असावे. १९२९ मध्ये एकदा बापूजी अल्मोडाजवळच्या कौसानी येथे रात्री अंगणात झोपले होते. रात्री वाघाचा एक छावा त्यांच्या अंथरुणाभोवती फेरी मारून गेला होता. सकाळी वाघाच्या पावलांचे ठसे बघून सारेजण घाबरले परंतु बापूजी मात्र दुसऱ्या दिवशीही रामनाम घेत, उघड्यावरच झोपले. गारठ्यामुळे आजी घरात झोपत असे पण या घटनेनंतर तिनेही बापूजींच्या शेजारी, मोकळ्या आकाशाखाली आपली पथारी लावली. काही धोका झालाच तर आपण त्यात सहभागी व्हावे अशी तिची इच्छा होती.

याच वर्षी बापूजी बनारसला गेले होते. तेथे सनातनी हिंदूंनी बापूजींच्या विरोधात मोठी वावटळ उठविली होती. एका आमसभेत बापूजी एकटे गेले होते. या सभेत गोंधळ माजल्याचे जेव्हा आजीने ऐकले तेव्हा देवदासकाका आणि जवाहरलालांना बरोबर घेऊन मोटारीने ती सभास्थानी जाण्यास निघाली परंतु वाटेत गर्दीमुळे मोटार चालविणे कठीण झाले होते. जवाहरलालजींनी खाली उतरून मोटारी समोरून काही जणांना दूर हटविले परंतु गर्दी फारच होती. आजी, देवदासकाका आणि जवाहरलालजी यांच्यापासून एकटीच दूर राहिली. त्याचवेळी समजले की, सभेत दगडफेक होत आहे. तेव्हा आजी उद्गारली, "बापूजींच्या सभेत दगडफेक होत असताना मी बाहेर कशी राहू?" आणि कुणाची वाट न बघता, गर्दीतून वाट काढीत ती एकटीच बापूजींच्या जवळ पोहोचली.

वरील घटना तर महत्त्वाच्या आहेतच; परंतु आजीच्या दैनंदिन सेवेमुळेच बापूजी आजीवन आपली प्रकृती सांभाळू शकले होते. बापूजींचे खाणे-पिणे, राहाणे-झोपणे, कोणतीही गोष्ट अशी नव्हती की, जीत आजीने जागरूकतेने लक्ष दिले नाही. स्वयंपाक करणे, भांडी घासणे, वेळेचे बंधन पाळणे, त्यांच्या डोक्याला तेलाची मालीश करणे आणि दिवसातून दोनदा तळपायांना तूप चोळणे इत्यादी बापूजींची सारी कामे ती स्वतः करीत असे. एवढी व्यवस्थित सेवा झाली नसती तर अनेक उपवास प्रवास, अनेक चिंता आणि परिश्रम व रक्तदाब यांत बापूजींचा निभाव लागणे शक्य नव्हते. आजीच्या तीक्ष्ण नजरेतून काही सुटत नसे आणि बापूजींचे काम करून ती कधी थकत नसे. सकाळी चार वाजता प्रार्थनेला ती उठत असे व तेव्हापासून रात्रीपर्यंत ती कामात मग्न राहत असे. मीराबहेन आपल्या आठवणीत लिहितात, "अनेक वर्षे मी बापूजींची सेवा केली आणि या कालावधीत मला 'बा' (कस्तुरबा) च्या अद्‌भुत गुणांचे दर्शन झाले. बापूजींच्या वैयक्तिक गरजांची काळजी घेण्याचे काम बहुधा आम्हा दोघींवरच पडत असे. बापूजींच्या तुफानी दौऱ्यांत तर अमर्याद अडचणींना तोंड द्यावे लागत असे. परंतु 'बा' न चुकता नियमितपणे, न थकता, मोठ्या कुशलतेने ही कामे करीत असे. बापूजींची कामे करताना थोडी बहुत मदत माझी होत असे तरीपण सभा अथवा मुलाखती संपवून कितीही उशिरा बापूजी घरी आले तरी त्यांच्या डोक्याला तेलमालीश करण्यासाठी व त्यांचे थकलेले शरीर दाबून देण्यासाठी 'बा' त्यांच्या प्रतीक्षेत रात्ररात्र बसलेली असे आणि पुन्हा सकाळी चार वाजता उठून बापूजींच्या सेवेला लागत असे. अनावश्यक बोलत राहून ती बापूजींचा वेळ कधी वाया घालवीत नसे. अवतीभोवतीच्या लोकांपैकी 'बा' बापूजींना कमीतकमी त्रास देत असे व अधिकातअधिक त्यांची सेवा करीत असे. 'बा' कधी आजारी पडली तर मात्र बापूजींचे काम स्वतः करू शकत नसे पण तरीही त्यावर देखरेख ठेवणे तिने कधीच सोडले नाही."

बापूजींची सेवा करणे हीच बहुधा आजीची दिनचर्या बनली होती. बापूजींचे जेवण होईपर्यंत ती त्यांच्याजवळ बसून असे. स्वतः जेवत असली तरी तिचा एकडोळा बापूजींकडे लागलेला असे. एखादीही माशी किंवा डास जरी बापूजींच्या ताटाजवळ आला तरी आजीच्या हातातील पंखा किंवा नॅपकिन हलवून ती त्यांचे निवारण करीत असे. अनेकदा काही भावुक अनुयायांना बापूजींची सेवा करावीशी वाटे. आजी या लोकांच्या उत्साहाला विरोध तर करीत नसे पण त्यांच्या कामावर चौकस नजर मात्र ठेवीत असे. या नव्या लोकांच्या कामात नेहमीच काही त्रुटी राहत असत, मग आजी मुकाट्याने ते काम पूर्ण करीत असे. इतरांनी नीट न घासलेली भांडी ती स्वतः पुन्हा स्वच्छ घाशीत असे. आजीची स्वच्छता आणि टापटीप कमालीची होती. तिला कसलीच अस्वच्छता सहन होत नसे. तिच्या घरातील चादरी, उशा,

टॉवेल इत्यादी अगदी पांढरे शुभ्र असत आणि त्यामुळे लॉँड्रीतून धुऊन आणल्याप्रमाणे चकाकत. आजीचे स्वयंपाकघरही अगदी स्वच्छ असे. कुठेही, धुरकटपणा, तेलाचा वा हळदी तिखटाचा डाग त्यांना सहन होत नसे. त्याकाळी टेबल खुर्चीची प्रथा नव्हती त्यामुळे आमच्या आश्रमात जमिनीवर बसून व लाकडी पाटावर ताट ठेवून जेवण्याची पद्धत होती. हे लाकडी पाट आणि भोजनघराची फरशी, आजी दोन्ही वेळेस स्वतः साबणाने धूत असे किंवा माझ्या आईकडून धुऊन घेत असे माझी आई नेहमी म्हणते की, आजीच्या स्वयंपाक घरातील पोतेरेसुद्धा माझ्या घरच्या धुतल्या कपड्यांपेक्षा अधिक चमकत असे.

आश्रमवासीयांनी गरिबांप्रमाणेच कमीत कमी खर्चात भागवावे असे बापूजींचे आग्रहाचे सांगणे असे; त्यामुळे माझी आजी, आई, वडील आणि अन्य आश्रमवासीयांनी केवळ पाच रुपयात आपला मासिक खर्च भागविण्याचा निश्चय केला होता. आजी आणि आईचा जेवणाचा खर्च तर पाच रुपयापेक्षा अधिक नसे पण साबणाचा खर्च मात्र बराच असे. साबरमती आश्रमातील एका प्रार्थनेच्यावेळी बापूजींनी या गोष्टींचा जाहीर उल्लेख करून आजीला साबणाचा खर्च कमी करण्याची सूचना केली. परंतु आजीने न डगमगता तात्काळ उत्तर दिले की, तिला अस्वच्छता सहन करणे शक्य नाही, आणि साबणाचा खर्च न करणे म्हणजे रोगांना निमंत्रण देणेच होय, स्वच्छतेसाठी होणारा खर्च कमी करणे तिला शक्य नाही.

याच काळात आश्रमाच्या सामूहिक स्वयंपाक घरात उकडलेला भोपळा जवळपास दररोज बनत असे. भोपळा सर्व भाज्यांत स्वस्त होता. आश्रमाच्या रसोड्यात तिखट आणि मसाले वर्ज्य ठरविले होते त्यामुळे सकाळ-संध्याकाळ भोपळा उकडला जात असे. ज्याला लागेल त्याने त्यावर मीठ घेण्यास मुभा होती. या उकड-भोपळ्यामुळे आश्रमातील बऱ्याच स्त्रियांना वात-पित्ताचा त्रास सुरू झाला. परंतु बापूजींना तक्रार करण्याची कोणाची हिंमत नव्हती. आजीला कळाल्यावर तिने बापूजींकडे फिर्याद केली तेव्हा या लोकांसाठी मसाला घालून भाजी करण्याची परवानगी मिळाली. दुसऱ्या सायंकाळी भोजनाच्यावेळी बापूजींनी विचारले की, मसाल्याची भाजी जे खाणार असतील त्यांनी आपली नावे नोंदवावीत. तेव्हा आजी तात्काळ म्हणाली, "तुम्हाला यात पडावयाचे कारण नाही. आम्ही भगिनी आपसात काय ते ठरवून करू." दुसरे दिवशी जेव्हा फोडणी दिलेली भाजी या महिलांना वाढण्यात आली तेव्हा बापूजींनी गमतीने विचारले, "काय, कशी काय झालीय फोडणी? भाजीत मसाला तर ठीक आहे ना?"

हा विनोदच असला तरी सर्व महिलांना त्यामुळे संकोचल्यासारखे न व्हावे म्हणून आजी म्हणाली, "तुम्ही काय कमी होता? मागे तुम्हीदेखील मला दर रविवारी पकोडे आणि पातळ पुरणपोळी बनवावयास लावून खूप ताव मारीत होता. ते तुम्हीच होता की अन्य कोणी?"

अशारीतीने बापूजींनाही आजीचे म्हणणे मान्य करावे लागत असे. आपल्या क्षेत्रात आजीचे वर्चस्व परिपूर्ण होते आणि त्याच्या अंमलबजावणीत ती मुळीच दबकत नसे. बरेच आश्रमवासी बापूजींच्या काटेकोर आणि कडक नियम पालनास घाबरत असत. परंतु आजी त्यांना आईप्रमाणे आधार देत असे व त्यांच्या लहानमोठ्या मागण्या बापूजींपुढे ठेवीत असे. आश्रमातील स्त्रियांचे तर प्रेमळ मातेप्रमाणे सदैव ढाल बनून आजी त्यांचे रक्षण करीत. पक्षपाताचा संपूर्ण अभाव हा आजीचां सर्वश्रेष्ठ गुण होता. सर्वांना समान लेखून ती प्रसंगी दटावीतही असे. आणि सर्वांना सारखाच त्याग आणि आदरही तिच्याकडून लाभत असे. आजीची चार मुले होती पण तिने आपल्या आणि इतरांच्या मुलात कधी भेद केला नाही. देवदासकाका पंजाबच्या गुजरातनामक गावात तुरुंगात होते, तेव्हाची गोष्ट. काकांची हालहवाल बघण्यासाठी ती पंजाबपर्यंत गेली नाही. तिचे म्हणणे असे की, एखाद्या गरीब मातेला असे आपल्या मुलांकडे जाता येते काय? स्वातंत्र्याच्या लढ्यात असे कष्ट तर होणारच! ते सहन करणे हेच सत्याग्रहातील तप होय. त्याच काळात प्यारेलालजी (१९२० पासून बापूजींचे सेक्रेटरी) साबरमतीच्या कारागृहात होते. मातेच्या जिव्हाळ्याने आजी प्यारेलालना भेटावयास जात असे आणि त्यांच्या सोयी-सवलतीसंबंधी काळजी करीत असे. आजीच्या दृष्टीने, देवदास, रामदास, महादेव किंवा प्यारेलाल यांत काही फरक नव्हता.

पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यलढ्याने व सत्याग्रहाने आमची तुरुंगाची भीती दूर केली; परंतु आफ्रिकेतील जेल मात्र खऱ्या अर्थाने कारागार होता. तिथल्या त्रासाचे मोजमाप करणे कठीण! तोपर्यंत स्त्रियांनी जेलमध्ये जाण्याची तर कल्पनाही अशक्य होती. अशा भीषण तुरुंगांच्या काळात, आपल्या मर्यादेचे व स्त्रीजातीचे रक्षण व्हावे या पवित्र हेतूने तुरुंगवास पत्करणारी आमची आजी ही पहिली स्त्री असावी. १९१३ मध्ये, दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या सरकारने, रजिस्टर झालेल्या विवाहांव्यतिरिक्त, अन्य सर्व धर्मानुसार झालेल्या विवाहांना बेकायदेशीर ठरविले होते. या कायद्याने आफ्रिकानिवासी प्रत्येक हिंदू, मुसलमान, पारशी परिवारात गोंधळ उडाला कारण कुटुंबातील स्त्री मालकीण न राहता रखेली ठरविली गेली होती. हा स्त्रीत्वाचा सर्वात मोठा उपमर्द होता. हे सारे ऐकल्यावर आजी बापूजींना म्हणाली, "एवढा अपमान सहन करूनही तुम्ही मला जेलमध्ये जाण्यास का सांगत नाही?" बापूजी म्हणाले, "जेलमध्ये जाणे न जाणे हा सारा स्वयंप्रेरणेचा प्रश्न आहे. माझ्या सांगण्यावर कोणी जेलमध्ये जावे हे योग्य नव्हे. विशेषत: तू माझी पत्नी आहेस. माझी लहानशी इच्छा पूर्ण करण्यासाठी तू तुरुंगात गेलीस आणि तेथील कष्टांनी घाबरून माफी मागून परत आलीस तर काय होईल? त्यातच तुझी प्रकृतीही ठीक नाही. तुला तेथे कष्ट झाले आणि तुरुंगात जाण्याचा पश्चात्ताप झाला तर मला आणि तुलाही ते बरे वाटणार नाही." हे ऐकून आजीचा

स्वाभिमान जागृत झाला. ती म्हणाली, "तुम्हाला वाटते हा लहानगा रामदास जेलच्या यातना सहन करू शकतो आणि मी मागे राहीन? तुम्ही आणि मुले बघाल की, मी तेथे मरेन पण कदापि माफी मागणार नाही. आणि जर तशी हार खाऊन परत आलेच तर तुम्ही मला आपल्या घरात घेऊ नका. पण मला तर या लढाईत भाग घ्यायचाच आहे." बापूजी म्हणाले, "माझी अट तर तुला माहीत आहेच. माझा स्वभावही तुला चांगला माहीत आहे. तेव्हा नीट विचार कर. आताही आपला विचार बदललास तरी त्यात काही चूक अथवा बदनामी होणार नाही." आजी ताडकन् म्हणाली, "मला विचार-बिचार काही करावयाचा नाही. माझा निश्चय म्हणजे निश्चय!" अशारीतीने आमच्या आजीने आपला अल्पवयीन मुलगा रामदास आणि अन्य स्त्रीपुरुषांसह सत्याग्रह केला आणि प्रथम वॉलक्रस्ट आणि नंतर मॉरिसबर्गच्या तुरुंगात तिला ठेवण्यात आले. या तुरुंगातील घाण तर एवढी पराकोटीची होती की, ती बघून ओकारीच येत असे. भांड्यांना शिळ्या उष्ट्या अन्नाची घाण कायम चिकटून राहिलेली असे. घाम, लघवी आणि घाणीने घोंगड्या लाकडासारख्या झालेल्या होत्या. जेलमधील अर्धे फ्रॉक तर अशा अवस्थेत होते की, स्त्रियांनी ते कसे वापरले असतील कोण जाणे? आजीची प्रकृती ठीक नसल्यामुळे तीने जेलमधील जेवण स्वीकारण्यास नकार दिला होता. सध्या ती केवळ फलाहारावर असे त्यामुळे जेलमध्येही तिने फलाहाराची मागणी केली. सरकारने मागणी अमान्य केली. त्यावर आजीने आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला. पाच दिवसानंतर सरकारने हार स्वीकारली व फलाहारास मान्यता दिली परंतु हा फलाहारही इतका कमी असे की, त्याची मोजदाद करण्याची मला आजही लाज वाटते. परिणामतः पूर्ण तीन महिने आजी अर्धपोटीच राहिली. दिवसभरात तिला तीन केळी, दोन टमाटे, दोन लिंबे आणि बोराएवढी चार अलूची (एक फळ) दिली जात होती. तीन महिन्यांनी आजी जेलच्या बाहेर आली तेव्हा सत्तर वर्षांची म्हातारी दिसू लागली होती. जेलमध्येही आजी सतत काम करीत असे. या सत्याग्रही स्त्रियांनी, स्त्रियांच्या वॉर्डची सफाई, फरशी धुणे आणि जाळी काढणे ही कामे केली. सगळ्या घोंगड्या धुऊन व त्यांना आवश्यक तेथे ठिगळे लावून स्वच्छ व व्यवस्थित करून ठेवले. ॲल्युमिनियमची सारी भांडी घासून घासून चकचकीत केली. मॉरिसबर्ग जेलची निग्रो वॉर्डन, आजी आणि तिच्या सहकारी स्त्रियांवर अत्यंत प्रसन्न होती. असे मी ऐकते, परंतु या तुरुंगवासाने आजीची प्रकृती बिघडवून टाकली. जेलमधून घरी आल्यावर बापूजींनी व माझे वडील रामदास गांधी यांनी तिची पुन्हा अपूर्व सेवा शुश्रूषा केली. या काळातच प्रकृतीसाठी बापूजींनी मीठ आणि डाळ वर्ज्य करण्यास आजीला सांगितले. शाकाहारी माणसाला डाळ हे सामान्यतः महत्त्वाचे अन्न असते. आजी म्हणाली, "हे कसे व्हावे? मीठ कोण सोडू शकतो?" तेव्हा बापूजी म्हणाले, "असे असेल तर मीठ आणि डाळ वर्षभर न खाण्याचे व्रत मी स्वीकारतो." बिचाऱ्या आजीवर तर जणू वीजच कोसळली.

ती रडवेली झाली म्हणाली, "मी मीठ आणि डाळ सोडून देते. तुम्ही आपला आग्रह सोडा. मी तुम्हाला ओळखून आहे. चूक झाली माझी. मलाही फार मोठी शिक्षा होईल." परंतु गांधींनी घेतलेले व्रत सोडण्याचा प्रश्नच नव्हता. त्यानंतर बापूजींनी जवळपास आयुष्यभर मीठ वर्ज्य केले. भारतात आल्यावर काही दिवस त्यांनी मीठ वापरले पण ब्लडप्रेशर सुरू झाल्यावर ते कायमचे सोडले आणि रोज लसूण खाऊ लागले. ते म्हणत, "लसूण म्हणजे गरिबाची कस्तुरी होय! त्याचे सेवन प्रकृतीला उपकारक असते."

आफ्रिकेतील फिनिक्स आश्रमात सारे मिळून पन्नाससाठ लोक राहत असत. हे सारेजण एका परिवारातील सदस्यांप्रमाणे एकत्र राहत. तेथेही आजीची स्वच्छता आणि सर्वांविषयीची आत्मीयता मोठी आकर्षक आणि निराळीच होती. माझे वडील सांगतात की, फिनिक्समध्ये एक विचित्र अस्वच्छ स्त्री राहत असे. आजीचा स्वच्छतेचा एवढा आग्रह असूनही ही स्त्री मात्र कधी सुधारली नाही. आपला तोच बेंगरुळ गलिच्छपणा तिने चालू ठेवला. आजी तिच्या वाटचेही काम स्वतः करीत असे पण आजीने कधी भांडण केले नाही आणि अस्वच्छताही सहन केली नाही. बापूजींची सेक्रेटरी सोन्आ श्लेषिनबरोबर आजीचे चांगले पटत असे आणि दोघी मिळून बापूजींवर थोडा अंकुश ठेवीत असत. आफ्रिकेतील सत्याग्रह भरात असतानाच सारी मोठी माणसे तुरुंगात गेली असताना, मिस श्लेषिनने मुलांचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत तोंडातल्या चमचात बटाटा ठेवून पळण्याच्या शर्यतीत आजी प्रथम आली होती आणि त्यात तिला चांगल्या प्रतीच्या विनोलिया साबणाच्या तीन वड्यांचा डबा बक्षीस मिळाला होता. वस्तुतः आजीला खेळांची खूप आवड होती. नंतर आगाखान जेलमध्ये असताना बॅडमिंटन आणि टेबलटेनिसचा खेळ ती जवळून लक्ष लावून पाहत असे. अशक्तपणामुळे स्वतः खेळू शकत नसे पण सामना बघणे तिला आवडत असे. इतकेच नव्हे तर रीतसर अंपायरचे कामही करीत असे. खेळताना कोणी लबाडी केली तर आजी ती चटकन दाखवून देत असे. तिला कॅरम खेळणेही मनापासून आवडे. आगाखान जेलमध्ये, मीरा बहेनला जोडीदार घेऊन जेलर केटली आणि डॉक्टर गिल्डर यांच्याबरोबर ती कॅरम खेळत असे. हार खावी लागली तर ती खूप उदास होत असे. मीरा बहेन खूप छान खेळत असल्याने आजी तिलाच आपली जोडीदार म्हणून घेत असे. कॅरमच्या सोंगट्यातील लाल राणी जाळीत घालणे फार आवडे. नंतर आजी खूपच अशक्त झाली. जेलर केटली आणि डॉ. गिल्डर जाणून बुजून हार स्वीकारीत. हेतू हा की, खेळात जिंकून ती प्रसन्न राहावी. पुढे पुढे तर कॅरम खेळण्याच्या श्रमानेही आजीला दम लागत असे; तेव्हा त्यांच्या अंथरुणाजवळच कॅरम मांडला जात असे. आजीला स्वतः खेळणे शक्य नसे पण मीराबहेन आपल्या भिडूसह जेव्हा जिंकायची तेव्हा आजीला आपण स्वतः जिंकल्याचाच आनंद होत असे. लोकांना असे

वाटणे स्वाभाविक आहे की जुन्या काळातील एक अशिक्षित पत्नी आपल्या यशस्वी पतीचे आज्ञा पालन करू शकेल; पण त्याला सहकार्य करणे अथवा सल्ला देणे कसे करू शकणार? परंतु आमची आजी अशिक्षित असली तरी तिचे सामान्यज्ञान, तिची आकलनशक्ती आणि विचारशक्ती चांगलीच विकसित होती. तिची माणसांची पारख तर विशेषच होती. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी तिने बापूजींना शेख महबूबच्या अयोग्य संगतीविषयी सावध केले होते. आफ्रिकेतही अनेकजण त्याग, संयम यांचे ढोंग करून बापूजींना खूश करीत असत. आजी त्या सर्वांना ओळखून असे आणि कधी भ्रमात राहत नसे. मुलामुलींच्या सहशिक्षणासंबंधी बापूजींचे विचार उदार होते. त्यांना वाटत असे की, एकदा ब्रह्मचर्याचे महत्त्व समजल्यावर चिंतेचे कारण नाही. लैंगिक आकर्षण कधी उत्पन्न होईल व मन शरीर यांचा ताबा घेईल सांगता येत नाही. पण बापूजींना ते कळत नसे. परंतु आमच्या आजीला याबाबतीत किंचितही शंका अथवा भ्रम नव्हता; आणि इतरांच्याविषयी यासंदर्भात ती बापूजींना वेळोवेळी सावधही करीत असे. माझे वडील लहान वयातच शुश्रूषेच्या कामासाठी साऱ्या आश्रमात प्रसिद्ध होते; त्यामुळे बापूजीं रुग्णांची सेवा करण्याचे काम त्यांच्यावर सोपवीत एकदा फिनिक्स आश्रमात एका स्त्रीच्या संपूर्ण पायाला फोड झाले होते. बापूजीं माझ्या वडिलांना म्हणाले 'रामदास, या भगिनीचा संपूर्ण पाय लाल औषधाने साफ कर.' तेव्हा आजीने माझ्या वडिलांना स्पष्ट आज्ञा केली, 'रामा, हे काम तुझं नाही आणि मी ते तुला करूही देणार नाही. तू हे काम करू नयेस अशी माझी तुला आज्ञा आहे.' स्त्री रुग्णांची अशी सेवा किशोरवयीन मुलाला करावयास सांगणे आजीला बरोबर वाटले नाही. अशारीतीने आजी नेहमी सावध असे आणि गरज पडली तर बापूजींच्या आदेशाविरुद्ध आपले स्वतंत्र आज्ञापत्र जारी करीत असे व त्याची अंमलबजावणीही होत असे.

बापूजीं सार्वजनिक कार्यात अधिक गुंतलेले आणि समाजसेवा हेच आपल्या जीवनभराचे व्रत मानू लागले तेव्हा १९०६ मध्ये आफ्रिकेतील झुल लोकांच्या बंडाच्यावेळी त्यांनी ब्रह्मचर्याचे कठीण व्रत घेण्याचा निर्णय घेतला. हा विषय पती-पत्नी दोघांच्या समजूतीचा असल्यामुळे, बापूजींनी आजीशी त्यासंबंधी चर्चा केली. जे काम बापूजींना कष्टसाध्य वाटत होते ते आजीने अत्यंत सरळपणे स्वीकारले. सामान्यतः पुराणकथांतून, योगी-तपस्व्यांची साधना भंग करण्याचा दोष पत्नी अथवा अन्य स्त्रियांवर ठेवला गेला आहे आणि स्त्री म्हणजे मोहमायेचे निधान असे सामान्यतः मानले जाते. परंतु या बाबतीत आमची आजी अगदी वेगळी होती. तिच्या पतीने इच्छा व्यक्त करताच कसलीही चर्चा न करता तिने ब्रह्मचर्याचा स्वीकार केला.

आपल्या आत्मकथेत बापूजींनी लिहिले आहे की, आपल्या ब्रह्मचर्याच्या साधनेत आजीने कधीच विक्षेप निर्माण केला नाही. आजीला ब्रह्मचर्याचे पालन सहजसाध्य होते आणि तिच्या श्रेष्ठ चारित्र्याचे व मनोबलाचेच ते प्रमाण होते. आजीच्या निरामय व्यक्तिमत्त्वाचा हा एक विशेष होता की, बाहेरील विपत्तींच्या झंझावाताचा सामना करीत असतानाही अथवा मानसिक द्वंद्वाच्या भोवऱ्यात सापडली असताही ती शांतचित्त राहून प्रसंग निभावून नेत असे. बाह्यविरोधात अथवा वादविवादात न पडता ती आपले कर्तव्य करीत असे. ज्या स्त्रियांच्या हृदयात असा शांत स्रोत प्रवाहित असतो त्या सामान्यतः क्षत-विक्षत न होता संकटांतून निभावून जातात. अंतर्बाह्य समभाव हेच याचे रहस्य होय. असे लोक कधी रागावत नाहीत अथवा कधी लहानमोठ्या मोह-ममतेत अडकतच नाहीत असा याचा अर्थ नव्हे. मात्र परिस्थितीची वादळे अशा व्यक्तित्वांना कधी हलवू शकत नाहीत. आजीला हा गुण बहुधा ईश्वरदत्त असावा. मला असे वाटते की, प्राचीन काळातील अरुंधती आणि या युगातील कस्तुरबा गांधी यांच्या शांतचित्त भूमिकेत कोठेतरी समानता आहे; आणि एका नातीची आपल्या आजीविषयीची ही केवळ पक्षपाती कल्पना आहे, असे नव्हे.

# ४

# आमची आजी

माझा धाकटा भाऊ कनू (कान्हा) आणि मी साबरमती मगन वाडी आणि सेवाग्राम या तिन्ही आश्रमात बापूजी आणि आजी यांच्याबरोबर दीर्घ काळ राहिलो आहोत. गुजरातीत आजीला ' मोटीबा ' म्हणजे मोठी आई म्हणतात त्यामुळे आमच्या वयाची मुले आजीला मोटीबा म्हणून संबोधित असत, साबरमती आश्रमातील वास्तव्याच्या वेळी मी इतकी लहान होते की, तेथील हृदयकुंजातील निवासाचे मला स्मरण नाही. या हृदयकुंजाच्या व्हरांड्यातच मी गुडघ्यांवर रांगायला आरंभ केला होता, असे मला नंतर कळाले. परंतु सेवाग्राम आश्रम आणि मोटीबा यांची आठवण माझ्या मनात पक्की आहे. मी आणि कनू नेहमी मोटीबाच्या लहानशा घरात तिच्याबरोबर राहत असू. ते घर सठे, एक १० x १२ फुटांची खोली आणि तिला लागून आणखी एक अरुंद खोली होती. या अरुंद खोलीत मोटीबा आणि आम्हा सर्वांना झोपण्यासाठी गाद्या, उशा आणि घोंगड्या नीट रचून ठेवलेल्या असत. आम्ही सर्वजण चटई टाकून जमिनीवर झोपत असू. घरात पलंग अथवा बाज नावाला नव्हती. तिथेच मोटीबाची लहानशी पत्र्याची पेटी ठेवलेली असे. मोठ्या खोलीत एका भिंतीवर लहान आकारात कुंकवाने ॐ काढलेला होता आणि आजी नियमाने त्यापुढे दिवा लावीत असे. एक लहानशी खिडकीसारखी अलमारी होती, तिला फळ्यांचे तीन कप्पे होते. एका कप्प्यात आजीचे कपडे, दुसऱ्यात माझे आणि कान्हाचे कपडे आणि तिसऱ्यात टॉवेल, नॅपकिन व एखादी चादर ठेवली जाई. एवढाच त्या घरातील परिग्रह होता. आम्हाला मात्र तेच घर अत्यंत सुंदर व आरामदायक वाटत असे. खोलीच्या मागे बांबूच्या तट्ट्याचा अडसर करून एक कच्चे न्हाणीघर केलेले होते. त्यात मधोमध रोवलेल्या एका चौकोनी दगडावर बसून स्नान करता येत असे. नळ नव्हता. दोन बादल्यात पाणी भरलेले असे. पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्थित नालीही नव्हती. पलीकडच्या गुलाब आणि मेंदीच्या झाडांना वापरलेले घाण पाणी जाण्याची सोय होती. त्यामुळे या न्हाणीघरात फक्त हात-पाय-तोंड धुतलो जाई आणि स्नान मात्र, दूरवर असलेल्या विहिरीजवळ दोनतीन आडोशांच्या जागेत करावे लागे. दिवसातून एकदोन वेळेस, बैलांनी ओढल्या जाणाऱ्या रहाटाने विहिरीतून पाणी काढले जाई व त्यामुळे गाई बैलांसाठी असलेल्या स्वच्छ डोणीत पाणी भरलेले असे. रहाटाचे पाणी पाईपने डोणीत सोडले जाई. एरव्ही मला, कनूला आणि सर्व आश्रमवासीयांना, रहाटाने पाणी काढता येत असे. मला

मोटीबाच्या न्हाणीघरात स्नान करण्याची भीती वाटत असे कारण तिथे एक मोठा रंगीबेरंगी कानखजूरा राहत होता. शिवाय तेथे साप, विंचू येण्याचीही शक्यता असे. या आलिशान व्यवस्थेत मी कान्हा आणि धाकटी बहीण उषा यांनी अनेक महिने मोटीबाबरोबर काढले होते.

आमची मोटीबा वयाच्या सत्तराव्या वर्षीही मोठी नाजूक आणि देखणी होती तिचे मोठे मोठे डोळे, डोलेदार नाक, हनुवटी आणि सुंदर कपाळ मोठे आकर्षक होते, उंच नव्हती पण प्रमाणशीर मात्र होती. तिचे हात पाय आणि बोटे अगदी कमळाच्या देठाप्रमाणे लांबट आणि पातळ होती. एवढ्या वयातही तिची दृष्टी तीक्ष्ण होती. वाचताना तिला चष्मा लागे पण एरव्ही मात्र त्याची गरज नसे, ती मोठी चपळ होती. हळूहळू, मंद चालणे तिला जमतच नसे. आमचा आश्रमही विस्तीर्ण होता. चांगल्या वीसपंचवीस एकरात पसरलेल्या लहान लहान घरातून आश्रमाचा संसार विभागलेला होता. स्वयंपाकघर, भाजी चिरण्याचा व्हरांडा, भोजनाची जागा, न्हाणीघरे, संडास, भांडी घासण्याची जागा, बापूजींची खोली, पाहुण्यांची खोली आणि गोठा ही सारी कमीतकमी वीस-तीस किंवा चाळीस पन्नास गजाहून अधिक अंतरावर होती. या सर्व ठिकाणी आजीला वेळोवेळी जाणे भाग असे. रात्रीची प्रार्थना झाल्यावर आम्ही तिघे भावंडे आजी आणि बापूजींच्या अंथरुणांच्या मध्ये झोपत असू. थंडीच्या व पावसाच्या दिवसांत बापूजींच्या खोलीच्या रुंद व्हरांड्यात आमची अंथरुणे टाकली जात.

मोटीबा सकाळी चार वाजता प्रार्थनेच्यावेळी उठत असे ती दुपारची दहा पंधरा मिनिटांची विश्रांती वगळता, बहुधा रात्रीपर्यंत कामात असे, ती बापूजींचा नाश्ता तयार करून, स्नान उरकून घेई. त्यानंतर घरातल्या ॐ पुढे दिवा लावून भाजी चिरण्यात व स्वयंपाक करण्यात मदत करीत असे. खंडू मामा आणि मणिबाई हे दोघे हरिजन स्वयंपाकात साहाय्य करीत पण प्रामुख्याने आजी आणि आश्रमातील अन्य स्त्री पुरुषच हे काम करीत. बापूजींची पापडासारखी पातळ, कडक चपाती (खाकरा) स्वतः आजीच बनतीत असे आणि त्यांना लागणारा उकडल्या भाजीचा रस, लसूण इत्यादीही ती स्वतःच करीत असे. कधीकधी शेळीचे दूध उकळून व त्यात गूळ टाकून बापूजींसाठी ती चॉकलेट तयार करीत असे. भोजनानंतर बापूजी ते स्वतः खात असत आणि आम्हा तिघांच्या तोंडातही एक एक तुकडा ठेवीत दुपारी मोटीबा बापूजींच्या तळपायांना तूप चोळीत असे. बापूजींना झोप लागेपर्यंत ती पंखा वारीत बसलेली असे.

आमच्या झोपड्या माती, चिखल आणि बांबूच्या बनलेल्या होत्या. आमच्या आश्रमात वीज नव्हती व त्यामुळे माशा, डास घालविण्यासाठी पंखा वापरणे आवश्यक असे. त्यानंतर थोडी विश्रांती घेऊन मोटीबा स्वतः कॉफी पीत असे व आम्हा मुलांना शेंगदाणे किंवा फुटाणे खावयास देई. त्यानंतर ती नियमितपणे सूत कातीत असे. बरोबर पाच वाजता सायंकाळचे जेवण वाढी. जेव्हा बापूजी फिरावयास जात तेव्हा मोटीबा आजाऱ्यांना भेटावयास जात असे.

धुळीने भरलेल्या सडकेवर चप्पल घातलेल्या पायांनी वेगात चालल्यामुळे बापूजींचे पाय धुळीने माखले जात, त्यामुळे फिरून परत आल्यावर बापूजी एका स्टूलवर बसत आणि मोटीबा खाली बसून त्यांचे पाय धूत असे. पाय धुण्याचे हे काम आजी एवढ्या तन्मयतेने व व्यवस्थित करीत असे. हे काम करताना तिच्या मनात कधीही दास्यभाव असल्याचे मला जाणवले नाही. काम कितीही हलके असले तरी आजी आणि अधिक आश्रमवासी ते मोठ्या गौरवाने करीत असे व त्यामुळे ते तुच्छ कामही शोभनीय होत असे. सायंकाळी साडेसहा वाजता प्रार्थना होत असे... त्यावेळी प्रत्येक जण आपण स्वतः दिवसभरात काढलेले सूत दाखवीत असे. रामधुन आणि रामचरित मानसाच्या गायनानंतर प्रत्यक्ष प्रार्थनेला आरंभ होई. रामधुन आणि रामचरिताचा तो सुंदर स्वर आजही माझ्या कानात घुमत आहे. सायंकाळच्या प्रार्थनेनंतर आजी तेथेच बसून राही आणि तेथे तिचा दरबार भरत असे. त्यात सर्व आश्रमवासी महिला एकत्र येत आणि दिवसभरात काय-काय झाले, कोण आले, कोण गेले, कुणाचे पत्र आले, कोण आजारी आहे इत्यादी सर्व वृत्तान्त कथन केला जात असे. मोटीबाच्या मांडीवर अथवा शेजारी बसून मीही अनेकवेळा स्त्रियांची ही चर्चा ऐकली आहे थंडीच्या दिवसात आमचे खंडूमामा एका मातीच्या शेगडीत चुलीतले उरलेले निखारे टाकून ती प्रार्थनास्थळी आणून ठेवीत असे. त्या विस्तवावर साऱ्या स्त्रिया हात शेकून घेत. तसे शेगडीवर शेकने मला आजही सहन होत नाही, त्यावेळीही शेगडीची धग सहन होत नसे. तेव्हा मी आजीच्या पदराखाली झोपत असे किंवा तिच्या पाठीला चिकटून बसत असे, त्यामुळे ऊब मिळाली तरी धगीचा त्रास होत नसे. त्यानंतर आजी बापूजींच्या डोक्याला तेल लावीत असे व पुन्हा तळपायांना तूप लावीत असे. त्यामुळे बापूजींचा रक्तदाब नियंत्रणात राहत असे. पायांना तूप लावल्यावर आजी ते इतक्या दक्षतेने पुशीत असे की, नखांच्या सांदीत अथवा पायाच्या मागील बाजूस कोठेही पोपडेपणा नावालाही राहत नसे. एवढ्या पराकाष्ठेने पाय पुसल्याचे हे काम आजीच करू जाणे. कधी कधी मीही मालीश करण्याचा आव आणि असे पण त्यात काही दम नसे. बापूजींच्या पायाशी खेळतानाच वडीलधाऱ्यांच्या सेवेचा माझ्यावर संस्कार होत असल्याने त्यांना बरे वाटत असे. हे सारे आटोपल्यावरच मोटीबा अंथरुणावर पडत असे. मोटीबा रिकामे बसलेली आश्रमातील कोणीही बघतले असेल असे मात्र वाटत नाही. ती जे काही करीत असे ते अत्यंत दक्षतेने व व्यवस्थित करीत असे.

अगदी साधेपणातही मोटीबा मोठी सुंदर, रेखीव दिसत असे. तिला फिक्के रंग आवडत नसत. तिच्या पांढऱ्या साडीला सामान्यतः एक इंच रुंदीची लाल किनार असे. साडी नेसण्याची तिची पद्धतही मोठी व्यवस्थित होती. डोक्यावरून पदर नसलेल्या अवस्थेत मोटीबाला कदाचित कुणी पाहिले असेल. मोटीबाच्या खांद्यावरील अथवा कमरेला खोचलेला पदर कधी जागेवरून घसरलेला कोणी बघितला नव्हता. रात्री झोपेतही आजीचे मस्तक

झाकलेले असे. एखादा आश्रमवासी मळकट कपड्यात किंवा केस नीट न विचरलेला दिसला तर, "कपडे व्यवस्थित का वापरीत नाही?, हे काय वेडेवाकडे गुंडाळलेय"?, असे सहजपणे विचारीत असे-मोटीबाच्या रक्तात आळस नावाला नव्हता. साबरमती आश्रमात, सारे मजूर काढून टाकून स्वावलंबनाचा प्रखर प्रयोग करण्यात आला होता. तेव्हा गोशाळेचे कामही आश्रमवासीयांना करावे लागत असे. हा प्रयोग सुरू होताच मोटीबाही गोशाळेत गेली, गोशाळेचे व्यवस्थापक मोटीबाला काय काम द्यावे या विचाराने सटपटून गेले. त्यांचा संभ्रम मोटीबाच्या लक्षात आला. ती म्हणाली, "मला काम का सांगत नाही? गाईसाठी कण्या भरडायच्या नाहीत का?" व्यवस्थापक म्हणाले "बा, तुम्ही तर......." आजी लागलीच म्हणाली "नाही नाही, आता मी दळून देते." मोटीबा जात्यावर जाऊन बसली आणि भजन गातगात दळण दळू लागली, त्याचप्रमाणे कधी प्रवासात असली तर जेथे जाईल तेथे स्वयंपाकघरातील कामात ती सहकार्य करीत असे आणि नंतर साऱ्या स्त्रियांना घेऊन सभा संमेलनात जात असे. मोटीबाच्या या साध्या सरळ एकात्मतेने देशातील अनेक गरीब सामान्य स्त्रियांची मने जिंकून घेतली होती आणि त्यांना तिच्याकडून धीर व आश्वासन लाभत असे. मोटीबाच्या या सहृदयतेने प्रभावित होऊनच, खेडा आणि बार्डोलीच्या मिठाच्या सत्याग्रहात अनेक स्त्रियांनी काम केले होते. त्या स्त्रियांनी लाठ्या खाल्या, तुरुंगवास पत्करला परंतु आपल्या पतीला अथवा परिवाराला सरकारची माफी मागण्यापासून वा दंड भरून सुटका करून घेण्यापासून परावृत्त करीत कुटुंबातील पुरुषमंडळीचे धैर्य टिकवून ठेवले. अशा रीतीने महिला आघाडी मजबूत करण्याचे फार मोठे श्रेय मोटीबाकडे जाते. नंतरच्या काळात मोटीबाची वृद्धावस्था ध्यान्यात घेऊन सेवाग्राममध्ये तिच्यासाठी स्वतंत्र व जवळच संडासाची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु आजी त्याचा वापर करीत नसे. आपले मलमूत्र इतर कोणी साफ करावे हे तिला पसंत नव्हते. त्यासाठी रात्री ठेवण्यात येणारे पात्रही ती स्वतःच साफ करीत असे. आपल्या कामासाठी इतर कोणाची मदत घेणे मोटीबाला आवडत नसे.

मी आणि माझे भाऊबहीण आश्रमात काही महिने अवश्य राहत असू. कनू तर काय, अनेक वर्षे बापूजींबरोबर राहिला. तो तर आपल्या आजीआजोबांचाच मुलगा अधिक होता. त्यामुळे तो जेव्हा वडिलांना पत्र लिहीत असे त्यावेळी मोटीबाचे अनुकरण करीत तोही त्यांना आशीर्वाद लिहीत असे. असे असले तरी, आमच्या जेवणाराहाण्याचा खर्च माझे वडील आश्रमाला देत असत. आश्रम ही सार्वजनिक फंडातून चालणारी सामाजिक संस्था होती. तेथे सामान्य जनता-आम्ही पुत्र-पौत्र असा भेदभाव बाळगणे अनुचित होते. त्यामुळे जितके दिवस आम्ही आश्रमात राहत असू तितक्या दिवसांचा आमचा खाण्यापिण्याचा खर्च आमच्या वडिलाकडून वसूल होत असे व आश्रमाकडून त्याची रीतस्तर पावतीही मिळत असे. आजीला वाईट वाटे पण मन घट्ट करून आमचा भोजनखर्च ती कार्यालयात जमा करवीत असे.

दोन्ही वेळच्या जेवणाच्या वेळी, मी कनू आणि उषा बापूजींच्या शेजारी पण आजीच्या जवळ बसत असू. बापूजी आमच्या योग्य आहाराकडे लक्ष पुरवीत आणि पालकाची भाजी आणि भोपळ्याची उकडलेली व मीठ नसलेली भाजी आम्हाला खायला लावीत असत. प्रत्येक सोमवारी मोटीबाचा उपवास असे त्यामुळे तिच्यासाठी बटाटे किंवा रताळी (जिम्मी कंद) उकडून त्याला जिरे तुपाची फोडणी देऊन त्यात मीठ व मिरपूड टाकलेली असे. त्या भाजीची चव काही वेगळीच असे आणि मोटीबा ती चमचा चमचा भाजी, खुशाल आम्हालाही देत असे. तेव्हा बापूजी म्हणत, 'तू या मुलांची सवय बिघडवीत आहेस.' तेव्हा आजी म्हणत असे, 'अरे, इतर आजी आजोबांच्या घरी तर नातवंडांना मिठाई मिळते. मी बटाट्याचे दोनचार तुकडे दिल्याने काही नुकसान होणार नाही, तुम्ही तर या पोरांना मीठही न लावता उकडलेला पालक खायला लावता,' यावर बापूजी फक्त हसत असत, आम्ही मुले आजीच्या छात्रछायेच्या आधाराने आनंदून जात असू. सेवाग्राममध्ये आम्हा भावंडांना कधी काही उणीव भासली नाही. मोटीबाच्या लाडाने, काही उणीव असल्याचे अथवा वेगळ्या प्रकारचे आजी आजोबा असू शकतात याची आम्हाला कधी जाणीवच झाली नाही. आम्ही तिघेही आमच्या संसारमुक्त, परिव्राजक आजीआजोबांवर संतुष्ट होतो.

आमचा परिवार आणि सारा आश्रम शुद्ध खादीधारी होता. त्यातही मोटीबाची शिस्त लक्षणीय होती. मोटीबाला खादीचे महत्त्व पटवून देण्यात तसेच स्पृशास्पृश्यतेची भावना सोडून हरिजनांना जवळ करण्यास तयार करण्यासाठी बापूजींना बराच काळ लागला असे काही लेखांत उल्लेख आढळतात. मला वाटते यात काहीतरी चूक असली पाहिजे. कारण, मोटीबा स्वभावाने साधी सरळ होती. बापूजींच्या सांगण्यावरून तिने बूट मोजे घालणे व पार्शी वेषभूषा करणेही स्वीकारले होते, काटा-सुरी वापरून जेवणे शिकून घेतले होते. खादी वापरण्यात तर तसे अवघड काहीच नव्हते. वस्तुतः मोटीबाने खादी वापरणे आधीच सुरू केले होते, कारण तिने आठ-दहा नंबरी सुताच्या अरुंद खादीला पाचगज आडवा तुकडा जोडून, दोन किलो वजनाची तरटासारखी साडी नेसण्यास प्रारंभ केला होता. त्यानंतर बऱ्याच उशिरा, गंगाबहेन मुजुमदारांना रुंद पन्ह्याची खादी तयार करून, बापूजींना धोतर बनवून दिले होते. १९१८ तच आमच्या घरात खादीचा असा प्रवेश झाला होता की, दुसरा कपडाच घरात येत नव्हता आमच्या येथील स्वयंपाक घरातील फडकीही सारी खादीची असत. एकदा मोटीबाच्या पायाच्या करंगळीत ठेच लागली. खादीच्या जाड चिंधीने मोटीबा जखम बांधण्याचा प्रयत्न करीत होती, तेवढ्यात एका स्त्रीने तिला मलमलची पट्टी दिली. ही पट्टी जखमेवर घासली न जाता, नीट बांधली गेली असती आणि टिकून राहिली असती परंतु आजीने खादीच्या पट्टीचाच आग्रह धरला. कसे तरी खादीच्या चिंधीवरच तिने काम भागविले पण

मलमलच्या पट्टीला हातही लावला नाही. मोटीबा अत्यंत नियमितपणे चरख्यावर सूत कातीत असे. सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी त्यांचे सूत नेहमी सर्वांत अधिक असे. दररोज जवळजवळ चारपाचशे तारा सूत ती कातीत असे. मोटीबा म्हणत असे की, बापूजींच्या अन्य कामात साहाय्य करणे तिला शक्य नसले तरी चरखा चालविणे तरी शक्य होते, आणि सूताच्या धाग्यानेच स्वराज्य येणार होते. आरंभी तिला आपली खादीची वजनदार साडी धुणे कठीण होत असे तेव्हा बापूजी तिला म्हणत, "आण तुझी साडी मी धुऊन देतो." परंतु अशा हलक्या कामात बापूजींचा अमूल्य वेळ वाया जावा हे आजीला पसंत नसे.

आगाखान जेलमध्ये असताना, मोटीबाने एका आश्रमवासी महिलेला, सेवाग्राममध्ये असलेल्या आपल्या कपड्यांसंबंधी अशी सूचना लिहून पाठविली "बापूजींनी स्वतः काढलेल्या सुतापासून मुद्दाम माझ्यासाठी तयार करण्यात आलेली साडी तर, जेलमध्ये मला पाठवाच कारण मृत्यूनंतर माझा देह त्या साडीतच गुंडाळला जावयाचा आहे" बापूजींच्या हातच्या सुताची बनवलेली ही साडी मोटीबा बहुधा नेहमीच नेसत असे. चितेवर तिचा देह ठेवला तेव्हाही तिच्या अंगावर हीच साडी होती. आपल्या अंतिम तुरुंगवासातून मोटीबाने अनेकांना पत्रे लिहिली होती, त्यातले एक पत्र पुढे देत आहे.

**आगाखान जेल,**

चि. काशी सोमवार ९-८-४३

ता. २२-७-४३ चे तुझे पत्र मिळाले. वाचून आनंद वाटला. पाऊस आणि पावसाळी वातावरण लक्षात घेता माझी प्रकृती ठीक आहे. खोकला येतो. दुर्गा (कै. महादेव काकांची पत्नी) कडील वृत्तान्त कळाला. तिकडे सर्व मजेत असल्याचे जाणून आनंद झाला. तिला (दुर्गा) आणि बावला (दुर्गाका बेटा नारायण) ला आणि इतरांनाही माझे शुभाशिर्वाद मला असे वाटते की तिला (पतीच्या पश्चात्) आता सेवाग्राममध्ये राहणे बरे वाटणार नाही. त्यामुळे ती आता तेथेच (वेडछी-गुजरात) राहील. जेथे असेल तेथे सुखी राहो. आम्ही असे ऐकले होते की सावित्री (जमनालाल बजाजांची सून) पुन्हा मंदिरात (जेलमध्ये) गेली आहे. आश्रमातील सर्वांना आशीर्वाद. दुसरे म्हणजे माझी पेटी उघडून तिच्यातील चारपाच साड्या पैकी दोन काळ्या किनारीच्या साड्या बुआजी (बापूजींची बहीण) ला पाठविणे. सोबतचा चारवार कपडाही पाठविणे. दुसऱ्या दोन लाल किनारीच्या साड्यांतली एक रामी (हरीलाल काकाची ज्येष्ठ कन्या) ला आणि दुसरी मनू (हरिलाल काकांची दुसरी मुलगी) ला पाठविणे. तसेच या पेटीत गोरखपूरची म्हणजे गीता प्रेसने प्रकाशित केलेली मोठी **गीता** आहे ती शांतिकुमार कडे पाठविणे म्हणजे ते ती येथे पाठवतील. आता बापूजींचा जन्म दिवस जवळच आहे तेव्हा बुआजीला व मुलींना काही देण्याची माझी इच्छा आहे; त्यामुळे हे लिहिले आहे.

त्या शिवाय एक खाकी रंगाचे कापड आहे ते रामीला पाठवावे. त्या शिवाय माझे काही ब्लाऊजही आहेत त्यातले देण्यासारखे वाटतील तेही पाठवून देणे; तसेच माझा बाह्या असलेला भुऱ्या रंगाचा स्वेटर आहे, तोही पाठविणे. डॉ. मनूभाई आणि हिरा बहेनला आशीर्वाद. आज राखीपौर्णिमा आहे. तूही साजरी केली असशील ना?

**बा आणि बापूचे आशीर्वाद.**

मोटीबाला हरिजनांविषयी काही विरोध नव्हता. नाहीतरी आफ्रिकेत असताना, १८९६ मध्ये मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन व सर्व जातीचे हिंदू मोटीबासह तिच्या घरीच राहत आणि खातपीत होते. मोटीबा परधर्मीय व परजातीच्या अनेक लोकांची सेवा करीत असे. साहजिकच हरिजनाला स्पर्श करण्यास तिचा काही विरोध नव्हता. असे नसते तर तीही बापूजींच्या बहिणीप्रमाणे राजकोटला निघून गेली असती, किंवा मगनलाल गांधींच्या पत्नीप्रमाणे तिनेही रडून गोंधळ घातला असता. हरिजनांच्या संदर्भात मोटीबाने बापूजींना पूर्ण साथ दिली होती. स्वच्छतेविषयी मोटीबाचा फार आग्रह होता. उष्टावलेला प्याला पुन्हा तसाच माठात बुडवू नये. आणि जेवणाच्या वेळी पळी चमचा उष्ट्या ताटाला लागू नये, हे आधुनिक स्वच्छतेचे काही सर्वमान्य नियम होत. अशा नियमाचे काटेकोर पालन व्हावे असा मोटीबाचा आग्रह असे; मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन असो की, ठाकुर ब्राह्मण वा हरिजन असो, साऱ्यांना हा नियम लागू असे. आश्रमात येणाऱ्या प्रत्येकाला हळूहळू स्वच्छतेची व नीटनेटकेपणाची शिकवण दिली होती. त्यामुळे हरिजन व इतरांत ती काही भेदभाव करीत असे, हे म्हणणे बरोबर होणार नाही. अस्पृश्यांना शिवण्यात तिला काही वावगे वाटत नसे व म्हणूनच सेवाग्रामच्या आश्रमात खंडूभाई आणि मणिबाई स्वयंपाक घरात बसून पोळ्या लाटीत असत. आम्हा लहानमुलांना, स्वयंपाकघरात इथे तिथे हात घालण्याबद्दल खंडोमामा आणि मणिबाई रागवत असत. त्यांना त्रास देण्यास आम्हाला मजा वाटत असे. मला आणि कनूला तर खंडूमामा कुटुंबातीलच वाटत. ते नोकर आहेत हे आम्हाला माहीत नव्हते; नोकर कसे असतात याचीही आम्हाला कल्पना नव्हती.

रामायण ऐकणे व त्याचा अर्थ समजावून घेणे मोटीबाला फार आवडत असे. चंपारण्यातील निळीच्या सत्याग्रहाच्या वेळी, मोटीबाने बिहारमधील गावात राहत असताना, गरिबांची सेवा करता करता मोडकीतोडकी हिंदी शिकून घेतली होती. नंतर राजेंद्र बाबू आणि त्यांच्या पत्नी राजवंशी देवी तिचे विशेष मित्र बनले होते. राजेंद्रबाबू स्वतः मोटीबाला रामायणाचा अर्थ समजावून सांगत असत. त्यामुळे, तुळसीदासांच्या रामचरित्रमानसावर मोटीबाचे विशेष प्रेम होते. सेवाग्राममधील कामाच्या घाईतही सायंकाळी प्रार्थनेस जाण्यापूर्वी तेथे म्हटला जाणारा भाग ती आधी स्वतः वाचून घेत असे. त्यादिवशी म्हटल्या जाणाऱ्या

उताऱ्याचा अर्थ रोज तिला कोणीना कोणीतरी सांगत असे. प्रार्थनेत चालीवर होणाऱ्या रामायणाच्या पठनात ती स्वतः सहभागी होत असे. तिचा आवाज मधुर होता. भागवताचे पारायणही मोटीबाला आवडत असे. तिने दोन तीनवेळा, संपूर्ण रामायणाचा व संपूर्ण भागवताचा पाठ केला होता. लोकांच्या दृष्टीने आमची आजी अशिक्षित होती परंतु ती नियमाने गुजराथी हिंदी वर्तमानपत्रे वाचीत असे. देशाच्या वास्तव स्थितीची तिला चांगली कल्पना असे. या शिवाय, दमादमाने, गुजरातीतील हरिजन बंधूचा अंक ती समग्र वाचून काढीत असे. आणि त्यामुळे बापूजींच्या विचारांशी ती परिचित असे. महायुद्धाच्या वार्ता वाचून ती दुःखी होत असे आणि म्हणत असे की, "ही लढाई जगाचा विध्वंस करूनच थांबेल." दुष्काळाच्या बातम्या वाचून मोटीबाने सेवाग्रामच्या पत्रात लिहिले, "बंगालच्या बातम्या वाचून तर अंतःकरण विदीर्ण होते. तेथे तर आभाळच फाटले आहे. देव काय करीत आहे कुणास ठाऊक?"

१९३९ मध्ये राजकोटच्या ठाकुर साहेबांनी प्रजेवर अत्याचार केले, त्यामुळे तेथील जनतेने सत्याग्रहाचा निर्णय घेतला होता. सरदार पटेल या संदर्भात राजकोटला गेले होते. वर्तमानपत्रातून या बातम्या वाचून मोटीबाने स्वतः निर्णय घेतला की, राजकोट तर तिची जन्मभूमी होय, तिथे जाऊन तेथील जनतेला सत्याग्रहात साथ दिलीच पाहिजे. बापूजी आणि सरदारांनी तिला पुष्कळ अडविले पण मोटीबा राजकोटला गेली आणि सरकारने तिला तुरुंगात डांबले. मृदुलाबेन साराभाई आणि मणिबेन पटेल बरोबर होत्या म्हणून मोटीबा एकाकी पडली नाही. देवदास काका तिला भेटायाला राजकोटला गेले होते. तेथील दुरवस्था बघून काकांचे डोळे डबडवून आले होते, पण मोटीबाने तेथील त्रासाचा कधी उल्लेखही केला नाही. या काळात मोटीबा दररोज बापूजींना पत्र लिहीत असे आणि बापूजींही आपल्या अनेक कामांच्या व प्रवासाच्या घाईगर्दीतही वेळ काढून तिला सविस्तर उत्तर पाठवित. या पत्रांचा संग्रह मणीलाल काकांनी प्रसिद्ध केला होता. ती 'प्रेमपत्रे' वाचताना अंतकरण गदगदून आले. मला वाटते कशी असेल ती स्त्री? तिची भक्ती किती विशिष्ट, तिची श्रद्धा किती अतुट होती! कसे असेल तिच्या पतीचे तिच्यावरील प्रेम? मला वाटते, असे प्रेम आणि असे समर्पण विरळाच!

आज समाजजीवनात इंग्रजी भाषेतला एक शब्द फार प्रचलित झाला आहे. आधुनिक स्त्रीच्या जीवनाची सारी भिस्तच खासकरून त्या शब्दावर आहे. एक शब्द आहे-'नर्व्हस' होणे हा नी दुसरा शब्द आहे 'टेन्शन' येणे हा. या दोन शब्दांचा वापर इतका फॅशनेबल झाला आहे की, शिक्षित-अशिक्षित, ग्रामीण-शहरी, श्रीमंत-गरीब सर्व या शब्दांचा सर्रास वापर करीत असतात. शब्द येतो तेथे शब्दामागून भावही येतोच. आणि मग आज मनात जागृत केलेला

भाव, सवय बनून अंतर्मनावरचे कायम सावट बनून ठाण मांडतो. या प्रकारे हर प्रकारच्या प्रसंगात व परिस्थितीत आम्ही नाराज राहतो, 'टेन्शन' घेतो, उद्विग्न बनतो. परंतु आमच्या आजीने मात्र बुहुधा हे शब्द ऐकलेच नसावेत! ती कधी नर्व्हस होत नसे आणि 'टेन्शन' तिला कधी माहीत नव्हते. तिच्या जीवनात अनेक संकटे आली पण ती कधी घाबरली नाही, नर्व्हस झाली नाही की, तिने कधी टेन्शन अनुभवले नाही. जे समोर आले त्याला तिने तोंड दिले कधी तक्रार केली नाही. कधी त्याचे कोडकौतुक करीत बसली नाही.

बहुधा १९३५ मध्ये, कलकत्त्यात अत्यंत आजारी पडून बापूजी सेवाग्रामला परतले. त्याची अस्वस्थता व अशक्तता बघून बरेच ग्रामवासी घाबरून रडू लागले होते. बापूजींच्या मृत्यूनंतर कसे होईल, अशी त्यांना भीती वाटत होती. पण मोटीबाला घाबरणे माहीतच नव्हते. तिने जोमाने बापूजींची सेवा आरंभिली. अत्यंत दक्षतेने व व्यवस्थित शुश्रूषा करून तिने त्यांची प्रकृती ताळ्यावर आणली १९२० मध्येही बापूजी असेच आजारी पडले होते आणि १९३३ च्या हरिजन उपवासानंतर तर त्यांनी जगण्याची आशाच सोडली होती. या उपवासाच्या वेळी मोटीबा साबरमती जेलमध्ये होती आणि बापूजी येरवड्याच्या तुरुंगात. त्यावेळी आपल्या डायरीत मोटीबाने लिहिले आहे–

**३ मे, १९३३ :** "चार वाजता प्रार्थना, **गीता** वाचली. नित्यकर्म, कॉफी घेतली. पेपर वाचला. भोजनकालच्या वर्तमानपत्रातून कळाले की, बापूजी हरिजनांसाठी दुसरा उपवास करणार आहेत. ८ मे, १९३३ सोमवारी सुरू होईल. बापूजींचा आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास उरलेला नाही. बापूजींच्या जवळ कसे जावयास मिळेल, याची चिंता लागून राहिली आहे. बापूजींचा हा प्रश्न, ही तपश्चर्या अत्यंत कठीण आहे.

**८ मे, १९३३ :** चार वाजता प्रार्थना-**गीता** वाचली. आजपासून बापूजींचा महायज्ञ प्रारंभ होत आहे. आम्ही येथे (जेलमध्ये) प्रार्थना केली. मला बापूजींकडे घेऊन जातील अशी आशा वाटत होती.

**१० मे, १९३३ :** बापूजींच्या उपवासाचे तीन दिवस आज पूर्ण झाले. मला बोलावलेले नाही. आजकाल वर्तमानपत्राची वाट बघत असते, त्यात काय असेल? 'हरिजन' चा अंक वाचला मन तर अस्वस्थ ते अस्वस्थच राहते.

**११ मे, १९३३ :** काल रामदास भेटायला आला होता. या वेळी माझं नशीबच फुटलंय, नाही तर सरकार मला का घेऊन जात नाही? काय करू ? फारच काळजी वाटते. या वेळीही मी दूरच आहे. मी बापूजींना तार केलीय- "मला तुमच्याकडे यावयाचे आहे; येथे माझा जीव घाबरा होतोय," त्यांची तार आली, "धीर धर" दुसरी तार आली, "आम्ही सरकारला परवानगी मागू शकत नाही. शांत राहा." "तेव्हा आता मी सूत कातते, प्रार्थना

करते पण काहीच बरे वाटत नाही," ती चिंताग्रस्त होती कारण यावेळी मोटीबा बापूजींपासून दूर एका जेलमध्ये परस्वाधीन होती. पण एकदा का ती आपले कर्तव्य पार पाडण्याच्या मागे लागली की, तिची सारी चिंता दूर पळत असे. बापूजींच्या अनेक उपवासांत मोटीबा त्यांच्या बरोबर राहून त्यांची तन्मयतेने सेवा करीत असे. बापूजी जीवन मृत्यूच्या सीमेवर असत परंतु मोटीबा विव्हळ न होता मन कठोर करून त्याची सेवा शुश्रूषा करण्यात गढून जात असे. मनाच्या ताणावर असे नियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या धैर्याची गरज असे,-मोटीबामध्ये असे धैर्य रोमरोमात भरलेले होते. साबरमती जेलमधील या दैनंदिनीची पाने मोटीबाची मनोव्यथा प्रकट करतात. परंतु या अवस्थेतही ती स्वतःलाच धीर देत असे आणि जेलमधील बरोबरच्या लोकांना सांगत असे, "तसा काही त्रास होण्याचे कारण नाही. महादेव, सरदार आणि सरोजिनी देवी त्यांच्याबरोबर आहेत. पण तरीही मी जवळ असेन तर फरक पडेल ना?" या 'मी जवळ असेन' या वाक्यखंडात जी वेदना दडलेली आहे ती लांबलचक वर्णनानेही कळू शकणार नाही. त्या काळातील मोटीबासारख्या वेगळ्याच मातीच्या घडलेल्या स्त्रियांची तपस्या काही वेगळ्याच तेजस्वितेचे आणि धैर्याचे दर्शन घडविते.

आमची मोटीबा मानवतेची प्रतिकृतीच होती. तिच्या उपस्थितीने आश्रमातील जीवन माधुर्याने व सहृदयतेने भरून जात असे. बापूजींचे जीवन तर तपश्चर्यारत होते परंतु तपस्व्याची शुष्कता अथर्वा कर्कशता त्यांच्या जीवनात नव्हती, उलट प्रेम आणि करुणेने ते ओथंबलेले होते आणि याचे श्रेय आमच्या आजीकडे जाते. मोटीबाने आपल्या नम्रतेने, कर्तव्यपरायणतेने, प्रखर निष्ठेने मनोबलाने व सहनशीलतेने बापूजींना जिंकून घेतले होते. बापूजी या देशातील लक्षावधी लोकांना पित्याप्रमाणे होते आणि मोटीबानेच या पित्याच्या हृदयातील वात्सल्य आणि करुणेचे गुप्त स्रोत प्रवाहित केले होते. त्यामुळेच मोटीबा साऱ्या आश्रमाची 'बा' म्हणजे आई बनली होती. मला वाटते की, बापूजींच्या आश्रमात एवढ्या साऱ्या लोकांना राहणे, मोटीबाशिवाय शक्य झाले नसते. बापूजी तर प्रखर, तप्त सूर्यासारखे होते त्यांच्या त्या तपःपूत तेजाच्या जवळ राहणेही कठीण कसोटी होती परंतु मोटीबा या तेजाचा प्रचंड ताप स्वतःवर घेऊन आश्रमवासीयांना वाचवित होती.

पंडित मोतीलाल नेहरू अनेक दिवस साबरमती आश्रमात येऊन राहत असत. मोटीबाची साथ नसती तर त्यांना आश्रम अगदी रुक्ष वाटला असता. सेवाग्राममध्ये बापूजींच्या झोपडीपर्यंत जावयाचे तर प्रथम मोटीबाची झोपडी लागत असे. ती आपल्या झोपडीसमोरच्या ओसरीवर बसून चरखा चालवीत असे आणि परिचित अपरिचित सर्वांचेच आपल्या या गोडव्याने स्वागत करीत असे. सर्वांच्या खाण्या पिण्याची व राहण्याची व्यवस्थाही तीच करीत असे. बापूजीतर पाहुण्यांबरोबर चर्चा करण्याचे काम तेवढे करीत. इतर साऱ्या सोयी-गैरसोयी

मोटीबाच बघत असे, काँग्रेस कार्यकारणीचे सारेच सदस्य मोटीबाला भेटल्याविना राहत नसत या सर्व पाहुण्यांत सरदार जवाहरलालजी, राजेंद्र बाबू व आचार्य कृपलानी यांचे विशेष स्थान असे. राजाजी तर व्याहीच होते. मोटीबा ज्याच्या त्याच्या इच्छेनुसार सर्वांना चहा, कॉफी देत असे. या सर्वांत सरहद्द प्रांतातील बादशहाखान मोटीबाचे विशेष मित्र होते. बादशहाखान सहा फुटांहून अधिक उंच होते. मोटीबा फारतर चार फूट आठ किंवा दहा इंच उंच होती. बादशहा खान जेव्हा केव्हा पेशावरहून येत तेव्हा मोटीबासाठी बदाम, बेदाने, अक्रोड आणि इराणची मऊ काळी खजूर घेऊन येत. या दुर्मिळ मेव्याचा बराचसा भाग मी आणि कनूच लंपास करीत असू, मोटीबाच्या मैत्रिणींमध्ये दादाभाई नौरोजींच्या तीन नाती गेसी बेन, खुर्शीद बेन व पेरिन बेन, करोडपती सर जहांगीर पेटिट यांची कन्या मिठूबेन पेटिट, सरोजिनी नायडू, मोतीलाल नेहरूंची पत्नी स्वरूपराणी आणि राजेंद्र बाबूंची पत्नी राजवंशी देवी या विशेष जवळच्या होत्या, या सर्व मैत्रिणी होत्या. इतर सर्व स्त्रिया लेकी अथवा सुना असत. या सर्वांना मोटीबा हेच आश्रमाचे सर्वाधिक आकर्षण होते.

मोटीबा आश्रमात नसती तर आश्रमवासीयांना हिंदू सणावारांचा बहुधा पत्ताही लागला नसता. सणाच्या दिवशी मोटीबा आवर्जून काहीतरी गोडधोड करून आश्रमवासीयांना देत असे. त्यामुळे आश्रमात एक प्रकारचे आनंदमय मंगल वातावरण निर्माण होत असे. घनश्याम दास बिर्ला तर नेहमी म्हणत. "आश्रमात सारेच विक्षिप्त लोक राहतात पण केवळ मोटीबा समजूतदार असल्यामुळेच आश्रम जीवन सह्य व्हायचे". गांधीजीदेखील म्हणत, "माझ्या आणि 'बा' च्या सहवासांत येणाऱ्यांमध्ये माझ्यापेक्षा 'बा' वर श्रद्धा असणारेच अधिक आहेत". आपल्या सर्व स्नेह्यांशी मोटीबा हिंदी-गुजरातीत बोलत असे, पण जेथे आवश्यक असेल तेथे बेधडक इंग्रजीही बोलत असे. खरे म्हणजे मोटीबा इंग्रजी शिकली नव्हती, पण कानावर पडणारे इंग्रजी शब्द वापरून ती काम निभावून नेत असे. बापूजींचे आफ्रिकेतील मित्र पोलाक यांच्या पत्नी निली यांनी 'मिस्टर गांधी दि मॅन' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात लेखिकेने मोटीबाच्या इंग्रजीचे केलेली वर्णन मोठे मजेशीर आहे. मी स्वतः देखील मोटीबाला राजाजींशी इंग्रजीत बोलतांना अनेकदा ऐकले आहे. मोटीबाच्या मनात संकोच वा भीती नसल्याने, ती जे बोलत असे ते बरे वाटत असे.

१९२२ ते १९२४ पर्यंत बापूजी कारागृहात होते. कैद्यांच्या काही मागण्यांच्या संदर्भात नेहमीचे जेवण बंद करून ते केवळ दुधावर राहिले होते. त्यांचे वजन घटून १०४ पौडांचे ९० पौंड झाले होते. मोटीबा बापूजींच्या भेटीसाठी तुरुंगात आली होती. पायऱ्या चढताना बापूजींचे पाय काहीसे लटपटले तेव्हा, मोटीबांनी असे होण्याचे कारण विचारल्यावर, बापूजींना अनिच्छेने सारे सांगणे भाग पडले. बरोबर इंग्रज जेलर होता. त्याने मोटीबाला सांगितले की, मि. गांधींनी जे काही सांगितले त्यात माझा दोष नाही, तेव्हा मोटीबा म्हणाली, 'आय नो माय हजबंड

ऑलवेज मेक मिसचीफ', या मोडक्या तोडक्या इंग्रजीने त्या जेलरचे मन जिंकून घेतले. "माझे पती नेहमीच काहीतरी भानगड करीत असतात" असे इंग्रजीत सांगून मोटीबाने जणूं बापूजींच्या जीवनाचेच निरूपण केले होते.

स्त्रियांना संचय करण्याची अधिक हौस असते. असे सामान्यतः म्हटले जाते. मोटीबा मात्र वृत्तीने नेमकी याच्या उलट होती. आफ्रिकेत असताना तिने दागिने बाळगले होते हे खरे; पण ते स्वतःच्या साजशृंगारासाठी नव्हे तर आपल्या येणाऱ्या सुनांसाठी रीतीरिवाज पाळण्यासाठी त्यांनी ते बाळगले होते. नंतरही मोटीबाने एक दोन साड्या राखून ठेवल्या होत्या त्या हिरालाल काकांच्या दोन्ही मुली जेव्हा केव्हा माहेरी येतील तेव्हा त्यांना देण्यासाठी म्हणूनच. या व्यतिरिक्त मोटीबाच्या स्वतःच्या गरजा वस्तुतः अत्यंत कमी होत्या. आश्रमाच्या शिस्तीत वावरणाऱ्यांना देखील मोटीबाचे साधेपण बघून आश्चर्य वाटे. लांबच्या प्रवासाची तयारी करताना बापूजी नेहमी म्हणत, 'बा' "आम्हा साऱ्यांना पराजीत करून टाकते इतके थोडे सामान आणि एवढ्या थोड्या गरजा अन्य कोणाच्या नाहीत. साधेपणाचा मी एवढा आग्रह धरतो पण माझे सामान, बरोबरच्या सामानाच्या दुप्पट असते. जाणीवपूर्वक प्रयत्न करुनही, 'बा' च्या स्वाभाविक पण निर्दोष, निर्मळ व उदात्त साधेपणाशी आम्ही कोणत्याही रीतीने स्पर्धा करू शकत नाही". बापूजींच्या संपूर्ण परिवारात, 'बा' ची वळकटी सर्वात लहान असे आणि तिची लहानगी पेटी कधी सामान कोंबल्याने गच्च भरलेली नसे.

भौतिक परिग्रहाच्या पलीकडे जाऊन आमच्या मोटीबाने आपल्या अभिलाषा आणि आकांक्षा सोडून दिल्या होत्या. बापूजींना याचे मोल कळत होते. एका नवागत आश्रम-वासीयाने एकदा बापूजींना विचारले, "चहा, कॉफी जर अपायकारक आहे तर मग 'बा' ती का घेतात?" बापूजी लागलीच उतरले," बा ने आजवर काय काय सोडले ते तुला माहीत आहे काय? ही एक सवय मात्र राहिलेली आहे, तीही सोडून देण्यास मी तिला सांगितले तर माझ्या इतका जुलमी कोण असेल? नंतर नंतर तर मोटीबाने आपली कॉफीही सोडून दिली होती. कधी गरजच वाटली तर तुळशीच्या मंजिऱ्या आणि मिऱ्यांचा काढा पिऊन ती समाधान मानीत असे. कॉफी इत्यादी तर नगण्य गोष्टी आहेत पण मोटीबाने आपल्या पतीचे सारे जीवनच देशावर ओवाळून टाकले होते. बापूजींची सेवा करणे आणि त्यांची सीमित शक्ती टिकवून ठेवणे हेच मोटीबाच्या जीवनाचे एकमेव उद्दिष्ट उरले होते. तिला ना कसली आसक्ती होती ना परिग्रहाची इच्छा! आणि आपल्या या त्यागाचा लेशमात्रही अहंकार तिला नव्हता. 'अहं' ला जिंकणे ही मोठी साधना होय आणि आमच्या निरक्षर आजीला ती सहज साध्य होती.

# ५

# महाशिवरात्र

आफ्रिकेतील अत्यंत जुलमी तुरुंगवास भोगल्यानंतर मोटीबाला भारतातील तुरुंग फारसे कष्टदायक वाटले नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील तुरुंग स्वच्छ असत आणि तेथे असंस्कृतपणाचे प्रमाणही कमी होते. मोटीबा किमान पाचवेळा तरी भारतीय तुरुंगात गेली असावी परंतु जेव्हा बापूजी एकटे जेलमध्ये जात आणि सरकार मोटीबाला अटक करीत नसे तेव्हा मात्र तिचे मन उदास होत असे आपले वियोगाचे दु:ख आणि चिंता मनातच दडपून ती बापूजींचे कार्य करण्यात गुंतून जात असे. आमची आजी आफ्रिकेत जेलमध्ये गेली होती आणि भोवतालचे राजकारण व संबंधित समस्यांचे तिला आकलनही होते. परंतु तेथे तिने सार्वजनिक क्षेत्रात कधी काम केले नाही. भारतात आल्यानंतर आणि विशेषतर बापूजी जेलमध्ये गेल्यावर, ती एकटी बाहेर राहत असे तेव्हा मात्र बापूजींच्या सर्व कार्यक्रमात व सत्याग्रहांमध्ये ती पुढाकाराने कार्य करीत असे. या उद्देशानेच मोटीबा चंपारण्यातील खेड्यात राहून तेथील गरिबांच्या सुखदु:खात वाटेकरी झाली होती. ग्रामोत्थानाच्या आणि प्रचाराच्या तिच्या या कार्याने त्रस्त होऊनच तेथील नीळवाल्या इंग्रज जमीनदारांनी वृत्तपत्रातून तक्रार केली की, "गांधीजी अनवाणी भटकत राहून आणि साधेकपडे वापरून लोकांत अंधश्रद्धा निर्माण करीत आहेत. आणि लोकांच्या भाविक वृतीचा फायदा उठवीत आहेत. इतकेच नाही, जेव्हा इतरत्र राजकीय आंदोलन चालविण्यासाठी ते बिहारच्या बाहेर जातात तेव्हा श्रीमती गांधी बिहारमधील लोकांना भडकविण्याचे काम करतात". हा आरोप सरळ सरळ खोटा असला तरी मोटीबाच्या कार्याचा लोकांवर किती प्रभाव पडत होता याचा अंदाज यावरून बांधता येतो.

खेडा सत्याग्रहाच्या वेळी तोरणा गावातील लोकांचे जेव्हा सर्व काही जप्त झाले तेव्हा मोटीबा तेथे गेली आणि तिने गावातील स्त्रीपुरुषांना धीर न सोडण्यास व हिंमत न हारण्यास सांगितले आणि त्यांना आधार दिला. मोटीबाच्या साध्या पण प्रेरणादायक शब्दांनी लोकांत आदेश निर्माण झाला आणि काही शेतकरी स्त्रियांनी मोटीबाला वचन दिले, "तुम्ही आमच्या साठी जर एवढे कष्ट घेत आहात तर आम्ही कशासाठी घाबरावे ? आम्ही हिंमत बाळगू आणि एक पैसाही सरकारला साऱ्यापोटी देणार नाही" हे वचन खेडा जिल्ह्यात सर्वतोपरी पाळण्यात आले.

१९२२ मध्ये बापूजींना सहा वर्षांची शिक्षा झाली, त्यावेळी मोटीबाने दिलेला संदेश एखाद्या वीरांगनेला साजेसा होता. ती म्हणाली, "माझ्या पतीला आज सहा वर्षांची शिक्षा झाली आहे. या कडक शिक्षेने मी थोडी अस्वस्थ, बेचैन आहे, हे मला कबूल केले पाहिजे. आम्हाला वाटले तर बापूजींना, शिक्षेची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच आम्ही तुरुंगातून सोडवू शकतो. यश संपादन करणे आमच्या हातची गोष्ट आहे. मात्र या कामी अपयश पदरी आले तर तो आमचाच दोष असेल. त्यामुळे माझ्या दुःखाविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या आणि माझ्या पतीवर प्रेम करणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांना माझी अशी विनंती आहे की त्यांनी रचनात्मक कार्यांत स्वतःला झोकून देऊन सर्व कार्यक्रम यशस्वी करावा. चरखा चालविणे आणि खादीचे उत्पादन करणे ही दोन महत्त्वाची कामे आहेत. या मार्गानेच आम्ही गांधीजींना देण्यात आलेल्या शिक्षेला पुढीलप्रमाणे आम्ही प्रत्युत्तर दिले पाहिजे.

सर्व स्त्रीपुरुषांनी परकीय कापडाचा त्याग करून खादीचा वापर करावा व इतरांना तो करावयास लावावा.

सूत कातणे हे सर्वांनी आपले धार्मिक कर्तव्य मानावे व इतरांनाही ते शिकवावे. सर्व व्यापारांनी परदेशी कापडाचा व्यापार सोडून द्यावा".

मोटीबाच्या या संदेशाने लोकांचा ढासळणारा आत्मविश्वास प्रबल केला होता. साऱ्या देशात ठिकठिकाणी विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटल्या आणि चरख्याचा गुंजारव सुरू झाला. काही जणांनी शुद्ध खादी वापरण्याचे व्रत घेतले आणि आज सत्तर वर्षांनंतरही ते त्याचे पालन करीत आहेत. याचप्रमाणे मोटीबा सूरत जिल्ह्यातील आदिवासींच्या गावात जाऊनही काम करू लागली. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी, मोटीबाने, सोनगढ जिल्ह्यातील डोसवाडा खेड्यात भरलेल्या दुसऱ्या आदिवासी परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले होते आणि त्या सुकुमार महिलेच्या साध्या भाषणाने प्रभावित होऊन त्या आदिवासींनी विदेशी कापडाचा आणि दारूचा त्याग केला होता. धारासना येथे झालेल्या लाठीमारात अनेक जण जखमी झाले तेव्हा मोटीबा वेगवेगळ्या इस्पितळांत जखमींच्या भेटीसाठी गेली होती. सर्व लोकांना व विशेषतः स्त्रियांना ती सांगत असे की, "कुणा एकाच्या घरावर सरकारने जप्ती आणली तर असे समजा की, सर्वांच्या घरावर जप्ती आली आहे. कोणीही जप्त केलेला माल विकत घेऊ नये. तसेच स्वार्थापोटी कोणी माफी मागू नये अथवा दंडही भरू नये. भगिनीवर्गाने आपल्या पुरुषांना हिम्मत दिली पाहिजे. त्यांना कोणतीही चुकीची गोष्ट करू देऊ नये याकामात गरजच पडली तर आपल्या घरच्या माणसांशीही असहकार करावा." साहजिकच, अशा क्रांतिकारी आणि लोकजीवनात संक्रमण निर्माण करणाऱ्या स्त्रीला सरकार फार काळ मुक्त ठेवू शकत नव्हते. परिणामतः १९३० ते १९३३ पर्यंतचा बहुतेक काळ मोटीबाला

जेलमध्ये घालवावा लागला. या तुरुंगवासात मोटीबा नेहमी स्वस्थ, प्रसन्न असे. ती स्वभावःच प्रसन्नमुख होती आणि प्रतिकूल परिस्थितीतही ती उदास होत नसे. जेलमध्येही ती आपल्या वासल्याचा सर्वांवर वर्षाव करत राही आणि बरोबरच्या ऐंशी-नव्वद जेलवासी स्त्रियांना सदैव धीर देत राही. त्यांची हिंमत टिकवून धरी. तुरुंगातही कसे समाधानी व प्रसन्न राहता येते याचा कानमंत्र ती अनोळखी सत्याग्रही महिलांना देत असे. मोटीबामुळे जेलमधील इतक्या साऱ्या स्त्रियांना कधी एकाकीपण जाणवले नाही, तसेच आपण कष्टात आहोत अथवा येथे आपले कोणी नाही असेही त्यांना जाणवले नाही. वस्तुतः मोटीबामुळे तुरुंगदेखील हिरव्यागार प्रसन्न रमणीय स्थानासारखा बनला होता. मोटीबा सर्व भगिनींची काळजी घेई, आजारात सेवा शुश्रूषा करी आणि सर्वांना संतुष्ट राखी. सर्वांवर सारखे प्रेम आणि सर्वांची समान काळजी हा मोटीबाच्या स्वभावाचा विशेष होता.

तुरुंगात असतानाच मोटीबाने इंग्रजी लिहायला शिकण्यास आरंभ केला. एवढ्या प्रौढ वयात आपण अे, बी, सी, गिरवीत आहोत याची तिला लाज वाटत नव्हती. बापूजींचा पत्ता आपल्याला स्वतः इंग्रजीत लिहिता यावा ही तिची उत्कट इच्छा होती. या इच्छेपोटीच अनेक दिवस ती इंग्रजी मुळाक्षरे गिरवीत राहूनही ती कधी कंटाळली नाही. नवीन शब्द अथवा वाक्ये शिकण्याची तिने कधी इच्छा बाळगली नाही. इंग्रजी शिकण्याचे एकच उद्दिष्ट मोटीबाने बाळगले होते. "बापूजींना पत्र लिहिल्यावर इतर कोणाकडून पत्ता लिहून घेण्याची गरज पडू नये आणि येणाऱ्या ढीगभर पत्रांतून माझे पत्र मला ओळखता यावे".

कष्टांच्या दिवसांत मोटीबाच्या चेहऱ्यावर अपूर्व दृढता आणि आत्मविश्वास झळकत असे. संकटांना घाबरून पळ काढणे तिला माहीत नव्हते; उलट संकटाला तोंड देताना ती जणू रणभूमीवर उतरत असे, वीरांगना बनत असे. तिला बापूजींच्या व स्वातंत्र्यलढ्याच्या न्याय्यतेविषयी व पवित्रतेविषयी कधीच शंका वाटत नव्हती, इतर कोणाचा असो नसो पण आजीचा देशवासीयांच्या विजयावर असीम विश्वास होता. बापूजींच्या निर्णयशक्तीवर मोटीबाचा पूर्ण विश्वास होता. तिला राजकारण समजत नसेल पण बापूजींनी ती सर्वतोपरी ओळखीत होती. देशातील कोट्यवधी मूक गरिबांचीही हीच भावना असावी. आपले सारे दुःख व क्लेश याचा भार आपल्या नेत्यावर टाकून त्यामुळेच तर देशातील हीन-हीन निःशस्त्र जनता स्वातंत्र्य लढ्यात उतरली होती या मुक्या जनतेच्या मनोवृत्तीचे मोटीबा मूर्तिमंत प्रतिबिंब होती. जेव्हा मोटीबा जेलच्या बाहेर असे तेव्हा, साबरमती तुरुंगात असलेल्या माझ्या वडिलांना व मणिलाल काकांना तसेच अन्य मित्रांना आवर्जून भेटावयास जात असे. तुरुंगातील कष्टांनी माझ्या वडिलांचे व काकांचे तोंड सुकून गेलेले असे, परंतु अनेक तुरुंगाचा अनुभव असल्याने मोटीबा मात्र अगदी शांत असे. स्वातंत्र्यांच्या वेदीवर बलिदान करण्याची मोटीबाला

एवढी सवय झाली होती की, पतीचे अथवा पुत्रांचे तुरुंगात जाणे तिला बलिदानच वाटत नसे. हजारो लोक तुरुंगात बंदिस्त होते त्यामुळे या लोकांत व आपल्या मुलांत तिला कसलेच अंतर जाणवत नसे. सगळेच लोक तिची मुले होती आणि म्हणून, रामदास, देवदास, मणिलाल या आपल्या मुलांना तुरुंगात जावे लागले, तर तेही तिला मान्यच होते. काय परिचित परंतु जीवनातील शेवटच्या जेलयात्रेच्या वेळी मात्र मोटीबाचे मन तयार नव्हते. एकतर, बापूजींनी तिला सांगितले होते, "सरकारला माहीत आहे की, मी त्यांचा मित्र आहे; त्यामुळे मला पकडण्यात येणार नाही". पण आठ ऑगस्टच्या त्या अंधाऱ्या रात्री सरकारने जेव्हा बापूजीं आणि महादेव काकांना अज्ञात स्थळी हलविले तेव्हा मोटीबाच्या हृदयाचा भीतीने थरकाप उडाला. त्यामुळेच दुसरे दिवशी ९ ऑगस्टला जेव्हा तिला स्वतःला अटक झाली तेव्हा आर्थरजेलमध्ये चोवीस तासांत केवळ मानसिक चिंतेने तिला वीस-तीस जुलाब झाले. हृदयाला बसणाऱ्या दुःखाच्या तीव्र धक्क्याने अनेकांना अतिसाराचा त्रास होतो. असे डॉक्टर आणि मनोवैज्ञानिकांचे मत आहे. मोटीबाच्या हृदयाने जाणवलेला तीव्र धक्का लपविला पण तिचे शरीर मात्र तो सहन करू शकले नाही. आगाखान जेलमध्ये असलेल्या बापूजी महादेव काका, सरोजिनी नायडू आणि मीराबहेन यांच्याजवळ मोटीबाला जेव्हा हलविण्यात आले तेव्हा तिच्या हृदयाला काहीशी स्वस्थता लाभली. एका दिवसातच तिचे जुलाब औषधाविना आपोआप बंद झाले व आगाखान जेलमध्ये ती हिंडूफिरू लागली. परंतु दैवाचा खरा आघात अजून शिल्लक असल्याचे तिला जाणवत होते.

महादेव काकांच्या मृत्यूनंतर मोटीबाची कळी सुकू लागली. अनेकदा ती म्हणत असे "ब्राह्मणाचा मृत्यू मोठ्या अमंगलाची पूर्व सूचना असते". बापूजी म्हणत, "अमंगल असेल ते सरकारसाठी" परंतु मोटीबाला वाटत राहिले की, महादेव काका, बापूजींच्या काळजीनेच मोडून पडले आणि म्हणून या ब्रह्महत्येचे पातक त्यांच्याच माथी असणार. आजवर, तुळशीचे रोप आणि मीराबहेनची बाळकृष्णाची मूर्ती यांना मोटीबा पवित्र मानीत आली होती, आता महादेव काकांचे समाधिस्थान मोटीबाला भगवान शंकराचे मंदिर वाटू लागले. महादेव काकांच्या मृत्यूनंतर, उदासीनता घालविण्यासाठी बापूजींनी मोटीबाला **गीता** शिकविण्यास आरंभ केला. त्याबरोबरच देशाचा भूगोलही ते तिला शिकवीत. कधी कधी इतिहासातील काही गोष्टी ते मोटीबाला सांगत आणि रोज सायंकाळी काहीना काही तिला वाचून दाखवीत. मोटीबाची स्मृती आता तारुण्यात तारुण्यासारखी नव्हती तरी पण पृथ्वीचा आकार, अक्षांश, रेखांश इत्यादी ती समजू लागली होती. एकदा तर प्यारेलालना अडलेला भूगोलातील एक हिंदी शब्दही तिने बरोबर सांगितला होता. आता आपले इतिहास-भूगोलाचे ज्ञान इतके गोळा

झालेय की आपल्या कान्हा या नातवाला अभ्यासात आपण मदत करू शकू असा तिला आता विश्वास वाटू लागला होता. किती साधा भोळा विश्वास आणि कसे हे आपल्या नातवावरचे प्रेम!

एके दिवशी मोटीबाने बापूजींना एक नोटबुक मागवून देण्यास सांगितले. बापूजींनी मोटीबाला दोनचार कोरे कागद दिले आणि म्हटले "सध्या यावरच शिका नंतर काही प्रगती झाल्यावर नोटबुक मागवू" मोटीबाला हे उत्तर चांगलेच लागले. बापूजींनाही आपली चूक जाणवली पण झालेला वार परत घेणे काही शक्य नव्हते. सरोजिनी नायडूंनी गुपचूप एक नोटबुक मागवून तिला दिले. मोटीबाने मात्र ते नोटबुक न वापरता बापूजींच्या पुस्तकांत ठेवून दिले. बापूजींनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण आजी एक स्वाभिमानी स्त्री होती, ती म्हणाली "मला नोटबुकाची गरजच काय? " शेवटपर्यंत ते नोटबुक बापूजींच्या पुस्तकांत, धूळखात पडून राहिले आणि मोटीबाला बोलावीत राहिले. अनवधानाने उच्चारलेले लहानसे वाक्य कसे हृदयविदारक ठरते बघा! आणि मग त्या जखमी हृदयाचा घाव बुजविण्यासाठी पुरेसे शब्दही सापडत नाहीत!

जेलमध्येदेखील मोटीबा व्रत-उपवास करीत असे. धार्मिक उपवासांव्यतिरिक्त स्वतंत्रता दिवस, राष्ट्रीय सत्याग्रह, भारत छोडो ८ ऑगस्ट या दिवशी ती उपवास करीत असे. कधीकधी सोमवार एकादशी वा आणखी एखादी तिथी लागोपाठ येत असे. तेव्हा मोटीबा सतत तीनचार दिवस उपवास करीत असे, मात्र एकही व्रत ती सोडत नसे. आगाखान जेलमध्ये पंचाग किंवा कॅलेंडर नव्हते. मोटीबाने बापूजींना विचारले की, 'एकादशी कधी आहे?' बापूजींनी जेलर कटेलींना पंचाग मागितले परंतु त्यासाठी दिल्लीहून मंजुरी येण्यास वेळ लागणार असल्यामुळे त्यांनी सुशीला बहेनला स्वतःच कॅलेंडर तयार करण्यात सांगितले व त्याची पद्धतही शिकविली. ज्या दिवशी बापूजींना अटक झाली ती तारीखतिथी आणि तो वार बापूजींना ध्यानात होता. त्या आधारेच साऱ्या वर्षाचा हिशोब करून वर्षभराचे कॅलेंडर तयार झाले. त्यावर पौणिमेच्या दिवशी लाल पेन्सिलीने व अमावस्येला निळ्या पेन्सिलीने खूण करण्यात आली. या कॅलेंडरवरूनच मोटीबाला एकादशी कधी आहे ते सांगण्यात आले. जवळपास महिनाभर या स्वनिर्मित कॅलेंडरवरच काम चालविण्यात आले. या जेलमध्ये मोटीबा नियमितपणे चरखा चालवित असे, परंतु आगाखान जेलमध्ये आल्यापासून मोटीबांच्या छातीत दुखत असे व त्यामुळे सुशीला बहेन तिला चरखा न चालविण्यास सांगत असे. मोटीबा म्हणत असे, "सूत कातण्याने माझ्या हृदयाला काय श्रम होणार?" त्याचप्रमाणे आगाखान पॅलेसच्या विर्स्तीर्ण जागेत मोटीबाला हिंडण्याफिरण्यापासून परावृत्त करणेही कठीण होते. शेवटी कर्नल भंडारींना मोटीबाला सांगावे लागले," हे बघा, तुम्ही जर इकडे तिकडे

जास्त फिराल तर तुम्हाला येरवडा जेलमध्ये पाठवावे लागेल." त्यानंतर मात्र मोटीबाने चालणे फिरणे कमी केले. ती इतकी भोळी होती की, कर्नल भंडारींच्या पोकळ धमकीचाही तिच्यावर परिणाम झाला.

या जेलमध्ये एक ब्राह्मण शिपाई होता. मोटीबाचे त्याच्यावर विशेष प्रेम होते. ती त्याला अधूनमधून दूध, फळे इ. देत असे. त्याच्याकडून काहीचूक झाली तरी ती त्याला क्षमा करी आणि म्हणे "बिचारा ब्राह्मणाचा मुलगा आहे. इथे अन्य काही धर्मकृत्य तर शक्य नाही यालाच काही देता आले तर बरे" एकदा तिने त्या शिपायाला विचारले, "महाराज, तुम्ही ब्राह्मण आहात. आम्ही इथून घरी कधी जाऊ सांगा बरं," तो बिचारा काय सांगणार? पुस्तक बघून सांगतो असे उत्तर देऊन, आपले अश्रू गुपचूप पुशीत त्याने तोंड फिरवले त्या वृद्धेच्या आस्थेने तो ब्राह्मण शिपाई द्रवला होता.

एकदा मोटीबाने वृत्तपत्रात, ब्रिटनचे गृह सचिव एम. टी. साहेबांचे निवेदन वाचले की, गांधी आणि जिना परस्परांना भेटण्यास तयार नाहीत. हे वाचून मोटीबा नाराज झाली. हिंदू मुस्लीम ऐक्यावर तिचा पूर्ण विश्वास होता. डॉ. अन्सारी, बादशहाखान, अब्दुलकलाम आजाद किंवा हकीम अजमलखान, उमर सोब्दानी ही मंडळी मोटीबाच्या दृष्टीने मुसलमान नव्हतीच! ते सारे तिला आपले जवळचे मित्र वाटत. अशी भावना बाळगणाऱ्या मोटीबाला, एम. टी. साहेबांचे असत्य वक्तव्य सहन झाले नाही. ती म्हणाली, "हे खोटं आहे. गांधीजी तर जिनांच्या घरी त्यांना भेटावयास गेले होते. महादेवने हे सारे लिहून ठेवले आहे. एम.टी.ला माझ्यासमोर येऊ देत म्हणजे त्याला ही नोंद दाखवीन आणि विचारीन की, गांधी जिनांच्या भेटीसाठी त्यांच्या घरी गेले होते की नाही?" वर्तमानपत्रांत गांधीजींवर येणारी टीका वाचून मोटीबा अत्यंत दुःखी होत असे. या साऱ्या गोष्टी तिला नवीन नव्हत्या हे खरे पण जेलच्या बाहेर असताना, एवढ्या लक्षपूर्वक वर्तमानपत्र वाचायला तिला वेळच मिळत नसे. दुसरे असे की, ऑगस्ट क्रांतीनंतर, बापूजींच्या विरुद्ध जे विष ओकले जात होते तसे या आधी क्वचितच घडले असावे. हे विरोधी लेखन बघून मोटीबा म्हणत असे, "बघा, किती खोटं बोलतात ही माणसं! यांच्या पापाचा रांजण कधी तरी भरेलचना? ईश्वर किती दिवस हे पाप सहन करीत राहील?" विशेषतः गांधीजींच्या अहिंसेवर कोणी अविश्वास दाखतीत असे, आघात करीत असे तेव्हा मोटीबाला ते सहन होत नसे.

जेलमध्ये, बरोबरच्या लोकांना आवडेल असा एखादा पदार्थ मोटीबा स्वतः बनवीत असे अथवा बनवून घेत असे. एकदा तिने पुरणपोळी बनविली. बापूजींना काही काळ पुरणपोळी फार आवडायची. मोटीबाला पथ्य होते पण ती म्हणाली "आज तर मीही पुरणपोळी खाणार. जाऊन बापूजींनाही विचारा की, तेही पुरणपोळी खाणार काय?" जड अन्न खाल्याने

आजीच्या हृदयात धडधड होत असे. गांधीजींना विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, "बा जर खाणार नसेल तरच मी पुरणपोळी खाईन". जवळच बसलेल्या मोटीबाने तात्काळ उत्तर दिले, " तर मग, मी खात नाही". त्या दिवशी मोटीबाने स्वत:च्या देखरेखेखाली तयार करून घेतलेल्या पुरणपोळ्या आपल्या हाताने सर्वांना वाटल्या पण स्वतः एक तुकडाही तोंडात टाकला नाही. स्वतः खाण्यापेक्षा इतरांना खाऊ घालण्यातच मोटीबाला अधिक आनंद होत असे आणि बापूजी एखादा पदार्थ खातात म्हटल्यानंतर तर त्यासाठी आपली इच्छा ती केव्हाही बाजूला सारीत असे. बापूजीच तिचे सर्वस्व होते. एक दिवस विचारमग्न होऊन मोटीबा विचारू लागली की, 'या सरकारकडे एवढी साधने असताना बापूजी त्याच्याशी कसे लढणार?' तेव्हा सुशीला बहेन म्हणाल्या, "ईश्वर तर आहेना? त्याच्या भरवशावरच बापूजींनी हे युद्ध सुरू केले आहे, तोच ते तडीस नेईल". मोटीबा म्हणाली, "पण आजतर ईश्वरही आमच्यावर रुष्ट आहे. बघाना, महादेवला त्याने कसे उचलून नेले ते ?" बापूजींनी हा संवाद ऐकला. ते म्हणाले, "महादेवचे जाणे म्हणजे तर एक शुद्धतम बलिदान होय; स्वातंत्र्ययुद्धाला त्याचा फायदाच होणार आहे." परंतु मोटीबाच्या मनातली शंका गेली नाही. तिची प्रकृती अधिकच बिघडली होती. ती चिडली आणि म्हणाली, "बघा एवढ्या मोठ्या सत्तेच्या वाटी जाऊ नका असे मी तुम्हाला सांगत होते. पण तुम्ही काहीच ऐकले नाहीत. आता त्याची फळे साऱ्यांना भोगावी लागत आहेत. सरकारची शक्ती अपार आहे. ते लोकांना चिरडून टाकीत आहे. लोक बिचारे किती सहन करतील? आणि यांचा परिणाम शेवटी काय होणार?" बापूजींनी प्रथम तर नाना युक्तिवाद करून तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण त्या दिवशी मोटीबा हे सत्य अशारीतीने समजून घेण्यास तयार नव्हती. शेवटी बापूजी म्हणाले, "तुला हवंय तरी काय? चल, तू आणि मी सरकारची माफी मागू या." मोटीबा म्हणाली, "मी काय म्हणून कुणाची माफी मागावी?" बापूजी म्हणाले, "तू म्हणत असशील तर मी व्हाइस रॉयला माफीचे पत्र लिहू काय?" मोटीबाला बापूजीची मानहानी कोणत्याही परिस्थितीत सहन होणे शक्य नव्हते; रागातच ती म्हणाली, "सुकुमार बालिका जेलमध्ये खितपत आहेत; त्या माफी मागत नाहीत आणि तुम्ही माफी मागणार? आता जे केलेत त्याचे फळही भोगा, तुमच्याबरोबर आम्हीही भोगू, महादेव जेलमध्ये मेला आता माझी पाळी आहे". बापूजी निमूटपणे ऐकत राहिले. मोटीबा रागावत असे तेव्हा बापूजीं मौन धारण करीत काही दिवसांनी मोटीबा बापूजींना म्हणाली, "तुम्ही इंग्रजांना निघून जाण्यास का सांगता? राहीनात बिचारे ते येथे? आमचा देश फार मोठा आहे. आम्ही सारे त्यात राहू शकतो. तुम्ही त्यांना सांगा की, आमचे भाऊ बनून ते येथे राहू शकतील" बापूजी म्हणाले, "मी तरी दुसरे काय सांगतो? मी देखील हेच म्हणतो की, त्यांनी आमचे भाऊ म्हणून येथे राहावे, स्वामी बनून नव्हे, राजेपद

सोडल्यास आमचे काही भांडण नाही." मोटीबा म्हणाली, " हे तर बरोबरच आहे. इंग्रजांना अंमलदार बनवून आम्ही येथे ठेवू शकत नाही. भाऊ म्हणून त्यांनी खुशाल राहावे".

१९४२ मध्ये मोटीबाला बापूजींची फार काळजी वाटत होती. बापूजी दुपारी अर्धा तास ध्यान करीत असत. ते ईश्वराकडे मार्गदर्शनाची प्रार्थना करीत. मोटीबा सकाळी स्नानानंतर अर्धा-पाऊण तास तुळशीची पूजा करीत असे. ती आपल्या पतीसाठी दीर्घायुष्य मागत असे. या चिंताग्रस्ततेने मोटीबाचे स्वास्थ्य बिघडू लागले. ती इतकी अशक्त झाली की, महादेव काकांच्या समाधीवर फुले वाहण्यासाठी तेथवर चालत जाणेही तिला कठीण झाले. सर्वांच्या मनात हा प्रश्न असे की, बापूजींच्या उपवासात मोटीबाचे काय होणार? सरोजिनी स्वतःला आवरू शकली नाही ती म्हणाली, "बापू, तुमचा उपवास बाला संपवून टाकील." बापूजी हसून म्हणाले, "बाला मी तुम्हा लोकांपेक्षा अधिक ओळखतो. तिच्या शौर्याचा तुम्हाला अंदाजही येणे शक्य नाही. तिला तुम्ही ओळखतच नाही. शेवटी मी बा बरोबर बासष्ट वर्षे काढली आहेत. मी तुम्हाला सांगतो, तुमच्यापेक्षा बाची हिंमत अधिक आहे, हरिजन उपवासाच्या दिवसांत जगण्याची आशा सोडून जेव्हा मी माझे सारे सामान इस्पितळातील सेवकांना वाटून देण्याचे ठरविले तेव्हा बाने दृढतापूर्वक, सामान वाटण्याचे हे काम केले होते. त्यावेळी तिची पापणीही ओली झाली नव्हती." १९३३ च्या मोटीबाच्या डायरीत या प्रसंगाचा उल्लेख आढळतो तो असा, "स्नान करून इस्पितळात गेले. मी सामानाचे टोपले उघडले. बापूजी म्हणाले, 'सारे सामान इस्पितळात देऊन टाक.' मी देऊन टाकले. काल रात्री बापूजींना उलटी झाली त्यामुळे ते खूपच क्षीण झाले होते. म्हणाले, 'आता मी या अंथरुणावरून उठणे नाही. तू काही काळजी करू नकोस. तुला तर याचा गौरव वाटला पाहिजे. याचेच नाव सत्य होय.' परंतु ईश्वर दयाळू आहे. त्याने आपल्या भक्तांची लाज राखली आहे. इतक्यावर जे व्हायचे असेल ते होवो." मोटीबाची ईश्वरावरील श्रद्धा निरर्थक नव्हती. त्याचदिवशी सरकारने बापूजींना सोडून दिले होते. आगाखान पॅलेसमधील उपवासाच्यावेळीही बापूजींचा हा विश्वास खरा ठरला होता. उपवास सुरू करण्यापूर्वी बापूजींनी मोटीबाशी बोलून तिला आपल्या निश्चयाची कल्पना दिली. तिनेही अनुकूलता दाखविली. तिचे म्हणणे असे, "हे योग्यच आहे. जिथे एवढा खोटेपणा चालू आहे तिथे बापूजी गप्प कसे बसू शकतील? सरकारच्या अत्याचारांना विरोध करण्यासाठी त्यांच्याजवळ उपवासाशिवाय दुसरे साधन तरी कोणते आहे?" तिच्या या निर्धाराने तिचे बळ वाढले. बापूजींच्या एकवीस दिवसांच्या या उपवासात त्यामुळेच सर्वकाळ मोठ्या हिमतीने तिने त्यांची सेवा केली. त्या अवधीत एक दिवसही तिची प्रकृती बिघडली नाही.

१० फेब्रुवारी, १९४३ ते २ मार्च, १९४३ पर्यंतच्या २१ दिवसांच्या या उपवासात आधीच वृद्धापकाळाने व इतर अनेक कष्टदायक घटनांनी जर्जर झालेली बापूजींची प्रकृती उपवासाच्या तिसऱ्या दिवसापासूनच अधिकच खालावली. या उपवासाच्या काळात आगाखान जेलचे दरवाजे खुले करण्यात आले होते. माझे वडील या उपवासाच्या काळात पंधरा दिवस पुण्यातच थांबले होते. मी, माझी आई, बहीण उषा आणि भाऊ कान्हा असे आम्ही सारेजणही आमच्या वडिलांबरोबर शेवटच्या आठवडाभर पुण्यात राहिलो होतो. सकाळपासून सायंकाळपर्यंत आम्ही मोटीबाबरोबर जेलमध्ये थांबत असू, बापूजींचे पाय किंवा डोके हलक्या हाताने दाबीत असू. आमचे आजोबा वाचतील की नाही, आम्हाला कळत नव्हते. अत्यंत रोड झाले होते. अंथरुणावर त्यांची आकृती अगदी लहान दिसत असे. या उपवासाच्या काळात मोटीबा फक्त एकवेळ फलाहार घेत असे. उपवासाचे दिवस जसजसे वाढू लागले तसतसा मोटीबाचा तुलसीपूजेचा आणि बाळकृष्ण पूजेचा समयही वाढत होता. बापूजींची अवस्था जसजशी अधिक गंभीर बनत गेली तसतशी मोटीबाची पूजा प्रदीर्घ आणि अधिक एकाग्रतेने व तन्मयतेने होऊ लागली.

तीन मार्चला उपवास पूर्ण झाला. माझे वडील आणि देवदास काका चार-पाच दिवस बापूजींजवळ राहिले. थोडी शक्ती आल्यावर त्या दोघांनी पुणे सोडले. धोका टळला आणि आई मुलांची गाठभेट बंद झाली. मुलांची भेट मोटीबाला टॉनिकसारखी होती. आपल्या निश्चयाच्या बळावर मोटीबाने या उपवासाच्या दिवसात एवढे काम केले होते आणि मनोबलाने शरीरही टिकवून धरले होते. आता रामदास आणि देवदास निघून गेल्यावर ती आतल्या आत खचू लागली. तिचे शरीर क्षीण होऊ लागले. १६ मार्चला, म्हणजे बापूजींच्या उपवासानंतर तेरा दिवसांनी, मोटीबाला हृदय विकाराचा झटका आला. दोन घंटे हा त्रास राहिला. त्यानंतर ९ दिवसांनी २५ मार्चला दुसरा झटका आला. हा चार तास राहिला. त्यानंतर मोटीबा सतत आजारी राहू लागली. चित्रगुप्ताच्या वहीत नावे असलेले कर्ज फेडण्यास तिने आरंभ केला. उपवासापूर्वी बापूजी म्हणत, "सहा महिन्यात काहीतरी निकाल लागेल." उपवासानंतर मात्र ते पुन्हा पुन्हा सांगून लागले, "कमीतकमी सात वर्षे तुरुंगात राहावे लागेल." मोटीबाला याचा मोठा धक्का बसला. ती म्हणू लागली," मला तर महादेवकडे जावयाचे आहे, मी कसली सात वर्षे जगणार?" कधी कधी मोठ्या केविलवाणेपणाने प्रार्थना करी, "हे बाळकृष्णा, आम्हास लौकरात लौकर तुरुंगातून बाहेर ने" २ ऑक्टोबर, १९४३ ला दुसऱ्यांदा जेलमध्ये बापूजींचा वाढदिवस आला. मोटीबाची प्रकृती ठीक नव्हती. तरीपण तिने बापूजींनी स्वतः कातलेल्या सुताची साडी परिधान केली आणि कैद्यांना अन्न वाटण्यात शक्य तेवढे साहाय्य केले. आजारातदेखील मोटीबाला एकादशी किंवा संक्रातीचा विसर पडत नसे. २ जानेवारी, १९४४ ला मोटीबाने सांगितले, "तीळ मागवून घ्या संक्रातीला सर्व कैद्यांना तिळाचे लाडू वाटा."

बापूजी म्हणाले, "हे बरोबर नाही. हे काय आपले घर थोडेच आहे. अशी कामे जेलमध्ये नव्हे तर घरीच केली जातात."

मोटीबा म्हणाली, "मला कुठे घरी जायचंय?"

दुसरे दिवशी तीळ आले आणि लाडूही तयार झाले आणि १४ जानेवारी, १९४४ ला मोटीबाने चाकाच्या खुर्चीत बसून साऱ्यांना तिळगुळाचे लाडू वाटले.

मोटीबावरील उपचारांच्या संदर्भात सरकारची भूमिका अत्यंत कडक आणि अनादराची होती. मोटीबाची दिनशा मेहता व वैद्यराज शिवशर्मा यांच्यावर श्रद्धा होती, परंतु या दोघांनाही रात्री मोटीबाजवळ थांबू दिले जात नसे आणि त्यामुळे तिला त्रास होत असे. प्रकृती जास्त बिघडली तरी डॉक्टर तिच्याजवळ नसत. बिचारे वैद्यराज तर तीन रात्री, आगाखान जेलच्या दरवाजाबाहेर मोटारीतच झोपून होते परंतु तेथून मोटीबाजवळ येण्यासही जेलच्या नियमानुसार तासभर लागत असे. या परिस्थितीत गांधीजींनी व्हायसरॉयशी या संबंधात बराच पत्रव्यवहार केला होता आणि शेवटी लिहिले होते, "मला जर माझ्या पत्नीवर योग्य उपचार करणे शक्य नसेल तर निदान मला दुसऱ्या एखाद्या जेलमध्ये तरी पाठवा म्हणजे मला तिच्या वेदनांचा मूक साक्षी व्हावे लागणार नाही."

१७ फेब्रुवारी, १९४४ ला दुपारच्यावेळी हरिलाल काका मोटीबाच्या भेटीस आले. त्यांना बघून मोटीबाला खूप आनंद झाला. नंतर समजले सरकारने त्यांना केवळ एकदाच भेटण्याची परवानगी दिली होती. मोटीबा खूपच चिडली, म्हणाली, "हा काय प्रकार आहे? देवदासला दररोज येऊ दिले जाते मग हरिलाललाच ही अडकाठी का? भंडारी माझ्यापुढे आले तर मी विचारीन की, दोन भावात असे अंतर का करता? तो बिचारा गरीब आहे म्हणून काय त्याला आपल्या आईलाही भेटता येऊ नये?" बापूजींनी मोटीबाला शांत केले. परंतु हरिलाल काका मात्र त्या दिवसानंतर गडप झाले. स्वामी आनंदांनी मोठ्या प्रयत्नांनी त्यांना कुठूनतरी हुडकून काढले होते आणि म्हणूनच २१ फेब्रुवारीला मोटीबा आपल्या या मोठ्या मुलाला भेटू शकली होती. मोटीबाची स्थिती गंभीर झाली तेव्हा सरकारने माझ्या वडिलांना व देवदास काकांना निरोप पाठवून भेटीची परवानगी दिली होती, याच काळात, बापूजींचे जुने मित्र रेवाशंकर जव्हेरी यांचे पुत्र धीरूभाई यांना जेव्हा मोटीबाची अवस्था गंभीर असल्याचे कळाले तेव्हा स्वामी आनंदांबरोबर ते मुंबईहून पुण्यास आले व आगाखान जेलमध्ये मोटीबाच्या भेटीस गेले. नमस्कार केल्यानंतर त्यांनी एक पावडरचा टिनचा डबा मोटीबाच्या हाती दिला आणि म्हणाले," ही घ्या, आमच्या पेढीवर ठेवलेली आपली ठेव." साऱ्या समक्ष मोटीबाने डबा उघडला, त्यात दोन सोन्याच्या बांगड्या व अन्य काही अलंकार होते. बापूजींनी हसत विचारले "हा काय प्रकार आहे? मला तर पत्ताच नव्हता की, आपल्याजवळ असे काही उरले

आहे व रेवाशंकरभाईंकडे ठेव म्हणून ते ठेवलेले आहे". बापूजींनी विनोदाने पुढे म्हटले, "धीरू, हे काय प्रकरण आहे? माझ्या पत्नीशी व्यवहार करता आणि मला कळवीतही नाही?" धीरूभाई म्हणाले, "हा तर आमचा ग्राहक आणि पेढीमधील व्यवहार आहे." नंतर हसून बापूजींनी मोटीबाला विचारले, "आता या बांगड्यांचे काय करावयाचे ते सांग. तू तर मोठी श्रीमंत आहेस. कोणाला देतेस हे दान? हरिजन फंडासाठी मला देऊन टाक".

मोटीबा म्हणाली, "हे माझे स्त्रीधन आहे. यावर तुमचा हक्क नाही. हा बांगड्यांचा जोड माझ्या सासऱ्याने 'मुखावलोकन' समारंभात मला दिलेला आहे. ही दहा हिरे जडवलेली अंगठी सासूबाईंनी दिलेली आहे, आणि या सुवर्णजडित हस्तिदंती बांगड्या व सोन्याच्या मोहरा माझ्या स्वतःच्या आहेत. मी जेव्हा सोने वापरणे सोडून दिले तेव्हा जुन्या आशीर्वादाची ही स्मृती १९०२ मध्ये मी रेवाशंकर भाईंकडे सांभाळून ठेवण्यास दिली होती. मी तर विसरूनच गेले होते."

या घटनेला ४२ वर्षे झालेली होती. बापूजींनी ते सर्व अलंकार बघितले. ६२ वर्षांपूर्वी त्यांच्या वडिलांनी या बांगड्या कस्तुरला दिल्या होत्या. गतकाळातील प्रतिमा डोळ्यांपुढे तरळल्या. आज तेव्हाची नववधू, अनेक कष्ट भोगून, या कारावासातच आपला संसार सोडून देवाघरी जाण्याची तयारी करीत होती, कुठे होते ते वत्सल पिता कबा गांधी? कुठे होती ती स्नेहमयी पुतली मा जिने आपल्या बाहुलीसारख्या पुत्रवधूला हे अलंकार दिले होते? आगाखान पॅलेसच्या त्या काळकोठडीत त्या दिवशी अनेकजण हजर होते आणि सारे जण नव्यासारख्या दिसणाऱ्या त्या सुंदर अलंकारामागे दडलेला आनंद-उत्साह आणि नंतरच्या आयुष्यातील "बा" च्या व्यथावेदनांचे पुनःस्मरण करीत होते. ६२ वर्षांनंतर त्या अमूल्य अलंकारांचे पुन्हा दान घडावयाचे होते! आशा, अभिलाषा आणि आकांक्षांनी गुंफलेल्या आपल्या जीवनात मोटीबाने अनेक कष्ट, व्यथा आणि वेदना अनुभवल्या होत्या आणि तरीही एका उत्साहाचे व गौरवाचे प्रतीक म्हणून हे दोनचार सुवर्ण अलंकार ती दान करणार होती. कोणाला बरे करणार होती ती हे दान? "बा" चा निर्णय काय होता, याची सारेजण प्रतीक्षा करीत होते. बिचारे बापूजी विचारमग्न होऊन गतकालीन सुख दुःखांच्या अनुभवात आपल्या किशोरी पत्नीचे गोंडस मुख शोधीत होते. अगदी गप्प होते. देवदास काका आणि स्वामी आनंद शेजारीच उभे होते. मुंबई महानगरीचे धनाढ्य सुवर्णकार, आपल्या या सुप्रसिद्ध ग्राहकाच्या अंतिम इच्छेच्या प्रतीक्षेत हे सारे मूळ चित्र बघत होते. तेव्हा मोटीबा म्हणाली, "हे सर्व अलंकार सुमी (लेखिका) च्या' विवाहात दिले जावेत." बापूजींना वस्तुतः विस्मय वाटला. म्हणाले "सुमी? एकच का? आपली तर चार मुले आहेत. चौघांत वाटून दे." मोटीबा म्हणाली, "नाही. हे सुमीसाठीच आहेत" तिची समजूत काढीत बापूजी पुन्हा म्हणाले, "जर रामदासलाच हे सारे द्यावयाचे असेल तर त्याच्या तिन्ही अपत्यांत वाटून दे, रामदासला तर

तीन मुले आहेत. कान्हा आणि उषालादेखील काही देशील की नाही?" शांतपणे मोटीबा म्हणाली, "नाही. एकट्या सुमीसाठीच सारे आहे, तिलाच ते दिले जावे." एवढे बोलल्याने आजीला थकवा आला. जुन्या आठवणींच्या भावविशाने मोटीबाची उरली सुरली शक्तीही क्षीण केली होती. तिने उशीवर डोके टेकले. बापूजींनी तो अलंकारांचा डबा, देवदास काकाच्या स्वाधीन केला आणि सांगितले की, सुमीसाठी तो रामदास काकांना देण्यात यावा.

१९-२० फेब्रुवारीला मोटीबाला ऑक्सिजनवर ठेवण्यात आले, परंतु काही आराम पडला नाही. श्वास घेताना होणाऱ्या त्रासाने मोटीबा झोपू शकत नव्हती. बसल्या बसल्याच, समोरच्या टेबलावर डोके टेकवून झोप घेण्याचा ती प्रयत्न करीत असे, डॉक्टर आल्यावर ती म्हणत असे, "आता तर मला स्मशानातच जावयाचे आहे. कसला इलाज करता आता?" डॉ. गिल्डर तिला म्हणाले, "बा, तुम्ही असं का म्हणता? अजून तर तुमची मुलं यावयाची आहेत. रामदास, देवदास साऱ्यांना भेटायचं आहे ना?" मुलांच्या भेटीच्या कल्पनेनेच मोटीबाच्या चेहऱ्यावर स्मित उमटले मग गंभीरपणे म्हणाली, "कशाला बोलावता त्यांना? तुम्ही सारे माझी मुलंच तर आहात. मी मेले की जाळून टाका. रामदासला तर इथे येऊच देऊ नका. गाडीत गर्दी फार असते, भाडेही बरेच लागते, पुन्हा पुन्हा प्रवास. त्याला त्रासाचा होईल."

२१ फेब्रुवारीच्या सायंकाळी, देवदास काका दिल्लीहून पुण्याला आले. रात्रभर उभे राहून मोटीबाची सेवा करीत राहिले. देवदास काकांना बघून मोटीबा म्हणाली, "आता तूच साऱ्यांना सांभाळ. बापूजीतर साधूच आहेत; त्यांना साऱ्या जगाची चिंता लागलेली असते. हरिलाल तर तुला माहीतच आहे. तेव्हा आता सारा परिवार तुलाच सांभाळावयाचा आहे." हरिलालची मुलगी मनूदेखील आगाखान जेलमध्ये आली होती. मोटीबाला तिची विशेष ओढ होती. सकाळी ५ वाजेपर्यंत देवदासकाका मोटीबाच्या मस्तकावर हाताने थोपटीत राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर करुणा आणि प्रेम ओसंडत होते. मोटीबा आता जाण्याच्या तयारीत आहे, या जाणिवेनेच काकांचे हृदय मूकरुदन करीत होते. २२ फेब्रुवारी, महाशिवरात्रीचा शुभ दिवस होता. मोटीबाची अवस्था वाईट होती. बापूजी सकाळीच फिरायला जाण्याच्या तयारीत होते. ते थोडावेळ आजीजवळ उभे राहिले. मग म्हणाले, "फिरायला जाऊ का?" दररोज तर मोटीबा बापूजींना आग्रहाने फिरायला जाण्यास सांगत असे. परंतु त्या दिवशी मोटीबाने बापूजींना फिरायला जाण्यास अनुमती दिली नाही. फिरायला जाणे रहित करून बापूजी मोटीबाजवळ बसले. त्यांच्या छातीवर आपले मस्तक टेकून मोटीबा पडून राहिली. दोघांच्याही चेहऱ्यावर त्यावेळी अपूर्व शांती आणि समाधान दिसत होते. प्रदीर्घ वैवाहिक जीवनाच्या अंतकाळाचे ते दृश्य दिव्य होते. दहा वाजेपर्यंत बापूजी मोटीबाजवळ बसून राहिले. मधूनमधून ते तिला रामनाम घेण्यास सांगत होते. तिला खोकला आला की थोपटीत होते. एक सरकारी

अधिकारी देवदास काकाला म्हणाले की, "सरकारने मोटीबाला सोडले आणि बाहेर आल्यावर त्यांची प्रकृती अधिकच बिघडली तर लोक गांधीजींनाही सोडा म्हणून मागणी करतील. परंतु सरकार बापूजींना सोडण्यास तयार नव्हते. अशा स्थितीत सारे जग, हृदयहीन राक्षस म्हणून सरकारला बदनाम करील म्हणूनच एवढी गंभीर अवस्था असताही सरकार कस्तुरबा गांधींना मुक्त करीत नाही.

२२ फेब्रुवारीच्या सकाळी, इंग्लंडहून विमानाने पेनिसिलीन पुण्याला पोहोचविण्यात आले होते. मोटीबाच्या न्युमोनियावर पेनिसिलीनचा उपचार व्हावयाचा होता. १९४४ मध्ये पेनिसिलीन हे औषध विशेष कोणाला माहीत नव्हते. परंतु युद्धकाळात त्याचे प्रयोग यशस्वी ठरले होते. देवदास काकांची इच्छा होती की, पेनिसीलीन देऊन मोटीबाचा जीव वाचवावा. परंतु शेवटच्या समयी बापूजींनी मोटीबाची सारी औषधे बंद करावयास लावली होती. अंत समयी इंजेक्शन देऊन मोटीबाला त्रास देणे ठीक नव्हते. देवदास काकांनी मोटीबाला गंगाजल पाजले. आणि म्हटले, 'रामदास भाई येत आहेत.' मोटीबा म्हणाली, "त्याला कशाला त्रास देता?" बापूजींना बघून मोटीबा म्हणाली, "मी आता निघाले आपण खूप सुख भोगले आणि पुष्कळ दु:खही सहन केले. माझ्या मृत्यूनंतर रडायचे नाही. माझ्या मृत्यूनंतर तर लाडू वाटले पाहिजेत." मग ती ईश्वराची प्रार्थना करू लागली, "भगवान, क्षमा कर आता तर तुझीच भक्ती आणि तुझेच प्रेम हवे!" सायंकाळी ५।। वाजता कर्नल भंडारी पेनिसिलीन घेऊन आले. जेव्हा कळाले की, पेनिसिलीनची एक नव्हे तर अनेक इंजेक्शने द्यावी लागणार आहेत, तेव्हा मोटीबाला अधिक कष्ट देणे बापूजींना इष्ट वाटले नाही. त्यांनी देवदास काकांना समजाविले, "तू कसलेही दिव्य औषध आणलेस ना तरी आता आपल्या आईला बरे करू शकणार नाहीस. तुझा आग्रह असेल तर मी माझे म्हणणे सोडून देईन. पण तुझा आग्रह चुकीचा आहे. आता "बा" ईश्वराच्या हाती आहे. तरीही तुझी इच्छा असेल तर तू काय पाहिजे ते कर पण तुझा हा मार्ग बरोबर नव्हे. मरणासन्न मातेला अंतसमयी इंजेक्शन देऊन त्रास देणे उचित नाही."

ही चर्चा संपते न संपते तोच मोटीबाने बापूजींना साद घातली, बापूजी तात्काळ तिच्याजवळ गेले आणि तिला मांडी देऊन ते थोपटू लागले. त्यावेळी काही जणांना बापूजी व मोटीबाचा फोटो घ्यावयाचा होता पण बापूजींनी त्यांना थोपविले. मोटीबा अस्वस्थ होती. या शेवटच्या पवित्र क्षणी फोटो अथवा इंजेक्शनचा विक्षेप बापूजींना नको होता! मोटीबाने बापूजींच्या मांडीवरच प्राण सोडले. तिचा आत्मा जगाच्या बंधनातून मुक्त झाला. आपल्या पतीच्या मांडीवर मरण यावे ही मोटीबाची उत्कट इच्छा होती. देवाने तिची अंतिम इच्छा पूर्ण केली. बापूजींनी आपले मस्तक मोटीबाच्या खांद्यावर टेकविले. त्यांच्या डोळ्यातून दोन

अश्रूचे थेंब टपकले. देवदास काका, आईचे पाय धरून लहान मुलाप्रमाणे रडू लागले. बापूजींनी स्वतः मोटीबाच्या पार्थिव देहाला स्नान घातले आणि आपल्या हाताने कातलेल्या सुताची ती लाल किनारीची साडी त्यावर गुंडाळली. तिच्या कपाळावर सौभाग्य तिलक लावून तिला जमिनीवर ठेवले गेले. बापूजी रात्रभर मोटीबाच्या निर्जीव शरीराजवळ बसून राहिले. रात्रभर अखंड गीतापाठ होत राहिला.

दुसरे दिवशी शांतिकुमारजींनी मोटीबासाठी चंदनाची चिता रचण्याची इच्छा व्यक्त केली. बापूजी म्हणाले" "बा" एका गरिबाची पत्नी होती. गरिबाला चंदन कोढून मिळणार! तेव्हा कर्नल भंडारी म्हणाले, "माझ्याजवळ चंदनाचे लाकूड आहे." (१९४३) मध्ये बापूजींनी केलेल्या उपवासाच्यावेळी त्यांच्या संभाव्य मृत्यूनंतर बापूजींच्या चितेसाठी सरकारने चंदन विकत घेऊन आगाखान पॅलेसमध्य ठेवले होते, तेच हे चंदन होते. बापूजी म्हणाले, "सरकार वाटेल तसा त्याचा (चंदनाचा) उपयोग करू शकते. तुमचे चंदनाचे लाकूड घेण्यास माझा विरोध असूच शकत नाही." त्यानंतर मोटीबांच्या चितेसाठी चंदनाच्या एका संपूर्ण वृक्षाचे लाकूड आणले गेले.

महादेव काकांच्या समाधीला लागूनच मोटीबाची चिता रचण्यात आली. अंदाजे दीडशे आप्त आणि स्नेही उपस्थित होते. बापूजींच्या सांगण्यावरून देवदास काकांनी अंत्यसंस्कार केले. माझे वडील चितेला अग्नी दिल्यानंतर आगाखान जेलमध्ये पोहोचले होते. आपल्या दोन्ही मुलांना बापूजींनी आपल्या बाहूंत कवटाळले. त्या दोन्ही पुत्रांचे दुःख बघवत नव्हते. देवदास काका ४४ वर्षांचे होते आणि माझे पिता ४६ वर्षांचे होते. ५६ वर्षांचे हरिलाल काकांही तेथे जवळच होते मात्र ते पुढे आले नाहीत. आपल्या प्रिय मातेला ते स्तब्ध, मूकहृदयाने निरोप देत होते. भगवान शंकराची अनन्य भक्त कस्तुरबा गांधी महाशिवरात्रीच्या शुभदिनी संसाराची सारी सुख दुःखे सोडून निघून गेली. मोटीबाची भीती खरी ठरली होती. तिला जेलमधून बाहेर पडता आले नाही. त्या आलिशान महालात तिला कधी सुख लागले नाही. तिच्यासाठी तो भूतमहाल होता. प्रथम महादेव काका गेले. आता मोटीबा गेली. देवदास काका आणि माझे वडील तीनचार दिवस बापूजींजवळ राहिले. मोटीबाच्या अस्थी गोळा करण्यात आल्या आणि प्रयागच्या संगमात विसर्जनासाठी त्या नेण्यात आल्या. बापूजींच्या जीवनाची सुरम्य तारका कायमची अस्तंगत झाली आणि शेवटी विखुरली गेली. मोटीबाच्या मृत्यूनंतर लॉर्ड वॅव्हेलने बापूजींना सहानुभूतीची तार पाठविली होती. उत्तरात बापूजींनी लिहिले, "सततच्या वेदनांतून मृत्यूने हिची सुटका केली हे खरे आणि त्या दृष्टीने मी या मृत्यूचे स्वागतच करतो. परंतु या आघाताचे कल्पनेपेक्षा अधिक दुःख मला झाले आहे."

१९४४ च्या शेवटी बापूजी सेवाग्रामला आले असताना, त्यांच्या वाढदिवसासाठी माझे वडील आणि आम्ही सर्वजण सेवाग्रामला गेलो होतो. त्यावेळी आश्रमात खूप गर्दी जमली होती. देशोदेशीच्या पाहुण्यांची बरीच संख्या होती, बापूजी जेलमधून सुटल्यामुळे सारे प्रसन्न होते. आम्हीही प्रसन्न होतो पण मला मात्र तो आश्रम आता आश्रमच वाटत नव्हता. मोटीबाची कुटी रिकामी होती. आम्ही तेथेच थांबलो होतो पण त्यामुळे अधिकच खिन्न वाटत होते. मोटीबाची सुंदर, चपल मूर्ती आता समोर येईल असे सारखे वाटत होते. पण गेलेले माणूस कधी परतत नाही. आमची आजीही ब्रह्मांडात विलीन झाली होती, ती आता कधीच परत येणार नव्हती.

बापूजींचा सुनेपणा अधिकच हृदयस्पर्शी होता. मोटीबाच्या शरीरदहनास खूप वेळ लागला होता. तिच्या शरीरातून खूप पाणी निघाल्याने दहन क्रिया सकाळी ८ पासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत चालू होती. एवढा सारावेळ बापूजी चितेसमोरच उभे होते. अनेकदा मित्रांनी सांगितले की, 'तुम्ही थकून जाल. जाऊन आराम करा.' परंतु बापूजींनी तेथून दूर जाण्यास नकार दिला. हसून म्हणाले, "६२ वर्षांचा सहवास मी असा कसा सोडू शकेन? यासाठी तर "बा" देखील मला क्षमा करणार नाही" बापूजींच्या हृदयात तीव्र व्यथा होती. ते ज्ञानी असले तरी माणूसही होते. सारे जण निघून गेल्यावर रात्री खाटेवर पडल्या पडल्या म्हणाले, "बावाचून मी जीवनाची कल्पनाही करू शकत नाही. माझ्या आधी तिने जावे असे मात्र मला वाटत होते. म्हणजे माझ्या पश्चात् तिचे कसे होईल ही चिंता मला राहणार नाही. पण "बा" माझ्या जीवनाचे अविभाज्य अंग होती. तिच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती कधीच भरून येणार नाही" नंतर पुन्हा म्हणाले "देवाने माझी कशी कसोटी पाहिली? पेनिसिलिन दिले जरी असते तरी ती जाणारच होती. पण तसे केले असते तर ईश्वरावरील माझ्या श्रद्धेत उणीव निर्माण झाली असती. मी देवदासला समजाविले, आणि पेनिसिलीन न देण्याचा निर्णय झाला व बा ने प्रयाणाची तयारी केली, हाही योगच म्हटला पाहिजे. माझ्या मांडीवर तिला मृत्यू आला याने तर माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही."

त्यावेळी बापूजी सकाळीच, उकळत्या पाण्यात लिंबाचा रस आणि मध टाकून पीत असत. एके दिवशी एक नवीन महिला मोठ्या उत्साहाने बापूजींसाठी मधपाणी घेऊन आली. माझी आई जवळच बसली होती. तिला जाणवले की, पाणी काही विशेष गरम नाही. माझ्या आईला वाटले की, पुन्हा दुसरे गरम पाणी घेऊन यावे. बापूजी म्हणाले, "राहू दे, मला तसे गरम पाणी आणून द्यायला. "बा" थोडीच आहे? तिच्याइतका बारकावा मला कुठेच दिसत नाही" त्याचप्रमाणे १९४५ मध्ये, माझी सुशीला काकी आफ्रिकेतून भारतात आली असताना, बापूजींना भेटली तेव्हा म्हणाली," बापू, तुम्ही काहीसे खिन्न, अन्यमनस्क दिसता

आहात." बापूजी म्हणाले, "होय. मी "बा" ला विसरू शकत नाही. तिच्या माघारी मी असा आतून रिता होईन याचा मला अंदाज नव्हता" १९४७ मध्ये, महाशिवरात्रीच्या दिवशी, नोआखलीत लोकांनी टोपलीभर संत्री बापूजींना भेट दिली. "बा" ला स्वतः खाण्यापेक्षा इतरांना खाऊ घालण्यातच अधिक आनंद होत असे. अशी आठवण काढून त्यांनी सारी संत्री लोकांना वाटून टाकली. बापूजी स्थितप्रज्ञ होते व त्यामुळे सुखदुःख समान लेखून आपले कर्तव्य करीत होते. परंतु मोटीबा गेल्यावर ते मनोमन अगदी रिक्त झाले होते. त्यांच्या जीवनात मोटीबाचे महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या काळजीने रात्र-दिवस खपत राहणारी मोटीबा आता नव्हती. ही वेदना ते कोणाला सांगूही शकत नव्हते. वैवाहिक जीवनाची असाधारण उंची गाठणाऱ्या प्रेमी जोडप्याची ताटातूट झाली होती आणि त्याला आता काही इलाज नव्हता. सती साध्वी स्त्रीलाच शिवरात्रीच्या दिवशी पतीच्या मांडीवर मृत्यू येण्याचे भाग्य लाभते, असे मानले जाते. मोटीबाच्या चितेवर, सौभाग्य चिन्हे म्हणून काचेच्या पाच हिरव्या बांगड्या ठेवण्यात आल्या होत्या. तीन दिवस चिता धगधगत होती आणि अनेक मण चंदनाचे लाकूड जळून राख झाले. मात्र जेव्हा तिची अस्थिफुले वेचण्यात आली तेव्हा या पाचही बांगड्या अखंडित स्वरूपात हाती आल्या होत्या. पुराणकथेतील सावित्रीने आपल्या पती सत्यवानाचे प्राण एकदाच वाचविले होते परंतु आमच्या कस्तुरबा आजीने तर अनेक वेळा आपल्या पतीचे प्राण वाचविले होते आणि तिळातिळाने आपल्या जीवनाची आहुती देऊन आपल्या पतीचे आयुष्य वृद्धिंगत केले होते.

२२ फेब्रुवारी, १९४३ ला मोटीबाने ईश्वराकडे बापूजींच्या प्राणाची भीक मागितली होती, कदाचित त्या बदली आपले प्राण देण्याचा तिने वायदा केला असावा. त्यामुळेच ती त्यागमयी बरोबर एक वर्षाने २२ फेब्रुवारीलाच, आपला वायदा पूर्ण करण्यासाठी आपल्या प्राणप्रिय सख्याला सोडून देवाघरी निघून गेली होती. मोटीबाच्या मृत्यूबरोबरच आमच्या परिवाराचा ममतादीपच नेहमीसाठी विझून गेला होता.

## ६

# हरिलाल गांधी

बापूजींना चार मुले होती. त्यांतील सर्वांत वडील मुलाचे नाव हरिलाल होते; हिरालाल नव्हे. सप्टेंबर १८८८ मध्ये जेव्हा बापूजी बॅरिस्टर होण्यासाठी विलायतेस गेले तेव्हा हरिलाल गांधी तीन महिन्यांचा होता. हरिलाल गांधीबद्दल समाजात वेगवेगळी मते प्रसृत झालेली आहेत. ते सिगरेट पीत, त्यांना दारूचे व्यसन होते आणि ते व्यभिचारी होते. त्यांनी आपल्या पित्याविरुद्ध बंड उभारलेले होते. बापूजींचे मत होते की, त्यांच्या आणि मोटीबाच्या आरंभीच्या मूढतेने व विषय वासनेमुळेच हरिलाल काका असे बनले होते. हे फार सोपे आणि बहुधा वरवरचे स्पष्टीकरण होय. शेवटी प्रत्येक मुलाचा जन्म, विषयवासनेने प्रेरित संभोगातूनच होत असतो. त्यामुळे आईबापांच्या वासनेला दोष देणे उचित नव्हे. आईबापाचा तारुण्यसुलभ वेडेपणा अथवा अज्ञान बालकावर परिणाम करू शकत असले तरी प्रत्येक जीव जन्माला येताना पूर्वजन्मीचे संस्कार बरोबर घेऊन येतो. हेही लक्षात घेतले पाहिजे. वस्तुतः बाळपणी लाभणारे वातावरण, आईबापांचे लाड-प्रेम, संगोपन आणि आईबापाचा सहवास यांचा मुलावर सर्वाधिक परिणाम होत असतो. १८९६ मध्ये आपल्या आई वडिलांसह व मणिलाल काकासह हरिलाल काका आफ्रिकेत गेले होते तेव्हा त्यांना प्रथमच आपल्या पित्याचे सतत सान्निध्य लाभले होते. त्यावेळी ते ९ वर्षांचे होते. मानसशास्त्र सांगते की, जे काही शिकावयाचे, ग्रहण करावयाचे ते मूल आपल्या सातव्या वर्षांपर्यंतच शिकत-ग्रहण करीत असते. त्यानंतर जे घडते ते या मूळ गाभ्याच्या विस्ताराचेच विकसित रूप असते.

हरिलाल काकाला या संस्कारक्षम नाजूक, सूक्ष्म चैतन्यशील अवस्थेत, पित्याचे सान्निध्य तर राहोच, पण सामान्य सुखही मिळाले नव्हते. आईचे प्रेम होते पण ती तर त्या विशाल गांधी कुटुंबाची जवळ जवळ गुलामच बनलेली होती. हरिलालचे हात, तोंड धुण्याचीही सवड तिला तेथे मिळत नव्हती. आफ्रिकेत गेल्यावरही बापूजी वकिली आणि नाताळ काँग्रेसच्या कामात सतत व्यग्र असत. आपल्या तत्त्वांसाठी बापूजींनी आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत पाठविले नव्हते आणि स्वतः देखील कधी नियमितपणे त्यांना शिकविण्याची जबाबदारी पाळली नव्हती. प्रत्येक मूल स्वतः बघून-ऐकून बरेच काही शिकत असते; पण हे शिक्षण नव्हे. मुलांना शाळेत घातले नाही तेव्हा हरिलालला दररोज किमान दोन तास स्वतः शिकविण्याची अथवा या महत्त्वाच्या कामासाठी एखादा शिक्षक नेमण्याची बापूजींची जबाबदारी होती. या दोन्ही गोष्टींच्या अभावी, बापूजींच्या मुलांना कधीच व्यवस्थित, पद्धतशीर शिक्षण लाभले

नाही. आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करीत आहोत तसेच त्यांचे चारित्र्यही घडवीत आहोत, असे बापूजींचे या बाबतीत म्हणणे होते. लोकांची सेवा करणे हे एक उत्तम कार्य होते. शिक्षण काय नंतरही होऊ शकेल; पण एखाद्या रुग्णाची सेवा करण्याची गमावलेली संधी काय पुन्हा लाभणार आहे? असे ते सांगत. मला असे वाटते की, ही भूमिका तर्काधिष्ठित नाही, संस्कार आणि शिक्षण यांत अंतर आहे. संस्कार आणि चारित्र्य संवर्धन महत्त्वाचे निश्चितच आहे, पण परंतु शिक्षणाचे स्वतःचे महत्त्व असून त्याचा काळही नियत असतो. वैदिक आश्रम व्यवस्थेत, वयाची पहिली २५ वर्षे विद्याभासाचा काळ मानला आहे. त्यानंतर विद्यार्जनाची वृत्ती ओसरू लागते. नंतरची २५ वर्षे गृहस्थाश्रमाची असतात. बापूजींनी या आश्रमव्यवस्थेतील अंतर्भूत तत्त्वाची उपेक्षा करून हेळसांड केली होती. प्राचीन मंत्रदृष्ट्या ऋषींनी अत्यंत विचारपूर्वक व सूक्ष्म निरीक्षणांती ही व्यवस्था निश्चित केलेली दिसते. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने ही व्यवस्था महत्त्वाची असून, ती मोडल्यास विहत परिणाम संभवतात. हरिलाल गांधीच्या व्यक्तित्वाचे असेच झाले होते.

१९०१ मध्ये बापूजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले होते आणि मुंबईत त्यांची वकिली चांगली चालू झाली होती. १९०२ मध्ये बापूजींनी आपले मित्र हरिदास वकील यांची कन्या गुलाब हिच्याशी हरिलालचा विवाह ठरवून टाकला. त्याकाळी ही पद्धत सर्वमान्य होती. त्यावेळी हरिलालचे वय १४ वर्षांचे होते. या बाबतीत मुलाची इच्छा जाणून घेण्याचा रिवाज तेव्हा नव्हता. बॅरिस्टर गांधींनासुद्धा आपल्या मुलाची इच्छा जाणून घेण्याची गरज वाटली नाही. त्यानंतर काही महिन्यांनीच बापूजींना आफ्रिकेस जाणे भाग पडले. १९०४ मध्ये मोटीबाही मणिलाल, रामदास आणि देवदास या आपल्या मुलांना बरोबर घेऊन आफ्रिकेत गेली. किशोर वयाच्या हरिलालला, विद्याभ्यासाच्या नावाने येथेच राहावे लागले. अशा रीतीने हरिलाल पुन्हा आपल्या काकांच्या घरी एकटेच राहू लागले. लहानाचे मोठे होऊ लागले. किशोरावस्थेचा काळ हा मोठा नाजूक काळ असतो, हे सामान्य लोकही जाणतात. या वयात कोणाही मुलाला, आई-वडिलांचे पूर्ण प्रेम, आधार, सहवास आणि त्यापेक्षाही सहिष्णुता आणि अखंड दृढ विश्वासाची अत्यंत गरज असते. हरिलाल काकाच्या या नाजूक आणि धोक्याच्या वयातच बापूजी पुन्हा गैरहजर होते. बापूजींचे आचार विचार आणि साधनारत जीवन यांच्या सान्निध्याऐवजी हरिलालकाकांना बापूजींचे वडील बंधू करसनदास गांधी यांच्याबरोबर राहावे लागले. या वडील बंधूनीच बापूजींना बिडी पिण्याचे शिकविले होते आणि त्यांच्या भानगडी निस्तरण्यासाठी बापूजींना सोन्याच्या कड्यातील दोन तोळे सोन्याचा तुकडा चोरून कापून त्यांची उधारी चुकवावी लागली होती. या सर्व गोष्टी बापूजींना माहीत होत्या, त्यामुळे आपल्या किशोरवयीन मुलाला या दुष्ट भावापासून दूर ठेवणे त्यांना आवश्यक वाटावयास हवे होते. स्वतः बरोबर आपल्या या मुलाला ठेवणे

शक्य नव्हते तर देशविदेशात चांगल्या शिक्षण संस्थांची कमी नव्हती. आपल्या मुलाला कोठे, कोणत्या आणि कशा शाळेत ठेवावे याचा सखोल विचार करणे हे पिता म्हणून त्यांचे कर्तव्य होते. आज या गोष्टीला महत्त्व दिले जाते. शंभर वर्षांपूर्वी बापूजींनाही याचे महत्त्व कळत होते. परंतु हरिलालच्या बाबतीत मात्र ते बेपर्वा राहिले होते. हरिलालने बनारसला शिकावे की, काठीयावाडमध्ये अथवा गोंडल राज्यातील शाळेत, हे त्यांनी नाणेफेक करून ठरविले होते. आणि त्याला गोंडलला पाठविले गेले होते. थोडी जागरूकता दाखविली असती तर गोंडलची निवड योग्य नसल्याचे आरंभीच कळाले असते. गोंडलला पाठविल्यावर दोनच महिन्यांनी हरिलालला राजकोटला परत बोलावून घ्यावे लागले होते. त्यानंतरही, ही गंभीर चूक सुधारून दुसऱ्या चांगल्या संस्थेची निवड करण्यात आली नव्हती आणि हरिलालला बनारसलाही पाठविण्यात आले नव्हते. त्यामुळे आपल्या काकांच्या रूढीवादी, मागासलेल्या या परिसरात एखाद्या निराश्रिताप्रमाणे हरिलाल राहू लागला. या निष्ठुर निष्काळजीपणाच्या आरोपातून बापूजींचा बचाव करणे कठीण होय.

आईबाप आपल्या मुलाचे मलमूत्र काढण्यापासून ते आजारात सेवा करण्यापर्यंत अनेक खऱ्या अथवा काल्पनिकही दुःखात, सहनशीलतेने कष्टत असतात. त्यामुळे सामान्यतः मुले त्यांना समर्पित असतात. आपल्या पित्याच्या बळकट बाहूत आपणास कसलीच भीती बाळगण्याची आवश्यकता नाही हे मुलाला जाणवत असते. तोच पिता मुलाचे हगणे-मुतणे साफ करायलाही पुढे होत असतो, हे पण मुलाला माहीत असते. हरिलालची व्यक्तिगत सेवा करण्याचा बापूजींना कधी अवसर मिळाला नाही. मणिलालला त्यांनी मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले होते. रामदास आणि देवदास यांच्या जन्माच्या वेळी, दाई वेळेवर उपलब्ध नसल्याने सारे काही त्यांनाच निस्तरावे लागत होते. धाकट्या दोघांचे पूर्ण लालनपालन बापूजींनी केले होते. हरिलालला मात्र लहान-मोठ्या आजारात आईचा आधार तरी लाभला होता की नाही, याची मला शंका आहे. १६ वर्षांच्या अपरिपक्व वयातच आई आणि धाकटे भाऊ विदेशात गेले होते. जवळ कोणी प्रेमातली व्यक्ती नव्हती. विधवा आत्याच्या घरी राहणारे हरिलाल इतके आजारी झाले की, उपचारांसाठी त्यांच्या भावी सासऱ्यांनी त्यांना आपल्या घरी आणले परंतु बापूजींनी पाठविलेल्या पैशांवरच जगणाऱ्या त्याच्या काकांना, गावातल्या गावात असूनही या आजारी किशोराला आपल्या घरी घेऊन जाण्याइतकी दया आली नाही.

बापूजींच्या आत्मकथेत, हरिलालच्या जन्माव्यतिरिक्त अन्य कसलाही उल्लेख आलेला नाही. आपल्या या बिघडलेल्या मुलावरील बापूजींचे प्रेमच बहुधा उडाले असावे अशी मला शंका येते. एवढ्या लहान वयात आपण बापही बनलो याची त्यांना लाज वाटत असणेही

स्वाभाविक होते. हृदयातील हा अव्यक्त क्षोभ सहन करण्यासाठी बहुधा त्यांच्या सुप्त मनाने या लहानग्याला कदाचित विस्मृतच करून टाकले असावे. हरिलालच्या अस्तित्वाची स्मृतीही बहुधा त्यांना सुखकर वाटत नसावी.

एवढी अवहेलना होत असताही हा मुलगा हरिलाल आपल्या हसतमुख सहज स्वभावाने, राजकोटच्या समवयस्क मुलांत लोकप्रिय होता. तसेच शहरातील फुटबॉल टीमचा उत्कृष्ट खेळाडू मानला जात होता, असे माझ्या वडिलांनी आपल्या आठवणींत लिहून ठेवले आहे. जीवनातील या साऱ्या अव्यक्त यातना, एकाकीपणा आणि अगणित गैरसोयी अनुभवीत असतानाच, हरिलालचा त्याच्या वाग्दत्त वधुशी-गुलाबशी परिचय झाला आणि हा एक सुखद योगच म्हटला पाहिजे. पहिल्या भेटीतच दोन्ही किशोरांत प्रेमाची जी गाठ बांधली गेली ती आजीवन टिकून राहिली. गुलाब आपले नाव सार्थ करणारी सुशील होती तशीच कवयित्रीही होती. आपल्या वाग्दत्त वराला, प्राणप्रिय हरिलालसाठी तिने कविता केली होती, जी प्रत्येक प्रेयसी स्वतःच्या प्रियकरासाठी लिहिण्याची इच्छा करील. कविता करता येईलच असे मात्र नाही. गुलाबने लिहिले होते, प्रिय प्राणाधार पती, ............

शुद्ध अष्टमीचा दिस फार महिमा रे
मम वसंत विलासी नाथा झडकरी येई रे
वेगे हरिलाल मम प्राणा येऊनि भेट रे.
जशी दिसे अंधारी रात चन्द्र विनानी रे
माझी दशा अशी करणारा तू मुरारी रे.
प्रिय चंद्रमा चढे आकाशी चांदणी साथी रे
मनरंजन प्रियनाथ मनात राही व्यापून रे.
रूप यौवन न् गुणशील विद्यानिधी रे
प्रभू मज सोपे शुभनाथ कृतार्थ करी रे.
शुभ सुखद कस्तुरी वास सगळा बहके रे
करी शुभगुणी मज नाथा सरिता वाहे रे.
निज दासी मानुनि दोष सुधारून घेई रे
विरहाग्नी करे दुःखी निवारून देई रे.

स्वस्तीश्री रे पोरबंदर देश सुंदर शोभे रे
जिथ सुगुण विभूषित चंद्र माझा झळके रे

महाकुळात जन्मे नाथ सत्याचा सागर रे
परम पुण्यानं मिळे मज हाच वर रे
मी राजकोट देशी आज गुलाब याची रे
स्वीकारा मम प्रणाम पाया मी पडते रे
न पाहिले तुम्हास स्वप्नी स्वामी रे
अंतर आत्मा असे एक अंतर्यामी रे
स्वीकारुन मम प्रीती घेऊनि जाई स्वामी रे
शुभ लग्न असे नाथा वैशाख महिनी रे

आपली प्रकृती चांगली असावी ही इच्छा. देवाची इच्छा असेल तर थोड्या काळातच मिलाप होईल. पत्राला उशीर झाला याची क्षमा असावी. आपण जी योग्य वाटेल ती शिक्षा द्यावी.

चंद्रोदयाची वाट बघत बसलेल्या
प्रेमी चंद्रिका गुलाबचे प्रणाम.

आपला मुलगा हरिलाल याच्यासंबंधी बापूजींच्या दोन तक्रारी होत्या. पहिली ही की, त्याने लौकर विवाह करून घेतला आणि दुसरी अशी की, तो स्वतंत्र वृत्तीचा आणि अनिर्बंध होता.

हरिलाल आणि गुलाब प्रेमिक होते हे खरे, पण दोघेही शालीन आणि समजदार होते. राजकोटच्या परक्या वाटणाऱ्या वातावरणातून निघून आफ्रिकेत आपल्या मातापित्याजवळ जावे अशी हरिलालची इच्छा होती, परंतु विवाहासाठी तेथून परत इकडे येता येईल याची हरिलाल काकांना शाश्वती वाटत नव्हती. त्याकाळी आफ्रिकेत गेलेला माणूस पाचदहा वर्षांनीच परतत असे. हरिलालला जर हा अवधी अधिक वाटला असेल तर त्याला विरोध करण्याचे कारण नव्हते. आजच्या आधुनिक युगातही कोणाही मुलीचा पिता, लग्न ठरल्यावर पाच वर्षे थांबू शकत नाही. १९०६ मध्ये तर ही कल्पना करणेही शक्य नव्हते. शिवाय असे की, हा निर्णय हरिलालच्या हाती नव्हता. १९०४ मध्ये बापूजींनी स्वतःच हा संबंध निश्चित केला होता. गुलाबपेक्षा चांगली मुलगी असू शकत नव्हती. हरिलाल वकिलांच्या पेक्षा अधिक संपन्न परिवार लाभणेही दुरापास्त होते. शिवाय विवाह समारंभाचा निर्णय बापूजींचे वडील बंधू, लक्ष्मीदास गांधी यांनी घेतला होता. त्यांनी आपल्या या पुतण्याचा विवाह २ मे, १९०६ रोजी करून टाकला. हरिलालच्या मातापित्यांना आणि स्वतःच्या धाकट्या भावालाही विवाहाची वार्ता त्यांनी २७ मे, १९०६ ला पत्राने कळविली की, चिरंजीव "हरिलाल आता चतुःर्भुज झाला आहे". हरिलाल आणि त्याच्या पित्यामध्ये जर

आत्मीयतेचा, अंतःकरण उकलणारा पत्रव्यवहार असता तर पित्याला आपला मुलगा किती आजारी होता हे कळाले असते, तसेच त्याला आपल्या नियोजित सासुरवाडीस कसे नेण्यात आले आणि तिथे गुलाबशी त्याचा प्रत्यक्ष परिचय कसा झाला हेही समजू शकले असते पण बापूजींना हे काहीच माहीत नव्हते. विवाह समारंभ झाल्यावरच त्याची वार्ता कळाली, यात बापूजींचाही दोष नव्हता. विवाह झाल्याची ही सूचनाही बहुधा खर्चापोटी मागविण्यात आलेल्या बऱ्याच मोठ्या रकमेसाठीच करण्यात आली असावी. आपल्या स्वतःच्या मुलाच्या विवाह समारंभात सहभागी होण्याचे सुख मोटीबा आणि बापूंना मिळाले नाही. त्यांची नाराजी स्वाभाविक होती पण यात दोष होता तो लक्ष्मीदास गांधींचा, या प्रकरणात हरिलालचा काही दोष वा अपराध नव्हता. लक्ष्मीदास गांधी हरिलालचे भारतातील पालक होते. मातापित्यांना वेळेवर सूचना देणे ही त्यांची जबाबदारी होती. मोठ्या भावाच्या निष्काळजीपणासाठी तरुण मुलाला दोषी ठरविणे अन्याय्य होते.

विवाहानंतर दोन महिन्यांनी, एका दूरच्या नातलगाकडून दहा पौंड उधार घेऊन हरिलाल आफ्रिकेस गेले. ज्याचा पिता तीन परिवारांना डामडौलाने राहण्याइतका पैसा प्रत्येक महिन्याला पाठवित असे, त्या मातापित्यांच्या भेटीसाठी अधीर झालेल्या मुलावर मात्र, काका अथवा आत्याकडून पैसे न मिळता, दूरच्या नातलगाकडून उधार घेऊन आफ्रिकेत जाण्याची पाळी यावी हीदेखील विचार करण्याचीच गोष्ट होय. त्या १८ वर्षांच्या हरिलालची अवस्था किती लाचार झाली असेल? तार पाठवून पित्याकडून पैसे मागविण्याचीही हिंमत त्याच्यात राहिली नव्हती. नवविवाहित मुलगा आफ्रिकेस निघाला आहे, तेव्हा त्याच्याजवळ किती पैसे आहेत, त्याला काय हवे आहे, हे विचारण्याचीही गरज त्याच्या काकांना वाटली नाही. तो बहाद्दर तरुण आपल्या प्रियतमेला सोडून देवाच्या भरवशावर आफ्रिकेस निघाला. एकच आशा होती की, समर्थ पिता आपल्या मुलाच्या जीवनाला योग्य वळण लावू शकेल. अपेक्षा अशी होती की, बालपणीचा कडवटपणा संपेल आणि आपल्या पित्याप्रमाणेच हरिलाल शिकूनसवरून आपला विकास करू शकेल व समाजात आपले स्थान ग्रहण करील.

१९०७ मध्ये जेव्हा हरिलाल आफ्रिकेत पोहोचला तेव्हा जोहान्सबर्गमध्ये ट्रान्सवालचा सत्याग्रह सुरू होता. उत्साही पुत्राने गरज पडली तेथे पित्याचे काम अंगावर घेतले. कधी जोहान्सबर्गच्या कार्यालयात तर कधी फिनिक्स आश्रमात हरिलालने काम केले. त्याशिवाय 'इंडियन ओपिनियन' च्या छपाईसारखी लहानमोठी कामेही त्याने केली. प्रमुख पाहुण्यांना आणण्याचे अथवा पाठविण्याचे कामही त्याच्याकडे असे. अनेक जबाबदाऱ्या पार पाडीत असताना, हरिलाल आपली निष्ठा, जन्मजात प्रतिभा, बहादुरी व कार्यक्षमता आणि हसतमुख स्वभावाने लोकप्रिय झाला. आपल्या शरीराच्या सुखसोयींची अथवा सुरक्षिततेची मुळीही पर्वा न करता तरुण पत्नी व नवजात कन्या यांच्या सहवासाची इच्छा बाजूस सारून त्याने

अनेकदा सत्याग्रहात भाग घेतला. कायदा मोडून, सीमा ओलांडण्याच्या आरोपाखाली कमीत कमी दहा वेळा हरिलाल आफ्रिकेतील जेलमध्ये गेला होता. त्याने दोन वेळा तीन महिन्यांचा, तीन वेळा एक एक महिन्याचा आणि दोन वेळा सहा महिन्यावर कारावास भोगला होता. सात आठ दिवसांच्या शिक्षेचा तर काही हिशेबच नव्हता. हरिलालने जेलमध्ये उपवासही केले. आफ्रिकेतील पाशवी सत्तेविरुद्ध हा तरुण निर्भयपणे सत्याग्रह करून झगडत राहिला. गांधीभाईंच्या या तरुण पुत्रावर, आफ्रिकेतील सारा हिंदी समाज लुब्ध होता. कर्तव्यशक्ती आणि सहनशीलतेबरोबरच सदैव प्रसन्न राहण्याचे अद्‌भुत वैशिष्ट्य त्याच्यात होते. लोकांनी त्याला जणू दुसरा गांधीभाईच मानले होते. हरिलाल गांधी 'छोटे गांधी' म्हणूनच लोकांत प्रसिद्ध झाले होते. उदासीन पिताही शेवटी पुत्राच्या योग्यतेने द्रवले. समर्पित पुत्राचा आधार आणि साहाय्य अनन्य असते. सत्यशोधक गांधी भाईंना, हरिलालच्या रूपाने एक कार्यक्षम व विश्वासू स्वयंसेवक लाभला होता. हरिलाल स्वतंत्र विचार करणारा, सरळ शुद्ध स्वभावाचा निष्कपट युवक होता, त्याच्यात पाखंड, कपट अथवा ईर्ष्येचा सर्वथा अभाव होता. हरिलाल काका जो विचार करीत तेच आचरणात आणीत. ते एवढे विलक्षण चतुर होते की, प्रत्येक व्यक्तीची योग्यायोग्यता बरोबर जोखीत असत आणि मोठेपणाचे सोंग तात्काळ ओळखीत. बापूजींच्या लहानपणापासून, त्यांच्याभोवती खोटेपणा करणारा धोकेबाज, पाखंडी, ढोंगी आणि दुतोंडी साथीदारांची कधी उणीव नव्हती. सत्यअसत्य मध्येच चमकून उठते. अशा लोकांना हरिलाल काकांचा विशेष काही विरोध नव्हता. त्यांचे पिता सत्याग्रहाचे नेतृत्व करीत होते. या तुफानात दगडविटांसह पाचोळाही उडत असे. लोकांचे सोंगढोंग, नखरे आणि त्यांची सूक्ष्म मलिनता हरिलाल काका बघत होते, ओळखीत होते; परंतु मनातल्या मनात हसून अशा लोकांच्या नसत्या उद्योगांपासून व वायफळ चर्चांपासून दूर राहून ते आपले कर्तव्य करीत असत. हरिलालनी आपल्या पित्याप्रमाणे मीठ सोडणे, कच्चा आहार घेणे, दूध वर्ज्य करणे इत्यादी गोष्टी कधी केल्या नाहीत. त्यांना त्याची गरजच नव्हती. त्यांचे मनोबल एवढे होते की, आपल्या प्रतिष्ठेवर अडून सत्याग्रहाच्या माध्यमाने अत्याचारी सत्तेशी एकाकी लढू शकत होते. आश्रमवासीयांना, आपल्या सवयींमुळे सरकारसमोर वाकण्याची पाळी न यावी, या हेतूनेच या साऱ्या संयमांची योजना करण्यात आलेली होती. हरिलालना अशी काही भीती नव्हती. ज्या आवडीने व रुचीने ते जीवन आणि जिभेच्या विलास आणि सुखस्वादाचा उपभोग घेऊ शकत होते; त्याच सहजपणाने एका झटक्यात त्या साऱ्या आकर्षणापासून व मोहांपासून मुक्त होऊन निःस्पृह, निरपेक्ष असे आदर्श सत्याग्रही बनू शकत होते. ही त्यांची केवळ आत्मप्रौढी नव्हती. आफ्रिकेतील अवर्णनीय निर्दयता आणि आपदांना हसत हसत तोंड देऊन त्यांनी हे अनेकवेळा सिद्ध केले होते. १९०६ मध्ये बापूजींनी ब्रह्मचर्य व्रताचा स्वीकार केला होता. आत्मशुद्धी आणि देशसेवेची तऱ्हेतऱ्हेची व्रते बापूजी घेत असत. ब्रह्मचर्याने लाभणाऱ्या अपूर्व सुखसमाधानाचे

ते आपल्या सहकाऱ्यांना वर्णन करीत. आपला प्रत्येक सहकारी भोगवासनांपासून मुक्त व्हावा अशी त्यांची इच्छा होती. ब्रह्मचर्याचे पालन करताना, अनेक आकर्षणांचा मोह सोडताना बापूजींना बरेच कठीण गेले होते व बराच काळ लागला होता. त्यांनी स्वतःच हे सारे आपल्या आत्मकथेत लिहिले आहे. हरिलाल गांधींना ब्रह्मचर्य पालन करण्याची इच्छाही नव्हती आणि बापूजींना खूश करण्यासाठी त्यांनी त्याचे कधी सोंगही आणले नव्हते. ते एक सहज साधारण व्यक्ती होते. हरिलालना आपल्या पत्नीचा सुखद सहवास प्रिय होता आणि तिच्याबरोबर घेतलेल्या समागम सुखामुळे त्यांच्या समाजसेवेत वा सत्याग्रहात कधी काही विक्षेप अथवा उणीव निर्माण झाली नाही. पत्नीच्या आकर्षणाने तुलसीदासाप्रमाणे त्यांना कधी कर्तव्यापासून अथवा मर्यादेपासून दुरावले नव्हते. हा स्वाभिमानी प्रेमाधीन पती देशासाठी मृत्यू पत्करण्यासही सिद्ध होता परंतु त्याचे वैयक्तिक जीवन हा त्याच्याच अधिकाराचा प्रश्न होता, त्याबाबतीत इतरांच्या मतांना वा आग्रहांना स्थान नव्हते आणि तसे ते नसायलाही पाहिजे होते. याला त्याच्या दृष्टीने आपल्या साधनाप्रेमी पित्याचाही अपवाद नव्हता.

गांधी स्वतःच मान्य करीत की १९०६ मध्ये ते अत्यंत आग्रही होते व त्यांचा क्रोध अनेकदा मर्यादा ओलांडीत असे. आपली ही असहिष्णुता बापूजींनी जाहीरपणे मान्य केली होती. आमच्या मोटीबाने, आदर्श हिंदू पत्नी प्रमाणे, त्यांचा हा दुराग्रह आणि प्रकोप निमूटपणे 'पिऊन टाकला' आणि अशारीतीने या स्वाभिमानी स्त्रीने बापूजींच्या सर्वांगीण विकासास आणि साधनेस मूकपणे पण मौलिक हातभार लावला होता. मोटीबा बापूजींच्या शक्तीचा निःशब्द आदिस्त्रोत होती. बापूजींचा शिव कल्याणकारी रूपाच्या आतला शक्तिपुंज मोटीबा होती. शिव शब्दातून 'ई' हे अक्षर काढले तर उरते निष्प्राण कलेवर 'शव'. संस्कृत भाषेत 'ई' चा एक अर्थ करुणा असा पण होतो. 'ई' म्हणजे ईश्वर असेही आहे. या प्रकारे भगवान शंकराचा पुत्र प्रकोपही पृथ्वी तेव्हाच सहन करू शकते जेव्हा तिच्या ठायी प्रकृतीची करुणा व शक्ती असते. एरवी भगवान पशुपति नाथांचा तिसरा डोळा उघडल्यावर क्रोधाग्नीत दुष्टाचा तर संहार होतोच पण अवघा संसारच भस्म होऊन गेला असता. समुद्रमंथनातून निघालेले हलाहल विष प्राशन करणाऱ्या नीलकंठ महादेवाचे अर्धनारी नटेश्वर स्वरूप जसे पूजनीय आहे तसेच या देशातील जहर प्राशन करणाऱ्या बापूजींसह मोटीबाचे स्थान होय. तिने हे जहर, अमृत करून टाकले होते. मोटीबा नसती तर आमचे पितामह तपस्वी दुर्वास मात्र बनले असते. त्यांचा क्रोधाग्नी नियंत्रित, सीमित करण्याचे श्रेय आमच्या निरक्षर आजीकडे जाते. परंतु तरुण पुत्र हरिलाल हे कसे सहन करू शकणार? एकतर पुरुष आणि त्यातून ज्येष्ठ पुत्र! तो तर बापाच्या सवाईच बनू शकत होता. आपल्या समग्र अस्तित्वाची आहुती देऊन, पित्याशी एकरूप होणे हे पुत्राचे कर्तव्य नव्हे आणि ते संभवनीयही नव्हे.

ययातीपुत्र पुरूने आपले यौवन पित्याला दिले होते खरे पण ते दान होते. श्रीरामाने पित्याची आज्ञा शिरोधार्य मानून वनवास स्वीकारला पण त्यात समर्पणाची नव्हे तर पित्याने दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याची भूमिका होती. हरिलालनी बापूजींचे सारे कार्यक्रम स्वीकारून ते सुसंगतपणे पार पाडून दाखविले होते पण या कार्यक्षेत्राबाहेरील बापूजींच्या साऱ्या प्रयोगांविषयी उदासीनता दाखविली आणि ते स्वीकारले नाहीत तर त्यात हरिलालचा दोष मानता येत नाही.

आपल्या पित्याप्रमाणे आपणही आधुनिक शिक्षण घेऊन आपली योग्यता वाढवावी आणि समाजासाठी त्याचा उपयोग करावा, अशी हरिलालची इच्छा होती. परंतु पित्याने तर विद्याभ्यासाची आवश्यकताच धुडकावून लावली होती. शरीरश्रमाच्या माध्यमातून का होईना पण विद्याभ्यास नितांत आवश्यक होय. शेतकरी परंपरेत पुस्तकी ज्ञान अनावश्यक होते तर त्यानुसार, बापूजींनी आपल्या मुलाला शेती अथवा एखादी बाग तरी द्यावयाची? त्यातच त्याचे सार्थक झाले असते. परंतु अपरिग्रहाचे समर्थन असलेल्या गांधीजींना ऐहिक संपत्ती देऊन आपल्या मुलांना पंगू बनविणे मान्य नव्हते. हेही ठीकच होते. पण मग अन्य एखाद्या व्यवसायाची व्यवस्था करणे हा पित्याचा धर्म होता. बापूजींनी अनेकदा सांगितले आणि लिहिले आहे की, आपली मुले धोबी, मोची, शिंपी, पिंजारी, शेतकरी किंवा घाणा चालविणारे तेली बनले असते तर त्यांना आनंद झाला असता आणि अभिमान वाटला असता. हे व्यवसाय करावयाचे तर पिढी दरपिढी चालत येणारी कुशलता हवी असते आणि पित्याने वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस मुलाला दीर्घकाळ शिकविण्याची गरज असते. गांधी कुटुंबाच्या वाडवडिलांचा धंदा दिवाणगिरीचा होता. बापाचा धंदा बॅरिस्टरीचा होता. बापूजी जर बॅरिस्टर नसते तर कायद्यातील बारकावे समजण्याची अथवा देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याची क्षमता त्यांना मुळीच लाभली नसती. लंडनमधील शिक्षणावाचून, त्यांची सत्याची साधनाही बहुधा याप्रकारे व्यक्त झाली नसती. स्वातंत्र्याचा लढा हा जितका अहिंसेचा होता तितकाच सतत इंग्रजी सत्तेतील धुरंधरांच्या मुत्सद्देगिरीने युक्तिवाद करण्याचा बौद्धिक लढाही होता. सत्य आणि अहिंसा आवश्यक होतीच कारण स्वातंत्र्याच्या वाटचालीचे ते अनिवार्य पाथेय होते, परंतु तेथेही कायद्याचे ज्ञान, सूक्ष्म उलट तपासणीचे प्रशिक्षण अत्यंत आवश्यक होते. काँग्रेसचे प्रमुख नेते बॅरिस्टर होते. नेहरू, पटेल, देशबंधूदास, राजाजी, मोतीलालजी, विठ्ठलभाई पटेल आणि राजेंद्र बाबू हे सारेजण सुशिक्षित कायदेपंडित होते. अशा विचक्षण सहकाऱ्यांचे बापूजी यशस्वीपणे नेतृत्व करीत आले होते. अहिंसेच्या आग्रहाव्यतिरिक्त बापूजींजवळ कायद्याचा कुशाग्र अनुभव होता आणि त्यांच्या मनाचे ते एक अपरिहार्य अंग होते. आपल्या पित्याचे हे कौशल्य प्राप्त करून हरिलालना आपल्या पित्याच्या पावलावर पाऊल टाकून चालावयाचे होते. विद्याभ्यासाचा आणि शिक्षणाचा तरुण हरिलाल आग्रह

धरत होता; त्यासाठी प्रसंगी हट्टही करीत होते. चांगल्या कामासाठी असा हट्ट केला तर वावगे काही नव्हते. हरिलालच्या आग्रही पित्याने मात्र आपल्या मुलाला कोणत्याही व्यवसायाचे पद्धतशीर शिक्षण दिले नव्हते. कॅलन बाख आणि पोलाक या बापूजींच्या मित्रांची इच्छा होती की त्यांच्या पितृप्रेमी, विचक्षण व सुसंस्कृत अशा चारी मुलांना व्यवस्थित शिक्षण द्यावे म्हणजे ते देशंवासीयांची अधिक चांगली सेवा करू शकतील. परंतु बापूजींचा आपल्या मतांचा आणि प्रयोगांचा आग्रह होता. पत्नी आणि मुलांची व त्यातही विशेषतः हरिलालची शिक्षण घेण्याची मागणी बापूजी, मूढता, अज्ञान आणि मोह असे संबोधून फेटाळून लावीत असत. हरिलालना हे सहन होत नसे. देवदास काकांच्या आणि माझ्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणे व स्वतः बापूजींच्या मतानुसारही, हरिलालकाका गांधींच्या चारी मुलांत अधिक चतुर आणि बुद्धिमान होते, विचक्षण होते. इतर तिघा मुलांनाही कष्ट सोसावे लागले तेही निराश झाले. पण आपल्या प्रखर पित्याच्या शिस्तीला विरोध न करता त्यांनी आपला मार्ग शोधला. पुढच्या काळात संधी मिळताच त्यांनी पित्याचा आग्रह बाजूला ठेऊन, लहानसा परंतु आपापल्या आवडीचा मार्ग स्वीकारला होता. हरिलालकाका विशेष कुशाग्र होते. बुद्धिशाली मुलगा अरबी घोड्यासारखा असतो. त्याला शिकवून तयार करताना शिक्षकाला अत्यंत सावध असावे लागते. नाहीतर अस्सल अरबी वंशांचा घोडा बिथरून खुन्नस बाळगणारा दुष्ट बुद्धीचा होण्याची भीती असते आणि त्यानंतर तो कोणत्याच कामाचा राहत नाही. बापूजींच्या कठोर आग्रहाने आणि अव्यक्त तिरस्काराने शक्तिशाली, तेजस्वी, संवेदनशील हरिलालला कायमचे मार्गभ्रष्ट करून टाकले.

लंडन येथील बापूजींचे परम मित्र डॉ. प्राण जीवन मेहतांनी बापूजींना लिहिले, "हरिलाल आता मोठा झाला आहे. त्याला आणि त्याच्यासह आणखी एखाद्या योग्य तरुणाला माझ्याकडे लंडनला पाठवा. मी त्यांना सांभाळीन आणि बॅरिस्टर करून पाठवीन. तुमच्या सार्वजनिक कार्यात त्यांची त्यामुळे तुम्हाला चांगली मदत होईल."

हे पत्र आले तेव्हा हरिलाल काका जेलमध्ये होते. तीन महिन्यांची शिक्षा भोगून झाली होती आणि आणखी तीन महिने उरले होते. हरिलालचे वय यावेळी २२ वर्षांचे होते. ते समजदार होते, बरेवाईट त्यांना कळत होते, सज्ञान होते, आणि कर्तव्यनिष्ठ होते. परंतु विकासाच्या या राजमार्गाची संधी हरिलालना उपलब्ध करून देणे बापूजींना प्रशस्त वाटले नाही. डॉ. प्राण जीवन मेहता यांच्या सूचनेनुसार बापूजींनी एका पार्शी तरुणास आणि एक दूरचे नातलग ३२ वर्षांचे छगनलाल गांधी यांची निवड केली आणि त्या दोघांना लंडनला पाठवून दिले. हा निर्णय बापूजींनी कोणांच्या सांगण्यावरून घेतला याची मला कल्पना आहे आणि माझ्या वडिलांकडून मला ते समजलेही आहे, परंतु कोणाचा नामोल्लेख येथे अपेक्षित नाही. हरिलालच्या तुलनेत निवड करण्यात आलेल्या सोरावजी अडवाणी या पार्शी युवकाची

योग्यता मध्यम प्रतीची होती. परंतु छगनलाल गांधी आणि हरिलाल गांधी यांत मात्र जमीन अस्मानाचे अंतर होते. एखाद्या जन्मजात आंधळ्यालाही ते जाणवू शकत होते. त्या दोघांची तुलना करणे म्हणजे हरिलाल गांधीच्या पात्रतेचा धडधडीत अपमान करण्यासारखे होते. परंतु स्वतः निःपक्षपाती बनण्याच्या अथवा म्हणविण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे गांधीजींनी अन्याय तर केलाच शिवाय अगदी अयोग्य निर्णयही घेतला. छगनलाल गांधी लंडनमधील शिक्षण घेण्यास योग्य नव्हते. सहा महिन्यांतच ते बॅरिस्टर न बनता परतले होते.

हरिलाल जेव्हा जेलमधून सुटून आले तेव्हा, त्यांच्या संदर्भातील या पत्राचा मागमूसही त्यांना कुणी लागू दिला नाही. बापूजींनी मोकळ्या मनाने आपण होऊन जर आपला प्रस्ताव हरिलालना सांगितला असता आणि आपल्या निर्णयाचे कारण त्यांनी स्पष्ट केले असते तर पित्याचा हा निर्णय मान्य करण्याइतके आत्मविश्वासजन्य औदार्य हरिलालमध्ये होते. परंतु बापूजींनी स्वतः या पत्राचा अथवा त्यासंबंधातील आपल्या निर्णयाचा हरिलालजवळ उल्लेखही केला नाही. आश्रम शेवटी आश्रमच असतो बॅरिस्टरच्या कार्यालयातील गुप्तता तेथे शक्य नसते. काही महिन्यानंतर ही वार्ता हरिलालच्या कानी पडली, त्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांच्यावर मोठा आघात झाला. त्यांनी बापूजींना विचारले. बापूजींनी काही कारणे सांगितली असतीलच पण त्यांत दम नव्हता. माझे वडील रामदास गांधी मोठे न्यायी आणि तत्त्वप्रिय होते. अंतिम निर्णय शिरोधार्य करण्याची त्यांची शक्ती विलक्षण होती. त्यांचा बापूजीं विषयीचा अनन्य पूज्य भाव निर्विवाद होता. अशा माझ्या वडिलांनी मला सांगितले होते, "ही बापूजींची चूक होती. या प्रस्तावाची हरिलाल काकांना कल्पना दिली असती तर त्यांना कष्ट झाले नसते. या घटनेमुळे त्यांची अशी धारणा झाली की, बापूजींच्या छायेत त्यांना कसलीच संधी मिळणार नाही. त्यासाठी आपला आपणच पुरुषार्थ केला पाहिजे".

आमची रूपवती गुलाब काकी मे, १९०७ पासून आपली सासू, सासरा आणि दिरांसह फिनिक्समध्ये राहत होती. मधूनमधून 'इंडियन ओपिनियन' च्या कामानिमित्त जेव्हा हरिलाल फिनिक्समध्ये येत असत तेव्हा पतिपत्नींचा सहवास घडत असे. आफ्रिकेत गेल्यावर ११ महिन्यांनी १० एप्रिल, १९०८ ला रामनवमीच्या शुभदिनी गुलाब काकीने एका मुलीस जन्म दिला. मोहनदास करमचंद गांधींच्या घरी हे प्रथम नातवंडाचे शुभागमन होते. रामभक्त आजोबांनी या पहिल्या नातीचे नाव रामी ठेवले. हरिलालपण आपल्या कन्येवर प्रसन्न होते पण या दिवसांत ते सतत सत्याग्रहात अथवा प्रवासात असत.

गुलाब काकी दुसऱ्यांदा गरोदर असताना, बापूजींनी १५ जून, १९१० ला, हरिलालच्या संमतीने, आपल्या या सुनेस राजकोटला तिच्या माहेरी पाठविण्याचा निर्णय केला. २० जून, १९१० ला हरिलालनी पुन्हा सत्याग्रह केला आणि त्यांना ३ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. २२ सप्टेंबर, १९१० ला त्यांची सुटका झाली. ते जेलमधून बाहेर आले तेव्हा त्यांची पत्नी गुलाब आणि कन्या हिंदुस्थानात पोहोचले होते. आपल्या पत्नीचा निरोप घेता न

आला, तरी हरिलाल संतुष्ट होते. १० फेब्रुवारी, १९११ ला हरिलालचा पहिला मुलगा, कांती याचा राजकोटमध्ये जन्म झाला. गांधींच्या घरी आता नातवाचेही आगमन झाले.

बापूजींच्या कडवट बोलण्याने, उग्रतेने, असहिष्णुतेने आणि निष्कारण पक्षपाताने निराश आणि उद्विग्न होऊन मे, १९११ मध्ये बरोबर काहीही न घेता हरिलाल घर सोडून निघून गेले. पोर्तुगीज वसाहतीतील लोरेंजो माक्विसमधील ब्रिटिश कौन्सिलरकडे त्यांनी अकिंचन हिंदी म्हणून जहाजाचे तिकीट मागितले. तिथे त्यांची खरी ओळख लागली. तेव्हा गांधीच्या मुलाला असे तिकीट मागताना बघून लोकांना धक्का बसला, ही वार्ता जोहान्सबर्ग मध्ये गांधींना समजली. त्यांचे मित्र कॅलेन बाख यांनी हरिलालची समजूत घालून त्याला परत आणण्याची इच्छा व्यक्त केली. पितापुत्रांत बेबनाव झाला तर परिवाराचे स्नेही सामान्यतः समजूत घालण्याचे काम करतात. दोन्ही पक्षांनी मोकळेपणाने आपल्या हृदय व्यथा व्यक्त कराव्यात असा या मित्रांचा प्रयत्न असतो.

मध्यस्थाचा हा उपयुक्त आणि शालीन मार्ग बापूजींना पसंत पडला नाही, त्यांनी दोन तारा पाठवून हरिलालला जोहान्सबर्गला बोलविले. पितापुत्रांत रात्रभर बोलणे झाले. मुलाने आपली हृदयव्यथा, आपली शिक्षणाची उत्कंठा बापाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. गांधीजींनी हरिलालच्या संदर्भातील निराळ्या वास्तवाचे गांभीर्य अंदाजता आला नाही. मे, १९११ च्या शेवटी मातेचा निरोप न घेताच हरिलाल हिंदुस्थानात परत गेला कारण बापाने मुलाला आईची भेटही घेऊ दिली नव्हती. स्टेशनवर निरोप घेताना बापलेक दोघे ही व्याकुळ व्यथित होते. परंतु आपल्या मुलाची निराशा गांधीजींना कमी करता आली नाही. सामान्य व्यवहारातील समजूतदारपणा दाखविणेही त्यांना जमले नव्हते. हरिलालला महिन्याला ३० रुपये मिळण्याची व्यवस्था करून पितृकर्तव्य पार पाडल्याचे समाधान गांधींनी मानले. लाहोरला जाऊन विद्याभ्यास करावा म्हणजे तेथे कोणी आप्तस्वकीय नसतील. विद्यार्जनात कसलाही विक्षेप येणार नाही अशी हरिलालची अपेक्षा होती. त्यांना तर बापाकडून आर्थिक साहाय्याचीही मुळीच अपेक्षा नव्हती. आपल्या पत्नीला वर्षभरासाठी तिच्या श्रीमंत माहेरी ठेवून, पंजाबमधील लाहोरसारख्या अनोळखी शहरात मॅट्रिक पास करण्याची हरिलालची इच्छा होती. दिवसा मजुरी करून रात्री जागून अभ्यास करावा अशी त्यांची योजना होती.

बापूजींनी त्यांना लाहोरला जाण्यास मनाई केली व अहमदाबादेत राहून अभ्यास करण्यास आग्रहाने सांगितले. २४ वर्षांच्या हरिलालला आपल्या काकांच्या संसारापासून दूर दूर जावयाचे होते परंतु पित्याच्या आग्रहाचा ते अनादर करू शकले नाहीत. अहमदाबादेत एकटे राहून हरिलाल शिक्षण घेत होते तेव्हा बापूजींनी पत्राद्वारे सांगण्यास आरंभ केला, "बायकोला माहेरी ठेवून तू आपली जबाबदारी टाळीत आहेस आणि घरजावईच बनून गेला आहेस. पुढे शिकण्याची आकांक्षा असेल तर बायकोचे दागिने विकून शीक. मॅट्रिक होऊन काय मोठा तिसमारखां होणार आहेस? फ्रेंचच्या अभ्यासात वेळेचा आणि पैशांचा दुरुपयोग

का करीत आहेस? त्यापेक्षा संस्कृत शीक. संस्कृत येत नसेल तर त्यासाठी एक वर्ष घालवून संस्कृत शीक." मला वाटते की, मागच्या सीटवर बसून गाडी चालविण्याचा हा प्रकार अत्यंत वाईट होता. बापूजींना, "प्राप्तेषु शोडषे वर्षे पुत्रंम मित्र वदाचरेत्" हे संस्कृत सुभाषित फार आवडत असे. एकदा मलाही त्यांनी असेच लिहिले होते. परंतु त्यानुसार आचरण करणे मात्र त्यांना बरेच अवघड जात होते.

मुलांनी स्वतः घेतलेले निर्णय किंवा टाकलेली साहसी पावले अथवा त्यांनी सुरू केलेल्या प्रयोगांचे खंडन करून आपलेच विचार त्यांना स्वीकारावयास लावण्याचा आग्रह बापूजींनी जवळजवळ जन्मभर बाळगला, मी प्रौढ होईपर्यंत हे सारे असेच चालू होते. निर्मळ प्रेम आणि सद्‌भावनेतूनच ते आपल्या अनुभवानुसार व दूरदृष्टीच्या आधारे योग्य तेच आचरण करण्यास भाग पाडीत असत. यासाठी कधी ते तर्कनिष्ठ भूमिका घेत तर कधी उपरोधाचा मार्ग स्वीकारीत, त्यांच्यासारख्या महान व्यक्तीची अवज्ञा करण्याची हिंमत करणे आम्हा भावंडांना अत्यंत कठीण होते.

हरिलाल काकांना अहमदाबाद योजना पसंत नव्हती. पत्नीला जवळ ठेवून अभ्यास करणे शक्य होणार नाही, याचा त्यांना अंदाज होता. परंतु आफ्रिकेतील आपल्या पित्याच्या तंत्रानुसार, स्वतःचे स्पष्ट मत बाजूला सारून, त्यांच्या सूचनांचे हरिलालनी पालन केले. परिणामी, हरिलाल काकांना जी भीती होती ती खरी ठरली. मॅट्रिकची परीक्षा त्यांना उत्तीर्ण करता आली नाही. तीन वेळा निष्फळ प्रयत्न केल्यानंतर परीक्षेचा नाद सोडून त्यांनी स्वतंत्र नोकरी धरली आणि चांगली कमाई करू लागले. या अवधीत १९१३ मध्ये गांधीजींनी ५ हजार स्त्री-पुरुषांच्या स्थलांतराचा (हिजरत) विराट मोर्चा हाती घेतला. तेव्हा आफ्रिकेत जाऊन या सत्याग्रहात उडी घेण्याची हरिलाल काकांनी पुन्हा पुन्हा इच्छा प्रकट केली. गांधींचे परममित्र गोखले यांनी त्यांना रोखले. बापूजींनी मुलाच्या आफ्रिकेस येण्याच्या इच्छेचे स्पष्टपणे स्वागत केले नाही. तेवढ्यात आफ्रिकेत समेट झाला आणि आफ्रिकेत जाण्याचे प्रयोजन संपले. डॉ प्राण जीवन मेहतांनी पुन्हा इच्छा व्यक्त केली की, हरिलालने त्यांच्या बरोबर रंगूनला येऊन काम करावे व शिक्षणही घ्यावे. बापूजींनी त्यांची ही सूचनाही धुडकावून लावली. या तीनचार वर्षांतील बापूजींच्या पत्रांतून आश्चर्यजनक असा उपहास उपरोधाचा सूर जाणवतो. माझ्या मते, असा हृदय विदीर्ण करणारा उपहास कधीच करावयास नको होता. बहुधा तोपर्यंत बापूजींना आपल्या क्रोधावर नियंत्रण प्राप्त झाले नसावे. या सर्व अनावश्यक हस्तक्षेप नियंत्रण आणि अन्यायानंतरही हरिलाल काका मातापित्यांना समर्पित राहिले.

इंग्लंडहून बापूजी हिंदुस्थानला परतले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी हरिलालकाका मुंबईला गेले होते आणि कोचरब येथे आश्रमाची स्थापना होईपर्यंत ते वेळोवेळी पित्याला

साहाय्य करीत होते व त्यांच्यासह प्रवास करीत होते. पितापुत्रांना दोघांनाही परस्परांचे आकर्षण होते. परस्परांची ओढ होती. परंतु पित्याच्या सततच्या नकारात्मक भूमिकेमुळे मुलगा मनोमन क्षुब्ध होता. पिताजी आपल्या समाजसेवेत आणि सत्यसाधनेत गर्क होते, त्यांनी तरुण हरिलालच्या अंतरंगातील बालक हरिलालची कौतुकाची अपेक्षा कधी जाणलीच नाही. त्या शालीन प्रेमळ पुत्राने वेळोवेळी दार ठोठावले परंतु महात्म्याच्या महायज्ञाच्या महाघोषात त्याची हाक कोणी ऐकलीच नाही, मग त्याला समजून घेणे तर दूरच राहिले. या अवधीत १९१३ मध्ये हरिलालचा मुलगा 'रसिक' जन्माला आला, १९१३ मध्येच हरिलाल अत्यंत आजारी झाले. पित्याने आफ्रिकेतून लिहिले," मॅट्रिकच्या परीक्षेची हाव सोडा. मॅट्रिक पास झाल्याने मी काय प्रसन्न होणार नाही. नापास झालास तर तुला अत्यंत उद्वेग होईल. तुझ्या मनाची शक्ती गेली आहे यात आश्चर्य नाही. तेथील शिक्षणच मिथ्या आणि विचारहीन आहे." बापूजींच्या मनात मुलाच्या प्रकृतीची चिंता आणि सहानुभूती असेलच तर ती या पत्रात कोठे दिसत नाही. उलट पत्रातील मजकुराने कोणाचाही उत्साह मोडून पडणे स्वाभाविक होते. तरीही हरिलालांची सुसंस्कृतता एवढी होती की, चार वर्षांनंतर पित्याच्या स्वागतासाठी ते मुंबईस पोहोचले होते.

३१ मे, १९१५ ला 'शांती' या हरिलालांच्या तिसऱ्या पुत्राचा जन्म आजोळी झाला. १९१५ मध्ये हरिलालनी कलकत्त्यात नोकरी धरली. १२० रु. महिना पगार होता. त्या दिवसात ही रक्कम मोठीच समजली जाई. आपली चारी मुले आणि पत्नीच्या सहवासात कलकत्त्यातील ही दोन वर्षे हा त्यांच्या अत्यंत सुखाचा व तृप्तीचा काळ होता. हसणे बोलणे आणि चेष्टा विनोदांनी परिपूर्ण सुखी मंगलमय असा हा संसार होता. २२ एप्रिल, १९१७ ला हरिलाल काकांची शेवटची कन्या 'मनू' हिचा कलकत्त्यात जन्म झाला. सुनेच्या प्रसूतीकाळी आधार देण्यासाठी मोटीबा साबरमती आश्रमातून यावेळी मुद्दाम कलकत्त्यास गेली होती. आईचा हा सहवास हरिलालना अत्यंत सुखदायक होता. ते कृतार्थ होते. उत्पन्न वाढविण्याच्या इच्छेने, हरिलालनी स्वतंत्र धंद्याचा प्रयत्न केला परंतु कधी भलेपणामुळे तर कधी अननुभवामुळे ते जमले नाही, घातलेले पैसे मात्र बुडाले. शिवाय बदनामीही झाली. मान्यवर पित्याकडे यासंबंधात तक्रार झाली. गांधीजींनी मित्रांना लिहिले की, हरिलाल सज्ञान असून स्वतंत्र आहे. साहजिकच मुलाच्या उधारीची जबाबदारी स्वीकारण्यास समर्थ समाजसेवक असलेला पिता असमर्थ होते. त्यांचे म्हणणेही बरोबरच होते. परंतु यासंदर्भात हे ध्यानात घेतले पाहिजे की, काही स्वार्थी लोकांनी गांधीजींकडे ही तक्रार केली होती आणि हरिलालनी आपल्या यशस्वी पित्याकडून कधी साहाय्याची इच्छाही केली नव्हती व कधी साहाय्य मागितलेही नव्हते. तगादा करणारे जर प्रतापी पित्यापर्यंत गेले नसते तर हरिलालनी स्वतःच्या प्रयत्नांनी ही उधारी फेडली असती अथवा अशा धंद्यातून त्यांनी अंग काढून घेतले असते.

प्रसिद्ध व्यक्तीच्या मुलांना आर्थिक साहाय्य करून आपला स्वार्थ साधणाऱ्यांची जगात कधीच कमतरता नसते. दुर्दैवी हरिलालना ही वस्तुस्थिती कधी कळत असे आणि कधी कळतही नसे. दुर्भाग्याने हरिलाल उधारीच्या या विषारी भोवऱ्यात अडकले. १९१८ च्या ऑक्टोबर मध्ये, इन्फ्लुएन्झाच्या त्या कुविख्यात भयानक साथीत गुलाब सापडली. त्यावेळी ती आपल्या वडिलांकडे गेली होती. हरिलाल कलकत्त्यात होते. गुलाबची अशक्तता वाढत गेली पण कोणीच काही करू शकले नाही. हवापालट केल्याने कदाचित उतार पडेल म्हणून राजकोट पासून १५ मैल दूर असलेल्या एका गावात तिला नेण्यात आले. आठवड्या भरानंतरच प्रथम साडेतीन वर्षांचा मुलगा शांती आणि त्यानंतर आठवड्याभरानेच अत्यंत क्षीण झालेल्या गुलाबनेही पतीपासून दूर एकाकी अवस्थेत प्राण सोडला. वयाच्या तिसाव्या वर्षीच हरिलाल विधुर झाले. त्यांची नावाप्रमाणे नखशिखांत सुंदर आणि कोमल प्रिय पत्नी गुलाब, चार मुले मागे ठेवून अंतर्धान पावली. या चारी मुलांना हरिलालने आजी आजोबांजवळ साबरमती आश्रमात आणून सोडले. गुलाबच्या पुराणमतवादी बहिणींनी "सर्व मर्यादा सोडत अस्पृश्यांना जवळ करणाऱ्या 'भंग्या'च्या आश्रमात मुलांना ठेवण्यास कडाडून विरोध केला. हरिलालनी लिहिले, "मी आश्रमात नव्हे तर माझ्या आईवडिलांजवळ मुलांना ठेवले आहे." हरिलालना गुलाबच्या दोन्ही बहिणींविषयी कसलाच आदरभाव नव्हता. वस्तुतः या दोन्ही बहिणी मोठ्या विक्षिप्त आणि कठोर हृदयाच्या होत्या, हे मला स्वतःला माहीत आहे. अशा रूढीग्रस्त स्त्रियांच्या नीचतेला कधी कधी काही सीमाच राहत नसते. त्या दोघींनी हरिलाल काकांवर करू नयेत ते आरोप केले आणि एकदा तर त्यांचा अपमान करून थप्पडही मारली होती आणि या अभद्र घटनेचा दोषही काकांच्याच माथी मारला होता. कदाचित चिडून काका कठोरपणे वागले असण्याचा संभव नाकारता येत नसला तरी त्या दोघी बहिणीही अत्यंत अमर्याद आणि कुटिल वृत्तीच्या होत्या.

गृहलक्ष्मीच्या मृत्यूनंतर हरिलाल काकांची खरी फरपट सुरू झाली. संसार उद्ध्वस्त झाल्यावर ज्याच्याजवळ आपल्या हृदयाची व्यथा आणि जगाच्या निर्दयतेची कथा सांगून आपले मन मोकळे करता येईल असे स्नेहाचे त्यांना कोणीच राहिले नाही. मुले जवळ असती तर कदाचित त्यांची जबाबदारी आणि त्यांच्या कोवळ्या बालपणाचा मोह काकांना प्रेमपाशात बद्ध ठेवू शकला असता. यानंतर उत्तरोत्तर हरिलाल काकांचे पतन होत राहिले, त्या करुण कथेचे वर्णन करणे म्हणजे मोठी हृदयविदारक वेदनाच होय. नियतीच्या फेऱ्यात सापडून एखादा तेजस्वी माणूसही कसा दारोदारच्या ठोकरा खात भटकत राहतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आमचे हरिलाल काका होत.

# ७

# एक दुःखी आत्मा

गुलाबकाकीच्या अकाली मृत्यूने हरिलाल काकाच्या मनाचा तोलच गेला. हरिलाल काका आणि गुलाबकाकी दोघेही अत्यंत देखणे होते. त्यांचा धाकटा मुलगा शांतीदेखील अत्यंत सुंदर आणि प्रसन्नवदन होता असे म्हणतात. प्रथम शांतीच्या आणि लागलीच पत्नी गुलाबच्या मृत्यूने काकांवर वज्रपातच झाला. काकांच्या संघर्षमय जीवनाच्या वाळवंटात गुलाबकाकी ही वाटिकेसारखी होती आणि तेथे काका हेच सर्वस्व होते. आपल्या प्रेमाने व समर्पणाने काकीने काकांना असे वश करून ठेवले होते की, तिच्या इच्छेविरुद्ध काही करण्याचे त्यांच्या मनातही येत नसे. काकी काकांच्या सद्‌वृत्तीची दीपशिखा होती आणि तिच्या सुखद प्रकाशात साऱ्या जगाच्या विरोधाला तोंड देण्याचे सामर्थ्य काकांना लाभत होते. काकी गेल्यावर काकांच्या जीवनाचा एकमेव आधार तुटला. या दुःखाने ते एकाकी बनले आणि अथांग सागरात निराधार होऊन त्यांची नाव तोल सुटून भरकटू लागली. त्यांना अडविणारे कोणी राहिले नाही. मुले आश्रमात अथवा गुलाबच्या बहिणींच्या घरी वाढू लागली. संसाराचे सारे पाश तुटले तेव्हा काकांनी मदिरेचा आश्रय घेतला. एकदा दारूचा फेरा सुरू झाला की, पैसा कधी पुरत नाही. दारूच्या मोहात, अधिक पैसा मिळविण्यासाठी अनेकजण उलटे पालटे धंदे करू लागतात; काकाही अशाच धंद्यात अडकले.

काकीच्या मृत्यूच्यावेळी बापूजी खेडा सत्याग्रहात व्यस्त होते. हरिलालला भेटून त्याचे सांत्वन करावे या आशेने बापूजी दोन वेळेस रेल्वे स्टेशनवर गेले. हरिलालच्या येण्याची निश्चित सूचना नव्हती पण तशी अपेक्षा होती. पहिल्या गाडीत हरिलाल आलेले नव्हते. नंतर रात्रीच्या गाडीच्या वेळी बापूजी प्लॅटफॉर्मवर आपल्या मुलाला हुडकीत राहिले. गाडीच्या दुसऱ्या वर्गाच्या एका डब्यात काका उदास बसून होते. स्टेशनवर कोणी भेटायला येईल याची त्यांना आशा नव्हती; त्यामुळे बापूजींना बघून ते दचकलेच. शोकमग्न काका स्तब्ध होते. मुलाचे दुःखविवर्ण मुख बघून बापूजी अत्यंत कष्टी झाले. काका बापूजींना काहीच बोलू शकले नाहीत, तेव्हा बापूजींनाही धक्का बसला. मुलगा पहिला राहिला नाही, त्याचे माधुर्य संपले असे त्यांना वाटले. बापूजी आपल्या मुलाला भेटावयास गेले कारण मनात त्याच्या विषयी प्रेम होते. परंतु त्या दोघा पितापुत्रांमध्ये नियतीचे चक्र काही वेगळेच रूप धारण करीत असे.

काकीच्या मृत्यूनंतरही काका कलकत्त्यातच काम करीत राहिले. धंदा करीत होते. पण त्यांचा प्रत्येक प्रयत्न निष्फळ होत होता. पैसा वाया जात होता. या परिस्थितीत बापमुलांतील तणाव वाढत गेला परंतु हे मतभेद आणि बेबनाव असूनही १९२० मध्ये हरिलाल काकांनीही सत्याग्रह केला. ११ डिसेंबर, १९२१ ला त्यांना अटक झाली आणि सहा महिन्यांची शिक्षा झाली. काकांना अटक झाल्याच्या आनंदात बापूजींनी त्यांना अभिनंदनाची तार पाठविली. १० जून, १९२२ ला काका जेव्हा जेलमधून सुटले तेव्हा बापूजींना सहा वर्षाची सजा झालेली होती. बापूजींना भेटण्यासाठी काका साबरमती जेलमध्ये दोन तीन वेळेस गेले होते. त्यानंतर मात्र देशातील कोणत्याही सत्याग्रहात त्यांनी कसलेच काम केले नाही. आमच्या आजीचे धाकटे बंधू माधवदास मामांनी आग्रह करून हरिलालना आपल्या धंद्यात घेतले. आपल्या धाकट्या भावाचे अवगुण माहीत असल्यामुळे मोटीबाने काकांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण मामा माधवदासांच्या आग्रहाखातर काका त्यांच्याबरोबर धंदा करण्यास तयार झाले. मात्र हा व्यवहार चालू शकला नाही. मालाची खरेदी विक्री पूर्णतया मामांच्या सांगण्यानुसार होत असे; परंतु धंद्यात येणाऱ्या तोट्याचा दोषमात्र हरिलाल काकांच्या माथी मारून त्यांनी आपल्या महात्मा मेहुण्याकडे तक्रारींची पत्रेही लिहिली. या तक्रारींनी बापूजी क्षुब्ध होत असत. हरिलाल काकाही व्यथित होत होते. परंतु परस्परांना समजून घेण्याची क्षमता बापलेकात कमी होऊ लागली होती. दोष दोघांचाही होता आणि त्यापेक्षाही नियतीचा दोष होता.

या संकटमय परिस्थितीत असतानाही, हरिलाल काका, बापूजींच्या आजारात अथवा उपवासाच्या काळात ते जेथे असतील तेथे जात असत. १९२८ मध्ये हरिलाल काकांचा मुलगा रसिक, दिल्लीच्या जामिया मिलियामध्ये देवदास काकांबरोबर चरखा चालवायला शिकत होता. तो विषमज्वराने आजारी झाला. 'बापूजींजवळ साबरमतीस मला घेऊन जावे' असे तो मला म्हणत राहिला. पण ही इच्छा अतृप्तच राहिली. तो दिल्लीतच मरण पावला. मृत्यूपूर्वी काही तास आधी हरिलाल काका रसिकजवळ पोहोचले होते. चतुर, कुशल आणि लाडका रसिक निघून गेला. आपल्या असाहाय्यतेने देवदास काका अत्यंत खिन्न होते. देवदास काकांनी लिहिले आहे, "त्यांच्यात-हरिलालकाकांत-आपल्या भावांशी भांडण करण्याची प्रवृत्ती होती पण अशावेळी नव्हे. त्यांनी स्वत:चाच धिक्कार केला, आम्हा सर्वांशी अत्यंत नम्रतेने ते वागले, डॉ. अन्सारी आणि स्नेह्यांचे आभार मानले व अज्ञात ठिकाणी निघून गेले..."

काकीच्या मृत्यूनंतर हरिलालकाका मदिरेच्या अधीन झाले. नशेत काहीही करीत असत परंतु बुद्धी अजून कुशाग्र होती. एकाकीपणाने ते घाबरून गेले होते. त्यांनी आपले पतन ओळखले. त्यापासून वाचण्याचा त्यांनी वारंवार प्रयत्न केला. दहा वर्षे विधुरावस्थेचे दु:ख भोगल्यानंतर रसिकचा मृत्यू झाल्यावर त्यांनी दुसरे लग्न करून देण्याची बापूजींना

विनंती केली. बापूजींनी आपली असमर्थता प्रकट केली आणि सांगितले की, एखाद्या विधवेशी विवाह करावा. काकांनी तेही केले असते, पण आंदोलनांच्या झंझावातात, अशी विधवा शोधण्यास अवसर कुणाला होता? तेव्हा काकांनी हताश होऊन आपली जीवननौका मध्यधारेत सोडून दिली. गांधीजींचा श्रेष्ठ ज्येष्ठ पुत्र नाना भोवऱ्यामध्ये सापडला. या संदर्भात नम्रतेने असे म्हणावेसे वाटते की, बापूजी आपल्या उद्योगांत व्यस्त होते आणि काकांविषयी उदासीनही होते, परंतु आजीने का काही केले नाही? काकांना अनुरूप अशी जोडीदारीण तिने का नाही शोधली? आजीने मनापासून यात लक्ष घातले असते तर ती निश्चित यशस्वी झ ाली असती. परंतु मणिलाल, रामदास आणि देवदास अजून अविवाहित असल्यामुळे बहुधा ती गप्प राहिली असावी.

१४ मे, १९३६ ला, काही खोडसाळ मुसलमानांच्या फेऱ्यात सापडून हरिलाल काका धर्मांतर करून मुसलमान झाले. २९ मे, १९३६ ला, मुंबईच्या जामा मशिदीत काकांनी आपले धर्मांतर जाहीर केले. आता ते अब्दुल्ला गांधी बनले होते. बापूजींच्या पत्रानुसार माझे वडील काकांचा शोध घेण्यासाठी मुंबईस जनाब झकेरियांच्या घरी पोहचले. बराच वेळ त्या लोकांनी माझ्या वडिलांना काकांना भेटू दिले नाही. परंतु धीर न सोडता, हाती घेतलेल्या कामाचा पाठपुरावा करण्याची माझ्या वडिलांची हिंमत विलक्षण होती. रात्रीचे १०-११ वाजले. माझे वडील त्या अनोळखी वस्तीतील असभ्य वातावरणात थांबून राहिले. शेवटी काका बाहेर आले. नव्याने मुस्लीम बनलेले काका धर्मांतराच्या कैफात होते. माझ्या वडिलांचे विवेकाचे चार शब्द ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. धर्मांतर घडवून आणणारे मुसलमान आमच्या काकांना पैसे आणि दारू पुरवीत असत. आमच्या काकांचा 'निका' लावून त्यांना एकमेव सत्यधर्माच्या मार्गावर आणण्याचा त्या मुसलमानांचा प्रयत्न होता. एका उत्साही मुस्लीम व्यक्तीने तर बापूजींनाही लिहून टाकले, "मुलाप्रमाणे त्यांनीही इस्लाम धर्माचा स्वीकार करून पुण्य मिळवावेत." या सर्व घटनांनी मोटीबा क्षत-विक्षत झाली होती. तिने बोलून दाखविलेली मन:स्थिती देवदास काकांनी लिखित स्वरूपात वृत्तपत्रांना पाठविली. आपल्या आईने, तिचा असंतोष आणि संताप, वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रकट करावा याचे हरिलाल काकांना मनस्वी वाईट वाटले. तिने स्वत: पत्र का पाठविले नाही? असे त्यांना वाटत राहिले.

भरपूर पैसे, मदिरा आणि वारांगणांच्या सहवासाची लयलूट पावल्यावरही इस्लामच्या अनुभवाने आमच्या काकांचा भ्रमनिरास झाला. मोटीबाने मुंबईला जाऊन काकांना समजाविले आणि १० नोव्हेंबर, १९३६ ला सहा महिन्यांच्या अल्पावधीनंतर काकांनी आर्य समाजाच्या साहाय्याने पुन्हा हिंदू धर्माचा स्वीकार केला. त्यानंतर काही दिवस त्यांनी आर्य समाजात राहून, आर्य समाजाचा प्रचारही केला. नंतर काकांचा अरविंद घोषांशी परिचय झाला. अरविंद

बाबूंच्या पांडेचरी आश्रमात 'मदर' (माताजी) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फ्रेंच महिलेविषयी काकांना विशेष आत्मीयता उत्पन्न झाली. काका पांडेचरीला मधून मधून जात असत आणि अरविंद बाबू व 'मदर'शी पत्रव्यवहारही करीत. पण एके ठिकाणी स्थिर होण्याचे सुख काकांच्या दैवातच नसावे असे वाटते. नंतर नंतर त्यांची इतकी दीन दरिद्री अवस्था झाली होती की, अंगात धड सदराही नसताना ते सतत भटकत असत. कोठे झोपत होते आणि कोण त्यांना खायला घालीत होते, कुणास ठाऊक? स्वस्थता, स्थिरता अशी उरलीच नव्हती. सतत भटकत राहणे हाच त्यांचा जीवनक्रम बनला होता.

नागपूरला आमच्या घरी ते अधूनमधून येत असत. हरिलाल काकांना माझ्या वडिलांविषयी बहुधा आत्मीयता असावी. या दोघा भावांना चर्चा करताना मी कधीच ऐकले नाही. आमचे कुटुंब मध्यमवर्गीय होते, परंतु माझे आई-वडील मोठ्या प्रेमाने काकांचे आगतस्वागत करीत. जेव्हा काका येत तेव्हा त्यांच्याकडे अंगावरचे कपडेही धड आणि पुरेसे नसत. बरोबर अंथरूण पांघरूणही नसे. त्यांच्याजवळ ना साबण असे ना टॉवेल. आई आणि मी त्यांचे मळके कपडे धुऊन स्वच्छ करीत असू तर माझे वडील आपले स्वच्छ शुभ्र खादीचे कपडे काकांना देत असत. दोघांची उंची जवळपास सारखी होती, त्यामुळे माझ्या वडिलांनी दिलेल्या स्वच्छ कपड्यांत काका शोभून दिसत. कधी कधी मला काही पैसे देऊन, जवळच्या दुकानातून सिगरेट आणावयास सांगत. मी आपल्या बालबुद्धीने त्यांना "विडी सिगरेट प्याल्याने नुकसान होते" असे भाषण ठोकीत असे. मला काही न बोलता ते नुसते हसत. आज मला वाटते की, असा उद्धटपणा करण्याचा मला अधिकार नव्हता. माझ्या या आगाऊ पणाबद्दल मला चोप न देणारे काका मोठे सहिष्णू असले पाहिजेत. काका आलेले असले म्हणजे घरी मोठे स्वादिष्ट पदार्थ बनत असत व दोघे भाऊ मोठ्या शालीनतेने एकत्र भोजन करीत असत. काकांच्या वागण्याबोलण्यात मला कधी काही गैर आढळले नाही. वासना वा लोलुपता प्रत्ययाला आली नाही. स्वच्छ कपडे परिधान केल्यानंतर, ते आणि माझे वडील यांत तसे काही अंतर जाणवत नसे. त्या दोघांत वैचारिक मतभेद असतीलच, परंतु त्यावर वाद-विवाद मात्र कधी होत नसे. आमच्या स्वागताने व आग्रहाने प्रसन्न होऊनही, तीन दिवसांहून अधिक मात्र काका आमच्या घरी थांबत नसत. ते जेव्हा जायला निघत तेव्हा माझे वडील धोतर, सदरा, रुमाल, टॉवेल, नॅपकीन इत्यादी कपड्यांचे तीन चार जोड काकांबरोबर देत असत. आई त्यांच्यासाठी एका स्वच्छ सतरंजीत, चादर, उशी आणि घोंगडी गुंडाळून देत असे. हे सारे सामान बांधीत असताना माझे वडील उद्‌गारत, "देव जाणे किती दिवस हे सारे राहणार आहे? दोन चार दिवसातच ते विकले जाणार आहे. निदान तोवर तरी त्यांच्या शरीराला थोडा आराम मिळेल." आमच्या घरून ते कोठे जात तेही आम्हाला कळत नसे. कधी कधी मी

काकांना विचारीत असे, "आता पुन्हा केव्हा याल?" त्यांचे उत्तर असे "राम जाणे!" त्या दिवसांतच काकांनी मला "सूरतका जामण (जेवण) और काशीका मरण" या म्हणीचा अर्थ समजावून सांगितला होता. ते जर आमच्याबरोबरच राहिले असते तर निश्चितच त्यांना व आम्हालाही सुख लाभले असते. परंतु सुखासारख्या वस्तूपासून काका निरंतर दुरावत चालले होते.

एवढ्या सर्व घडामोडींनंतरही काकांचा विवेक अथवा सुसंस्कृतपणा संपलेला नव्हता. १९०७ पासूनच, राजकोटमधील आपल्या वडिलोपार्जित संपत्तीवरील आपला हक्क बापूजींनी सोडून दिला होता आणि या निर्णयावर माझे वडील, देवदास काका आणि मणिलाल काकांनी स्वाक्षरी करून स्वीकृती दिली होती. परिणामतः राजकोटमधील एका गांधींचा मोठा वाडा, लक्ष्मीदास गांधी आणि करसनदासांच्या मुलांच्या मालकीचा झाला होता. १९३५ मध्ये त्या दोघा मुलांनी ते घर विक्रीस काढले परंतु कायदेशीरपणे त्यासाठी हरिलाल काकांची संमती आवश्यक होती. ते घर खूप मोठे होते आणि विक्रीनंतर वाटा मागितला असता तर हरिलालकाकांना सहजच पंधरावीस हजार रुपये मिळू शकले असते. लक्ष्मीदास गाधींचा मुलगा श्यामलदास काका याने तार करून हरिलाल काकांना राजकोटला बोलावून घेतले. हरिलाल काकांनी कसलाही वाद न करता, या वडिलोपार्जित संपत्तीवरील आपला हक्क तात्काळ सोडून दिला. ते म्हणाले, "कबा गांधींच्या घरावरील आपला हक्क बापूजी (गांधींनी) सोडून दिला तसेच माझ्या धाकट्या भावानींही त्यावर आपला काही हक्क ठेवला नाही तेव्हा मलाही त्या घरावर काही हक्क दाखविण्याचा अधिकार नाही." पैशाच्या लोभाने माणूस काय करीत नाही? परंतु हरिलाल काकांनी एका क्षणात एवढी मोठी रक्कम सोडून दिली होती. एकीकडे त्यांचे दारूचे दुर्व्यसन तर दुसरीकडे अशी विलक्षण निःस्पृहता! पण त्यांची ही उदारता आणि अनासक्ती कोणी जाणलीच नाही, मग तिची प्रशंसा करणे तर दूरच.

आमच्या परिवारात कोणी आजारी झाले तर हरिलाल काका त्याची सेवा करीत. फिनिक्स आश्रमात एकदा आजी आजारी झाली तेव्हा बापूजी जेलमध्ये होते. जेलमधून बापूजींनी जोहान्सबर्गला हरिलाल काकांना तारेने कळविले तेव्हा सारी कामे सोडून हरिलाल काका फिनिक्स आश्रमात येऊन आईच्या सेवेला लागले. एक महिन्यानंतर १२ डिसेंबर १९०८ ला बापूजी जेलमधून बाहेर आले तेव्हाच काकांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली. त्याचप्रमाणे ९ ऑगस्ट १९०९ ला हरिलाल काका जेलमधून सुटताच आजारी असलेल्या मणिलालच्या सेवेसाठी फिनिक्स आश्रमात हजर झाले होते. कलकत्त्यात असताना आजारी गुलाबकाकीची शुश्रूषाही ते स्वतःच करीत. रसिकभाई आजारी झाला तेव्हाही काका तेथे पोहोचले होते. मोटीबा दिल्लीत आजारी झाली तेव्हा काका दिल्लीत तिच्या सेवेसाठी आले होते.

मोटीबाच्या शेवटच्या आजारातही काका आगाखान जेलमध्ये पोहोचले होते. मोटीबाला खूप आनंद झाला होता. परंतु तिच्या या गरीब मुलाला सरकारने तिची पुन्हा भेट घेऊ दिली नव्हती. आणि आपले हे दुःख काकांनी आपल्या मदिरेच्या चषकात बुडवून टाकले होते. आजीच्या मृत्यूपूर्वी स्वामी आनंदांनी काकांना शोधून काढले होते. आणि तिचा मृत्यू झाल्यानंतरही काका आगाखान जेलच्या चकरा मारीत राहिले. माझे वडील, देवदास काका आणि हरिलाल काका या तिघाही भावांनी आपल्या पित्यासह जेलमध्ये एकत्र भोजनही केले. मणिलाल काका त्यावेळी आफ्रिकेत असल्यामुळे येऊ शकले नव्हते.

बापूजींचा मृत्यू एकदम अनपेक्षित व तडकाफडकी झाला होता. त्यामुळे अग्निसंस्काराच्या वेळी हरिलाल काका राजघाटावर नव्हते. ते ज्येष्ठ पुत्र असल्याने अग्नि देण्याचा अधिकार त्यांचा होता. मात्र गेली वीस वर्षे ते आपल्या पित्याला विन्मुख झालेले, एका वेगळ्या जगात वावरणारे, दुःखी व्यक्ती होते. माझ्या वडिलांविषयी त्यांच्या मनात प्रेम असल्यामुळे, अग्निसंस्कारानंतर त्यांनी कसली तक्रार केली नव्हती. बापूजींच्या मृत्यूनंतर, हरिलाल काका दिल्लीतील आमच्या देवदास काकांच्या घरी आले होते. तेव्हाही ते तसेच उदास, अलिप्त दिसत होते. दोन दिवस ते आमच्याबरोबर राहिले. मी त्यांचे कपडे आपटून आपटून धुतले आणि स्वच्छ केले. माझ्या वडिलांनी आपले कपडे त्यांना दिले. देवदास काकांचे कपडे हरिलाल काकांना फार मोठे होत असत. देवदास काकांची पत्नी लक्ष्मी काकीने त्यांच्यासाठी अंथरुणाची जमवाजमव केली पण ते अधिक थांबले नाहीत. यावेळीही मी त्यांच्या सिगरेटवर व्याख्यान झोडले होते. देवदास काका, माझे वडील आणि मी, हरिलाल काकांना सोडण्यासाठी जुन्या दिल्ली रेल्वेस्टेशनवर गेलो. तिथे आम्ही तिघांनी त्यांना नमस्कार केला आणि त्यांचा निरोप घेतला. देवदास काकांनी त्याचे वर्णन केले आहे. हरिलाल काका अगदी रोड आणि पिवळट झाले होते. ते म्हणाले, "माझ्या नशिबात भटकणेच लिहिलेले आहे." या उद्‌गारात अपार वेदना, विरक्ती आणि थकवा एकवटलेला होता. बापूजी निघून गेले होते आणि साऱ्या विरोधानंतरही काकांना आपल्या पित्याविषयी प्रेम होते. १९४० मध्ये ते मोटीबाला आणि बापूजींना म्हणाले होते, "आयुष्याची आणखी दहा वर्षे अजून उरली आहेत." त्यानंतर चारच वर्षांनी मोटीबाचे निधन झाले. बापूजींना अकालीच एका मारेकऱ्याने हिसकावून नेले. या साऱ्याचा शोक, संताप काकांच्या आवाजात होता पण मनातील भावना प्रकट करण्याची ती वेळ नव्हती. मुंबईची गाडी आली आणि काकांना घेऊन निघून गेली मात्र काका मुंबईपर्यंत जाणार की, मध्येच कुठे उतरणार याचा आम्हाला पत्ता नव्हता. या घटनेनंतर, अवघ्या सहाच महिन्यांनी, १८ जून १९४८ ला, आपल्या षष्ठ्यब्दीपूर्तीच्या दिवशीच, मुंबईच्या शिवडी इस्पितळात हरिलाल काकांचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी, रामीबहेन व मनूबहेन या त्यांच्या

दोन्ही मुली आपल्या परिवारासह त्यांच्याजवळ होत्या. त्यांचा मुलगा कांतीभाई, वैद्यकीय शिक्षणासाठी म्हैसूरला होता. या मृत्यूने एक अत्यंत क्लेशयुक्त आत्मा संसारदु:खातून मुक्त झाला होता.

मी जेव्हा जेव्हा माझ्या या व्यथित काकांचा विचार करते तेव्हा तेव्हा मला शरदबाबूंच्या 'देवदास' कथेची आठवण होते. लोक माझ्या काकांना व्यसनी म्हणून झिडकारू शकतात. परंतु स्वेच्छेने, आवडीने ते व्यसन करीत नव्हते. आपल्या मनातील निराशा आणि अकथनीय आघात लपविण्यासाठी ते मदिरा घेत असावेत असे मला वाटते. आयुष्य संपेपर्यंत आपल्या पुरुषार्थाला व बुद्धिमत्तेला अवसरच मिळाला नाही याची त्यांना चीड होती. दारूच्या प्याल्यात ही व्यथा बुडवून विसरण्याचा त्यांचा प्रयत्न होता. दारूच्या मार्गाने अन्य सवयीही त्यांना निश्चितच जडल्या होत्या पण त्यांचे सावट त्यांच्या वागण्यावर पडले नव्हते. त्यांची सून सरस्वती हिनेही आपल्या आठवणीत असेच म्हटले आहे. या केरळकन्येला आपल्या सासऱ्याविषयी आदर आणि जिव्हाळा होता. तिने काकांची सेवाही खूप केली. आमचे काका, आपला मुलगा कांती, सून आणि नातवाबरोबर सहा महिने बंगलोरला राहिले होते. त्यांना थोडा आराम मिळाला पण तेथूनही ते निघून गेले. परंतु परक्या घरची एक कन्या आपल्या मद्यपी सासऱ्याला आपलेसे करू शकली हे काकांचे वैशिष्ट्य होते.

व्यसनाच्या आणि पतनाच्या गर्तेत वावरत असूनही काकांचे मातृप्रेम उज्ज्वल होते. आपल्या मातेची सारी सुखदु:खे पाहणारे ते एकटेच होते. कस्तुरच्या प्रारंभिक जीवनातील एकाकीपणाचा साक्षी तिचा मुलगा हरिलालच होता. विशेषत: जेव्हा जेव्हा बापूजींनी मोटीबावर आपला अधिकार गाजविला तेव्हा तेव्हा हरिलालचे कोमल पुत्रहृदय संतप्त होई. त्यामुळे, आपल्या वडिलांचा कितीही विरोध केला, तरी आपल्या आईवर त्याने खूप प्रेम केले. एकदा मध्य प्रदेशातील कटनी स्टेशनवर मोटीबा आणि बापूजींची गाडी उभी असताना, हरिलाल काका तेथे आले आणि त्यांनी मोटीबांच्या पायांना स्पर्श करुन वंदन केले. त्यावेळची त्यांची दयनीय अवस्था बघून कोणाचेही हृदय करुणेने भरून गेले असते. मोटीबा अस्वस्थ झाली, म्हणाली, "आमच्याबरोबर चल."

काका म्हणाले, "आता तर हे शक्यच नाही." त्यानंतर खिशातून एक मोसंबी काढून त्यांनी मोटीबाला दिली आणि म्हणाले, "बा, ही मी तुझ्यासाठी आणली आहे." मोटीबा काही बोलणार एवढ्यात बापूजी म्हणाले, "माझ्यासाठी काही नाही आणलंस?" "नाही, ही तर मी फक्त बा साठीच आणली आहे. आपणांस केवळ इतकेच सांगायचे आहे की, बाच्या बळावरच तुम्ही इतके मोठे झाले आहात." "तू म्हणतोस त्यात काहीच शंका नाही, पण तू आता आमच्याबरोबर येणार का?" बापूजींनी विचारले.

"नाही. मी तर केवळ बाला भेटण्यासाठी आलो आहे." काका म्हणाले. बापूजी खिन्नपणे आपल्या जागीच बसून राहिले. आई-मुलाचे हितगुज पुढे चालू झाले. "बा ही मोसंबी घे." काका. "कुठून आणलीस?" मोटीबाने विचारले. काकांनी उत्तर दिले, "आणली कुठूनतरी. तुझ्यासाठी प्रेमाने आणली आहे. भीक मागून आणली आहे." मोटीबाने मोसंबी हातात घेतली पण तेवढ्याने काकांचे समाधान झाले नाही. ते म्हणाले, "बा, ही मोसंबी तूच खाल्ली पाहिजेस, आणि तू खाणार नसलीस तर मला परत कर." "ठीक आहे. मीच खाईन ही मोसंबी." मोटीबा म्हणाली. काकांच्या फाटक्या दीन अवस्थेकडे मोटीबा बघत राहिली. मग म्हणाली, "चल. आमच्याबरोबर चल." काका म्हणाले, "नाही बा, आता या अवस्थेतून मी बाहेर येऊ शकणार नाही." मोटीबाचे विशाल नेत्र डबडबून गेले. गाडीने शिटी दिली आणि गाडी सुरू झाली. गाडीबरोबर चालत चालत काकांनी पुन्हा सांगितले, "बा मोसंबी तूच खा. अच्छा." गाडीने हळूहळू वेग घेतला तेव्हा मोटीबाच्या ध्यानात आले की, त्यांनी तर आपल्या मुलाला काहीच दिले नाही. ती उद्‌गारली, "अरे, बिचाऱ्याला काहीच दिले नाही. बिचारा उपाशी मरत असेल. आता तरी काही देता येईल का?" तिने आपल्या जवळच्या फळांच्या करंडीतून एक फळ काढले. खिडकीतून बाहेर बघितले तर गाडी प्लॅटफॉर्मच्या पुढे आली होती. लांबून एक क्षीण जयघोष कानी आला, "कस्तुरबाकी जय हो."

या अद्‌भुत प्रेमात दूषण आढळणे कठीण होय. ज्या व्यक्तीचे हृदय प्रेमाच्या अमृताने असे तुडुंब भरलेले होते त्या व्यक्तीला व्यसनी आणि पतित म्हणून तिरस्कृत करणेही कठीण होते. काकांचे हे सारे भांडणे, झगडणे, दारू पिणे म्हणजे त्यांच्या मनातील विद्रोहाचाच परिपाक होता. जर असे नसते तर बाह्यवर्तनाबरोबरच त्यांचे हृदयही मलिन झाले असते. निराशेच्या निबिड अंधकारातही त्यांचे हृदय कधी संवेदनाशून्य झाले नाही, तसेच बऱ्यावाईटाचा त्यांचा विवेकही कमी झाला नाही. त्यांनी जी काही प्रतारणा सहन केली आणि जो विद्रोह केला त्याचा परिणाम त्यांच्या शरीरापुरताच मर्यादित होता. आम्हा लोकांना तर त्यांनी कधी दटावले नाही की कधी अपशब्द वापरले नाहीत. आमच्यावर आपले ओझे टाकणे त्यांना मानवत नव्हते आणि त्यामुळे अधिक दिवस आमच्याकडे ते थांबतही नसत. आमची एकमात्र तक्रार हीच होती की, त्यांनी आम्हाला त्यांच्या सेवेची संधी दिली नाही.

देवदास काकांनी लिहिले आहे, "हरिलाल भाईंच्या अंगावर प्रसंगी सदराही नसावयाचा पण त्यांच्याजवळ लोकमान्य टिळकांचे **गीतारहस्य** मात्र हमखास असावयाचे. त्यांना **गीतारहस्य** खूप आवडत असे." ज्या माणसाला **गीतारहस्याचे** प्रेम होते, जो पांडेचरीच्या अरविंद घोष आणि माताजींचा भक्त होता आणि जो देशबंधू चित्तरंजन दासांचा मित्र होता तो एकदम निकृष्ट, वाया गेलेला होता हे स्वीकारणे कठीण जाते. जीवनाच्या प्रारंभापासूनच काका

एकाकी पडले आणि आजन्म संघर्ष करीत राहिले. हा दुर्दैवाचा फेराच म्हटला पाहिजे. त्यांचा दोष एकच होता की, ते स्वतंत्र बुद्धीचे आणि मुक्त विचारांचे होते. विद्याभ्यास करून समाजात योग्य स्थान प्राप्त करू इच्छित होते. त्यांचा दोष होता की, वयाच्या विसाव्या वर्षीच ब्रह्मचर्य व्रत स्वीकारणे त्यांना मान्य नव्हते. कोणाला दु:ख न देता, सरस जीवन जगत ते समाजसेवा करू इच्छित होते. गृहस्थाश्रमी जीवन स्वीकारून आपल्या पूर्वजांचे ऋण फेडावे ही त्यांची इच्छा होती. या आकांक्षेत तर काही वावगे वाटण्यासारखे नव्हते. परिवारातील आम्ही सारेजण त्यांचे ऋणी आहोत. त्यांनी बापूजींच्या विरुद्ध बंड पुकारले म्हणूनच अन्य तिन्ही मुलांवर बापूजींनी तशी सक्ती केली नाही. यापेक्षा अधिक असे की, आम्ही नाती-नातवांनी जेव्हा शाळा कॉलेजात जाण्याचा आग्रह धरला तेव्हा बापूजींनी आमची इच्छा एकदम ठोकरून लावली नाही. हरिलाल काकांच्या बलिदानामुळे व प्रेरणेमुळेच त्यांचा एकमात्र जीवित मुलगा कांती डॉक्टर बनू शकला होता आणि कॉलेजात जाण्याची अनुमती मिळालेली मी पहिली नात होते. माझ्यानंतर वाट मोकळी झाली आणि इतर मुले बापूजींच्या मृत्यूनंतरही कॉलेजात शिकू शकली. एरव्ही शाळा कॉलेजातील शिक्षणाला बापूजींचा प्रखर विरोध कायमच होता. हरिलाल काकांच्या प्रकरणानंतर बापूजींनी जाणले की, एका मर्यादेनंतर मुलांना स्वतंत्र निर्णय घेऊ देणे अधिक श्रेयस्कर होय.

हरिलाल काकांचे जीवन, सत्याग्रह यज्ञातील प्रथमाहुतीच्या श्रीफळाप्रमाणे बलिदान बनले होते. 'सुत वित दारा शीष' यांचे समर्पण करून बापूजी या देशाचे महात्मा म्हणून ओळखले जाऊ लागले. वस्तुत: आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या निरागस अभिलाषा आणि महत्त्वाकांक्षा ठोकरून, आपल्या पारिवारिक सुखाचा देशसेवेच्या यज्ञात त्यांनी हवि दिला होता. हरिलाल काका त्या त्यागतर्पणाची पहिली ओंजळ होते. आम्हा सर्व भावा-बहिणींना, आमच्या हरिलाल काकांच्या जीवनाची न लाज वाटते, न संकोच वाटतो. आमच्या दृष्टीने हरिलाल काका म्हणजे एक कोमल, देखणे वडीलधारे व्यक्तित्व होते. काही अपरिहार्य कारणांमुळे त्यांना दारूचे वाईट व्यसन लागले होते. खरेतर हासुद्धा एक प्रकारचा आजारच म्हटला पाहिजे आणि म्हणूनच आमच्या अशा रुग्ण काकांचा तिरस्कार करण्याचे आम्हाला काहीच कारण नव्हते. हरिलाल काकांच्या भावांनी त्यांचा कधीच तिरस्कार केला नाही, हे सुदैवच म्हटले पाहिजे. मला राहून राहून असे वाटते की, बापूजींनी सर्वांना एकच न्याय लावण्याची इच्छा बाळगली, हेच कुठेतरी बहुधा चुकले असावे. कधी कधी एखाद्या विशिष्ट व्यक्तीला वेगळ्या तऱ्हेने सांभाळावे लागते, आधार द्यावा लागतो. सारेजण तर एकसारखे नसतात. बापूजींनी थोडा अनासक्तपणे विचार केला असता तर ते हरिलाल काकांना अवश्य समजून घेऊ शकले असते. परंतु बापूजींना नेहमीच काळजी वाटत राहिली की, आपली मुले म्हणून

आपले वर्तन पक्षपाती न व्हावे. फार नव्हे, अगदी जरासे कौतुक, थोडेसे प्रोत्साहन लाभले असते तरीही हरिलाल काकांचे जीवन उजळून उठले असते. आपल्या जीवनात बापूजींनी प्रेमाचा पक्षपात कधी केलाच नाही, असेही नव्हे. १९२९ मध्ये मोतीलाल नेहरू आजारी होते. ते काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांच्यानंतर अध्यक्ष कोणी व्हावे याचा विचार चालू होता. विठ्ठलभाई पटेलांचे कार्य लक्षात घेऊन त्यांना अध्यक्ष करावे असे सामान्यतः सर्वांचे मत होते. परंतु आपल्यानंतर आपला तरुण मुलगा जवाहरलाल जर काँग्रेसचा अध्यक्ष निवडला गेला तर मोतीलाल खूश होतील, याची बापूजींना कल्पना होती. आपल्या कार्यकुशलतेने, बापूजींनी जवाहरलालांचे नाव अध्यक्षपदासाठी सूचित केले. बिचाऱ्या जवाहरलालना याची कल्पनाही नव्हती. परंतु बापूजींनी विठ्ठलभाई पटेलांना दूर सारले. विठ्ठलभाई इतके हतोत्साह झाले की, त्यांनी अंथरूण धरले. राजकारणातूनच ते बाहेर पडले. १९३० मध्ये तरुण जवाहरलाल काँग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले. या प्रेमप्रेरित पक्षपाताचा एक थेंब जरी आमच्या हरिलाल काकांच्या वाट्याला येता तर बहुधा, अशा असह्य वेदनेचे, तडकाफडकीचे आणि सर्वथा निरर्थक वाताहतीचे साक्षी बनण्याची व्यथा, मोटीबा आणि बापूजींना सहन करावी न लागती. आपल्या या मुलासंबंधी बापूजींच्या बहुधा काही आशाआकांक्षा असाव्यात व त्यांची त्यांना आसक्ती असावी. त्यामुळे त्यांच्यावर कडक शिस्त आणि कठोर वचनांचा मारा ते करीत राहिले. शेवटी हे जेव्हा सहन होईनासे झाले तेव्हा या बुद्धिमान व तेजस्वी पुत्राने पित्याच्या या आसक्तीजन्य अन्यायाचा प्रतिकार केला. सारा कलंक आपल्या माथी घेऊन हरिलालकाका अलग झाले. परंतु आपल्या पित्यापासून ते कधी सर्वस्वी मुक्त होऊ शकले नाहीत. आपल्या पित्याला ते कधी विसरू शकले नाहीत तसेच आपल्या निराशेच्या जोखडातूनही कधी सुटू शकले नाहीत. या द्वंद्वातच आमचे काका उद्ध्वस्त होत गेले. बापूजींच्या महात्मतेच्या यज्ञवेदीत आमच्या काकांची आहुती पडली.

माझे काही आप्तस्वकीय आणि आमच्या बृहत परिवारावर प्रेम करणारे देशभरातील मित्र, मी आपल्या महान आजोबांच्या उणिवा दाखवून आणि त्यांच्यावर टीका करून मर्यादाभंग केला असे म्हणून कदाचित मला जाब विचारतील. नतमस्तक होऊन हे आरोप मी स्वीकारते. परंतु यावेळी, न्यायाचा ताजवा हाती घेऊन मी हे तपासू इच्छित आहे की, या करुण प्रकरणाचे मूळ कशात आहे? माझे वाचक हेच माझे पंच आहेत. बापूजी बॅरिस्टर होते पण व्यवसायाने मी न्यायाधीश होते. न्याय करताना कायदा सोडून तर चालत नसते, नीरक्षीरविवेक तर करावाच लागतो. परंतु कायद्याच्या रुक्ष, निर्मम कलमांच्या आड एका मानवाची एक विषण्ण कथा दडलेली असते. कायद्याचे रक्षण करीत असतानाच, मानवतेचे संवर्धनही करतो तोच न्याय श्रेष्ठ असतो. अपराध्याला शिक्षा करणे एवढाच केवळ न्यायाचा उद्देश नसतो तर

आपराध्याला पश्चात्तापाचा अवसर देणे हाही त्याचा हेतू असतो. नीतिनियमांबरोबरच करुणार्द्र निर्व्याज निर्णय देण्यातच समाजाची श्रेष्ठ सेवा घडत असते. आजपासून शंभर वर्षांपूर्वी, आमच्या कुटुंबातील त्या ज्येष्ठ पुत्राला अपराध नसता आजीवन उपेक्षा आणि क्षमाहीन टीकेची शिक्षा देण्यात आली होती. हा घोर अन्याय दुरुस्त करण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. परंतु या शिक्षेची युक्तायुक्तता पारखणे हा माझा धर्म आहे. यात पितामहांची अवहेलना करण्याची द्वेषमूलक अशी अभद्रवृत्ती माझी नाही. यात परिस्थितीचे निरपेक्ष विवेचन मात्र आहे. माझे महान पितामह माझ्या या धृष्ट अविनयाला क्षमा करतील याची मला जाणीव आहे.

माझ्या हरिलाल काकांचा आत्मा जिथे कुठे असेल तिथे माझे हे तर्पण त्याच्यापर्यंत पोहोचावे अशी माझी नम्र याचना आहे, आशा आहे.

हरिलाल काकांच्या परिवारात दोन कन्या आणि एक पुत्र डॉ. कांती गांधी उरले होते. मोठी मुलगी, रामी बहेनचा विवाह कुंवरजी पारेख यांच्याबरोबर बापूजींनीच करून दिला होता. रामी बहेन, १९५६ मध्येच कालवश झाली. तिचे पती आणि तिचा परिवार सुखी आहेत. कांतीभाईने आपल्या पित्याच्या प्रेरणेने वयाच्या २७व्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा पास केली आणि त्यानंतर डॉक्टर बनण्याचे आपल्या पित्याचे स्वप्न पुरे केले. मुंबईत त्यांनी प्रॅक्टिस केली आणि आपल्या सप्रयत्नांनी घोडबंदर येथे एका क्षयरोग्यांसाठी इस्पितळ सुरू केले. येथे गरीब रुग्णांवर जवळजवळ मोफत इलाज होत असे. १९८९ मध्ये कांतीभाईंचा मुंबईत मृत्यू झाला. त्यांचा मुलगा शांती अमेरिकेत ख्यातनाम हृदय चिकित्सक आहे. सूसन या एका अमेरिकन मुलीशी त्याने विवाह केला आहे. त्यांना चार मुली आहेत. दुसरा मुलगा प्रदीप गांधीही अमेरिकेत स्थायिक झाला आहे. त्याची पत्नी महाराष्ट्रीय असून त्यांना दोन मुली आहेत आपले नाव सार्थ ठरविणारी आमची केरळीय वहिनी सरस्वती, वीणावादिका आहे. आमचे कांतीभाई व्हायोलीन वादक होते. त्या दोघांचा प्रणय या वाद्य संगीतातूनच सुरू झाला होता. हरिलालकाकांची धाकटी मुलगी मनूबहेनचा सुरेंद्र मधुबालाबरोबर विवाह झाला. त्यांना 'ऊर्मी' ही एक कन्या आहे. मनूबेन आणि सुरेंद्रभाई शुद्ध खादीधारी आहेत. त्यांची कन्या ऊर्मी, लहानपणी चांगली नर्तिका होती. मोठी झाल्यानंतर ती कुशल फिजियोथेरपिस्ट बनली. तिचा संसारही सुखाचा आहे. आपल्या साठ वर्षांच्या आयुष्यात हरिलाल काकांना जे सुख कधी मिळू शकले नाही ते सारे त्यांच्या मुलामुलींनी प्राप्त केले असे मला वाटते. हरिलाल काकांच्या निष्कपट आशीर्वादाचेच हे फळ म्हटले पाहिजे.

# ८

# मणिलाल गांधी

बापूजींचे दुसरे पुत्र, मणिलाल यांचा जन्म, २८ ऑक्टोबर १८९२ ला पोरबंदर येथे झाला. त्यांच्या जन्मानंतर सहा महिन्यांच्या आतच दादा अब्दुल्लांच्या खटल्याच्या कामासाठी बापूजींना प्रथमच आफ्रिकेस जावे लागले होते. १८९६ मध्ये बापूजींनी दक्षिण आफ्रिकेत राहून वकिली करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बापूजी हिंदुस्थानात आले आणि ९ वर्षांचे हरिलाल व ५ वर्षांचे मणिलाल आणि पत्नी कस्तुरबा यांना घेऊन १३ जानेवारी १८९७ ला दक्षिण आफ्रिकेत दरबान येथे पोहोचले. जहाजातून उतरताच तेथील गोऱ्या लोकांनी बापूजींवर पाशवी हल्ला केला होता. दैव बलवत्तर म्हणूनच त्यांचा जीव वाचला. या वेळी सारा परिवार रुस्तुम शेठ यांच्या घरी राहिला होता. तेव्हापासून जवळपास पुढचे सारे जीवन मणिलाल काकांनी आफ्रिकेतच घालविले. चार-पाच वर्षांनी स्वदेशी येत असत, परंतु त्यांचे कार्यक्षेत्र दक्षिण आफ्रिकेतच होते व तेथेच ५ एप्रिल, १९५६ ला त्यांचा मृत्यू झाला.

मणिलाल काका आजीवन आफ्रिकेत राहिले तरी जेव्हा जेव्हा ते भारतात येत, तेव्हा तेव्हा आपल्या अत्यंत प्रेमळ स्वभावाने ते आम्हा मुलांत मिळून मिसळून जात. त्यामुळे उषा, कनू आणि मला, काका परदेशात राहणारे कोणी परके वाटत नसत. आमच्यासाठी ते आमचे लाड करणारे प्रेमळ मोठे काका होते आणि म्हणून त्यांच्या छत्रछायेखाली माता-पित्यांच्या आज्ञांचे उल्लंघन करता येत असे. आमचे आई आणि वडील दोघेही मोठ्या आतुरतेने मणिलाल काकांची प्रतीक्षा करीत असत. बापूजींच्या मृत्यूनंतर माझ्या वडिलांना एकेरी संबोधन करणारे ते एकमेव व्यक्ती होते आणि माझ्या वडिलांवर रागावण्याचा हक्कही ते आपलेपणाने बजावीत. मणिलाल काकांच्या वत्सल न्यायालयात आमचे आई-वडील आपल्या फिर्यादी सादर करीत असत आणि उदार मनाचे काका नेहमी आईच्या बाजूने निवाडा करीत असत. माझ्या गंभीर उदासीन पित्यावर अंत:करणपूर्वक प्रेम करणारे कोणीतरी होते याचा मला आनंद वाटत असे. मणिलाल काकांचे माझ्या वडिलांना गोड फटकारे देणे आणि माझ्या वडिलांचे नम्रपणे आपले स्पष्टीकरण देणे माझ्यासाठी मोठे रोचक प्रसंग असत. त्यामुळे, दोनचार वर्षांच्या अंतराने लाभणाऱ्या मणिलाल काकांच्या चार-सहा, क्वचित पाच-दहा दिवसांच्या सान्निध्याच्या आठवणी माझ्या स्मृतिपटलावर चमकदार मोत्यांप्रमाणे जडलेल्या आहेत.

लहानपणी मणिलाल काका, प्रथम देवीच्या तावडीत सापडून खूप आजारी झाले. आजीने मोठ्या कष्टाने त्यांचा जीव वाचविला होता. नंतर १९०२ मध्ये मुंबईत असताना, मणिलालना टायफॉईड आणि त्याबरोबरच न्युमोनियाही झाला होता. अशा दोन भिन्न आजारांच्या तावडीतून निभावणे कठीणच असते. या आजारात, शारीरिक शक्ती टिकून राहावी म्हणून, पार्शी डॉक्टरने मणिलालना कोंबडीचा रस्सा देण्यास सांगितले. मोटीबा आणि बापूजी तर कट्टर वैष्णव शाकाहारी होते. आपत्तीच्या निमित्तानेही मांसाहार करणे त्यांना उचित वाटत नव्हते. आपली तत्त्वे आणि निष्ठा सोडून जगण्यात काही अर्थ नाही, असे बापूजींचे म्हणणे होते. उपचार करणारा तो भला पार्शी डॉक्टर शाकाहार-मांसाहाराच्या या वादाने त्रस्त झाला. बापूजींचा आदर्शवाद दुराग्रही आणि गांवढळ असल्याचे सांगून त्यांनी रुग्णाच्या जगण्याची आशा सोडून दिली. बापूजींनी दहा वर्षांच्या मणिलालला त्याची इच्छा विचारली. मणिलाल लहान होता पण आपल्या पित्यावर त्याचा विश्वास होता आणि मांसाहार करून जीव जगविण्यात काही अर्थ नाही, अशीच त्याची धारणा होती. नंतर बापलेक दोघांनीही डॉक्टरांच्या औषधाचा आधार सोडून दिला. रामाचे नाव घेऊन बापूजींनी मणिलालला ओल्या चादरीत लपेटले आणि वर दोन जाड घोंगड्या पांघरविल्या. टायफॉईडवर गार पाण्याच्या उपचाराचा अशा रीतीने बापूजींनी प्रयोग केला. असा प्रयोग नंतरच्या काळात मी स्वत:वर आणि आपल्या मुलांवरही केला आहे. परंतु १९०२ मध्ये असा उपचार जवळजवळ अज्ञात होता. ईश्वरी कृपेने एक तासाच्या तगमगीनंतर मणिलालना उतार पडला. या आजाराच्या वेळी बापूजींनी आपल्या चिंताग्रस्त मनातील द्वंद्वाचे वर्णन आपल्या **आत्मकथेत** केले आहे. देवानेच बापूजींची लाज राखली. या भयानक आजारातून मणिलाल काका बाहेर आले आणि निरोगी झाले. आपल्या सर्व मुलांत, मणिलालची प्रकृती अधिक चांगली असल्याचे बापूजी सांगत. या आजाराने पिता पुत्रांना परस्परांच्या अधिक जवळ आणले. त्या दिवसापासून मणिलाल सर्वस्वी आपल्या पित्याला समर्पित झाले.

१९०४ मध्ये वयाच्या बाराव्या वर्षी मणिलाल, आपली आई आणि रामदास व देवदास या धाकट्या भावांबरोबर पुन्हा आफ्रिकेस गेले. आफ्रिकेत प्रथम जोहान्सबर्ग येथे व नंतर फिनिक्स आश्रम आणि टॉलस्टाय फार्ममध्ये, आपल्या मातापित्यांसमवेत ते राहिले. शाळेत शिकण्याचा प्रश्नच नव्हता. वडिलांचे मित्र आणि सहकारी यांच्या समवेत तसेच कार्यालयात जे काही काम चालत असे ते चालत असतानाच एकीकडे मणिलाल यांचे शिक्षण चाले. मणिलालनाही पद्धतशीर शिक्षण घेण्याची इच्छा होती, परंतु आपल्या पित्याची आज्ञा त्यांनी स्वीकारली होती. कधी कधी कोणीतरी विचारीत, 'काय शिकतोस?' या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे ते किशोर मणिलालना समजत नसे. तेव्हा त्यांनी बापूजींना विचारले होते, "अशी

विचारपूस करणाऱ्याला काय उत्तर द्यावे?" बापूजींनी सांगीतले, "सांग, मी बापूजींच्या शाळेत शिकतो म्हणून." काकांनी हे स्पष्टीकरण मान्य केले होते. एकूण, अशा रीतीने आपल्या कार्यमग्न पित्याबरोबर काका लहान मोठी कामे करीत राहिले आणि दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात सारे कष्ट सोसून तीनचार वेळेस तुरुंगातही गेले.

१९०९ मध्ये बापूजी प्रिटोरिया येथील तुरुंगात होते आणि मोठा भाऊ हरिलालही जेलमध्येच होता; तेव्हा बापूजींनी तुरुंगातूनच २५ मार्च, १९०९ रोजी मणिलाल काकांना एक दीर्घ पत्र लिहिले होते. मणिलाल काका १७ वर्षांचे होते. अजून मिशी फुटली नव्हती. या पत्राद्वारे रामदास व देवदास हे धाकटे भाऊ, आजारी आई कस्तुरबा आणि मोठ्या भावाची एकाकी पत्नी गुलाब या सर्वांची सारी जबाबदारी बापूजींनी किशोरवयीन मणिलाल काकांच्या खांद्यावर टाकली होती. या पत्रातच त्यांनी चारित्र्यसंपादन, शरीरश्रम आणि खऱ्या शिक्षणासंबंधीही आपले विचार व्यक्त केले होते. त्याप्रमाणेच हिंदु धर्मातील अस्पृश्यता निवारणाची अनिवार्यता आणि आर्य समाजासंबंधीची चर्चा केली होती. आपल्या वयाची विशीपण अजून न गाठलेल्या मुलास अध्यात्माची शिकवण देणारे बापूजीच असू शकतात. पित्यावर निष्ठा असलेल्या मणिलालनी पित्याच्या इच्छा आत्मसात केल्या होत्या. त्या लहान वयातही मणिलाल काकांनी, त्यांच्यावरील विविध जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या असतील, असा माझा विश्वास आहे. रामदास व देवदास, वृत्तीने दुष्ट नव्हते, परंतु ९-१० वर्षांची मुले व्रात्यपणा करणारच हे आपण समजू शकतो. परंतु काकांनी आपल्या धाकट्या भावांना कधी मारले-पिटले नसावे, कधी रागावून-चिडून दटावलेही नसावे. मणिलालचा स्वभाव सौम्य होता. मणिलाल काकांचा आवाज मधुर होता आणि बोलणे सुसंस्कारित होते. त्यांच्या आणि बापूजींच्या आवाजात खूप साम्य होते. माझे वडील सांगत की, लहानपणी मणिलाल काकांना ऑर्गन वाजविण्याची फार हौस होती. त्यांच्यासाठी घरात ऑर्गनही आणलेला होता. काका ऑर्गन सुंदर वाजवीत असे म्हणतात. मी त्यांचे हे वादन तर कधी ऐकले नाही, परंतु इंग्रजी प्रार्थनागीते अत्यंत उत्तम रीतीने गाताना मात्र मी ऐकले आहे. 'लीड काइंडली लाइट' ही प्रार्थना काकांची अत्यंत आवडती होती. या इंग्रजी प्रार्थनेचा अर्थ काकांनी पूर्णतया स्वतःत एकरूप केला होता असे मला अनेकदा वाटत आले आहे. काकांना त्या 'दिव्यज्योती'ची अभिलाषा होती. आत्मशुद्धीसाठी ते करीत असलेले उपवास म्हणजे त्या गीतातील अर्थ अंगी बाणविण्यासाठीच त्यांनी केलेले प्रयोग होते. मणिलाल काकांच्या जीवनातही अनेक संघर्ष आले होते. बापूजींनी मणिलालचे प्राण वाचविले होते तर मणिलालनी बापूजींचा कडक शिस्तीचा असह्य कडवटपणा सहन केला होता. आमचे काका भक्त-हृदय होते. त्यांनी पित्याची सर्व तऱ्हेची कठोर शिक्षा सहन केली आणि कठोरतम शिक्षेमधूनही प्रेमाचे अमृत प्राप्त करून घेतले होते. एवढे सारे कष्ट

आणि अनेक प्रकारच्या वादानंतरही काकांच्या मनात कसलीही कटुता निर्माण झाली नव्हती. सौम्य शब्दांत ते आपले म्हणणे मांडीत पण त्यात तीव्रता अथवा कडवटपणा नसे. एक दोन ठिकाणी बापूजींनी लिहिले आहे, 'मणिलाल चंचल वृत्तीचा होता.' उणिवा दूर करण्याच्या नेक हेतूने, बापूजी आपल्या आणि आपल्या मुलांच्या उणिवा कैक पटींनी वाढवून सांगत, असा माझा तर्क आहे. स्वभावातील निष्कपटता, प्रेम आणि सौहार्द यांवर चांचल्याची मुद्रा लावून, एका तरुणाला फजीत करणे ही बापूजींची अगदी अनावश्यक अतिशयोक्ती होती. परंतु बापूजींचे पुत्र असण्याचा हा एकप्रकारे दंडच होता.

१९१४ च्या सप्टेंबरमध्ये भारतात परतल्यावर मणिलालही आपल्या धाकट्या भावांसह शांतिनिकेतन, हरिद्वार इत्यादी ठिकाणी गेले होते. पूर्णकुंभ मेळाव्याच्या पवित्र प्रसंगी गंगेला साक्षी ठेवून बापूजींनी पंचमहाव्रत घेतले. यात ब्रह्मचर्य व्रताचे श्रेष्ठ स्थान असते. २२ वर्षाच्या मणिलालनेही, ब्रह्मचर्य व्रताचा अंगीकार करावा अशी बापूजींची इच्छा होती. परंतु आपल्या पित्याला संतुष्ट करण्यासाठी अशा व्रतधारणेचे ढोंग न करण्याचे नैतिक धैर्य मणिलाल काकांत होते. पंचमहाव्रतांचा अंगीकार करण्याची आंतरिक प्रेरणा नसताना, बापूजींना खूश करण्यासाठी म्हणून केवळ व्रतांचा स्वीकार करून नंतर लपून छपून त्याचा भंग करणे, हे अधिक निकृष्ट पाप ठरले असते.

बापूजींचे अनुकरण म्हणून अथवा त्यांना खूश करण्याच्या लालसेचीही त्यांच्या आश्रमातील अनेक लोकांनी ब्रह्मचर्याचे व्रत अंगीकारले; परंतु नंतर हे कठोर व्रत निभावून नेणे त्यांना जमले नाही. व्रतभंगामुळे असे लोक नंतर कलाहीन होऊन गेले. वस्तुतः त्यांच्या चारित्र्याचाच हा दोष होता. बापूजींच्या परममित्रांनी त्यांचे अंधानुकरण केले नाही, पण तरीही त्यांची तत्त्वनिष्ठा व बापूजींवरील भक्ती तशीच टिकून राहिली. काही उत्साही लोकांनी मात्र बापूजींनी कौतुक करावे या लालसेने ब्रह्मचर्य व्रताचा स्वीकार केला आणि कालांतराने त्यांच्या घरी मुले जन्माला आली. बिचाऱ्यांच्या फजितीला पारावार राहिला नाही. वस्तुतः असे कठोर व्रत स्वीकारणे आणि नंतर त्याचा भंग करणे, हे सारे चूकच होय. मणिलाल काकांमध्ये जन्मजातच असा प्रामाणिकपणा होता की, अशा प्रदर्शनांच्या प्रलोभनाला ते बळी पडले नाहीत. आपल्या खऱ्या-खोट्या उणिवांचा स्वीकार करून, त्यांसाठी प्रायश्चित्त घेण्याची व क्षमा मागण्याची अद्वितीय नम्रता मणिलाल काकांमध्ये होती. परंतु बापूजी तर सत्यरूपी सुवर्ण प्राप्त करण्यासाठी भट्टीच लावून बसलेले होते. अशा उत्कट चोख साधनेत तिळमात्र किंमत द्यावा असा स्वप्नदोषही महापताकाप्रमाणे चर्चिला जात असे. बापूजी स्वतः अशा प्रकारे शुद्धतेचा आग्रह बाळगीत होते. त्यांच्या या वृत्तीमुळेच, समाजाने त्यांच्या सत्याच्या आग्रहाला कधी पाखंड समजून झिडकारले नाही. बहुधा आमच्या काकांनी पित्याच्या अशा

अनावश्यक अतिशयोक्तीलाही शिरोधार्य मानून त्यांच्या तत्त्वनिष्ठेचा आदर केला होता. याचे एकच करुण उदाहरण देणे पुरेसे ठरावे.

१९१६ मध्ये हरिलाल काका कलकत्त्यात होते आणि त्यांचा परिवार राजकोटमध्ये होता. गुलाब काकी आणि मुलांना, राजकोट ते कलकत्ता हा लांबचा प्रवास सोबतीवाचून करणे इष्ट नव्हते त्यामुळे बापूजींनी मणिलालला त्यांच्यासोबत जाण्यास सांगितले. नीटनेटका संसार मांडलेल्या घरात राहण्यातला आनंद आजवर बापूजींच्या मुलांना फारसा लाभलेला नव्हता. हरिलाल काका आणि गुलाब काकींच्या स्वतंत्र संसाराचा तो प्रथमचरण होता. हरिलाल काकांविषयी धाकट्या भावांना आपुलकी होती, त्यामुळे नवा संसार सुरू करताना हरिलाल काकांना पैशाची गरज लागेल असे मणिलालना वाटले. त्यांच्याजवळ असलेले ५०० रु. मणिलाल काकांनी मोठ्या भावास दिले. हे जेव्हा बापूजींना कळाले तेव्हा त्यांना हा चोरीचाच प्रकार वाटला. सायंकालीन प्रार्थनेनंतर त्यांनी या घटनेचा उल्लेख केला आणि चोरीचा आरोप ठेवून मणिलालना कोचरब आश्रमातून काढून टाकले. बापूजींचा हा न्याय मला बरीच वर्षे अनुचित वाटत होता. परंतु अलीकडे दहा-बारा वर्षांपासून मात्र मला जाणवू लागले आहे की, समाजाचे नेतेच समाजाच्या आचार संहितेचे मानदंड असतात. आपल्या परिवारातील सभासदांच्यातील कमजोरी/स्खलन जर समाजाचे नेते दृष्टिआड करू लागले तर समाजाचे नीतिनियम खंडित होऊन जातील आणि नैतिक बेबंदशाहपासून समाज आणि संस्कृतीचे रक्षण कठीण होऊन जाईल. मात्र असेही वाटते की, मणिलाल काकांच्या मनात, हे ५०० रु. देताना कसलेच कपट अथवा चोरीचा भाव नव्हता. चोरीचा हेतू असता तर हे सारे पैसे त्यांनी दुसऱ्याला कशाला दिले असते? चोरी स्वार्थासाठी होत असते. इथे तर स्वार्थाचा सर्वथा अभाव होता. मोठ्या भावाची गरज ध्यानात घेऊन काकांनी सारे काही देऊन टाकले होते. हे पैसे आले कुठून असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. वयाच्या १५व्या वर्षापासून मणिलाल काका, 'इंडियन ओपिनियन'च्या छापखान्यात काम करीत होते. त्यांना महिन्याला ५ पौंड वेतन मिळत असे. वेतन काही फार मोठे नव्हते परंतु या अल्प उत्पन्नातूनही किशोरवयीन मणिलालने काही पैसे जमविले असावेत. २४ वर्षाच्या तरुणाजवळ, आप कमाईतून ५०० रु. जमा झालेले असले तर त्यात काही वावगे नव्हते. पण बापूजींच्या दृष्टीने हा महत्तम अपराध होता. मणिलाल कलकत्त्याहून कोचरब आश्रमात परत आल्यानंतर बापूजींना ज्या दिवशी ५०० रु. चे हे प्रकरण कळाले, त्याचदिवशी सायंकाळच्या प्रार्थनेत या 'निंद्य अपराधा'चा उल्लेख करण्यात आला. आश्रमवासीयांनाही हा काही विशेष अपराध वाटला नाही. परंतु बापूजींनी मणिलालना कोचरब सोडून निघून जाण्यास सांगितले. बापूजींचे

म्हणणे होते की, अहमदाबादपासून दूर, मद्रासला जाऊन मणिलालने एखाद्या विणकराच्या हाताखाली एखाद्या अनाथ, अज्ञात मजुराप्रमाणे काम करावे.

मणिलालनी हे कठोर शासन, नतमस्तक होऊन स्वीकारले. शिवाय रात्रभर रडत रडत त्यांनी बापूजींना विनंती केली की, आपल्या अपराधासाठी त्यांनी उपवास करू नये. शेवटी उपवास न करण्याचे आश्वासन बापूजींनी मणिलालना दिले. दुसरे दिवशी मणिलाल रडत असलेल्या आपल्या आईला व धाकटा भाऊ देवदासला सोडून आश्रमातून निघून गेले. मद्रासपर्यंत जाण्याचे एकीकडचे रेल्वेचे भाडे बापूजींनी दिले होते म्हणून बरे! गाडीतसुद्धा मणिलाल रात्रभर रडत होते. आपण पित्याला दुःख दिले याची क्षमायाचना करणारे पत्रही त्यांनी प्रवासात असतानाच लिहिले. किती कठोर ही शिक्षा आणि किती प्रखर हे शासन! परंतु काकांचे अलोट प्रेम क्षणभरही स्खलित झाले नाही. ते पित्यावर रागावले नाहीत. मी जर माझ्या काकांना नीट ओळखले असेन तर, मला अशी खात्री आहे की, पित्याविरुद्ध विद्रोहाची कल्पनाही त्यांच्या मनात आली नसावी. आठ महिने अत्यंत कष्टाचे जीवन मद्रासमध्ये अनुभवल्यानंतर काकांचे निष्कासन अनायास संपुष्टात आले. जणू देवाने, निर्दोष काकांचे निष्कपट प्रायश्चित्त मान्य केले होते.

दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स येथून बापूजींचे स्नेही मि. वेस्ट यांचे पत्र आले होते की, 'इंडियन ओपिनियन' चालविणे त्यांना इतःपर शक्य नाही व तेरा वर्षांच्या सेवेनंतर त्यांना आता निवृत्ती हवी होती. बापूजींनी मणिलाल आणि १९ वर्षीय रामदासला फिनिक्सला पाठविले. वयाच्या २५ व्या वर्षी मणिलाल काकांनी 'इंडियन ओपिनियन' या साप्ताहिकाची जबाबदारी स्वीकारली. दोघा भावांना महिन्याला ५ पौंड वेतन मिळत असे आणि हाताने स्वयंपाक करून ते साधेपणाने फिनिक्स आश्रमात राहत. साप्ताहिकाचे प्रकाशन ते नियमितपणे करीत. हे साप्ताहिक नेहमीच आर्थिक अडचणीत असे. आजवर 'इंडियन ओपिनियन'मध्ये काम करीत असलेले मिस्टर वेस्ट आणि मिस्टर सेम यांनी दरबानमध्ये आपले स्वतंत्र छापखाने सुरू केले होते. बापूजींनीच त्यांना रुस्तुम शेठकडून आर्थिक साहाय्य करविले होते आणि फिनिक्स प्रेसमधून गरज पडेल ते घेऊन जाण्यास अनुमती दिली होती. आता एका ऐवजी तीन छापखाने उभे राहिले आणि त्यामुळे काम वाटले जाऊन उत्पन्न घटले होते. आणखी असे की, आपल्या साप्ताहिकात विचारस्वातंत्र्य सुरक्षित राहावे म्हणून कसलीही जाहिरात द्यावयाची नाही, असा बापूजींनी दंडक घालून दिला होता. या धोरणामुळे 'इंडियन ओपिनियन' नेहमीच आर्थिक अडचणीत असे. मणिलाल काका मोकळ्या हाताचे उदार मनस्क व्यक्ती होते. साहजिकच पैसे कमी पडल्याने उधारीही होतच असणार. फिनिक्समधील शंभर एकर शेतजमिनीत, भाजीपाला, फळे-फुले, ऊस इत्यादी उत्पादन इतक्या मुबलक

प्रमाणात होत असे की, 'इंडियन ओपिनियन'ला या शेतीच्या उत्पन्नाचा नेहमीच आधार लाभे. कर्मचाऱ्यांची संख्याही मर्यादित असे. त्यामुळे संपादकीय लिहिण्यापासून ते मजकूर जुळविण्यापर्यंत, छापण्यापासून ते रॅपर लावण्यापर्यंत आणि पत्ते लिहिण्यापासून ते तिकिटे लावण्यापर्यंत, साऱ्या कामात काकांचा सारा परिवार साहाय्य करीत असे.

अनेक अडचणींचा सामना करावा लागला तरी, 'इंडियन ओपिनियन'च्या सत्यनिष्ठेत मात्र कसलेच अंतर पडले नव्हते. दक्षिण आफ्रिकेतील शासनाच्या वर्णभेदाच्या धोरणाला विरोध करण्यात आणि सत्य व अहिंसेचा आग्रह धरण्यात, हे साप्ताहिक दीपस्तंभाचे कार्य करीत होते. नंतर-नंतर, मोहनदास गांधींचे 'इंडियन ओपिनियन', मणिलाल गांधींचेच मुखपत्र बनले होते. मणिलाल काकांच्या वैयक्तिक मालकीचा यात प्रश्न नव्हता. कारण यात वडिलोपार्जित संपत्तीचा विनियोग नव्हता तर हे वृत्तपत्र एका सार्वजनिक ट्रस्टचे होते. परंतु आपल्या विचारांचे व आदेशांचे निर्भय प्रतिपादन आणि अन्याय व अनीतीचा निर्भय विरोध यांमुळे दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रमाची प्रतिष्ठा आणि मणिलाल गांधींची निष्ठा एकरूप होऊन गेली होती. महात्म्याचे पुत्र असल्यामुळे मणिलाल काकांना पावलोपावली प्रतापी पित्याशी होणाऱ्या तुलनेचे अयोग्य आणि निरर्थक ओझे सहन करावे लागत होते. परंतु त्यांनी आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आकारास आणले. प्रसिद्ध पित्याशिवायही मणिलालांचे स्वतःचे असे वेगळे अस्तित्व होते व साऱ्या आफ्रिकेला ते परिचित होते.

विपुल साधन संपत्तीने समृद्ध अशा आफ्रिकन गोऱ्या समाजातील वर्णभेदाचा, हिंसेचा आणि कपटनीतीचा मणिलाल काका सतत विरोध करीत राहिले. एकदा विचारपूर्वक जे धोरण स्वीकारले त्याचा निष्ठेने पाठपुरावा करीत. एकदा एखादा निर्णय केल्यावर त्यांचा निश्चय कधी बदलत नसे; मग कोणी साथ देवो वा न देवो. आफ्रिकेतील हिंदी लोक आणि स्थानिक काळे लोक यांच्यात अनेक वर्षांपासून काही विशेष जवळीक नव्हती. विचारांती मणिलालना असे जाणवले की, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांनी तेथील काळ्या लोकांना साहाय्य केले पाहिजे, त्यांच्या अधिकारांसाठी सत्याग्रह केला पाहिजे. त्यांच्या या निर्णयाने नाताळ काँग्रेस आणि त्यांचे जुने सारे मित्र नाराज झाले. समाज परित्यक्त मणिलाल काकांनी एकाकीच त्या निग्रो लोकांना सत्याग्रहात साथ दिली. १९५२-५३ मध्ये बनलेल्या प्रतिकार समितीचे ते सदस्यही निवडले गेले होते. वयाच्या ६०व्या वर्षी मणिलाल काकांनी या आंदोलनात सत्याग्रह करून कारावास पत्करला. ५० पौंड दंड अथवा ५० दिवस सक्तमजुरी अशी शिक्षा त्यांना झाली. परंतु दंड न भरता त्यांनी कारावास स्वीकारला. या ५० दिवसांत त्यांचे वीस किलो वजन कमी झाले. कारागृहातील अवहेलना आणि अमानुष अत्याचारांचा

मणिलालनी प्रतिकार केला. ते जेव्हा जेलमधून बाहेर आले तेव्हा अगदीच रोड झालेले होते. परंतु बाहेर येताच त्यांनी कैद्यांची दुर्दशा दूर करण्याचे काम सुरू केले आणि त्यात त्यांना बरीच सफलताही मिळाली.

अशा सर्व सत्याग्रहांच्या आधी उपवास करून आत्मशुद्धी करण्याची मणिलाल काकांची पद्धत होती. अशा रीतीने त्यांनी अनेकदा सात अथवा चौदा दिवसांचे आणि दोनतीन वेळेस एकवीस दिवसांचे उपवास केले होते. उपवास करीत असतानाही आपली सारी कामे गाजावाजा न करता करीत राहणे; हा त्यांचा विशेष होता. गांधींजीच्या मृत्यूनंतर, १९४९ मध्ये, विश्वशांती परिषदेचे अधिवेशन प्रथम शंतिनिकेतन व नंतर सेवाग्राममध्ये झाले होते. सेवाग्रामच्या अधिवेशनास आम्ही लोकही गेलो होतो. त्यावेळीही, अधिवेशनास आध्यात्मिक पाठबळ लाभावे म्हणून मणिलाल काकांनी सात सात दिवसांचे उपवास केले होते. आम्ही सारेजण स्वादिष्ट भोजनावर ताव मारीत होतो; परंतु काका मात्र उपवास करीत होते आणि चर्चेमध्ये सहभागी होऊन सक्रिय साहाय्य करीत होते.

मणिलाल काकांची ईश्वरनिष्ठा आणि भक्तीही उत्कट होती. त्यांनी जीवनात जे काही केले ते ईश्वराला साक्षी ठेवून आणि ईश्वरार्पण बुद्धीने केले. त्यामुळेच दक्षिण आफ्रिकेत त्यांना फार आदराचे स्थान होते. तेथील हिंदी लोकांनाही वर्णभेद पसंत नव्हता; परंतु पैशाच्या लालसेने ते लोक वर्णभेद सहन करीत असत. अशा नैतिक तडजोडीला मणिलाल काकांची संमती नव्हती. परिणामत: ते एकाकीच वर्णभेदाचा प्रतिकार करीत. कधी गोऱ्या लोकांसाठीच केवळ राखीव असलेल्या ग्रंथालयात जाऊन नियमभंग करीत तर कधी त्यांच्यासाठी राखीव असलेल्या बाकावर बसून कायदा मोडीत असत. मणिलाल गांधींचा असा मूक सत्याग्रह सतत चालू असे. प्रारंभी तर सरकार अशावेळी त्यांना अटक करीत असे किंवा नको त्या स्थानांवरून जबरदस्तीने दूर नेत असे; परंतु नंतर नंतर त्यांना अटक करण्याचे सरकारनेही सोडून दिले. खटला चालविण्याचा तर कधी प्रश्नच उपस्थित होत नव्हता. दक्षिण आफ्रिकेतील सरकारला भीती वाटत असे की, हा दुसरा गांधी आपल्या सत्तेला डोईजड न ठरो.

मणिलाल गांधी सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त होते; त्यामुळे त्यांच्यात व नाताळ काँग्रेसमध्ये खूपच मतभेद होता. परिस्थितीशी तडजोड करून मूलभूत सिद्धांतांना फाटा देणे त्यांना मानवत नव्हते. आपल्या तत्त्वांसाठी भोगावे लागणारे सारे अत्याचार, सारा तिरस्कार सहन करण्यास ते कधी डगमगत नसत. त्यांनी कधी इतरांना दोष दिला नाही. स्वत:वर मात्र त्यांनी अनेक बंधने टाकली व त्यांचे पूर्णतया पालन केले.

१९२७ मध्ये मणिलाल काका भारतात आले असताना, बापूजींनी अकोल्याच्या प्रसिद्ध मश्रूवाला परिवारातील ज्येष्ठ कन्या, सुशीला हिच्याबरोबर त्यांचा विवाह लावून दिला. या विवाहासाठी वरपक्षाकडून बापूजी, मोटीबा, रामदास, देवदास आणि स्वत: मणिलाल असे

केवळ पाच जणांचे वऱ्हाड अकोल्यास गेले आणि विवाह समारंभ अत्यंत साधेपणाने पार पडला. विवाहानंतर मणिलाल काका लागलीच आपल्या पत्नीसह दक्षिण आफ्रिकेस गेले आणि आता एकट्याऐवजी हे दोघेजण फिनिक्स आश्रमाचे काम करू लागले व साप्ताहिक चालवू लागले. आमची सुशीला काकी मोठ्या शांत स्वभावाची संयमी आणि मृदुभाषी स्त्री आहे. तिच्यासारख्या कुशल आणि कलात्मक वृत्तीच्या गृहिणी कमीच आढळतात. कोणतेही काम करावयाचे ते सुंदर आणि सुव्यवस्थितच करावयाचे अशी त्यांची सवय होती. आता तर त्याही ८५ वर्षांच्या झाल्या आहेत, डोळ्यांनी कमी दिसू लागले आहे. परंतु त्यांच्यासारखे सुंदर रफू काम क्वचितच कुणाला जमत असावे. कपड्यांना इस्त्री करणेही त्यांच्याकडून शिकावे. त्या जेव्हा स्वदेशी येत तेव्हा सामान्यतः कोणत्या कामात पडत नसत; परंतु आमचे देवदास काका आणि माझे वडील आग्रह करून त्यांना स्वयंपाक करावयास लावीत असत किंवा आपल्या कपड्यांना त्यांच्याकडून रफू करवून घेत असत; हे मी स्वतः बघितले आहे. आधी तर त्या नकारच देत परंतु हिंदू परंपरेत दिराचा भावजयीवर मोठा अधिकार मान्य असल्यामुळे, शेवटी आमच्यासाठी काहीतरी विशेष पदार्थ त्या बनवीत असत. त्यांनी बनविलेल्या रस्सा, भाजी आणि पुलावाची चव आजही माझ्या जिभेवर रेंगाळत आहे. हे पदार्थ त्यांच्या पद्धतीने करण्याचे सोंग मी आणीत असले तरी ती केवळ मनाची समजूत काढणे होय, याची मला जाणीव आहे. घरकाम जसे त्या सुंदररीतीने करीत तसेच, 'इंडियन ओपिनियन'च्या गुजराती विभागाचे संपादकीयांपासून सारे कामही त्या सांभाळीत. हिशेबाच्या कामातही मणिलाल काकांपेक्षा सुशीला काकीच अधिक तयार असल्याचे माझे वडील सांगत; असे मला काहीसे आठवते. दोघां पतिपत्नीत अत्यंत प्रेम आणि आदरभाव होता. मणिलाल काकांचे प्रेम अद्वितीय होते. त्यांनी काकीला राजाच्या राणीसारखे मानसन्मानाने वागविले. काकीनेही आपल्या पतीला सर्व परिस्थितीत साथ दिली.

आफ्रिकन लोक शौर्याचे व धैर्याचे मोठे भोक्ते आहेत; मणिलाल काकांचे शौर्य, त्यांची सहनशक्ती आणि त्यांचा मूक अचल निश्चय बघून त्यांना मोठे आश्चर्य वाटत असे. दिवसभरात एकवेळ भोजन न करणे हीच त्या लोकांना मोठी शिक्षा वाटे. परंतु मणिलाल काकांनी, झुलु लोकांच्या सत्याग्रहात सहभागी होण्यापूर्वी आत्मशुद्धीसाठी आणि ईश्वरी प्रेरणेने सत्याग्रह यशस्वी व्हावा म्हणून २१ दिवसांचा उपवास केला होता. हा उपवास त्यांनी केलेल्या सत्याग्रहातली दृढता, अहिंसा आणि सरकारच्या अत्याचारांचा हा शांत प्रतिकार बघून सारा झुलु समाज चकित झाला होता. काळ्या लोकांची आर्थिक अवस्था वाईट आहे; शतकांपासून आपल्याच देशात त्यांचे शोषण होत आले आहे; त्यामुळे कोणाला आपल्या घरी बोलावणे, कोणाला भोजनाचे निमंत्रण देणे यात त्यांना मोठा संकोच वाटतो. मणिलाल

काकांची करुणा आणि त्यांचा सुसंस्कृतपणा इतका उदात्त होता की, ते त्या काळ्या महिलांशी त्या जणू काही महाराणी आहेत अशा भावनेने त्यांच्याशी वागणे बोलणे करीत. त्यांच्या लहानशा घरांतही, कसलाही अहंकार न बाळगता ऊठबस करीत. या गौरवाने तो समाज सद्‌गदित होत असे.

मणिलाल काकांना पायी चालण्याची फार हौस होती. किंबहुना ते त्यांचे एक व्यसनच होते म्हणा ना. फिनिक्स ते दरबान हा १५ मैलांचा रस्ता ते पायीच चालून जात. दिवसातून २०-२५ मैल चालणे त्यांच्या दृष्टीने स्वाभाविक होते. बापूजींच्या मृत्यूनंतर, १९४९ मध्ये मणिलाल काका दिल्लीस आले होते. मीही त्यावेळी दिल्लीतच होते. आम्ही दोघे, देवदास काकांसह, हिंदुस्थान टाइम्सच्या इमारतीत राहत होतो. मणिलाल काका प्रातःकाळी चार वाजता मला जागे करीत आणि थंडीतही गार पाण्याने स्नान करून मी त्यांच्याबरोबर पायी चालत राजघाटावर जात असे. सूर्योदयापूर्वी तेथे पोहोचून आम्ही प्रार्थना करीत असू. त्यानंतर सूर्योदय बघून पायी चालतच आम्ही घरी परतत असू. मणिलाल काकांचा तो सहवास माझ्या दृष्टीने अमूल्य होता.

१९२९ मध्ये देशात, पूर्ण स्वराज्याच्या लढ्याचे नगारे वाजत होते; ते ऐकून मणिलालना आफ्रिकेच्या सुरक्षित वातावरणात राहणे उचित वाटले नाही. ते हिंदुस्थानात आले आणि बापूजींच्या दांडी यात्रेत सामील झाले. २८५ मैल पदयात्रा करून गांधीजींनी समुद्र किनाऱ्यावरील मिठाची चिमट उचलून कायदेभंग केला. बापूजींना अटक झाल्यावर, दुसरेच दिवशी मणिलाल काकांनी, सरोजिनी नायडूंसह धारासना नावाच्या मिठाच्या गोदामावर सत्याग्रह केला. पोलिसांनी सत्याग्रहींना निष्ठुरपणे लाठ्यांनी मारले. मणिलाल काकांनी शांतपणे लाठ्यांचा मार सहन केला. ते बरेच जखमी झाले. बरेच दिवस त्यांना अंथरुणावर पडून राहावे लागले. १५ महिन्यांची सजा झाली. गांधी-आयर्विन करारानंतर मणिलाल काकांची सुटका झाली. सुटका होताच परत आफ्रिकेस जाऊन ते आपले काम करू लागले. मणिलाल काकांच्या अर्धशतकांच्या प्रयत्नांनंतर, 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक केवळ आफ्रिकेपुरते मर्यादित न राहता विदेशांतही प्रचलित झाले. त्यांनी फिनिक्स आश्रमाला एका साधारण स्थानापेक्षा वरच्या पातळीवर नेऊन त्याला एखाद्या पवित्र मंदिराचा गौरव प्राप्त करून दिला. आफ्रिकेतील बापूजींच्या निवासस्थानी मणिलाल काकांनी एक सुंदर संग्रहालय तयार केले होते. तेथील शांत वातावरण, सुव्यवस्था आणि कलाकौशल्याची सुरम्यता यांकडे आकर्षित होऊन देशविदेशातील लोक फिनिक्स आश्रम बघावयास जात असत आणि आपल्या वृत्तान्तात त्याचा आवर्जून उल्लेख करीत. वस्तुतः मणिलाल काकांच्या उन्नत व्यक्तीमत्त्वामुळे, लोकांना तेथे जाऊन गांधीजींच्या प्रारंभ काळाच्या त्या पुण्य भूमीचे दर्शन घेण्याची इच्छा होत असे.

दक्षिण आफ्रिकेतील सरकारला हा आश्रम दृष्टिसमोरही नको असे. परंतु मणिलाल काकांची सत्यनिष्ठा आणि शांत सत्याग्रहापुढे त्या पाशवी सत्तेचाही निरुपाय होत असे. आता काका नाहीत; त्यामुळे दोन वर्षांपूर्वी (१९८३ साली) काही बदमाषांनी या आश्रमाची मोडतोड करून त्यास आग लावून दिली. असे भासविण्यात आले की, हा प्रकार तेथील निग्रो लोकांनी केला. परंतु मी शोध काढला त्यावरून कळते की, हे सारे तेथील सरकारच्या प्रेरणेनेच घडले होते. ह्या शक्तिशाली आणि समृद्ध देशाच्या समर्थ सत्तेला, सत्याग्रहाच्या आदिस्त्रोताचे स्मारक सहन झाले नाही. हुकूमशाही सत्तांना वाटत असते की, भूतकाळाच्या स्मारकांचा विध्वंस करून, इतिहासही नष्ट होईल. परंतु अहिंसक सत्याग्रह, सनातन आणि शाश्वत असतो. भौतिकदृष्ट्या त्याचा नाश झाला तरी समाजाच्या स्मृतींतून व संस्कारातून त्याचा लोप होत नसतो.

मणिलाल काकांनी आपल्या तपस्येने फिनिक्स आश्रम अजरामर केला. त्या आश्रमात एक शाळा आणि एक दवाखाना स्थापन करून, आजूबाजूच्या निग्रो प्रजेला त्यांनी मोठे साहाय्य केले. त्या गोरगरीब निग्रोंच्या शिक्षणाची व आरोग्याची सोय करून काकांनी त्यांच्या विकासास मोठाच हातभार लावला होता. आजीच्या मृत्यूनंतर १९४५ मध्ये मणिलाल काका स्वदेशी आले होते आणि काही महिने प्रवासात बापूजींच्या सोबत राहिले होते. कधी कधी आश्रमवासी मोठे कोती मनोवृत्ती प्रकट करतात, बनतात; त्यांना इतरांची ईर्ष्या वाटू लागते. बापूजींच्या मुलांनी, त्यांच्या मित्रांनी कोणा आश्रमवासीयास कधी कष्ट दिले नव्हते. या चारी मुलांनी समाज सेवेसाठी आपल्या पित्याला मुक्त ठेवले होते. बापूजींच्या सान्निध्यात राहण्यास इतरांना त्यांनी पूर्ण सनद दिली व त्यांची सोयच पाहिली. पण बहुधा यामुळेच या त्यांच्या निकटवर्ती सेवक-सहकाऱ्यांना बापूजींवर केवळ त्यांचा अधिकार आहे अशी भावना झाली असावी. त्यांचा हा एकाधिकार भेदून आम्ही बापूजींच्या मुलां-नातवंडांनी, त्यांच्याबरोबर राहणे, प्रवासात त्यांची सोबत करणे, वा त्यांच्याशी गप्पा-गोष्टी करणे पसंत पडत नसे. सारेजण कोणते ना कोणते निमित्त काढून आम्हा सर्वांना, बापूजींपासून दूर घालवून देत असत अथवा ते न जमले तर, बापूजींवर रुसून त्यांना क्लेश देत असत. आमच्याविषयीची ही तुच्छतेची भावना आम्हा मुलांनाही उमगत असे. आमच्या आजोबांवर आमचे अत्यंत प्रेम असल्यामुळे भोवतालच्या लोकांच्या अशा वागण्याची तक्रार करून आम्ही त्यांना त्रास देत नसू. ते छोटे-मोठे अपमान, ती उपेक्षा आम्ही न बोलता पचवीत असू. मणिलाल काका जेव्हा १९४५ मध्ये बापूजींच्या बरोबर राहिले तेव्हा त्यांनाही असाच कटू अनुभव राहिला. बापूजींची सेवा करणारे त्यांचे सहकारी मणिलालांवर जळत असत आणि त्यांना बापूजींपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असत. अनेकदा बापूजींनाही हे दिसत असे. परंतु आपल्या सतत

कार्यमग्न अशा पित्याला या संदर्भात काही त्रास देणे मणिलाल काकांना मान्य नव्हते. सारे काही कळूनही मणिलाल काका गप्प राहत असत; परंतु माझ्या वडिलांना जेव्हा ते भेटत तेव्हा लोकांच्या क्षुद्रतेचा व आपल्या असंतोषाचा उल्लेख करीत असत. या क्षुद्रतेचे त्यांना आश्चर्य वाटे आणि दुःखही होई. बापूजींच्या मृत्यूच्यावेळी काका दरबानमध्ये होते. या वार्तेने ते हतबुद्ध झाले आणि आतल्या आत जाणवणाऱ्या व्यथेने अधिक गंभीर बनले. त्यांनी आपल्या पित्याच्या मार्गावर चालतच आफ्रिकेत काम केले होते. बापूजींच्या हत्येने मणिलाल काकांवर आघात झाला आणि ते उदास बनले. आपल्या पित्याप्रमाणेच मणिलाल काकाही जीवनाच्या अंतिम क्षणांपर्यंत कर्मरत राहिले. आपल्या दोन्ही धाकट्या भावांच्या तुलनेत मणिलाल काकांना आपल्या पित्याची अंगीकृत कार्याच्या संदर्भात, कठोर कडक वागणूक अधिक सहन करावी लागली. परंतु या तीव्र मानसिक आणि शारीरिक कष्टांतून मणिलाल काका अक्षत पार पडले होते आणि आपल्या पित्याला समर्पित राहिले होते. त्यांची पितृभक्ती श्रेष्ठ होती.

१९५६ मध्ये, अनेक चिंतांनी ग्रासल्याने मणिलाल काकांना पक्षाघाताचा विकार झाला. दोन महिने दरबानच्या इस्पितळात त्यांना राहावे लागले. अनेक उपचार होऊनही विशेष फायदा झाला नाही. काकांच्या इच्छेनुसार २५ मार्च, १९५६ ला त्यांना फिनिक्समधील घरी आणण्यात आले. त्यांचा एकमेव पुत्र अरुण याने त्यांची अपार सेवा केली. स्नान घालणे, उठून बसविणे, त्यांची दाढी करणे, त्यांना जेवू घालणे इत्यादी सारी कामे मुख्यतः अरुण करीत असे. अर्थात काकींची तर त्याला साथ असेच. आश्रमाच्या शांत, प्रसन्न वातावरणात काकांना थोडा आराम पडू लागला होता. त्यांची प्रकृती पूर्ववत होईल अशी सर्वांना आशा वाटू लागली होती. आपल्या पित्याला अधिक प्रसन्न वाटावे म्हणून अरुणने त्यांच्यासाठी एक स्वतंत्र झोपडी तयार करण्यास आरंभ केला होता. ५ एप्रिल, १९५६ ला अरुणने नेहमीप्रमाणे काकांना स्नान घातले आणि अंथरूण नीट करण्यासाठी त्यांना खुर्चीवर बसविले. त्यांची प्रकृती एकदम बिघडली आणि डॉक्टर येऊन पोहोचण्यापूर्वीच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. जणू आपल्या प्रियकर परमात्माच्या मीलनासाठी सजून ते निघून गेले होते.

आफ्रिकेतील श्रीमंतीच्या गौरवर्णीय समाज जीवनात मणिलाल काका हे सत्य अहिंसेच्या एकमेव जागत्या पहारेकऱ्यासारखे होते. फिनिक्सचा सौम्य शांत तारा अस्त पावला आणि सारा आश्रम सुना झाला. आमचे मधुर भाषी उदार मनाचे आवडते काका हे जग सोडून गेले आणि त्यांच्या माघारी 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक चालणे अशक्य झाले. ५३ वर्षांनंतर 'इंडियन ओपिनियन' बंद करणे भाग पडले. १९०३ मध्ये बापूजींनी हे पत्र सुरू केले

होते. १९०६ पासूनच मणिलाल काका त्यांत नियमितपणे काम करू लागले होते. १९१७ पासून ते या साप्ताहिकाचे एकमेव संचालक बनले. माझ्या वडिलांनी प्रारंभी या कामात थोडी मदत केली. १९३७ मध्ये दोन वर्षांसाठी या पत्राचे काम अंगावर घेतले, कारण त्या काळात मणिलाल काका आपल्या परिवारासह भारतात आले होते. मणिलाल काकांच्या मृत्यूबरोबरच बापूजींच्या आद्य संस्थेचाही अंत झाला होता. तेथे चालणाऱ्या शाळा आणि दवाखाना या समाजोपयोगी संस्था आजही चालू आहेत. काका आणखी काही काळ जगते तर 'इंडियन ओपिनियन'चे नाव बदलून ते केवळ 'ओपिनियन' असे ठेवावे, असा त्यांचा विचार होता, कारण ते मूळ आफ्रिकावासीयांचे स्वतंत्र शक्तिशाली मुखपत्र बनावे असा त्यांचा प्रयत्न होता. पण हे प्रत्यक्षात येण्यापूर्वीच काकांनी या जगाचा निरोप घेतला. त्यामुळे वर्णभेदविरोधी आंदोलनाचे बरेच नुकसान झाले. आफ्रिकेतील काळ्या प्रजेला मणिलाल गांधीविषयी स्नेह आणि आदर होता. आपल्या मागण्यांच्या संदर्भात महात्मा गांधींचा हा पुत्र सक्रिय साहाय्य मार्गदर्शन आणि नेतृत्व करू शकेल असा त्या लोकांना विश्वास वाटत होता. असे घडते तर कदाचित आफ्रिकेत एवढे रक्त सांडले नसते आणि अहिंसेच्या मार्गाने तेथील प्रजेला आपले हक्क मिळू शकले असते. परंतु नियतीवर कोणाची सत्ता थोडीच चालते?

'सीता' आणि 'इला' या मणिलाल काकांच्या दोन मुली आहेत. दोघींचे विवाह दरबान मध्येच झाले आणि तेथेच ते लोक स्थायिक झाले. सीतेला दोन मुली आणि एक मुलगा आहे. त्यांचेही विवाह झाले आहेत. सीतेचे पती नानूभाई धुपाडिया हे प्रसन्न स्वभावाचे गृहस्थ होते. त्यांना 'शेर शायरी'चा नाद होता. ते शीघ्र कवी होते. अलीकडेच त्यांचे देहावसान झाले. आता सीताचे वय साठ वर्षांचे असावे. इलाचे पती राम गोविंद यांचे माता पिता उत्तर प्रदेशचे असावेत. पण आता आफ्रिकानिवासीच झाले आहेत. राम गोविंद मिळवते आणि खाऊन पिऊन सुखी आहेत. त्यांना राजकारणात रसही आहे. त्यांच्या राजकीय विचारांत कम्युनिझमची छटा जाणवते. आज काल ते फिनिक्सची व्यवस्था बघतात. आपल्या साम्यवादी विचारांसह, ते अहिंसा आणि सत्याचे कसे रक्षण करीत असतील, हे सांगणे कठीण आहे. हाही नियतीचाच प्रभाव म्हटला पाहिजे. त्यांना पाच मुले आहेत.

अरुण हा मणिलाल काकांचा एकलुता मुलगा. त्याने आजारपणात मणिलाल काकांची अपार सेवा केली. मणिलाल काकांच्या अस्थिविसर्जनासाठी अरुण भारतात आला होता. माझ्या वडिलांनी व अरुणने, काकांच्या अस्थी प्रयागच्या संगमात विसर्जित केल्या होत्या. अरुणने सुनंदा या महाराष्ट्रीय स्त्रीशी विवाह केला आहे. सुनंदा भाभीला पहिल्या विवाहापासूनची एक मुलगी आहे.

मणिलाल काकांच्या मृत्यूनंतर माझे वडील हेच आमच्या घरातले ज्येष्ठ व्यक्ती होते. अरुणला विवाहाची अनुमती देतानाच त्यांनी सांगितले की, पती होण्याआधी पित्याची जबाबदारी सांभाळण्याची तयारी ठेवूनच हा विवाह केला पाहिजे. अरुणही याच श्रेष्ठ परंपरेचा वारस आहे. त्याने त्या मुलीला रीतसर दत्तक घेतले आणि 'अर्चना गांधी' म्हणून ती ओळखली जाऊ लागली. अरुणची पत्नी सुनंदा ही एक सडपातळ आणि मनमोहक स्त्री आहे. तिने जीवनाच्या प्रत्येक वळणावर अरुणला साथ केली आणि गांधी परिवाराच्या सर्व स्नेह्यांना आपलेसे केले. ती एक कुशल गृहिणी असून गांधी कुटुंबात पूर्णतया मिसळून गेली आहे. अरुण आपल्या आजोबा आणि पित्याची परंपरा चालविणारा पत्रकार आहे. अनेक वर्षे 'टाइम्स ऑफ इंडिया'त काम केल्यानंतर, तो आपले एक स्वतंत्र साप्ताहिक चालवित आहे. सुनंदा आणि अरुण यांचे एकमात्र अपत्य असलेला 'तुषार' हा मुलगाही बापाबरोबर प्रेसचे काम करीत असतो. आता त्याचाही विवाह झाला आहे. आमची सुशीला काकी वृद्धावस्थेत मुलगा, सून, नातू आणि नात सून यांच्याबरोबर राहत आहे. त्या सर्वांचे जीवन अत्यंत नियमित आहे. सारेजण प्रत्येक दिवशी नियमाने योगाभ्यास इत्यादी व्यायाम घेतात. सुदृढ मध्यम वर्गातील ही आदर्श जोडपी आहेत.

**९**

# माझे वडील रामदास गांधी

बापूजींच्या तिसऱ्या मुलाचे नाव रामदास गांधी. रामदास गांधींचा जन्म ४ मे १८९८ ला दक्षिण आफ्रिकेतील दरबान शहरी झाला. त्यांचे दोघे मोठे बंधू हरिलाल व मणिलाल हे अनुक्रमे १० आणि ६ वर्षांनी मोठे होते. वयाच्या २४व्या वर्षापर्यंत रामदास आफ्रिकेतच लहानाचे मोठे झाले. भोवतालच्या वातावरणामुळे बालक रामदासने प्रथम इंग्रजीतच बोलावयास प्रारंभ केला. तीन वर्षांचे असताना ते प्रथम भारतात आले तेव्हा त्यांना फक्त इंग्रजीच बोलता येत होते. इथे आल्यावर थोडेबहुत गुजराती शब्द ते शिकू लागले होते तेवढ्यात त्यांना परत आफ्रिकेस जावे लागले. अशा रीतीने रामदासांची बालपणाची भाषा प्रामुख्याने इंग्रजीच होती.

वडिलांचा आदर करण्याची गुजरातेत एक मोठी गोड प्रथा होती. कुटुंबातील तरुण आपल्या पित्यासमोर, स्वतःला आपल्या मुलांकडून 'पिता' या अर्थाचे संबोधन लावून घेत नसत. त्यामुळे आम्ही सर्व मुलांनी आपल्या पित्याला 'बापू' असे न म्हणता 'भाई' म्हणावयास आरंभ केला. हरिलाल काका आणि मणिलाल काकांची मुलेही आपापल्या वडिलांना भाई म्हणूनच हाक मारीत. 'पापा' म्हणण्याचा प्रश्नच नव्हता कारण तो इंग्रजी शब्द आहे. आपल्या भावांत रामदास गांधी सर्वांत सुंदर होते. त्यांचे धारदार नाक, चमकदार मोठे आणि घारे डोळे, दाट काळे केस, बांधेसूद शरीर, लांब हात पाय आणि कमळाच्या देठासारखी सुंदर बोटे मोठी आकर्षक होती. ते कुठेही उभे राहिले तरी ओळखदेख नसतानाही लोकांचे ध्यान त्यांच्याकडे आकर्षित होत असत. कोणतेही कपडे त्यांना साजरे दिसत. हाफ पँटमध्येही ते सुंदर दिसत. १९०४ मध्ये वयाच्या ६ व्या वर्षी, आई आणि भावांबरोबर त्यांना आफ्रिकेस परत जावे लागले. त्यावेळी बापूजींचे कुटुंबीय पहिल्या वर्गाने प्रवास करीत. जहाजावरील कर्मचारी पुष्कळदा शिडीचा वापर न करता, दांडीला धरून उडी घेत असत. हा प्रकार मोठा अवघड होता परंतु जहाजावर असताना ६ वर्षांच्या रामदासनेही तसे उतरण्याची सवय केली होती. काही वेळा रामदासना हे जमले. नंतर एकदा मात्र दांडीला लोंबकळताना जहाजाने एकदम वेग घेतल्याने, त्यांचा तोल गेला आणि ते धाडकन खाली आपटले आणि त्यांच्या डाव्या हाताचे हाड मोडले. जहाजावरील डॉक्टरने, रामदासना बेशुद्ध करून हाड जोडले आणि खालीवर लाकडाच्या दोन पट्ट्या ठेवून हात बांधून टाकला. जहाजाच्या कप्तानाला मात्र हा उपचार पुरेसा वाटला नाही. काही अंतरावरून जात असलेल्या एका लढाऊ जहाजास

बिनतारी संदेश देऊन कप्तानाने आपल्या जहाजाकडे येण्यास त्याला सुचविले. ते जहाज जवळ आल्यावर, त्यावरील डॉक्टरने रामदासच्या मोडलेल्या हाताची तपासणी केली. तेव्हा शस्त्रक्रियेची गरज असल्याचे त्याला जाणवले. त्याकाळी जहाजावर अशी सोय नव्हती म्हणून जखम स्वच्छ करून पूर्ववत पट्टी बांधण्यात आली. दरबानला पोहोचल्यावर सौ. गांधी आणि मुलांना रेल्वेने जोहान्सबर्गला जावयाचे होते. वाटेत डब्याच्या एका खिडकीच्या दारात मणिलालचा अंगठा चेंगरला. मुक्कामाला जाईपर्यंत कस्तुरबा अस्वस्थ होती, पतीला काय सांगावे ते तिला कळत नव्हते. तिन्ही मुले या ना त्या दुखण्याने किरकित होती. मणिलालच्या अंगठ्यात खूप वेदना होत होत्या. बापूजींनी बघितल्यावर लाल औषधाने जखम स्वच्छ केली आणि वर ओल्या मातीची पट्टी बांधली. त्यानंतर मणिलालच्या वेदना कमी झाल्या आणि तो शांत झोपी गेला. रामदासची जखम मोठी होती. बापूजींनी हलक्या हातांनी त्याचीही पट्टी सोडली आणि त्याला विचारून त्या जखमेवरही ओल्या मातीची पट्टी बांधली. ही पट्टी रोज बदलली जात असे. माझे वडील सांगत असत की, दहाबारा दिवसांत त्यांची जखम भरून आली. हात बरा झाला पण त्यांच्या मनगटाचे हाड मात्र वाकडेच राहिले. या व्यतिरिक्त अन्य काही त्रास उरला नव्हता आणि शस्त्रक्रियेची गरज राहिली नव्हती.

जोहान्सबर्गमध्ये रीतसर शिक्षणाच्या अभावी बापूजींच्या मित्रांकडून रामदासला अक्षरज्ञान प्राप्त झाले. कॅलान बाखशी बापूजींचा घनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेला होता. मुलांच्या आगमनानंतर कॅलान बाख कुटुंबाचा भागच बनून गेले. रामदासला कॅलान बाख खूप आवडत आणि कॅलान बाख या देखण्या बालकावर मुग्ध होते. रामदास, देवदास सतत कॅलान बाखसह इकडे तिकडे जात. त्यांच्या भव्य कार्यालयात त्यांचा अनिर्बंध वावर असे. दोन्ही मुलांना लिफ्टने कार्यालयाचे सात मजले चढणे-उतरणे फार आवडत असे. कॅलान बाख दररोज मुलांसाठी ढीगभर मिठाई आणि खेळणी घेऊन गांधी भाईंच्या घरी जात असत. सौ. गांधी या जर्मन सज्जनाशी अत्यंत मोकळेपणाने वागत. जोहान्सबर्गच्या घरी असताना बापूजीदेखील सहज माधुर्य असलेले एक सामान्य संसारी गृहस्थ होते. बॅरिस्टरी उत्तम चालत असल्याने पैशाला कमी नव्हती. अवतीभोवतीच्या गोऱ्या लोकांशी निकटचा संबंध असल्याने त्या लोकांचे घरी येणे-जाणे असे. रामदास आणि देवदास इतके लहान आणि गोजिरवाणे होते की, त्या विदेशी लोकांनाही त्यांच्याविषयी माया वाटे. या कारणाने या मुलांना शुद्ध इंग्रजी उच्चार आणि इंग्रजांच्या राहण्यासाहण्याच्या पद्धती आपोआप अवगत झाल्या. ते दिवस सुख, शांती आणि समृद्धीचे होते. घरात स्वावलंबन आणि शरीरश्रमाचे वातावरण होते. मुले घरकामात मदत करीत असत. बापूजी स्वतः सर्वत्र पायी जात असत व त्यामुळे ही मुलेही दररोज बरीच चालत असत. बापूजींच्या सहकाऱ्यांशी जवळीक असल्याने मुलांना

कोणी अपरिचित वाटत नसे. स्वाभाविकच आपला आणि परका हा भावच मुलांत उद्‌भवला नव्हता. माणसांचे दोन भाग होते. सज्जन सगळे आपले. दुर्जनांविषयी सहानुभाव बाळगला जाई. स्वार्थाची जाणीव कमी होती. समर्थ पिता सर्वांचे पालन करीत होते. मनात समाधान आणि उदारता होती. कोणताही हीन भाव या मुलांना ठाऊक नव्हता. घरात सारी कामे स्वहस्ते होत. एक नोकर होता पण तो नोकरापेक्षा कुटुंबाचा घटकच अधिक होता. त्यामुळे मुलांच्या मनात उच्च नीचतेची भावना उत्पन्न झालेली नव्हती. घरातील सर्वांत कठीण आणि अप्रिय काम माता पिता स्वतः करीत असत. त्यामुळे कोणतेही काम करताना मुलांना लाज, शरम वाटण्याचा प्रश्नच नव्हता. या मूलभूत गुणांचा रामदासच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. या संस्कारामुळे रामदासना संसारातील स्पर्धा हेवेदावे, शिवीगाळ, तुझे-माझे या गोष्टी आजन्म कधी उमगल्याच नाहीत. घरात प्रार्थना, सेवा, साधेपणा आणि सत्याचा आग्रह असल्यामुळे या साऱ्या गोष्टी रामदासांच्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग बनल्या. या गुणांनी जसा फायदा झाला, तसा त्यांमुळेच काही संकटांनाही त्यांना सामोरे जावे लागे.

१९०६ मध्ये, आफ्रिकेतील झुलूंच्या बंडाच्यावेळी बापूजी सरकारच्या मदतीला गेले होते. सारा परिवार आता फिनिक्स आश्रमात गेला होता. रामदास तेव्हा ८ वर्षांचे होते. काही काळ टॉलस्टॉय फार्मवर तर, परत फिनिक्स आश्रमात, अशा रीतीने रामदासांचे बालपण गेले. टॉलस्टॉय फार्म आणि फिनिक्स आश्रम या दोन्ही ठिकाणी शेतांत आणि बगिच्यांत, जमीन खोदणे, सपाट करणे, कावडींनी पाणी आणणे, जळणासाठी लाकडे फोडणे, घर बांधणे इत्यादी सारी कामे आश्रमवासीयांना स्वहस्तेच करावी लागत. त्याबरोबरच, थोडे गणित, गुजराती काव्य आणि गीतेचे अध्ययनही होत असे. फिनिक्समध्ये छापखाना होता आणि त्यासंबंधीचे सारे काम शिकणे प्रत्येकाला अनिवार्य होते. मोठे बंधू हरिलालची पत्नी गुलाब भाभी सुशिक्षित होती आणि फिनिक्स मध्येच राहत होती. ती घरकाम करता करताच आपल्या दोन्ही धाकट्या दिरांना गुजराती लिहिण्यावाचण्यास शिकवित असे. साहित्याचे वाचन करून घेत असे. अक्षरज्ञानाबरोबरच मुले चारित्र्यवान आणि सेवापरायण बनावीत याकडे गुलाबभभींचे विशेष लक्ष असे. ती रामायण, महाभारत आणि भागवतातील कथा सांगत असे. रामदासना संगीताचीही विशेष आवड होती. ते हिंदी, गुजराती आणि तमिळ भजने उत्तम रीतीने गात असत. त्यांचे हे संगीतप्रेम आजीवन टिकून राहिले. या नादामुळेच वयाच्या २५ व्या वर्षी मुंबईस आल्यावर एका महाराष्ट्रीय संगीततज्ञाकडे ते संगीत शिकण्यासही जात असत. मात्र आमच्या वडिलांना आपल्या कला-कौशल्याचे व योग्यतेचे प्रदर्शन करणे पटत नव्हते. पुढे अनेक वर्षांनी देवदास काका एकदा नागपूरला आमच्या घरी राहावयास आले होते तेव्हा आम्ही सर्वांनी एकत्र प्रार्थना केली होती व देवदास काकांनी आपल्या बंधूंना

भजन गाण्याचा आग्रह केला होता. माझे वडील गाऊ शकतात, हे मला तर ठाऊकच नव्हते. त्यांना ज्यूथिका रॉय, दिलीपकुमार रॉय, कमला झरिया, पाहाडी संन्याल आणि पंकज मलिक यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकायला खूप आवडत, एवढेच मला माहीत होते. एके काळी आमच्या घरी सुंदर भजनांचा लहानसा संग्रह होता.

१९१३ मध्ये दक्षिण आफ्रिका सरकारने हिंदी स्त्रियांची मर्यादा भंग करणारा एक कायदा लागू केला आणि त्यानुसार, रजिस्टर न झालेले सर्व विवाह अवैध ठरविले. तेव्हा मोटीबा आणि अन्य स्त्रियांनी सत्याग्रह करून तुरुंगात जाण्याचे ठरविले. तेव्हा १५ वर्षांच्या रामदासनीही तुरुंगात जाण्यासाठी खूपच मनधरणी व विनवणी केली. रामदास अल्पवयीन असला तरी सुंदर सुदृढ शरीरामुळे लहान असल्याचे दिसून येत नसे. अजून मिसरुड फुटली नव्हती पण त्याला जेलमध्ये जावयाचे होते. खूपच आग्रह केल्यावर बापूजींनी होकार दिला होता. त्यानंतर कस्तुरबा गांधी आणि रामदास गांधी दोघांनीही सत्याग्रह केला आणि त्यांना तीन तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. साऱ्या जेलमध्ये रामदास सर्वात लहान आणि देखणा होता. या कैद्यांना दिवसाचे आठ तास माती खोदण्याचे अथवा दगड फोडण्याचे काम उन्हात करावे लागे. शेतात काम करताना इतर कैदी गाजर, मुळा, टमाटे इ. खात असत, पण रामदास मात्र कशाला हात लावीत नसे. असे खाणे त्याला चोरीचे खाणे वाटे. हा किशोरवयीन कैदी इतक्या एकाग्रतेने व न थांबता दगड फोडण्याचे काम करीत असे की, तेथील निग्रो वॉर्डनने त्याच्यावर देखरेख करणे सोडून दिले होते. त्या कठोरहृदयी वॉर्डनलाही ध्यानात आले होते की, कोणी नजर ठेवो न ठेवो, रामदास आपले काम पूर्ण निष्ठेने व प्रामाणिकपणे करणारच. रामदासचा हा गुणविशेष जन्मभर टिकून राहिला. जेलचे लोक भलेच म्हटले पाहिजेत, कारण ते नियत कामापेक्षा अधिक काम करवून घेत नसत. परंतु नंतर समाजात, साबरमती आश्रमात अथवा सेवाग्राममध्ये अनेकांनी रामदासच्या या गुणाचा अनेकदा गैरफायदा घेतला. कठीण आणि हलकी कामे रामदासवर सोपविण्याची लोकांना सवयच जडली. त्यामुळे रामदासांची स्वतःची महत्त्वाची कामे राहून जात असत. परंतु त्यांनी कधी पाट्या टाकण्याच्या वृत्तीने कोणते काम केले नाही की, ही फुकटची पिडा टाळली नाही. जे काम वाट्याला येई वा जे काम पार पाडणे आवश्यक असे ते ते काम इमानेइतबारे चोख पुरे करीत. बऱ्याच काळानंतर आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी रामदास वर्ध्याचे खादी भांडार चालवीत होते. बापूजी तेव्हा वर्ध्याच्या महिलाश्रमात राहत असत. आनंद हिंगोरानींची पत्नी आणि मुलगाही आश्रमात राहत असत. त्या बाईला तसे कोणतेच काम करावे लागत नसे; पण मुलाला सांभाळणारी आया जेव्हा दुपारी जेवणासाठी घरी जाई तेव्हा तेवढा वेळ आपल्या मुलाला सांभाळणेही तिला जड जात असे. त्यांनी बापूजींना आपली अडचण सांगितली तेव्हा

जवळच बसलेल्या रामदासना बापूजींनी मुलाला सांभाळण्याचे काम करण्यास सांगितले. रामदास आपल्या पित्याची प्रत्येक आज्ञा शिरसावंद्य मानीत. दुपारचे दोन तास, खादी भांडाराच्या कामातून मोकळे मिळत तेव्हा, हिंगोरानी बाईंना स्वस्थ झोप घेता यावी म्हणून रामदास स्वतः विश्रांती घेण्याऐवजी तिच्या मुलाला सांभाळू लागले. त्यावेळी बापूजी आणि अन्य लोक हे विसरले होते की, रामदासांची प्रकृती क्षीण होऊ लागली होती आणि त्यांना विश्रांतीची नितांत आवश्यकता होती. शेवटी प्रकृती अस्वास्थ्य दूर करण्यासाठी, कॅलन बाख रामदासना आफ्रिकेस घेऊन गेले. परंतु बापूजींच्या परिवाराने मात्र रामदासांचा योग्यायोग्य उपयोग करून घेण्यास कमी केले नाही.

मॉरित्सबर्ग जेलमध्ये अन्य कैद्यांना जेवणात एकवेळ १ औंस चरबी दिली जात असे. फिनिक्सचे सर्व सत्याग्रही शाकाहारी होते, त्यांनी चरबीऐवजी १ औंस तूप मागितले. जेव्हा ही मागणी मान्य झाली नाही जेव्हा रुस्तुमजी शेठ आदी सत्याग्रहींनी उपवास सुरू केला. १५ वर्षांच्या रामदासनेही सर्वांबरोबर उपवास करावयास आरंभ केला. या कोवळ्या मुलाच्या उपवासाचे पाप आपल्या माथी लागेल या भावनेने जेलचा वॉर्डन अस्वस्थ होता. साऱ्यांना चिंता वाटू लागली की, गांधीजींच्या या अल्पवयीन मुलाला शिक्षा देणेच बरोबर नव्हते, तेथे आता जर उपवासात त्याचे काही बरे वाईट झाले तर नसती भानगड व्हावयाची. पाच दिवसांनंतर तूप देण्यास मान्यता मिळाल्यानंतरच रामदासने उपवास सोडला. उपवासकाळातील रामदासच्या दृढनिश्चयाने अस्वस्थ झालेल्या जेलरने रामदासचे वडील बंधू मणिलाल यांना त्याची समजूत काढण्यास सांगितले होते. मणिलाल काकांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण रामदासने त्यांनाही जुमानले नाही. या लहान मुलाचा दृढनिश्चय बघून सारे चकित झाले होते. या प्रकरणानंतर जणू जेलचे खरे विकराल रूप दिसावे म्हणूनच या सर्व सत्याग्रहींना दरबानच्या जेलमध्ये हलविण्यात आले. तेथील जेवणाच्या भांड्यांना जुनाट खरकटे लागलेले असे व त्याचा दुर्गंध येत असे. परंतु तेथील जेलर दुसरी स्वच्छ भांडी देत नसे किंवा ती स्वच्छ करून घेण्यासाठी रामदासना पाणही देत नसे. पांघरावयाच्या घोंगड्यात उवा झालेल्या होत्या आणि त्यांचाही दुर्गंध येत होता. वापरावयाचे कपडेही मळकट आणि फाटलेले होते. १० दिवसपर्यंत या कैद्यांना पायांत घालावयास चपलाही दिल्या नव्हत्या. या साऱ्याचा विरोध करण्यासाठी रामदास आणि त्याच्या बरोबरच्या इतरांनी पुन्हा उपवास सुरू केला. पाच दिवसांच्या उपोषणानंतर परिस्थितीत थोडी सुधारणा झाली परंतु दरबान जेलच्या अधिकाऱ्यांचे वर्तन कडक आणि अमानुष होते. त्यांनी अल्पवयीन रामदासची काहीच पर्वा केली नाही. रामदासची दृढता मात्र अविचल होती. जेवढे अधिक कष्ट पडत तेवढ्याच

अधिक मनोबलाने रामदास अहिंसक पण प्रखर प्रतिकार करीत असे. अन्यायापुढे रामदास कधी वाकले नाहीत. बापूजींनीदेखील रामदासला दक्षिण आफ्रिका सत्याग्रहातील आदर्श कैदी म्हणून संबोधिले होते.

फिनिक्स आश्रमातील मुलांत रामदास सर्वाधिक शालीन आणि संयमी होता. बागेतील फळे-फुले तोडणे किंवा त्यांची नासधूस करणे त्याच्या स्वभावातच नव्हते. आई आजारी असताना मोठे बंधू हरिलाल यांच्याबरोबर तोही आईची सेवा करीत असे. परंतु अन्याय, जुलूम अथवा फुकटचा धाकदपटशा बघून मात्र तो चिडून उठत असे. अपमानाचा आघात झाला तर स्वाभिमानी रामदासचा सौम्य स्वभावही रौद्र रूप धारण करीत असे. प्रभुदास गांधींनी 'जीवन नु पराढे' या आपल्या गुजराती पुस्तकात एक घटना कथन केली आहे. फिनिक्समधील काही मुले एकदा रेल्वेने निघाली. फिनिक्स स्टेशनवरच गाडीत बसताना गोऱ्या गार्डने त्यांना दटावून हाकलण्याचा प्रयत्न केला. सारी मुले मुलेच होती पण रामदासने त्या गार्डला जोरात दाटले आणि आपल्या जागेवर अडून बसला. शेवटी त्या गोऱ्या गार्डाला निमूटपणे तेथून निघून जावे लागले पण तो गोरा गार्ड किशोर रामदासला धमकावू, घाबरवू शकला नाही.

१९१४ च्या शेवटी भारतात आलेल्या फिनिक्सवासीयांसह, रामदास गांधीही, शांतिनिकेतन, गुरुकुल कांगडी आणि नंतर दिल्लीत प्रो. रूद्र यांच्या घरी गेले होते. शांतिनिकेतनमध्ये गुरुदेव टागोर आणि त्यांचे बंधू 'बोडो दादा' यांच्याशी रामदासची विशेष जवळीक होती. त्यानंतर जेव्हा गांधीजी इंग्लंडहून भारतात आले तेव्हा आपल्या माता पित्यांसह रामदास रंगूनला डॉ. प्राण जीवन मेहता यांच्याकडे गेले होते. कलकत्त्यात गांधींजी प्रख्यात वैज्ञानिक सर जगदीशचंद्र बसू यांना भेटावयास गेले होते तेव्हा रामदासनाही त्यांनी बरोबर नेले होते. कलकत्त्यात देशबंधू चित्तरंजन दास यांच्या घरी मुक्काम होता. तेव्हापासूनच चित्तरंजन दासांशी आत्मीयतेचा संबंध स्थापित झाला होता. वस्तुतः हरिलाल गांधी आणि देशबंधू दास यांच्यात विशेष मैत्री होती. कलकत्त्याहून ही सारी मंडळी १९१५ मध्ये हरिद्वारच्या पूर्णकुंभ मेळाव्यास गेली. तेथे गांधीजींनी आपल्या चारी मुलांना व अन्य सहकाऱ्यांना संडास सफाईच्या कामात लावले. हे सारेजण अत्यंत तत्परतेने कुंभमेळ्यातील घाण साफ करण्याचे काम करीत. तेथून रामदास आपल्या पित्यासह अहमदाबादेस गेले आणि त्यांच्यासह तेथील कोचरब आश्रमात राहू लागले. परंतु तेथील उष्ण कोरड्या हवेत आणि (फळांचा समावेश नसलेल्या) गरिबीच्या आहारात रामदासची प्रकृती खालावू लागली. १९१७ मध्ये फिनिक्स आश्रमाला काही कार्यकर्त्यांची गरज होती म्हणून मणिलाल आणि रामदास कलकत्त्याहून जहाजाने दरबानला पोहोचले. रामदासने तेथे प्रथम साप्ताहिकाचे काम वर्षभर चांगल्या प्रकारे

केले. या काळात त्यांना पाच पौंड वेतन मिळत असे. नंतर आपल्या काही मित्रांसह त्यांनी कपड्याचा व्यापारही केला आणि त्यांना बरीच सफलताही मिळाली. १९२१ मध्ये रामदासनी विचार केला की, आता स्वदेशी जाऊन लग्न करावे आणि परत आफ्रिकेत येऊन येथेच स्थायिक व्हावे. परंतु माणूस चिंतितो एक आणि होते दुसरेच.

अहमदाबाद काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी रामदास गांधींचा सरदार पटेलांशी परिचय झाला. सरदारांनी या आकर्षक युवकाला मोतीलाल नेहरू, बॅ. जिना आणि त्यांची पत्नी रती जिना यांच्या स्वागताचे काम दिले. अहमदाबादचे हे काँग्रेसचे अधिवेशन अत्यंत भव्य झाले. त्यानंतर जेव्हा रामदासनी आफ्रिकेस परत जाण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा बापूजी म्हणाले, "देशात आंदोलनाची आग भडकली आहे आणि तू आफ्रिकेत जाऊन पैसे कमावणार?" अशा बिकट परिस्थितीत विवाह करणेही योग्य नव्हते, केव्हा काय होईल सांगता येत नव्हते. आज्ञाधारक रामदासनी आफ्रिकेला जाण्याचे रहित केले, जहाजाचे काढलेले तिकीट परत केले आणि व्यापार करून पैसा मिळविण्याचा विचार सोडून दिला. त्यानंतर रामदासनी देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात उडी घेतली. ते जेलमध्ये गेले, त्यांनी लाठ्या खाल्ल्या, खादीप्रचार केला. नंतर ते बार्डोली आश्रमाचे व्यवस्थापक बनले. परंतु त्यांच्या मनात विद्याभ्यासाच्या अभावाचे दु:ख सलत होते. जेलमधून सुटल्यावर बापूजींनी रामदासना गणित आणि हिंदू धर्माचे ग्रंथ शिकविण्यास आरंभ केला. दीनबंधू चार्ली अँड्र्यूज इंग्रजी साहित्य शिकवित असत. विनोबा गणित आणि संस्कृत शिकवित होते. सारे शिक्षक तेजस्वी होते आणि त्यांचे शिक्षणही उत्तम होते पण ही व्यवस्था टिकणे संभवनीय नव्हते. त्या काळी एवढा वेळ होता कुणाला? असहकाराच्या आंदोलनाच्या वादळात स्थैर्य लाभणे अशक्य होते आणि २३-२४ वर्षांच्या वयात शिक्षण घेणेही तसे कठीणच! नियमित पाठ्यक्रमाच्या अभावी हे शिक्षण टिकाऊ नव्हते परिणामत: रामदासांच्या मनातील निराशा गेली नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी आर्थिक समृद्धी देणारा एखादा धंदाही आता त्यांच्याजवळ नव्हता.

याकाळात रामदासनी कलकत्त्यास जाऊन आपले मोठे बंधू हरिलाल यांची मदत केली आणि मातृविहीन पोरक्या कांतीला कलकत्त्याच्या अयोग्य वातावरणातून काढून साबरमती आश्रमात आणून मोटीबाच्या स्वाधीन केले. आजाऱ्यांची सेवा, सूरत जिल्ह्याचे रचनात्मक कार्य आणि अन्य पडेल ते काम रामदास करीत राहिले परंतु रामदासना हवा तसा उत्साह अथवा संतोष लाभत नव्हता. आपल्या मधुर, सुंदर व्यक्तित्वाने रामदास लोकांना आकर्षित करीत परंतु त्याग आणि सेवा हेच आपल्या जीवनाचे कार्य मानल्यामुळे, नेतृत्व लाभले तरी ते पुढारीपण सोडून देत असत. स्वत: होऊन पुढे घुसून मोठेपणा मिळविणे त्यांना निंदनीय वाटत असे. भरीव कार्य करणे, सेवा करणे हेच सर्वोत्तम होय, असे बापूजीही रामदासना

लिहीत असत. आवडीने आणि प्रामाणिकपणे रामदास रुग्णसेवा करीत परंतु त्यात त्यांना आपले कार्यक्षेत्र सापडत नव्हते. वस्तुतः रामदास गांधींना डॉक्टर होण्याची संधी लाभती तर ते समाजाची श्रेष्ठ सेवा करू शकले असते. त्यांच्याप्रमाणे रोग्यांची शुश्रूषा आणि चिकित्सा थोडे लोकच करू शकत. आश्रमात कोणीही आजारी पडले की-, बापूजी रामदासना त्याच्या शुश्रूषेचे काम देत असत. रामदास योग्य सेवा आणि उपचार करण्यात कमी पडणार नाही, असा त्यांना विश्वास होता.

आमचे पिता रामदास गांधींच्या अद्वितीय सेवावृत्तीचा एक प्रसंग एका अत्यंत दुःखाच्या न शोकाच्या समयी एका सज्जनांनी मला सांगितला होता. १५ दिवसांच्या आजारानंतर माझ्या पित्याचा रात्रीच्या वेळी मृत्यू झाला होता. मी आणि उषाने पिताजींचा मृतदेह मुंबईत काँग्रेस समितीच्या जिना हॉलच्या मंचावर ठेवला. त्याच सकाळी सात वाजता प्रार्थना आयोजित करण्यात आली होती. आमच्या मितभाषी साध्यासुध्या वडिलांना एवढे सारे लोक ओळखीत असतील याचा आम्हाला तर पत्ताच नव्हता. मुंबईच्या कोन्याकोपऱ्यातून पार्थिव दर्शनाला लोक आले आणि श्रद्धांजलीचा हा कार्यक्रम लांबत गेला. यावेळी कांती पारेख नावाचे सज्जन समोर आले. माझा त्यांच्याशी काही परिचय नव्हता. कांती पारेख आपल्या श्रद्धांजलीत म्हणाले, "ज्या व्यक्तीचे निधन झाले आहे तिच्यामुळेच मी आज जिवंत आहे. १९२७ च्या बार्डोली सत्याग्रहात मी स्वयंसेवक होतो. घोडेस्वार पोलिसांच्या तुकडीने लाठीहल्ला केला आणि मी जखमी होऊन बेशुद्ध झालो. सगळे लोक जिकडे तिकडे पांगले. मी मेलो असे समजून लोकांनी मला तेथेच सडकेच्या बाजूला टाकून दिले होते. तेवढ्यात आमचे प्रमुख रामदास गांधी तेथे आले. बेशुद्ध पडलेला बघून त्यांनी मला तात्काळ आपल्या खांद्यावर उचलले आणि स्वतःच मला सूरतच्या इस्पितळात घेऊन गेले. तीन दिवस आणि तीन रात्री रामदास माझ्या सेवेत सतत उभे होते. मी वाचेन असे कोणाला वाटत नव्हते परंतु रामदास गांधींनी धीराने माझी सेवा केली आणि तीन दिवसांनी मी शुद्धीवर आलो. त्याच देवतास्वरूप रामदास भाईना श्रद्धांजली वाहण्यासाठी मी जिवंत आहे. याचे सारे श्रेय रामदास भाईंचेच होय. त्यांच्यासारखी निःस्वार्थ सेवा क्वचितच कोणी करू शकेल."

परिवारातील आम्हा कोणालाच आमच्या वडिलांच्या शौर्याचा वा उत्कट सेवावृत्तीचा अंदाज नव्हता. आजकाल एखाद्या लहानशा सेवाकार्याचीही जाहिरात करण्याचे अनेक मार्ग अवलंबिले जातात. वर्तमानपत्रात मोठे मोठे स्तुतिपर लेख छापवले जातात, स्मरणिका प्रसिद्ध केल्या जातात, मोठे सोहळे आयोजित केले जातात. सेवाकार्याचे 'पुण्य' असे आधीच वसूल केले जाते. नाव देऊन नेत्रयज्ञ आयोजित करतात, स्वास्थ्य केंद्रे काढतात, सेवा केंद्रे चालवितात, आपल्या परिवारातील व्यक्तींचे पुतळे बसवितात आणि मग वार्षिक उत्सव,

भजने, समारोह, पुरस्कार आदि प्रकारे आपल्या थोडक्या कामाला सजवून मोठे करून समाजात मानमान्यता प्राप्त करून घेतली जाते. स्वतःची प्रसिद्धी करण्याची ही शिष्टमान्य रीत बनली आहे. १९३० पूर्वी प्रचार तंत्राचा असा विकास झालेला नव्हता. परंतु लोकस्वभाव तर तेव्हाही तोच होता ना. त्या काळीही लोकांना आत्मगौरव आवडत होताच! या उलट आमच्या वडिलांनी आपल्या कार्याबद्दल आम्हालाही काही सांगितले नव्हते. त्यांच्या दृष्टीने स्वतःच्या कामाची चर्चा करणे, म्हणजे पराकोटीची अभद्रता होती. कर्तव्यपालन करणे आपला धर्म असून त्याचा उच्चार करणे म्हणजे हीनपणा होय; असे त्यांचे मत होते. त्यांच्या जीवनाचा हाच एकमेव मूलमंत्र होता. मी त्यांची मुलगी आहे. त्यांच्या कार्याबद्दल लिहिताना मलाही संकोचल्यागत वाटत आहे. परंतु जो कोणी त्यांना एकदा भेटत असे तो त्यांच्या निष्कपट सरलतेचा आणि शुद्ध निःस्वार्थ सेवेचा प्रशंसक बनत असे.

अनेक वर्षांनी १९७४ मध्ये, तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मला भेटीस बोलाविले होते. एका प्रकरणाच्या संदर्भात त्यांनी माझा अभिप्राय विचारला. मी माझे मत दिले आणि सहजच उद्‌गारले, "आपण माझ्या वडिलांना ओळखत नाही. मी त्यांची मुलगी, कायद्याचा असा अनादर करू शकत नाही." चव्हाणसाहेब म्हणाले, "तुमच्या वडिलांना मी ओळखीत नाही हे तुम्हाला काय माहीत?" मी म्हणाले, "माझे वडील काहीसे संन्यस्त प्रवृत्तीचे होते त्यामुळे त्यांना कमीच लोक ओळखीत." चव्हाणसाहेब म्हणाले, "मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी रामदास गांधी आमचे नेता होते. आम्ही सर्व एकत्रच जेलमध्ये गेलो होतो. मी त्यांच्याबरोबर काम केले होते. परंतु आपण नेता आहोत अथवा महात्माजींचे पुत्र आहोत, हे त्यांनी आम्हाला कधीच जाणवू दिले नाही. ते काही एका वेगळ्याच प्रकृतिधर्माचे व्यक्ती होते. ते बार्डोली आश्रमाचे व्यवस्थापक असल्यामुळे तुरुंगात त्यांना 'अ' वर्ग देण्यात आला होता; परंतु आपल्या सहकाऱ्यांना सोडून आपण 'अ' वर्गाच्या सुखसोयी उपभोगणे रामदास भाईंना पसंत नव्हते. त्यांनी स्वेच्छेने तिसऱ्या वर्गात राहणे व तेथील निकृष्ट जेवण घेणे स्वीकारले होते. यामुळे जेलर त्यांच्यावर अधिकच नाराज होता. येरवडा जेलचा तो जेलर, जाता येता आम्हा सत्याग्रहींचा अपमान करीत असे. रामदास भाईंनी त्याचा प्रतिकार केला. परिणामी रामदास भाईंना अधिक 'विशेष सजा' देण्यात आली होती." गांधीजींच्या या पुत्रापासून प्रेरणा घेऊन कितीतरी माता पित्यांनी आपल्या लाडक्यांना स्वातंत्र्यसमरात झोकून दिले होते. संयुक्त प्रांतातील सुर जावली गावच्या सावंत सिंहांनी रामदासच्या कार्याने प्रभावित होऊन आपला किशारपुत्र केवलसिंह राघव यास, हाती काँग्रेसचा तिरंगा ध्वज देऊन वर्ध्यापर्यंतच्या यात्रेसाठी वाजत गाजत निरोप दिला होता. आणि सरकारने केवलसिंहाला वर्ध्याऐवजी जेलमध्ये टाकले होते. मला या सर्व बातम्या अनपेक्षित होत्या. मला फक्त एवढेच माहीत

होते की, मिठाचा सत्याग्रह आणि नंतर १९३३ च्या कारावासातील कष्टांनी व अत्याचारांनी माझ्या वडिलांना अतिसाराचा त्रास सुरू झाला होता. त्यात त्यांचे वीसबावीस पौंड वजन कमी झाले होते आणि त्यांची मरणासन्न अवस्था झाली होती. तेव्हापासून त्यांची पचनक्रिया जी बिघडली ती कधीच सुधारली नाही. त्यांना नंतर नीट भूकही लागत नसे आणि शेवटी पोटाच्या विकारानेच त्यांचा मृत्यू ओढवला.

आमच्या पित्याच्या पुस्तकातूनही त्यांच्या या स्वभावाचे दर्शन होते. आपल्या जीवनाच्या उत्तर काळात रामदास गांधींनी आपल्या आठवणी लिहिल्या आहेत. २५० पानांच्या या आठवणींच्या संग्रहात कोठेही अतिशयोक्ती नाही. त्यांच्या या पुस्तकात ज्या घटनांचे वर्णन आहे ते बहुधा अन्य कोणत्याही पुस्तकात आढळत नाही. गांधीयुगातील संस्मरणे सांगणाऱ्या पुस्तकांची संख्या मोठी आहे. आठवणीच आठवणी लोकांनी तिखटमीठ लावून लिहून ठेवल्या आहेत. तसे काहीच या पुस्तकात नाही. आमचे पिता स्वतःला शिकला सवरलेला मानीत नसत. या कारणामुळेच गांधीजींचा हा तिसरा मुलगा एक सामान्य माणूस आहे असे अनेकजण समजत असत. परंतु रामदास गांधींचे हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते की-, लेखक बरेच काही बघणारी समजणारी व्यक्ती होत. ते अत्यंत संवेदनशील आणि संकोची होते आणि आत्मश्लाघा करणे तर त्यांना माहीतच नव्हते. हे सारे पुस्तक इतके अल्पाक्षरी आहे की, त्यातील एकेका वाक्यावर एकेक परिच्छेद मी लिहू शकेन आणि तरीही मी तेच ते परत सांगतेय असा कोणी मजवर आरोप ठेवू शकणार नाही की-, मी माझ्या कल्पनेने भरारी छान मारलीय अशीही मला शाबासकी देऊ शकणार नाही असा मला पूर्ण विश्वास आहे. माझ्या वडिलांच्या स्वभावात अहं आणि अहंकाराचा इतका कमालीचा अभाव होता की, साऱ्या पुस्तकात त्यांनी स्वतःचा कमीत कमी उल्लेख केला आहे. या पुस्तकातील प्रत्येक शब्द लक्षपूर्वक वाचणे आवश्यक होय; एरव्ही अनेक महत्त्वाच्या गोष्टी लक्षात येणार नाहीत. आपल्या आठवणीमधून माझ्या वडिलांची जी प्रतिमा साकार होते ती इतकी उत्कृष्ट आहे की, वस्तुतः हे प्रकरण लिहून त्यांची ही प्रतिमा मी बिघडवून तर टाकणार नाही ना, अशी मला भीती वाटते. आपला प्रामाणिकपणा, धैर्य, निष्ठा आणि कठोर परिश्रमांची क्षमता, या साऱ्या गोष्टी माझ्या वडिलांनी इतरांना अज्ञात ठेवल्या होत्या. आम्हा मुलांसमोरही त्यांनी आपल्या गुणांचे वा योग्यतेचे कधी वर्णन केले नाही. आम्ही जे काही जाणले, ते प्रत्यक्ष त्यांचा जीवनक्रम बघूनच. आपल्या 'अहं'पासून अशी मुक्ती प्राप्त करणे ही एक मोठी साधनाच असते आणि त्यांना ती सहज साधली होती.

२७ जानेवारी, १९२८ला वसंत पंचमीच्या दिवशी, काठियावाडमधील प्रसिद्ध व्होरा परिवारातील ज्येष्ठ कन्या निर्मला हिच्याशी रामदास गांधींचा विवाह झाला. निर्मलाचे वडील

तिच्या लहानपणीच निवर्तले होते; त्यामुळे सातव्या वर्गाच्या पुढे तिला शिक्षण घेता आले नव्हते. परंतु आश्रम जीवनाला अनुरूप असे संस्कार मात्र तिच्या अंगी बाणलेले होते. बारा तेरा वर्षांच्या लहान वयातही निर्मला खादी वापरीत असे. थाटामाटाच्या लग्नसमारंभातील भोजनांत सहभागी न होण्याइतकी जागृती त्यावेळीही तिच्या मनात झालेली होती. यामुळे, बापूजींना ती सून म्हणून आदर्श वाटत होती. निर्मलाचे पिता बापूजींचे जुने परिचित होते आणि त्यामुळे हा सोईरसंबंध सुखद होता. लग्नानंतर नवदंपतीने बार्डोली आश्रमात आपला स्वतंत्र संसार थाटला. दोनतीन महिन्यातच बार्डोली सत्याग्रहाला तोंड लागले. रामदास गांधींना अटक झाली. त्यांच्या घरावर जप्ती आली. निर्मला गांधी साबरमती आश्रमात सासू सासऱ्यांजवळ राहून आश्रमाचे काम करू लागली. रामदास गांधी तुरुंगातून सुटून आले तेव्हा पुन्हा सारे सामान विकत घेण्यात आले व नव्याने घर वसविण्यात आले. यावेळी पावेतो एका मुलीचा जन्मही झाला होता. परंतु चारच महिन्यांनी मिठाच्या सत्याग्रहात पुन्हा सरकारने घर हिसकावले. सरकारने घर ताब्यात घेतले तेव्हा निर्मलाला व तिच्या अर्भकाला थंडीच्या  दिवसांत केवळ अंगावरील कपड्यांनिशी घराबाहेर काढण्यात आले. रामदासांना पुन्हा अटक झाली होती. १९३२ मध्ये रामदास पुन्हा तुरुंगात गेले तेव्हा त्यांचा नवजात पुत्र केवळ बारा दिवसांचा होता. बापूजी इंग्लंडहून परतले होते आणि आश्रमाचा सारा परिवार कारागृहाच्या गजाआड गेलेला होता. आपल्या दोन लहान मुलांना घेऊन साबरमती आश्रमात आलेली निर्मला गांधी तेथील खादी भांडार चालविण्याचे काम करू लागली.

निर्मला गांधी एक चतुर, कुशल, कष्टाळू आणि भल्या महिला आहेत. त्या हसतमुख आणि विनोदप्रिय आहेत. त्यांना रडताना, रुसलेल्या अथवा खिन्न झालेल्या क्वचितच कोणी पाहिले असेल! त्यांनी आपले दु:ख आणि वेदना दडवून ठेवून प्रसन्न राहण्याची साधना केली आणि आज त्या साधनेत त्या सफल झाल्या आहेत. जीवनातील अनेक निराशा आणि कष्ट सहन करीत, सर्वांना समान दृष्टीने बघत, समजून घेत, आपले प्रेम आणि उदारता वाटीत त्या आपले जीवन जगत आल्या आहेत. त्यामुळे या विशाल देशात अनेक ठिकाणी त्यांचे स्नेही व प्रशंसक मित्र आहेत. आज (१९८५ साली) वयाच्या ७८ व्या वर्षीही त्या स्वावलंबी आणि कार्यक्षम आहेत. जमेल तोवर त्या सतत काम करीत असतात. त्यांना हृदयविकाराचा त्रास असला तरी अजूनही त्या नियमितपणे चालत असतात. त्यांनी मला सांगून ठेवले आहे की-, इंजेक्शन नि ग्लुकोज देऊन त्यांना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करू नये; मृत्यूसमयी त्या जेथे असतील तेथेच त्यांना अग्नी दिला जावा व जवळपासच्या जलाशयातच त्यांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात यावे. सरकारने अनेकवेळा त्यांचा घर-संसार जप्त केल्यामुळे आता कसलाही संचय करण्यात त्यांना काही गोडी उरलेली नाही. त्या म्हणतात, "हे सारे

सामान सुमान घेऊन मी काय करू? ते तर हरवते, मोडते अथवा काढून नेले जाते." पन्नास वर्षांपूर्वीच त्यांनी ठरवून टाकले की, आपली तीन मुले, पती आणि आपले कर्तव्य व पुरुषार्थ हेच आपले खरे धन होत. तेच टिकणारे आहे. या जाणिवेमुळेच आमच्या आई, निर्मला गांधी यांना, आधुनिककालीन सुखसोयींचा, थाटमाटाचा आणि संपत्तीचा मोह राहिलेला नाही. त्यांचा संसार एका लहानशा पत्र्याच्या पेटीत असतो. त्यांना थंडीच्यावेळी वापरण्यासाठी लोकरीची शाल आणि बंडी असते. प्रवासातही त्यांना चार साड्या पुरतात. स्वतःच कपडे धूत असल्यामुळे त्यांना कपड्यांचे अधिक जोड लागत नाहीत. त्या पाहुण्या म्हणून जिथे जातात तिथे ढीगभर फळे विकत घेऊन भेट म्हणून देतात आणि पाहुण्या असल्यातरी घरकामात मदत करू लागतात. त्यामुळे त्यांचे आगमन कोणालाच त्रासदायक वाटत नाही. त्यांची ठेंगणीठुसकी मूर्ती, पांढऱ्या शुभ्र खादीत एखाद्या बाहुलीप्रमाणे दिसते. त्या निसर्गोपचार पद्धतीच्या कट्टर समर्थक आहेत. आमच्या आई एकदा अत्यंत आजारी व क्षीण झाल्या असताना महात्मा गांधींनी दोन महिने त्यांना आपल्याजवळ ठेवून निसर्गोपचारांनी बरे केले होते. तेव्हापासून निसर्गोपचारांवर त्यांचा विश्वास असून त्यांचे खाणे-पिणेही त्यानुसारच असते. निसर्गोपचार पद्धतीचे त्यांचे ज्ञानही विकसित होत गेले आहे.

निर्मला गांधींना शिक्षण घेण्याची फार इच्छा होती परंतु देशाचे समर्थ प्रशिक्षण केंद्र असलेला साबरमती आश्रम हे त्यांचे सासर होते. त्या सून होत्या व म्हणून सर्वांचा मान ठेवणे व त्यांच्या सुखसोयींकडे लक्ष देणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य होते. या कारणाने शिक्षण घेऊन त्यांना स्वतःचा विकास करण्याची संधी लाभली नाही, अशी त्यांची मूक फिर्याद असायची हे लक्षात घेऊनच १९३७ मध्ये जेव्हा कॅलन बाख आमच्या वडिलांना आफ्रिकेस घेऊन गेले तेव्हा बापूजींनी आमच्या आईला डेहराडून येथील कन्या गुरुकुलात शिक्षणासाठी पाठविले. यावेळी कनू आजी कस्तुरबाजवळ राहिला तर उषाला निर्मला गांधीच्या आईने आपल्या जवळ ठेवून घेतले होते. मी अशक्त होते म्हणून आईबरोबरच डेहराडूनला गेले होते. तेथील गुरुकुलाचे संस्थापक आणि व्यवस्थापक रामदेवजी आणि ब्रह्मचारिणी विद्यावती यांच्या प्रेमळ आग्रहामुळे आईने प्रथम कोविद आणि नंतर विशारद परीक्षा पास केली. तिच्या या यशाचा बापूजी आणि विशेषतः मोटीबाला मोठे कौतुक वाटले. आईलाही आपल्या यशाचा आनंद वाटत होता. शाळेत शिक्षिका म्हणून काम करून आपल्या पतीला साहाय्य करावे अशी आईची इच्छा होती परंतु आम्हा तीन मुलांच्या विकासासाठी आमच्या आईने आपली महत्त्वाकांक्षा गाडून टाकली. तिने आपल्या पतीच्या आदर्शांचे पालन करीत आम्हा तिघाही मुलांना चांगल्या रीतीने वाढविले. आजही आम्हाला मदत करण्यास ती नेहमी तयार असते. माझ्या घरी काही अडचण आली, कोणी आजारी पडले तर आई माझ्याकडे येऊन मला

आधार देते. माझ्या तिन्ही मुलांनाही त्यांची ही आजी मित्राप्रमाणेच वाटते. राम, कृष्ण आणि सोनाली ही माझी तिन्ही मुले आपल्या आजीची प्रशंसक आणि समर्थक आहेत.

१९३४ पर्यंत आम्हा तिन्ही भावंडांचा जन्म झालेला होता. रामदास गांधींना स्वतःविषयी विशेष चिंता अथवा महत्त्वाकांक्षा नव्हती परंतु आपल्या तीन मुलांच्या संदर्भात मात्र त्यांना वाटत होते की, स्वतःची म्हणून स्वतंत्र आर्थिक क्षमता असली पाहिजे. आपल्या कुटुंबाची उपजीविका आश्रमाच्या खर्चाने चालावी हे त्यांना पसंत नव्हते. तसेच आपल्या मुलांच्या नियमित शिक्षणाची व्यवस्था करणे हे आपले कर्तव्य होय, असेही त्यांचे मत होते. रामदासच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था लावून द्यावी असे बापूजींना वाटले. आपल्या संन्यासी पित्यावर आपल्या मुलांच्या शिक्षणाचे ओझे टाकावे हे स्वाभिमानी रामदासना मान्य नव्हते. आम्हा तिघांच्याही शिक्षणाची योग्य व्यवस्था करण्यास बापूजी सिद्ध होते कारण रामदास आणि निर्मलाने विधायक कार्य करावे अशी त्यांची इच्छा होती. ज्या पित्याने आपल्या स्वतःच्या मुलांना कधी शाळा कॉलेजात पाठविले नव्हते त्यांना असे कष्ट देणे रामदास गांधींना अनुचित वाटत होते. आम्ही तिन्ही मुले रामदास गांधींची होतो आणि त्यांच्या भरणपोषणाची व शिक्षणाची व्यवस्था करणे ही त्यांचीच जबाबदारी होती. आणि ती निभावण्याचा त्यांचा अटळ आग्रह होता. रामदास गांधींना व्यापार करण्याची आता इच्छा नव्हती, कारण त्यासाठी आवश्यक ते स्वतःचे भांडवल त्यांच्याजवळ नव्हते; आणि मित्रांच्या पैशाच्या भरवशावर भागीदारीत व्यवसाय करणे त्यांना योग्य वाटत नव्हते.

आपल्या मित्रांचा हा गैरफायदा घेणे होय असे त्यांचे मत होते. नोकरी करण्याची इच्छा होती पण त्याबाबतीतही एक विचित्र द्विधा मनःस्थिती होती. रामदास गांधी इतके नम्र होते आणि स्वतःला ते इतके कमी लेखीत होते की, एखाद्या उच्च पदावर काम करण्यास आपण पात्रच नव्हतो, असे त्यांना वाटत होते. दुसरे असे की, आपल्या जगप्रसिद्ध पित्याचे नाव वापरून त्यांना नोकरी स्वीकारावयाची नव्हती. या द्विधा मनःस्थितीत रामदासनी नोकरीचे अनेक प्रस्ताव अस्वीकृत केले. आपल्या बापामुळे बडे लोक आपणांस नोकरीची भिक्षा वाढीत आहेत, असे त्यांना वाटे. मनातील हे द्वंद्व सर्वथा सुख, शांती, उत्साह आणि प्रसन्नता नष्ट करणारे होते. एखादा कोणी माणूस जर रामदास गांधींना साहाय्य करण्याची इच्छा व्यक्त करू लागला तर त्यात त्यांना गांधीजींच्या पक्षपाताचा वास येऊ लागे आणि ते ती नोकरी सोडून बाजूला होत असत. बापूजींच्या आदर्शांना व प्रतिष्ठेला थोडासाही धक्का न लागावा म्हणून अनेक लाभदायक प्रस्ताव सोडून रामदासनी नेहमी सामान्यातल्या सामान्य माणसाच्या आवाक्यातल्या नोकरीचा शोध केला. त्यांना जेव्हा कोणी गांधीजींच्या मुलाला साजेसा मान देत आणि सुखसोयी पुरवीत तेव्हा एखाद्या सामान्य माणसाला साजेसा सामान्य दर्जाच ते

स्वीकारीत. परिणामतः प्रत्येक काम ते जबाबदारी, प्रामाणिकपणा, निष्ठा, परिश्रम या साऱ्या उच्च संस्कारांना अनुरूप असे करीत परंतु मोबदला मात्र सामान्य कोटीतील मध्यमवर्गीयाला अनुरूप तेवढाच घेत असत. अंतर्मनातील या मंथनाने रामदास गांधींना सदैव कष्ट दिले. संक्षेपाने सांगावयाचे तर आपले वडील बंधू हरिलाल गांधी यांच्यापेक्षा ते अगदी भिन्न होते. आपल्या प्रतापी पित्याच्या बरोबरीने आपलेही सर्व काही व्हावे अशी हरिलालची महत्त्वाकांक्षा होती. रामदास गांधींचा प्रयत्न असे की-, आपल्या महात्मा पित्याच्या कीर्तीला कोठे धक्का न लागावा. या मानसिकतेमुळे त्यांचे आयुष्य कष्टात गेले.

१९३६ मध्ये तर अशी अवस्था होती की, आमचे वडील आपले नाव बदलून स्टेशनवर मजुरी करण्यासाठी तयार झाले होते. पण एवढ्या सन्माननीय पित्याचे नाव दडवून ठेवणेही सोपे नव्हते आणि आपला आकर्षकपणा आणि सुसंस्कृतपणा लपवून सामान्य बनणेही अवघड होते. या परिस्थितीत रामदास गांधींची प्रकृती नीट राहिनाशी झाली. दिवसभर भांडारात काम करीत पण काही खात नसत, कारण त्यांची भूकच मेली होती. मोटीबाला खूप चिंता वाटे. शेवटी तिने निर्णय केला की, बापूजींची सेवा करणारे तर अनेक आहेत; तेव्हा आता रामदासला एकटे सोडावयाचे नाही. रामदास आणि त्यांचा मुलगा कनू याला बरोबर घेऊन मोटीबा काही दिवस साबरमती आश्रमात राहिली. या काळात तिने आपल्या मुलाची आदर्श सेवा शुश्रूषा केली. ६५ वर्षांची मोटीबा २५ वर्षांच्या तरुण परिचारिकेच्या उत्साहाने आपल्या मुलाच्या नियमित पथ्यपाण्याची व दिनचर्येची काळजी घेत असे. कधी कधी रामदासना रात्रभर झोप लागत नसे तेव्हा मोटीबा शेजारी बसून त्यांच्या डोक्यावर थोपटीत असे. परंतु रामदासना भूकही लागत नव्हती व त्यांचा अशक्तपणाही दूर होत नव्हता. रामदासांचा आजार पथ्यपाण्याने जाणारा नव्हता. मुंबईस जाऊन आर्थिक स्वावलंबन लाभले तरच त्यांची प्रकृती ठीक राहील याची मोटीबाला कल्पना होती. शेवटी तिने रामदासना मुंबईस जाण्याची परवानगी देऊन टाकली आणि रामदास मुलाबाळांना सोडून नोकरीच्या शोधात बाहेर पडले. रामदासांचा नोकरीचा आग्रह आणि त्या बाबतीतील त्यांची भूमिका यांमुळे मोटीबा अत्यंत दुःखी झाली. हृदयात वेदना आणि डोळ्यात अश्रू घेऊन मोटीबाने आपल्या 'रामा'साठी काही पराठे आणि गुळाची मिठाई तयार करून प्रवासात शिदोरी म्हणून त्याच्याबरोबर दिली. ती उदास आणि खिन्न होती. त्यांचा मुलगा त्यांची मदत घ्यायला तयार नव्हता आणि या अथांग संसारात एकाकी होता.

# १०

# करुणामूर्ती रामदास

अत्यंत उदास आणि व्याकूळ मन:स्थितीत आमचे वडील मुंबईस आले. मुंबईत सदोबा पाटलांबरोबर छापखाना चालविण्याची बोलणी झाली परंतु ते जमले नाही. त्यानंतर म्हैसूर एम्पोरियममध्ये १०० रु. मासिक वेतनावर काम करू लागले. गवालिया टँकवर महिना १८ रुपये भाड्याची एक खोली घेऊन ते राहू लागले. या काळातच हरिलाल काकांनी धर्मांतर केले होते. काही दिवसांतच रामदासनी आपली पत्नी आणि मुलांनाही मुंबईस आणले. लहानग्या कान्हाला मात्र मुंबईचे बंदिस्त वातावरण पसंत पडले नाही. शाळेतदेखील तो उदासपणे बसलेला असे. हे कळाल्यानंतर मोटीबा सेवाग्रामहून आली आणि त्याला आपल्या बरोबर आश्रमात घेऊन गेली. मुंबईत नोकरी होती परंतु वडिलांची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच गेली. त्याच सुमारास कॅलन बाख भारतात आले. रामदासना अशा स्थितीत बघून ते अत्यंत दु:खी व नाराज झाले आणि त्यांना आपल्याबरोबर आफ्रिकेस घेऊन गेले. त्यांची अशी इच्छा होती की, रामदासने त्यांच्याबरोबर राहून आराम करावा आणि प्रकृती ठीक झाल्यावर एखादा व्यवसाय शोधावा म्हणजे त्याचे मन संतुष्ट राहील व लहानपणीचा हा प्रसन्नवदन मुलगा पुन्हा ताजातवाना बनेल.

आफ्रिकेत असलेले मणिलाल गांधी तीनचार वर्षांपासून भारतात आलेले नव्हते. रामदास आफ्रिकेत आलेले बघताच, 'इंडियन ओपिनियन'चे सारे काम त्यांच्यावर सोपवून ते परिवारासह मायदेशी आले. 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक नेहमीच आर्थिक अडचणींत असे आणि शिवाय त्याच्या हिशेबात घोटाळेही असत. ते रामदासना सहन होत नसत. अशारीतीने कॅलन बाख यांच्याकडे आरामात राहण्याऐवजी दिवसरात्र करावे लागणारे श्रम आणि साप्ताहिकासमोरील आर्थिक समस्यांच्या चिंतेत रामदास गुरफटले गेले. कागदाच्या एका इंग्रज कंपनीने तर साप्ताहिकावर खटला करण्याची नोटिसही दिली होती. अशा अवस्थेत, जन्मभूमी असलेल्या आफ्रिकेचे रोचक हवापाणी आणि तेथील ताजी फळे फुले रामदासच्या प्रकृतीला निरुपयोगी ठरली. एक वर्षानंतर मणिलाल गांधी आफ्रिकेत परत आले तोवर रामदास गांधींनी 'इंडियन ओपिनियन'ची स्थिती बरीच ठाकठीक केली होती आणि त्याची आर्थिक स्थितीही समाधानकारक केली होती. परंतु या धावपळीत रामदासांची प्रकृती मात्र अधिकच खालावली. रामदासना आफ्रिकेत आणून आपण त्यांना आरामही देऊ शकलो नाही

अथवा काही भरीव मदतही करू शकलो नाही; या जाणिवेने कॅलन बाख अस्वस्थ होते; परंतु त्यांचा निरुपाय होता. १९३८ मध्ये रामदास भारतात परत आले.

रामदासांचे धाकटे बंधू देवदास, साऱ्या गोष्टींचा बारकाईने विचार करणारे आणि चांगली समज असणारे होते. आपले बंधू रामदास यांचा आदर्शवाद आणि गांधीजींच्या नावाचा आधार न घेण्याचा त्यांचा आग्रह, यांची देवदासना यथार्थ कल्पना होती. त्यांना आपल्या भावाच्या मानसिक द्वंद्वाचीही कल्पना होती. आपल्या भावावर त्यांचे नितांत प्रेम व त्यांच्याविषयी सहानुभूती होती. देवदासनी आपल्या व्यक्तिगत संबंधांच्या बळावर टाटाच्या टॉमको कंपनीत, रामदास भाईंसाठी योग्य काम शोधले होते. या कामाचे वेतनही इतके जास्त नव्हते की, उपकार समजून रामदासनी ते अस्वीकृत करावे. अगदी मध्यमस्तरावरील काम होते. आमच्या वडिलांच्या पार्शी मालकाला त्यांच्या चारित्र्याची व स्वाभिमानी वृत्तीची जाणीव होती. त्यांनी महात्माजींचे पुत्र म्हणून विशेष सवलती दिल्या नाहीत परंतु त्यांच्या स्वाभिमानाचे मात्र सर्वतोपरी रक्षण केले. वेतन साधारण होते याचे रामदासना विशेष काही वाटत नव्हते. नोकरी करण्यात त्यांचा हेतू आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनून आपल्या मुलांना आधुनिक कालानुरूप शिक्षण देणे शक्य व्हावे हाच होता. त्यांना या साधारण वेतनातही समाधान होते. त्यांची पत्नी निर्मला गांधी आपल्या सामंजस्याने व कुशलतेने या साधारण वेतनातही घरसंसार व्यवस्थित चालवीत असे. बहुतेक कामे स्वहस्ते होत असत आणि काटकसर हा दैनंदिन जीवनाचा मूलमंत्र होता. परंतु यांत कोणाला कष्टही वाटत नव्हते व कोणाचा विरोधही नव्हता. निर्मला गांधी अन्नपूर्णेप्रमाणे घराच्या साऱ्या गरजा आणि घरी येणारे पै- पाहुणे यांची व्यवस्था निभावीत असे. पैसे नाहीत अशी घरात कधी ओरड झाली नाही. उधारी करणेही तापदायक वाटत होते. त्यामुळे अत्यंत काटकसरीने व सर्वथा शरीर श्रमांचा अवलंब करून, आमचे नागपूरचे घर चालत होते. १९३९ ते १९५१ ही बारा वर्षे रामदास गांधींनी टॉमकोच्या रीजनल मॅनेजरचे काम नागपुरात राहून केले. ही नोकरी स्वीकारताना बंगलोर आणि नागपूर या पर्यायांतून रामदासनी नागपूरची निवड केली, त्यात त्यांचा हेतू असा होता की, ५० मैलांच्या अंतरावर असलेल्या सेवाग्राममध्ये येणेजाणे सोयीचे होईल व मोटीबा आणि गांधीजींचा सहवास लाभत राहील. १९४१ पासून आम्ही तिन्ही मुले आपल्या आई वडिलांजवळ नागपूरला राहून शाळेत जाऊ लागलो होतो.

नागपुरात असताना दर शनिवारी, रविवारी आम्ही सेवाग्रामला बापूजींकडे जात असू. आमचे वडील शनिवारी दुपारच्या ट्रेनने येत असत. आम्ही सारेजण मात्र शुक्रवारी सायंकाळीच सेवाग्रामला पोहोचत असू. ७ ऑगस्ट, १९४२ ला आम्ही वर्ध्याच्या स्टेशनवर मोटीबा, बापूजी आणि महादेव काकांना निरोप दिला. येथे प्रथमच मी वडिलांना सद्गदित होताना

पाहिले. माझ्या वडिलांनी बापूजींना नमस्कार केला परंतु बापूजींनी त्यांना आपल्या बाहूंत घेतले. महादेव काका आणि माझे वडीलही एकमेकांना मिठी मारून भेटले. त्या दोघांत प्रेमाचे एक विलक्षण नाते होते. ८ ऑगस्टला बापूजींनी मुंबईत 'भारत छोडो'ची घोषणा केली. ९ ऑगस्टला सकाळी ४ वाजता बापूजी आणि महादेव काकांना अटक झाली. त्या काळात आमच्या वडिलांची उद्विग्नता बघवत नव्हती. सरकारचे दमनचक्र सुरू झाले होते. हजारो लोकांना पकडण्यात आले होते. शहरांत दररोज गोळ्या चालत.

शेकडो मित्र तुरुंगात गेले होते. आमचे वडील मात्र आमच्या शिक्षणात व्यत्यय न यावा म्हणून आपले मन मारून या सत्याग्रहापासून अलिप्त राहिले होते. तरीपण ते प्रत्येक दिवशी काँग्रेसच्या कार्यालयात जात. रिकामा वेळ असेल तेव्हा गोळीबार होणाऱ्या भागांतही ते हिंडत असत. माझ्या वडिलांच्या एका सहकाऱ्याने मला सांगितले की, एकदोन वेळेस गोळ्यांच्या सणसणाटातही ते निर्भयपणे लोकांना मदत करण्याचे काम करीत राहिले होते. हे सारे काम ते इतक्या शांतपणे व निर्भयपणे करीत असत की, सहकारीही चकित होत असत.

१५ ऑगस्टला, महादेव गांधींचा तुरुंगात मृत्यू झाल्याची बातमी रेडियोने दिली. प्रथम तर असेच वाटले की जुलमी सरकारनेच त्यांना मारून टाकले असावे, पण नंतर कळाले की, हृदयक्रिया बंद पडून त्यांना मृत्यू आला. हा मृत्यू माझ्या वडिलांना सख्ख्या वडील भावाच्या मृत्यूसारखाच वाटला. महादेव काकांच्या दुःखात माझ्या वडिलांना जेवणही जात नव्हते, आणि रात्री उशिरापर्यंत ते घराच्या गच्चीवर फेऱ्या मारत राहात. त्यांची व्याकुळता असह्य असे. हे दुःख काहीसे अंगवळणी पडू लागले असतानाच फेब्रुवारी, १९४२ मध्ये बापूजींनी २१ दिवसांचा उपवास जाहीर केला. या उपवासाच्या तणावपूर्ण परिस्थितीत आता महादेव काका नव्हते. सरकारची दडपशाही व बापूजींवर खोटे आरोप करणे वाढतच चालले होते. त्यामुळे एवढ्या वृद्धावस्थेत बापूजींना हा उपवास कसा सहन होईल याचीच चिंता माझ्या वडिलांचे मन कुरतडीत होती. मात्र त्याला काही उपाय नव्हता. उपवासाच्या काळात तुरुंगात गाठी-भेटीला मुक्तद्वार मिळाले होते. आणि सारेजण पुण्यास गेलो होतो आणि मोटीबा व बापूजींना रोज भेटत होतो. त्या दिवसांची आठवण आजही मला हादरवून टाकते. फारच कठीण दिवस होते! मोठ्या कष्टांनी एकवीस दिवसांचा उपवास पूर्ण झाला आणि बापूजींचे प्राण वाचले.

जेव्हा जेव्हा बापूजी आजारी पडत किंवा उपवास करीत तेव्हा तेव्हा माझे वडील अगदी व्याकूळ होत असत. त्यांच्याकरता बापूजी, नेता, महात्मा अथवा संत नव्हते. आमच्या वडिलांच्या जीवनात त्यांच्या माता पित्यांचे केंद्र स्थान होते. त्यामुळे माता पित्यांच्या अस्वस्थतेने त्यांचे संवेदनशील हृदय व्यथित होत असे, भयग्रस्त होत असे. त्याकाळी कोणा एका ज्योतिषाने आमच्या वडिलांना सांगितले होते की, त्यांच्या निकटच्या प्रेमातील व्यक्ती

मृत्युमुखी पडणार आहे. माझे वडील मला म्हणाले होते, "महादेव काका गेले; आता कोणाची पाळी आहे?" मोटीबा माझ्या वडिलांना व देवदास काकांना ठामपणे धीर देत असे की, "बापूजींना काही होणार नाही." बापूजी वाचले तर आपण आत्मार्पण करू असे तिने मनोमन ईश्वराला कबूल केले होते. ही गोष्ट आजीने कोणाला सांगितली नव्हती. गांधीजींच्या उपवासानंतर मोटीबाला, दोनतीनदा हृदयविकाराचे झटके आले. माझे आई वडील, दर दोन तीन महिन्यांनी मोटीबाच्या भेटीसाठी पुण्यास जात असत. आम्ही शाळेतून घरी येत असू आणि आई वडील दोघेही पुण्यास गेलेले असत. शेजारी सांगत की, सरकारची सूचना आल्यामुळे ते पुण्यास निघून गेले आहेत.

त्याकाळी आरक्षणाची भानगड नव्हती; सोयही नव्हती. गुराढोरांप्रमाणे का होईना, लोक आगगाडीने प्रवास करून आपापल्या ठिकाणी पोचत. बहुधा भ्रष्टाचार कमी होता. कोणी जादा पैसे देऊन तिकीट विकत घेतल्याची वा जागा मिळवल्याची मला आठवण नाही. धक्काबुक्की सहन करून डब्यात घुसायचे, अवजड सामान-सुमानाच्या रगाड्यात उभ्याने प्रवास करायचा, या सगळ्यासाठी साहसी वृत्ती गरजेची असे. काही वेळाने कोठे ना कोठे टेकावयास जागा मिळे. तेव्हा मात्र श्वास घेता येई! वरच्या वर्गाने प्रवास करण्याइतके तर आमचे उत्पन्न नव्हते. तेव्हा सारे हाल सहन करीत तिसऱ्या वर्गानेच प्रवास व्हायचा. बिचाऱ्या मोटीबाला प्रवासातील या त्रासाची जाणीव होती. आपल्या मुलाचे कष्ट तिला अस्वस्थ करून सोडी. पण मुलगा आपल्या आईच्या भेटीला जातच असे. एकदा माझे वडील मलाही आपल्याबरोबर पुण्यास घेऊन गेले. त्यावेळी देवदास काकाही तेथेच होते. आम्ही स्टेशनजवळच्या एका हॉटेलात जेवण घेतले. तेथे टेबलावर काटे, चमचे, सुऱ्या व्यवस्थित मांडलेल्या होत्या. आरंभी पद्धतशीरपणे सूप वाटण्यात आले. हॉटेलात खाण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. एवढे सारे काटे, चमचे कधी बघितलेच नव्हते. तेव्हा त्याचा उपयोग कसा करावा, तेही ठाऊक नव्हते. माझे वडील माझ्यासमोर बसले होते व काका बाजूला बसले होते. लांबूनच खुणा करून माझ्या वडिलांनी, कोणता चमचा कोणत्या कामासाठी वापरावा व काटा आणि चमचा कसा धरावा ते दाखविले. त्या दिवशी माझे जेवण अर्धवटच झाले. परंतु वडिलांनी केलेल्या खुणांनी व त्यांची गुपचूप नक्कल केल्याने प्रसंग निभावला, माझ्या पित्याने पाश्चात्त्य भोजनाची पद्धत मला एवढ्या नाजूकपणाने शिकविल्याने, नंतर अशा प्रसंगी माझ्यावर लज्जित होण्याचा कधी प्रसंग आला नाही. त्याचप्रमाणे मी जेव्हा अमेरिकेला जाण्यास निघाले तेव्हा, माझ्या वडिलांनी मला कोट कसा घालावा वा दुसऱ्याच्या अंगात चढवावा त्याची पद्धतही शिकविली होती. तसेच एखाद्या खाण्याच्या प्रसंगी कसे वावरावे तेही समजाविले होते. पाश्चात्त्य समाजातल्या सभ्य रीतिभातींचा पाठ दिला म्हणा ना. माझ्या जीवनातील सौंदर्याची जाण आणि लालित्य हा माझ्या पित्यांनी मला दिलेला उपहार होय.

२२ फेब्रुवारी, १९४४ ला मोटीबाचे तुरुंगात निधन झाले. मोटीबा अत्यवस्थ असल्याची बातमी कळताच माझे वडील नागपूरहून निघाले. परंतु त्यांची एक गाडी चुकली. नंतरच्या पॅसेंजर गाडीने पुण्याला पोहोचेपर्यंत मोटीबाचा प्राण निघून गेला होता. देवदास काकांनी अग्निसंस्कार सुरू केला होता. या अनिवार्य विलंबाची वेदना माझ्या वडिलांना जन्मभर जाणवत राहिली. हरिलाल काकाही तेथेच होते. मणिलाल काकांना वगळता अन्य तिघेही बंधू त्यावेळी जेलमध्ये उपस्थित होते.

मे, १९४४ मध्ये सरकारने बापूजींची सुटका केली तेव्हा माझे वडील आणि कनू, बापूजींना भेटण्यासाठी पाचगणीस गेले होते आणि नंतर आम्ही सर्वजण सेवाग्रामला गेलो होतो. हरिलाल काका तर तेथे नव्हते पण मणिलाल, देवदास आणि माझे वडील हे तिघेही बंधू प्रथमच सेवाग्राममध्ये एकत्र राहिले. पुढे १३ जानेवारी, १९४८ ला बापूजींनी दिल्लीत उपवासाला आरंभ केला. तेव्हा माझे वडील इतके व्याकूळ झाले की, तात्काळ विमानाने ते दिल्लीस गेले आणि बापूजींचा उपवास सुटल्यावर दिल्लीतच थांबले. २० जानेवारीला, बापूजींना थोडी शक्ती आल्यावर, माझे वडील नागपूरला परतले. बापूजींच्या प्रार्थनेच्या वेळी झालेल्या बॉंब स्फोटाच्या वार्तेनेही माझे वडील अत्यंत अस्वस्थ झाले. त्यांनी दिल्लीला फोनवर बोलणे केले तेव्हा बापूजी म्हणाले, "अशी काळजी करू नकोस. इकडे येण्याची आवश्यकता नाही. आता दोन दिवसांपूर्वी तर आपण भेटलो आहोत."

दहा दिवसांनंतर ३० जानेवारी, १९४८ ला, माझे वडील उशिरापर्यंत आपल्या कार्यालयात थांबले होते. घरी येताच बापूजींची गोळ्या झाडून हत्या केल्याची भीषण वार्ता कळाली. माझे वडील सुन्न झाले. असे काही घडू शकेल यावर विश्वासच बसत नव्हता. दहा दिवसांपूर्वी तर बापूजींशी बोलणे झाले होते आणि आता ते प्रेमळ उल्लासित हास्य कायमचे संपले होते. भारत सरकारच्या विमानाने सारा परिवार दिल्लीस पोहोचला. मात्र बापूजींचा पार्थिव देह बघून वेदना अधिक गडद होत होती. त्या कोमल सुंदर त्वचेने गोळीच्या यातना कशा सहन केल्या असतील, या कल्पनेनेच हृदय कंपित होत होते. सारे जग शोक मग्न होते. माझ्या वडिलांचे जीवन तर अंधकारमय झाले होते. रामदास गांधींनी आजीवन आपल्या पित्याच्या आदर्शांचे अनुपालन केले होते.

बापूजी त्यांचे मित्र, सखा, गुरू सारे काही होते. जीवनाचा हा दीपस्तंभ आता नेहमीसाठी शांत झाला होता, विझला होता. अशा व्यथेला शब्द नसतात. बोलून दाखविण्याचा काही लाभ नसतो, मूकपणे वेदना गिळून टाकणे हीच नियती असते. मणिलाल काका दूरवर आफ्रिकेत होते. हरिलाल काकांचा पत्ता नव्हता. माझे पिता मोठे असल्याने त्यांनीच बापूजींना अग्निसंस्कार केला. माझ्यासमोरच एका पुरोहिताने माझ्या वडिलांस सांगितले की, "आता

कपालक्रिया करा. या क्रियेत मृत देहाचे मस्तक मुरगाळले जाते. त्याविना अग्निसंस्कार पूर्ण होत नाही, अशी धारणा आहे. दोन वेळेस माझे वडील थबकले. आपल्या पित्याच्या देहाला कष्ट कसे द्यावेत, असा त्यांना संभ्रम पडला. या सर्व पारंपरिक आचार विचारांच्या संदर्भात वैदिक धर्म निष्ठुर पण स्पष्ट आहे. मृत्यूच्या संदर्भात माणसाला अनासक्त व्हावेच लागते. शेवटी माझ्या वडिलांनीही हृदय कठोर करून 'कपालक्रिया' केली. रूढीचे पालन केले. जानेवारी महिन्याच्या कडक थंडीच्या त्या सायंकाळी, चंदनाच्या धडकत्या चितेच्या लाल पिवळ्या प्रकाशात जवळ उभ्या असलेल्या माझ्या वडिलांची आणि काकांची विवर्ण व शोकग्रस्त मुद्रा आजही माझ्या डोळ्यांसमोर तरळत आहे. अशा प्रसंगी साऱ्या क्रिया यंत्राप्रमाणे होत जातात; परंतु दुःखाची खोली कोणाला जाणवत नसते.

स्नान इत्यादी आटोपल्यावर रात्री १० वाजता माझे वडील पुन्हा राजघाटावर गेले. आणि रात्रभर विझत्या चितेजवळ, मोटारीत बसून राहिले. महात्माजींचा एखादा श्रद्धाळू भक्त, व्याकूळ अवस्थेत तेथे येऊन, चितेतील अवशेषांसाठी ती चिवडून न टाको; या साठी त्यांनी ही खबरदारी घेतली होती. मोटारीत त्यांना झोप लागणे शक्य नव्हते, कारण ते अत्यंत विषण्ण व शोकाकुल होते. त्या आठ तासांच्या एकांतात आमच्या वडिलांनी कसला कसला विचार केला, ते मात्र त्यांनी कधीच कोणाला सांगितले नाही. कोणत्या भावोत्कट अवस्थेत पित्याला समर्पित असलेल्या रामदासनी आपल्या पित्याच्या पवित्र अवशेषांची निगराणी केली असावी याची आम्ही कल्पना करू शकतो. आता ते मोहक व्यक्तित्व पंचमहाभूतात विलीन झाले होते आणि मागे उरले होते ते केवळ चितेतील जळते निखारे आणि जळत्या स्मृती. पौषाच्या त्या निर्जन काळरात्रीप्रमाणेच वैराण जीवन समोर पसरलेले होते. रामदासच्या जीवनाची दीपशिखा अंतर्धान पावली होती. १ फेब्रुवारी, १९४८ ची सकाळ झाली. उगवत्या सूर्य नारायणाच्या किरणांत चितेतील निखारे भस्मधूसर दिसू लागले; तेव्हा दिल्ली काँग्रेस समितीच्या स्वयंसेवकांनी माझ्या वडिलांना घरी पाठविले. ४८ तासांनंतर थकले भागलेले माझे वडील घरी परत आले होते. माझे वडील अत्यंत मितभाषी होते, अधिक बोलणे त्यांना योग्य वाटत नसे. त्यामुळे आपल्या मनाची विकलता ते बोलून दाखवीत नसत. परंतु उत्तरात्तर आपले एकाकीपण घेऊन स्वतःतच त्यांचे मन संकोचू लागले होते. त्यांची व्यथा आणि बापूजीविषयींचे त्यांचे चिंतन किती गंभीर होते, याचे पुढील एकच उदाहरण पुरेसे होईल असे वाटते.

इंडियन पिनल कोडच्या कलम ३०२ अन्वये, नथुराम गोडसेवर गांधींच्या हत्येचा खटला जेव्हा भरला गेला तेव्हा, अशा अधम कृत्यासाठी त्याला फाशीची शिक्षा होणार हे निश्चित होते. त्यावेळी रामदास गांधींनी तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांना पत्र लिहिले

की, "नथुराम गोडसेला मृत्युदंड देणे बापूजींच्या अहिंसेच्या विरुद्ध होईल व त्यांच्या आत्म्याला क्लेश होतील. शेवटी नथुराम गोडसेच्या मृत्यूने बापूजी तर पुन्हा जिवंत होणार नाहीत. आम्हा परिवाराची झालेली हानी तर भरून येणार नाहीच. आमच्या पारिवारिक अथवा देशाच्या शोकात प्रतिहिंसा वा क्रोध यांचा सर्वतोपरी अभावच होता. आम्ही अत्यंत दु:खी होतो पण वैर करून काय होणार आणि कोणाशी वैर करणार? नथुराम तर केवळ निमित्त होता. याकरिता सूडाची भावना जागवून आपण बापूजींच्या जीवनभराच्या साधनेला धक्का लावणे इष्ट नव्हे. या मार्गाने अहिंसेच्या पुजाऱ्याचा अवमान होईल."

आपल्या पित्याच्या मारेकऱ्याविषयी अशी करुणा दाखविणारा, खून करणाऱ्या पापी माणसाला शासनाने क्षमा करावी अशी विनंती करणारा पुत्र जगात विराळाच म्हटला पाहिजे. चार पुत्र आणि चाळीस कोटी देशवासीयांत, आपल्या अहिंसेचा मूलमंत्र आत्मसात करणारी एकतरी व्यक्ती होती याचा जिथे असतील तिथे बापूजींना संतोष वाटला असेल! एवढ्या महापातकानंतरही गांधीजींच्या या पुत्राने त्या पातक्याशी वैरभाव धरला नव्हता.

केवढ्या विचारमंथनानंतर आमच्या वडिलांनी गृहमंत्र्यांना असे पत्र लिहिले असावे याचा आम्हाला अंदाजही करता येत नाही. या पत्रलेखनामागे दडलेली आपली मनोव्यथा, आपल्या अंत:करणातील रितेपण, उजाडलेपण त्यांनी आम्हाला कधीच बोलून दाखविले नाही. अशी उदात्त अहिंसा वृत्ती सरदार पटेलांच्या स्वभावात नव्हती. त्यांना रामदास गांधींचा हा दृष्टिकोण समजूच शकत नव्हता. रामदास गांधींच्या या पत्रानुसार, नथुराम गोडसेला मृत्युदंडाची शिक्षा न ठोठावली गेली असती तर कदाचित आज आमचा समाज, जातीयतेच्या नागदंशाच्या तावडीत सापडला नसता. गृहमंत्र्यांनी नथुरामवर खुनाचा खटला चालवून, त्याचा आत्मा आणि महात्मा गांधींचा आत्मा जणू एकाच पातळीवर आणला होता. बापूजींच्या सहकाऱ्यांच्या त्यांच्याविषयीच्या प्रेम, आदर यापोटी त्यांच्या अपूर्व, निष्कलंक, अहिंसक आत्मबलिदानाच्या श्रेष्ठ परिपूर्णतेला स्खलित केले होते.

अनेक वर्षे लोटली. माझ्या वडिलांची ही भावना सारे लोक विसरून गेले. आमच्या धावपळीच्या जीवनाच्या घाईगर्दीत आम्ही गोडसे नावही विसरून गेलो होतो. मुंबईच्या इस्पितळात माझे वडील मृत्युशय्येवर होते. तेव्हा एका उदास नीरव सायंकाळी त्यांच्या खोलीच्या दारावर थाप पडली. त्यावेळी मीच एकटी खोलीत त्यांच्याजवळ होते. माझे वडील शांत निश्चल पडून होते. मी दार उघडले, एक मध्यमवयीन गृहस्थ उभे होते. त्यांच्याबरोबर एक तरुणी होती. त्या तरुणीने माझ्या वडिलांच्या प्रकृतीची विचारपूस केली, आणि म्हटले, "हे गोपाळ गोडसे. आज सकाळच्या वृत्तपत्रातील बातमी वाचून ते पुण्याहून आजारी रामदास गांधींना भेटावयास आले आहेत." हे ऐकूनही माझ्या मेंदूत काही प्रकाश पडला नाही.

मी म्हणाले, "मी तर आपले नाव कधी ऐकलेले नाही. माझे वडील फार आजारी आहेत, अशा अवस्थेत त्यांना त्रास देणे बरे नव्हे. आपण आता जावे." तो मध्यमवयीन गृहस्थ आश्चर्यचकित आणि अस्वस्थ झाला होता. कदाचित त्यांना वाटले असेल की, आपल्या पितामहाच्या मारेकऱ्याचेही नाव न आठवणारी ही कसली स्त्री आहे? पण माझे त्यांच्याकडे लक्षच नव्हते. माझ्या वडिलांना कोणा अपरिचिताने त्रास न द्यावा, असा मी निश्चय केला होता. ते गृहस्थ म्हणाले, "बघा, रामदास गांधी हेच एकटे असे होते की, ज्यांनी गांधी खून खटल्यात आमचा जीव वाचविण्याचा प्रयत्न केला होता. मी या सज्जन माणसाला आजीवन माझ्या हृदयी धरून ठेवले आहे. मी त्यांना त्रास देणार नाही. त्यांच्या पायांना हात लावून मी कृतार्थ होऊ इच्छितो. आमच्या मनात तर रामदास गांधी महात्माजींपेक्षाही मोठे आहेत."

आता मात्र माझी वाचा बंद झाली. गोपाळ गोडसेदेखील बापूजींच्या हत्याकांडात सहभागी होते. त्यांना फाशी न होता, वीस वर्षे कारावासाची शिक्षा झाली होती आणि त्यानंतर, कारावासातून मुक्त झाल्यावर ते पुण्यात राहात होते. नथुराम गोडशांच्या विम्याचे दहा हजार रुपये, गोपाळ गोडशांच्या पत्नीला मिळाले होते. त्याच्या या वक्तव्याने मी हतबद्ध आणि निःशब्द झाले. माझ्या समोरच, माझ्या आजोबांना कमी लेखून माझ्या वडिलांना श्रेष्ठ ठरविण्याचा त्याचा हा प्रकार मला बरा वाटला नाही. अशा वाक्यचातुर्याने मला प्रसन्न करणे कठीण होते. परंतु गोपाळ गोडसेंना मी अडवू शकले नाही. ते दोघे आत आले. माझ्या पित्याकडे बघून गोपाळ गोडसेंनी त्यांच्या पायांना हात लावून नमस्कार केला, तेव्हा माझ्या वडिलांनी डोळे उघडले. "पुण्याहून गोपाळ गोडसे भेटायला आले आहेत." एवढेच बोलून मी गप्प झाले. वडिलांनी आपले कृश हात उचलून त्यांना नमस्कार केला व डोळे मिटून घेतले. अधिक काही बोलून, अंतःकरणात दडून असलेले दुःख जागे करण्याची माझ्यात हिंमत नव्हती. आता तर माझे वडीलही निरोप घेण्याची तयारी करीत होते. मी काय विचारू आणि काय बोलू? गप्प राहाणेच श्रेयस्कर होते. दोन दिवसांनी वडिलांचा मृत्यू झाला.

आता मी वृत्तपत्रात वाचते की, गांधीजींनी मृत्युसमयी 'हे राम' हे शब्द उच्चारलेच नव्हते असे गोपाळ गोडसे म्हणतात. हा काय बालिशपणा आहे? ही कसली घोर वंचना? असे होते तर चाळीस वर्षांपूर्वीच त्यांनी याचे खंडन करण्याची हिंमत का दाखविली नाही? ही घटना घडली तेव्हा गोपाळ गोडसे तर जवळपास कोठेच नव्हते. त्यामुळे त्यांना तर काहीच माहीत असू शकत नव्हते. परंतु चाळीस वर्षांनंतर असा खोटा वाद निर्माण करून जर गोपाळ गोडसेंना समाधान लाभत असेल तर तसे करण्यास ते स्वतंत्र आहेत. आम्हा गांधी कुटुंबीयांची त्यांना आडकाठी नाही.

# ११

# नैष्ठिक रामदास गांधी

रामदास गांधीच्या १२ वर्षांच्या नागपूरच्या वास्तव्याचे दोनतीन विशेष होते. शहरात राहून ते नोकरी करीत होते परंतु घरातील वातावरण मात्र आश्रमजीवनासारखे होते. कसलेही अवडंबर नसलेला साधेपणा आणि शरीरश्रमांना महत्त्व ही वैशिष्ट्ये होती. सेवा आणि स्वावलंबन हा आमच्या जीवनाचा मूलमंत्र होता. संडास आणि घरासमोरची उघडी गटारं साफ करण्याचे मोठे काम आमचे आईवडील करीत. आम्ही मुले बादलीने पाणी घालीत असू आणि आमची आई किंवा वडील, शेजारच्या दोन-तीन घरांपर्यंतची गटारं साफ करीत असत. आमचे घर लहान आणि जुन्या पद्धतीचे होते. मात्र मागचेपुढचे अंगण स्वच्छ करून व शेणाने सारवून आम्ही ते सुंदर बनविले होते, मला आणि उषाला फरशी स्वच्छ करण्याची एवढी सवय जडली होती की, दिवसातून तीनचार वेळा साऱ्या खोल्या आम्ही पुशीत असू. त्यामुळे घरातील फरशी एवढी स्वच्छ होत असे की, दिवसाच्या वेळी, मागल्या स्वयंपाकघरातही उषा, कनू किंवा मी खाली काही न अंथरता गार फरशीवर झोपून आपला थकवा घालवीत असू व आईच्या मांडीवर झोपल्याचे सुख अनुभवीत असू. आमच्या घरात आलमाऱ्या इत्यादींचा संपूर्ण अभाव होता. वडिलांच्या उपयोगाचे कागद, पेन्सिल किंवा त्यांचे लहानसे नेलकटर आणि बापूजींनी दिलेली श्रीमद्‌भग्वत्‌गीता व जॉन व बनियनचे पिलिग्रिम्स प्रोग्रेस यांसारखी त्यांची दोनचार पुस्तके सारी एका खिडकीत ठेवलेली असत. आम्ही एका पांढरा खादीचा कपडा खिडकीत अंथरून ठेवला होता. उषाने या कपड्यावर वेलबुट्टी काढली होती. प्रत्येक आठवड्याला हा कपडा स्वच्छ धुतला जाई आणि त्यामुळे खिडकी चमकू लागे या खिडकीतच दोन विशेष वस्तू होत्या एक रमण महर्षींचे सौम्य सुंदर चित्र आणि दुसरी 'ईव्हिनिंग इन पॅरिस' या सेंटची लहानशी गडद निळ्या रंगाची बाटली. माझ्या वडिलांना अत्तर आवडत असे. रमण महर्षींना ते सिद्धपुरुष मानीत असत. आमच्या घरातील पैसे, पासिंगशो सिगरेटच्या टिनच्या डब्यात टाकलेले असत. ज्याला जेवढी गरज असेल तेवढे पैसे स्वतःच तो त्यातून काढीत असे. काढलेल्या पैशातून खर्चानंतर जे उरत ते परत त्या डब्यातच टाकले जात. माझ्या आई वडिलांच्या ठायी आढळणारी शुचिता इतक्या उच्च कोटीची होती की, तो डबा व त्यातील साधारण शिल्लक ही कधीच संपत नसे, या डब्यात कधी खणखणाट होत नसे. आम्हा सर्वांचे कपडे गाठोड्यांमध्ये बांधून

बांबूच्या कामट्यांच्या एका तख्तावर ठेवलेले असत. मला आणि उषाला ही व्यवस्था त्रासदायक वाटत असे परंतु आमच्या वडिलांना अलमारी बाळगणे अनुचित वाटत होते. मी थोडी मोठी झाल्यावर, ज्येष्ठ कन्येच्या अधिकाराचा वापर करण्याचे धाष्टर्य बाळगून एका सुताराला कपड्यांसाठी एक अलमारी बनवून देण्यासाठी सांगितले. एका दुपारी अलमारी घरी पोहोचली. मोठ्या आनंदाने मी आणि उषाने अलमारीत सारे कपडे व्यवस्थित ठेवले. वडिलांचे शर्ट अलमारीत बरोबर बसले. खोलीतील कपड्यांचा पसारा आलमारी ठाकठीक बसल्याने खोली स्वच्छ मोकळी ढाकळी आणि मोठी वाटत होती; याचा आम्हा दोघींना खूप आनंद वाटत होता. सायंकाळी ऑफिसमधून घरी आल्यावर वडिलांनी अलमारी बघितली आणि हसून म्हणाले, "या घरात अलमारीत ठेवण्याजोग्या वस्तू आहेत, याचा आता चोराला पत्ता लागणार" आम्हा सर्वांना त्यांच्या बोलण्याचे मर्म कळाले पण आम्हा दोघा बहिणींच्या आनंदाला व उत्साहाला सीमा नव्हती ७५ रुपयांची ती अलमारी आजही माझ्या घरी आहे. माझ्या वडिलांच्या अपरिग्रहाच्या आग्रहाची आठवण देऊन मूकपणे ती मला टोमणा मारीत असते. आमच्या त्यावेळच्या त्या अत्यंत सामान्य घरातही देशातील मोठमोठे नेते आमच्या वडिलांच्या भेटीस येत असत. सेवाग्राम आश्रमाचे नागपुरात काहीही काम असले तरी नागपुरात ते आमच्या घरूनच पुरे केले जात असे. बापूजींच्या भेटीस येणारे देशभरातील अनेकजण रात्रीबेरात्री आमच्या घरी येत व मुक्काम करीत. या सर्व पाहुण्यांचे आमचे आईवडील अत्यंत प्रेमाने स्वागत करीत. रात्री ११-१२ वाजता उठूनही पाहुण्यांसाठी स्वयंपाक केला जात असे. माझ्या वडिलांच्या साधारण उत्पन्नांत या सर्व येणाऱ्याजाणाऱ्यांना उदारतेने खाऊपिऊ घालणारी माझी आई जणू अद्‌भुत अन्नपूर्णाच होती. ही किमया तिला कशी साधत होती ते एक ईश्वरच जाणे. पैसे कमी पडतात अशी तिने कधीच तक्रार केली नाही. आमच्या साधारण प्रतीच्या घरात दहापंधराजणांची नीटनेटकी व्यवस्था होत असे माझ्या आईवडिलांच्या ह्रदयात विशालता असल्यामुळेच या लहान घरातही काही कमी पडत नसावे. बापूजींचे सारे रुग्ण आपल्या उपचारांसाठी नागपूरला येत व आमच्या घरी राहत. त्यापैकी, आचार्य कृपलानी, आचार्य नरेंद्र दवे, किशोरीलाल मश्रूवाला, स्वामी आनंद असे काही लोक मला विशेष आठवतात. या घरीच सरदार पटेल भेटायला व जेवायला येत असत. त्याकाळचे मध्य प्रांताचे गव्हर्नर, पट्टाभी सीतारामय्या अनेकदा घरी भेटावयास येत असत. जवाहरलालजी नेहमी निरोप पाठवून आम्हाला राजभवनात बोलावून घेत असत. असे साऱ्या मोठ्या लोकांचे येणे जाणे चालू असे. परंतु आम्हाला आमच्या गरिबीचा काही संकोच अथवा त्रास वाटत नव्हता. स्वावलंबनाची स्वतःचीच एक प्रतिष्ठा आणि समाधान असते. या घरातच माणिलाल काका आठवडा-आठवडा आमच्याबरोबर राहिले होते आणि देवदास काका व हरिलाल काकाही येत-जात असत.

रामदास गांधी आपल्या करुणेसाठी प्रसिद्ध होते. त्यांना सामान्यत: पायी चालणे आवडत असे. क्वचितच कधी माणसाने ओढल्या जाणाऱ्या रिक्षात ते बसत असत. आम्ही सारेजण बाहेर निघत असू तेव्हा बहुधा पायीच चालत असू. परंतु कधी रिक्षा करणे भागच पडले तर आमचे वडील मात्र रिक्षाच्या मागे मागे पायी चालत असत व रिक्षा ढकलून दुबळ्या रिक्षावाल्यास साहाय्य करीत असत. साऱ्या नागपुरात अशी सहानुभूती असणारे बहुधा रामदास गांधी एकटेच असावेत आणि त्यामुळेच जवळजवळ सारे रिक्षावाले त्यांच्या मनातील करुणा ओळखीत असत. एकदा आमच्या घरी गरम पाण्याच्या रबरी पिशवीची गरज होती. वडिलांनी एका ऐवजी दोन रबरी पिशव्या विकत आणल्या. वाटेत एक लंगडा भिकारी वेदनेने विव्हळत होता. त्यांनी आपल्याजवळची एक पिशवी तेथेच त्याला देऊन टाकली. घरी एकच पिशवी आली. त्यांनी दोन पिशव्या विकत घेतल्याचे कळाले तेव्हा आम्ही दुसऱ्या पिशवीसंबंधी खूप विचारले पण ते एवढेच म्हणाले, "एकाला गरज होती म्हणून देऊन टाकली".

१९४३ च्या सुमारास, चांगल्या कंपन्यांतून जर्मन पेन्सिलींचा वापर होत होता. तशीच एक पेन्सिल मी माझ्या वडिलांजवळ बघितली होती. त्या पेन्सिलीने एवढी चमकदार अक्षरे उमटत की, मी तिच्यावर मोहित होते. 'मी ही पेन्सिल घेऊ का?' असे मी वडिलांना विचारले. ते म्हणाले, "ही कार्यालयातील वस्तू आहे आम्हाला ती घेता येणार नाही." त्यानंतर ऑफिसच्या वस्तू वापरण्याचा मला कधी मोह पडला नाही. अनेक वर्षांनंतर मी स्वत: नोकरी करू लागले. एकदा एक उत्तम डिंकाची बाटली, काही कागद, पेन्सिल, पिना, टाचण्या अशा माझ्या उपयोगाच्या वस्तू घेऊन माझा सेक्रेटरी माझ्या घरी गेला. माझ्या आईने विचारले, "हे कुणासाठी आणि कशाला?" सेक्रेटरी म्हणाला, "बाईसाहेब घरी फाईली पाहतात. त्यांच्यासाठी आणले आहे" आई म्हणाली, "हे सारे परत घेऊन जा, आमच्या मुलीला कागद, पेन्सिल लागली तर आमच्या घरी आहे. या घरात सरकारी कार्यालयाचा माल चालणार नाही."

आपल्या कामाच्या संदर्भात माझ्या वडिलांना बराच प्रवास करावा लागे, त्यात पहिल्या वर्गाचा खर्च, भत्ता इ. मिळत असे. परंतु त्या दिवसात अनेकदा पहिल्या वर्गात जागा मिळत नसे आरक्षणाची पद्धत सुरू झालेली नव्हती त्यामुळे कधी दुसऱ्या तर कधी तिसऱ्या वर्गानेही त्यांना प्रवास करावा लागे. अशा स्थितीत ज्यावर्गाने प्रवास केला असेल त्याच वर्गाचा खर्च ते घेत असत. त्यांचा हा प्रामाणिक व्यवहार अनेकदा त्यांच्या सहकाऱ्यांना उमगत नसे. जग काय म्हणते अथवा काय करते याच्याशी माझ्या वडिलांना काही कर्तव्य नव्हते ते नि:स्पृह व निरपेक्ष होते. आपल्या स्वीकृत आदर्शाच्या विरुद्ध काम करणे रामदास

गांधींना कठीण होते, अशक्य होते. तत्त्वांच्या विरुद्ध असलेल्या गोष्टींचे माझे वडील समर्थन करू शकत नसत. तत्त्वांचा हा हट्ट कधीकधी महाग पडत असे. त्यांचा आदर्शवाद अनेकदा त्यांना अप्रिय बनवीत असे. आमच्या वडिलांना मात्र अशा लोकप्रियतेची लालसा नव्हती आणि म्हणूनच त्यांनी या बाबतीत कधी तडजोड केली नाही. परिणामतः तर समाजात त्यांना एकाकी राहावे लागले.

आमचे वडील मानीत की, ते अशिक्षित आहेत आणि त्यांची जाण कमी आहे. त्यांचे हे म्हणणे मला कधी बरोबर वाटले नाही. आपल्या फुरसतीच्या वेळी माझे वडील जॉन बनियनचे 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस' हे पुस्तक वाचीत असत. हे अत्यंत गंभीर पुस्तक आहे. त्याचे आकलन करणे आणि त्याचा आनंद घेणे उच्चपातळीवरील साहित्य रसिकालाच जमू शकते. त्याच प्रमाणे अमेरिकन लेखिका पर्लबक आणि अन्य साहित्यकारांची गोडी मला आपल्या पित्यामुळेच लागली. त्यांच्या संग्रहातूनच मी अशी पुस्तके वाचली होती. इंग्रजी साहित्यांचे प्रेम मला आपल्या वडिलांपासूनच लाभले आहे. त्याचप्रमाणे आमच्या आश्रम-प्रार्थनेचा सुंदर अर्थही माझ्या वडिलांनीच मला समजाविला होता. विष्णू, लक्ष्मी आणि श्रीगणेशाच्या स्तुतीचा अर्थ मला प्रथम माझ्या वडिलांनीच उलगडून दाखविला होता पुढे अनेक वर्षांनी मी पं. बनारसीदास चतुर्वेदी यांच्या भेटीसाठी फैजाबादला गेले होते. ते माझ्या वडिलांना ओळखत होते याची मला कल्पना नव्हती. त्यांनी माझ्या वडिलांविषयी जो आदरयुक्त सद्भाव व्यक्त केला त्याने मी सद्गदित झाले. पंडितजींनी आपल्या फाईलींतून माझ्या वडिलांची त्यांना आलेली पत्रे दाखविली. त्या पत्रांची भाषा आणि त्यांतील आशय एखाद्या साहित्यिकाला शोभणारा असाच होता. त्यांचे इंग्रजीही निर्विवादपणे उत्कृष्ट होते. आपली योग्यता आणि आपले गुण लपवून स्वतःला कमी लेखण्याच्या रामदास गांधींच्या विनयशीलतेनेच लोकांचा असा समज झाला होता की, ते अशिक्षित आहेत.

माझ्या शिक्षणाचे शेवटचे वर्ष होते. माझ्या वडिलांच्या प्रकृतीची आम्हा सर्वांना चिंता लागून होती. ते दिवसभर काम करीत असत पण काही खाऊ शकत नसत. पातळ ताक अथवा चहाच्या कपावर सारा दिवस काढीत असत. तेव्हा देवदास काका आणि आम्ही सर्वांनी आग्रह केला की, त्यांनी आता नोकरी करण्याची काही गरज नाही, कारण आमचे शिक्षण पूर्ण होत आले होते आणि कनूला शिष्यवृत्ती मिळत होती. आम्हा सर्वांना आमचे वडीलच सर्वाधिक महत्त्वाचे होते आणि त्यांचे अस्तित्व आमच्या सुखसमाधानाचा स्रोत होता. खूप समजूत काढल्यावर आणि विशेषतः देवदास काकांच्या गोड उपरोधपूर्ण शब्दांमुळे त्यांनी १९५५ मध्ये नोकरी सोडून दिली. आता त्यांना 'कांचन मुक्ती' हवी होती नागपूर सोडून ते सेवाग्रामला राहावयास गेले. सेवाग्रामास जाण्यापूर्वी माझे वडील मला म्हणाले, "आता

मला पैशांची काय काळजी आहे? तुझ्या आईच्या काटकसरीने व कौशल्याने सारा खर्च जाऊनही बारा हजार रुपये बँकेत आहेत. ते मी तुझ्या नावे करून देतो. तू बँकेचे खाते बघ आणि तुझ्या 'बा'ला सांभाळ" माझ्या वडिलांना मी आता ओळखू लागले होते. सरळ विरोध केलावर ते कांचन मुक्तीचा आग्रह धरणार हे मला माहीत होते. तेव्हा मी म्हटले, "पिताजी अशी चूक करू नका. कुणास ठाऊक मी कधी कोणाबरोबर निघून गेले तर बिचारी 'बा' विनाकारण त्रासात पडेल. तरुण मुलीचा विश्वास कसा धरावा? पैसे तुम्ही तुमच्या नावावरच ठेवा. चेक वटविण्याचे काम मी करीत जाईन." माझ्या वडिलांनी स्मित केले आणि ओळखले की, आम्ही त्यांना पूर्णमुक्त करण्यास तयार नाहीत. त्यानंतर मी स्वतः मिळवू लागेपर्यंत त्यांचे बँकेचे काम मी करीत असे. माझे आईवडील न पाहताच चेकवर सही करीत असत. मला फसविण्याची अथवा चोरी करण्याची इच्छा झाली नाही, हे नशीबच म्हटले पाहिजे. नंतर कनूही कमावू लागला आणि माझे पैसेही येत असत, त्यांवर सारे काम भागत असे बँकेतील वडिलांच्या पैशाला हात लावण्याची पाळी कमीच येत असे.

सेवाग्राममध्ये माझे वडील खादी आणि शेतीचे काम बघू लागले. या सार्वजनिक संस्थांतील बापूजींच्या काळची शिस्त कमी होऊ लागली होती. व्यवहारातला चोखपणाही कमी होऊ लागला होता. पैशाचे आकर्षण वाढत होते आणि सेवावृत्ती कमी होऊ लागली होती. या सार्वजनिक संस्थांत काही लोकांनी आपला एकाधिकार चालविणे सुरू केले होते. बरेच जण तत्त्वांच्या शुद्धतेचा खेळखंडोबा करीत असत. पाखंड आणि द्वेष वाढीला लागला होता. नव्या जुन्या कार्यकर्त्यांची बेपर्वाही, अशुद्ध व्यवहार, चारित्र्यहीनता आणि भ्रष्टाचार यामुळे माझ्या वडिलांना फार दुःख होत असे. तसे तर कोणत्याच क्षेत्रात हे अवगुण नसले पाहिजेत परंतु समाजसेवेच्या क्षेत्रात तर ते असह्यच होतात. अशा दांभिक समाजसेवकांमुळे लोकांचे नुकसान होते. त्यामुळेच सामान्य जनतेत या गांधीवादी ठेकेदारांची नावड निर्माण झाली होती. बापूजींनी चालविलेल्या विधायक संस्थांमध्ये चालणारा अपव्यय आपसांतील भांडणे, निरर्थक चर्चांचे पाखंड आणि आर्थिक भ्रष्टाचार बघून माझ्या वडिलांची तडफड होत असे. अनेकदा ते सर्वांसमक्ष अशा लोकांना वस्तुस्थितीची जाणीव करून देत त्यांना समजावीत आणि त्यांच्याशी चर्चाही करीत. परंतु विधायक कार्यकर्ता जेव्हा समाजसेवेचे सोंग घेऊन अंतर्यामी स्वार्थ साधनेच्या मागे लागलेला असतो तेव्हा अशा माणसाला सुधारणे अथवा त्यांचे ढोंग जाहीर करून संस्थेला वाचविणे कठीण होऊन बसते. या कठीण वाटचालीस माझे वडील एकाकी पडत असत. त्यांना साहाय्य करणारा अथवा त्यांचे समर्थन करणारा कोणी नसे. साहजिकच त्यांना क्लेश होत आणि ते संतापत. अप्रामाणिकपणा आणि ढोंग त्यांना असह्य होई तेव्हा ते उपवास करीत अशारीतीने त्यांच्या वानप्रस्थ

जीवनातही संघर्ष उभा राहत गेला. त्यांची टीका इतकी रास्त असे की, त्यांना विरोधही कोणी करू शकत नसे.

मध्यप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री रविशंकर शुल्का यांच्या भ्रष्टाचाराची त्याकाळी खूप चर्चा होत होती. भिलाईच्या पोलादाच्या कारखान्याची कंत्राटे देण्याच्या संदर्भात मोठे वादंग माजले होते. माझ्या वडिलांना अशा भ्रष्टाचारांची तीव्र घृणा होती. माझ्या वडिलांनी या संदर्भात पंडित रविशंकर शुक्लांशी घातलेला वाद आणि त्यांची कलेली निर्भर्त्सना मला आजही आठवते. वडिलांच्या मित्रांनी मोठ्या प्रयत्नांनी त्यांना समजाविले होते आणि शुक्लांनी काही आश्वासनेही दिली होती. याच काळात उरळी कांचनच्या निसर्गोपचार केंद्रातील एका उत्साही डॉक्टरने माझ्या वडिलांना प्रकृती सुधारण्यासाठी १४ दिवस उपवास करावयास लावले. त्यांचे वय आणि शरीर प्रकृती लक्षात घेता इतका दीर्घ उपवास सर्वथा अयोग्य होता. परिणामत: माझे वडील काही दिवस अत्यंत अशक्त बनले. या अशक्तपणामुळे त्यांना तत्काळ लवकर राग येऊ लागला. त्यांना बेइमानी, भ्रष्टाचार, बेपर्वाई, अपव्यय आणि असभ्य वर्तन सहन होत नसे व अशावेळी ते लागलीच संतप्त होत. जग मोठे निष्ठुर असते. आश्रमातील जुने परिचित लोक म्हणू लागले, "रामदास गांधींचा मानसिक तोल गेला आहे" असा प्रचार करण्यातही लोकांना आनंद वाटत असतो. त्या परिस्थितीत मोटीबाची घनिष्ठ मैत्रीण असलेल्या मरोलीच्या कस्तुरबा आश्रमातील मिठू बहेन पेटिट यांनी रामदास गांधींना मोठा आधार दिला. त्यानंतर थोड्याच दिवसात आमचे वडील पूर्णपणे बरे झाले. परंतु त्यांचा सदाचाराचा आग्रह अनेकांना बोचत असे कारण त्यांच्या म्हणण्यात तथ्य असे.

भ्रष्टाचार वाढत असलेल्या समाजात, रामदास गांधीसारखा नि:स्वार्थ निष्कपट, निष्ठावान आणि सत्य बोलून दाखविणारा माणूस लोकांना आवडत नसतो. प्रत्यक्ष आमच्या घरातही वडिलांच्या अशा आग्रहाचा अनादर होत असे. मलाही त्याचा अनेकदा त्रास वाटे. आम्हाला वाटे की, या रीतीने नसती आफत कशाला ओढवून घ्यावी? भ्रष्टाचारी व्यक्तीच्या तोंडी लागण्यात काय अर्थ आहे? माझ्या वडिलांचे हे विचार उत्कृष्ट होते. असे मला त्यावेळीही वाटत होते आणि आजही माझा तसा दृढ विश्वास आहे. परंतु त्यांच्यामागे संघटित शक्ती, संपत्ती अथवा मैत्रीचे बळ नव्हते. आणि त्यामुळेच लोकांनी त्यांच्या म्हणण्याची पर्वा केली नाही. रामदास गांधींच्या अप्रिय वाटणाऱ्या बोलण्यातही किती तथ्य होते याची मात्र सर्वांनाच कल्पना होती. माझ्या वडिलांनी ज्या लोकांवर टीका केली होती अथवा ज्यांना विरोध केला होता, त्या सर्वांचे वास्तव स्वरूप आता उघडे झाले आहे. जवळपास साऱ्याच संस्था आता अगदी अपयशी ठरल्या आहेत. तत्कालीन लोकांचा स्वार्थ

आणि सत्तालालसा आज सर्वांना परिचित झाली असून त्याबद्दल सारे जण आज त्यांना दूषणे देत आहेत. मात्र १९६०-६५ मध्ये याच लोकांना जेव्हा रामदास गांधी विरोध करीत होते तेव्हा अनेक जण त्यांचा उपहास करीत असत. रामदास गांधीचे चारित्र्य आणि पायाभूत मूल्यांवरील श्रद्धा एवढी दृढ होती की, त्यांना कोणी विचलित करू शकत नसे. लोकांनी रामदास गांधींची चेष्टा केली असेल; त्यांचा उपहास केला असेल; आणि स्वतः रामदास गांधींना बरेच दुःख, कष्ट भोगावे लागले असतील, तरीपण आपल्या आदर्शांपासून ढळल्याचा आरोप मात्र चुकूनही कधी त्यांच्यावर कोणी करू शकणार नाही. कोणाविषयी त्यांच्या मनात शत्रुत्व नव्हते. आणि त्यांच्यावर नाराज असलेले असंतुष्ट लोकदेखील त्यांच्या सत्यप्रियतेची, चारित्र्याची आणि धैर्याची प्रशंसाच करीत असत. त्यांच्या जीवनाची एकापरीने ही सफलताच म्हटली पाहिजे.

१९५९ मध्ये उच्च शिक्षणासाठी मी अमेरिकेला जावयास निघाले तेव्हा मी वडिलांना विचारले, "भाई, तुम्हाला अमेरिकेहून काय आणू? मोटार आणू काय?" ते म्हणाले, "आपल्याला मोटर घेऊन काय करावयाचे आहे? परदेशी वस्तू आपल्या घरात शोभत नाही. तू माझ्यासाठी आल्याची मिठाई घेऊन ये आणि शिकूनसवरून इकडे परत ये. मला एवढेच पुरे."

आमच्या वडिलांनी आपल्या जीवनात खूप दुःख बघितले होते. गरिबी आणि प्रकृतीचा त्रास तर सहन केला जाऊ शकत होता, परंतु त्यांच्या साऱ्या प्रिय व्यक्ती त्यांच्यासमोरच मरण पावल्या होत्या. परम स्नेही, वडील बंधूच असे महादेव देसाई जेलमध्येच मरण पावले होते. स्नेहमयी माता कारागृहातच झिजून झिजून संपली होती. बापूजींनी जीवनभर एवढे उपवास केले, कष्ट सोसले आणि अनेकदा मृत्यूच्या दारातून परतले आणि शेवटी एका माथेफिरूच्या गोळ्यांनी त्यांच्या देहाची चाळणी केली. त्यांचे प्रिय वडील बंधू हरिदास व्यसनी बनले आणि जीवनप्रवाहातील भोवऱ्यात गरगरत राहिले व शेवटी घरदारापासून दूर एकाकी अवस्थेत क्षयनिग्रस्त होऊन एका अज्ञात इस्पितळात मृत्युला शरण गेले. अत्यंत निरोगी असलेले त्यांचे बंधु मणिलाल दूरवर आफ्रिकेत पक्षाघाताने हतबल होऊन अंथरुणावर पडले पण त्यांच्या भेटीला आफ्रिकेस जाणेही रामदास गांधींना शक्य झाले नाही, कारण दक्षिण आफ्रिका सरकारने गांधी कुटुंबियांवर बंधने लादल्यामुळे तेथे जाण्याची त्यांना परवानगी मिळत नव्हती. शेवटी माझ्या वडिलांचे निकटच्या स्नेह्यासारखे असलेले धाकटे बंधू देवदास गांधीही अचानक मृत्यू पावले हा आघात बापूजींच्या हत्येइतकाच कठोर होता. माझे वडील या आघाताने सुन्न झाले. त्यातच या कालावधीत सरदार पटेल, आफ्रिकेतील त्यांचे मित्र कॅलन बाख, दरबानमधील त्यांचे स्नेही सुऱ्हावर्दी आणि भारतातील त्यांचे स्नेही

किशोरीलाल मश्रूवाला ही सारी जुनी कार्यनिष्ठ सच्चरित मंडळी हे जग सोडून गेली. भ्रष्टाचार, लालसा, अप्रामाणिकपणा आणि लबाडीच्या चिखलात रुतलेले कार्यकर्ते आणि खुजे नेते देशातील पायाभूत अशा एकेक संस्था उद्ध्वस्त करू लागले. गांधीजींनी जे करून ठेवले ते सारे मातीत मिसळू लागले. माझे वडील या घटनांचे मूक साक्षी होते. स्वतःला गांधीवादी म्हणविणाऱ्यांनी बापूजींच्या नावाचा धंदा आरंभिला होता. ही मंडळी गांधीजींची डाळ-तांदूळ विकतात तशी बाजारी वस्तू म्हणून विक्री करू लागले होते. काँग्रेसचे नेते आजही तेच करीत आहेत रामदास गांधींना मात्र हे ढोंग, हा असत्य अनाचार सहन करीत जगणे प्रत्यही कणाकणाने मरण्यासारखे होते. १९६९ मध्ये गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षात माझ्या वडिलांची खिन्नता आणखीच गडद झाली. नगारे पिटून महात्म्याचे प्रदर्शन करीत देशभर त्याचा लिलाव चालू होता तेव्हा देवाने माझ्या वडिलांचे गाऱ्हाणे ऐकले आपल्या जन्मशताब्दी वर्षात बापूजींनी आपल्या पुत्राला आपल्याकडे बोलावून घेतले.

३१ मार्च, १९६९ पर्यंत माझ्या वडिलांना अशक्तता जाणवत होती पण अन्य काही तक्रार नव्हती. भूक लागत नव्हती पण ती तर कारावासाची देणगी होती. ही तक्रार गेल्या चाळीस वर्षांपासूनची असल्याने तिचे विशेष दुःख नव्हते. १ एप्रिलला सर्व चाचण्या करण्याच्या हेतूने आम्ही त्यांना मुंबईच्या कॅन्सर इस्पितळात नेले. तेथील तज्ज्ञ डॉक्टरांनी अधिक तपासण्यांचा आदेश दिला. बहुधा त्याच वेळी माझ्या वडिलांनी आणखी अधिक दुःख सहन न करण्याचा निश्चय केला असावा. त्यांनी खाणेपिणे सोडून दिले. दोन दिवस शिरेतून ग्लुकोज इत्यादी दिले गेले परंतु वडिलांची व्यथा बघवत नव्हती. या बाटल्या आणि सुयांनी ते त्रस्त होते. मला वाटले की, आपण आपल्या स्वार्थासाठी वडिलांना कष्ट देत आहोत. त्यांना जर हे उपचार पसंत नसतील तर ते बंद करण्याचे धैर्य आपणांत असले पाहिजे असेही मला वाटले आई आणि बहीण उषा यांच्याशी बोलून मी डॉ. पटेलांना सारे उपचार बंद करण्यास सांगितले. असा विलक्षण रुग्ण आणि त्याचे हे विलक्षण कुटुंबीय बघून डॉक्टर चकित झाले. ते म्हणाले, "तुम्ही गांधींची मुले आहात म्हणून औषधांना विरोध करीत आहात काय?" मी म्हटले, "तसे नव्हे. मी माझ्या वडिलांची मुलगी आहे आणि त्यांना जे नको आहे ते मी करणार नाही." वडिलांना बघून स्पष्ट जाणवत होते की, त्यांची जगण्याची इच्छा संपली असून आपले जीवन संपविण्याचा त्यांनी निर्णय केला होता. दोनचार दिवसांनी वडील मला म्हणाले, "तू मला अहमदाबादेस घेऊन चल" मी म्हटले, "तुम्हाला शक्ती नाही. प्रवास कसा करणार? थोडी शक्ती आली की, अहमदाबादेस जाऊ. अशा अवस्थेत मी तुम्हाला इस्पितळातून बाहेर नेले तर जग मला वेडी म्हणेल," माझ्या

वडिलांनी दोनतीनदा मला तीच गोष्ट सांगितली पण लोक काय म्हणतील, या चिंतेने त्यांची अंतिम इच्छा ओळखू शकले नाही. नंतर दोन दिवसांनी ते म्हणाले, "मला दुसऱ्या खोलीच्या खिडकीजवळ घेऊन चल. मला आकाश बघावयाचे आहे" एअरकंडिशनरमुळे माझ्या वडिलांच्या खोलीच्या सर्व खिडक्या बंद ठेवण्यात आल्या होत्या. तिथून मोकळे आकाश दिसूच शकत नव्हते. रात्री दोन वाजता, माझे वडील माझ्या आधाराने अंथरुणावरून उठून शेजारच्या खोलीतील खिडकीजवळ आले. आम्ही दोघांनीही मुंबई शहराच्या धुलिधूसर अंधारात धैर्याने लुकलुकणाऱ्या तारकांनी भरलेले आकाश बघितले. नंतर परत कारावासातील निर्गम कोठडीसारख्या आपल्या खोलीतील अंथरुणावर येऊन ते पडले.

माझे पती अहमदाबादहून माझ्या वडिलांच्या भेटीसाठी आले. त्या दोघांना आपापसात इंग्रजीत बोलण्याची सवय होती. माझे वडील आपल्या सुंदर, आकर्षक ऑक्स्फोर्ड इंग्रजीत आपल्या जावयाशी बोलू लागले. या ब्राह्मण जावयाने दिवसभर आपल्या सासऱ्याची व्यक्तिगत सेवाशुश्रूषा केली. अनेकदा थेंबाथेंबाने काही प्यायला दिले आणि हातपाय दाबले. उषाचे पती हरीष तर इस्पितळात आल्यापासूनच दिवसरात्र वडिलांच्या सेवेत होते. हरीश आणि उषा सारी बाहेरची कामे बघत. मी इस्पितळात राहिले होते आणि वडिलांची सेवा करीत होते. आईसुद्धा इस्पितळातच होती; तिचा चाळीस वर्षांचा सोबती प्रयाणाच्या तयारीत होता. पण ती कर्तव्यपरायण हिंमतवान प्रेमळ पत्नी होती. ती सेवा करीत असे आणि शांतपणे आम्हा सर्वांना आधार देत होती. माझे पती गजानन यांच्याशी तर माझे वडील इंग्रजीत बोलत होतेच परंतु आपल्या जीवनाच्या शेवटच्या दिवसांत ते गुजराती हिंदी विसरून गेले आणि आपल्या लहानपणच्या इंग्रजी भाषेतच सारे काही बोलू लागले.

शेवटच्या दिवशी मी अणि उषाने त्यांच्या मनातील विषादाचे कारण विचारले पण ते काहीच बोलेले नाहीत, तेव्हा उषा म्हणाली, "भाई, आपल्या कान्हाबद्दल तुम्ही दु:खी होऊ नका. आपणच आमचे सर्वस्व आहात!" वडील काही म्हणाले तर नाहीत पण त्यांना निश्चितच संतोष वाटला असावा, काही दिवसांपूर्वी अंगात थोडी शक्ती असताना ते म्हणाले होते, "ज्याला अशा दोन मुली आहेत त्याला मुलांची आवश्यकताच काय? माझ्या मुली तर मुलापेक्षाही अधिक आहेत."

आमचा भाऊ कान्हा बोस्टन मध्ये होता. त्याला कळवायचे तरी काय? आणि बोलवायचे तरी कशासाठी? कारण आपल्या आई, वडील आणि आम्हा सर्वांवर असमंजसपणे रुसून बोस्टनमध्ये स्थायिक होण्याचा नादानपणा त्याने केला होता. आमचा त्याच्यावर काही अधिकार उरला नव्हता पण आमचे प्रेमळ पिता आपल्या मुलाची आठवण करीत राहिले

आणि आम्हा दोघींचे सांत्वनही करीत राहिले. अमावस्येच्या रात्री बारा वाजता मी वडिलांच्या जवळ उभी होते. उषा थोड्या वेळासाठी आपल्या घरी गेली होती. गजानन रात्रीच्या ट्रेनने अहमदाबादला आमच्या छोट्या मुलांकडे निघून गेले होते. मी आणि वडील दोघेच होतो. अचानक त्यांचे डोळे चमकले. माझ्याकडे बघून त्यांनी आईला बोलावण्याची खूण केली. आई आली. दोघांनी एकदुसऱ्याचा हात धरला. वडील मला म्हणाले, "आईला सांभाळ" आणि आईला म्हणाले "मी जातो" एवढे बोलून त्यांनी डोळे मिटले आणि ते चिरनिद्रिस्त झाले. १५ दिवसांपासून अन्नपाणी जवळजवळ वर्ज्य करून माझ्या वडिलांनी स्वेच्छेने आपल्या जीवनाचा त्याग केला या अशांत व दुःखी संसाराचा त्यांनी अत्यंत शांतपणे निरोप घेतला. आम्ही मागे राहिलेले मात्र सुन्न, स्तब्ध झालो होतो. आमचे प्रेमळ वडील निघून गेले होते. आमचे छत्र नाहीसे झाले होते. माझी चाळीस वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच माझे वडील निघून गेले होते.

तसं पाहिलं तर मला तक्रारीला अवसर नव्हता कारण माझ्या अन्य भावंडांपेक्षा मला वडिलांचे अधिक सान्निध्य लाभले होते. परंतु माझे मन पश्चात्तापाने होरपळत होते. माझ्या निसर्गप्रेमी वडिलांना अहमदाबादच्या मोकळ्या वातावरणात आपल्या शेवटच्या काळात जावयाचे होते परंतु लोकापवादाच्या भीतीने मी त्यांच्या या इच्छेचा अनादर केला होता. त्यांच्या मृत्यूला आज १९ वर्षे पूर्ण झाली असताही त्या गोष्टीच्या आठवणीने माझे मन विषण्ण होते. माझेच मन मला सारखे टोचीत असते. वडिलांनी व्यक्त केलेल्या लहानशा इच्छेचेही मला पालन करता आले नाही हा माझा मोठाच असंमजसपणा होता. या अपराधाबद्दल क्षमेचा कोणताच पर्याय माझ्याजवळ नाही. क्षमा करणारा एकजणच तर आमच्या जवळ होता. आमच्या साऱ्या चुका तो स्वतःवर ओढवून घेत असे. स्वतःला खपवून त्याने आम्हा तिघांना वाचविले होते. आम्ही निरुपयोगी मुले त्यांना इस्पितळातून घरीही घेऊन जाण्यास तयार नव्हतो. हा अपराध मी कोणाला सांगू? कोण मला क्षमा करील? माझ्या हृदयाने मला जी शिक्षा सुनावली आहे तिची टोचणी जन्मभर मला लागून राहणार आहे. वडिलांच्या माघारी आता माझा उदासपणा घालवून माझे सांत्वन कोण करणार?

सर्वसामान्य लोक रामदास गांधीसारख्या माणसाला निर्माल्य समजून हेटाळीत असतात. आणि हे आजच घडते असे नाही. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी धडपडत नाही, झगडत नाही, जीव टाकत नाही, अशी स्वभावप्रकृती कशी काय असू शकते ते त्यांना वाटत नाही. आता, अशा व्यक्तींचे मनोबल इतके सुदृढ असलेली त्यांना त्यांच्या मार्गावरून विचलित करणे कोणाला शक्य होत नाही. तेव्हा संत्रस्त होऊन समाज अशा लोकांना वेड्यात काढतो आणि त्यांना दुर्लक्षित करतो. परंतु रामदास गांधींसारखी शेकडा पाच

माणसेही ज्या समाजात असतात ह्या समाजात आपसूक मानमर्यादा सांभाळली जाते आणि माणसांच्या निरोगी विकासाचे कार्य शांतपणे चालू राहते अशाच समाजाची उन्नतीही होते. असाच समाज प्रगती करतो. अशा व्यक्ती आक्रमकही नसतात व अवरोधकही नसतात. परंतु लीलेने वाहणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणे त्यांचे कार्य गतिमानच होत जाते. त्यांच्या उपस्थितीने अवतीभोवतीची स्पर्धा, ईर्ष्या, असूया आणि विद्वेष यांचा तणाव कमी होत असतो. रामदास गांधी सारख्या व्यक्तींच्या जवळपास असण्याने अवतीभवतीच्या व्यक्ती आपल्या व्यक्तित्वाचा विकास निष्कंटकपणे करू शकतात. आधुनिक सभ्यता संस्कृतीत ताणतणाव, संघर्ष आणि विकृत्ती यांच्यावर यांच्यासारख्या व्यक्तींच्या असण्याने स्वाभाविक अंकुश राहतो. परिणामतः संस्कृतीचे सहस्त्रदलकमल उमलू लागते आणि हे घडले कसे याची फारशी कुणाला कल्पनाही येत नाही. बहुधा यामुळेच बापूजींना आपला तिसरा मुलगा रामदास एवढा पसंत होता. त्यांना रामदासला कधी काही मुद्दाम सांगणे लागत नव्हते. रामदास सहजप्रेरणेने व सत्यासत्यातले भेद जाणत होता. त्याहून महत्त्वाचे हे की, रामदास गांधींसारखे लोक आपल्या अंतःकरणाने दाखविलेल्या मार्गावर निर्भयपणे अग्रेसर होत असतात. वाटेतील चकवे, धोके आणि मोह त्यांना पथभ्रष्ट करू शकत नाहीत. असे लोक इतिहास निर्माण करीत नसतात, पण आपल्या अस्तित्वाने वंगणाचे काम करून मानवतेचे रक्षण करतात आणि मानवजातीला उन्नत बनवीत असतात.

रामदास गांधींनी आम्हा तिन्ही मुलांना आपला आपला विकास करण्याचा अवसर दिला. त्यांच्या सौम्य छत्रछायेखाली आम्ही लहानाचे मोठे झालो. आज जर आम्ही काही असू तर त्याचे पूर्ण श्रेय माझ्या वडिलांना आहे. मी दहा वर्षांची असतानाची गोष्ट. कोणीतरी खोटे बोलले तेव्हा चिडून मी सांगितले की, तो खोटे बोलत आहे. माझ्या वडिलांनी मला म्हटले, "कोणावरही खोटे बोलण्याचा आरोप करू नये. फारतर तो चूक बोलत होता असे म्हणावे" 'सांसदीय भाषेचा' हा पहिला पाठ होय. आजही 'खोटे' या शब्दाचा प्रयोग करताना मला अवघड वाटते आणि माझ्या वडिलांचे सौम्य सुंदर नेत्र अशा वेळी माझ्या मनासमोर चमकून जणू माझा उपरोध करू लागतात. लहानपणापासून माझे डोळे तिरळे असल्याने मी मनातल्या मनात खजील होत असे. मुलांचे जग काही वेगळेच असते! बरोबरीची मुले चिडवीत ते अत्यंत क्रूरपणाचे वाटे. या दुःखात आणि आघातात माझे आईवडील, भाऊबहीण आणि काकाकाकूंनी सदैव मला आधार दिला आणि काहीसे अधिकच लाड-प्रेम करून सर्वांनी माझा आत्मविश्वास टिकवून ठेवला. डोळ्यांतील विकृतीमुळे, आपल्याला जीवनात सुख मिळणे दुर्लभच होय असे मला वाटत असे. निदान काही शिकलोसवरलो तर प्रतिकूल परिस्थितीच्या आघातात कसेबसे जगता तरी येईल अशी माझी धारणा झाली होती. त्यामुळे

अत्यंत निग्रहाने मी आपल्या जीवनाचे लक्ष्य साधण्याचा प्रयत्न केला. डॉक्टर व्हावे अशी मनातून इच्छा होती परंतु अधू डोळे केव्हा धोका देतील याचा नेम नव्हता; त्यामुळे एम.ए.आणि वकिलीचा अभ्यास केला.

माझे प्रिय देवदास काका माझे मन जाणत होते. दिल्लीतील एका गुजराती डॉक्टराशी माझ्या विवाहाची बोलणी सुरू झाली. मला विशेष ओढ नव्हती. माझी अनिच्छाही मी काहीशी व्यक्त केली. परंतु घरातील वडीलधाऱ्यांनी त्या स्थळाची योग्यता अनेकपरींनी सांगून माझी समजूत काढली. मलाही जीवनात प्रेम आणि आदर लाभण्याची आशा वाटत नव्हती, त्यामुळे जे घडते ते ठीकच वाटले. दिल्लीत काकांचा सहवास लाभेल आणि त्यांची सेवा करता येईल हेच मोठे समाधान होते. ठरल्याप्रमाणे महात्माजींच्या नातीचा हा विवाह दिल्लीत मोठ्या थाटामाटाने साजरा झाला. स्वातंत्र्यानंतर आमच्या कुटुंबातील हा पहिलाच सुखद समारंभ होता. माझ्या देवदास काकांनी व काकूंनी मनापासून सारी तयारी केली होती. माझ्या वडिलांनी मात्र विवाहातील या साऱ्या गोष्टींना विरोध केला. त्यांनी विरोधात उपवास करण्याची इच्छा व्यक्त केली. माझ्या त्या विवाह समारंभाशी असहकार करण्याचे जाहीर केले. स्वातंत्र्ययुद्धात वापरलेली सारी अहिंसक शस्त्रे सिद्ध करण्यात आली होती. माझे देवदास काका वस्तुतः अत्यंत चतुर तर्ककुशल होते. त्यांनी हा विवाह समारंभ निर्विघ्न सुरळीत पार पडू द्यावा यासाठी आपल्या भावाचा नम्रतेने अनुनय केला. मात्र विवाहविधी पूर्वी, लग्नमंडपातच मला समजले की, या संबंधात काही अर्थ नाही. येथे सुख-समाधानाला अवसर नव्हता. परंतु कसेही असले तरी निभावून नेणे हाच आपला धर्म असल्याचे मी ठरविले. मनाचा निर्धार केला तरीही लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच ते घर मला असह्य झाले. माझ्या कार्यालयाने मला रजा दिली नसल्याचे कारण सांगून मी नागपूरला निघून आले. देवदास काका आणि माझे वडील रेल्वे स्टेशनवर आले होते. नंतर दोन वेळेस मी सासरी गेले परंतु तेथील लोक, लालसा आणि अपमान सहन करणे म्हणजे आत्म्याचा घात करणेच होते. नोकरीमुळे आर्थिकदृष्ट्या मी स्वावलंबी होते. त्यानंतर मात्र, मध्यप्रदेशातील वीज पाणी यांसारख्या प्राथमिक सोयीचाही अभाव असलेल्या आदिवासींच्या प्रदेशातील कामात मी स्वतःला झोकून दिले. रात्री उशीत तोंड खुपसून रडावे आणि दिवसा हसत हसत अश्रू पिऊन काम करावे, ही त्या वर्षांतील माझी दिनचर्या होती. एकदा वडिलांनी माझे हे रडणे ऐकले. त्यांनी मला गप्प केले आणि म्हटले, "मी जिवंत असताना तुला रडण्याचे कारण नाही. अजून तर तुझे लग्न मला करावयाचे आहे." मी म्हणाले, "भाई, तुम्ही उगीच काहीतरी बोलत आहात. आता कसले लग्न? नोकरी आहे ती पुरे" वडील म्हणाले, "नाही. माझ्या दृष्टीने तू कुमारीच आहेस. मला आधीच हा संबंध पसंत नव्हता. तुम्ही लोकांनी मला काहीच सांगितले नाही. एरव्ही त्याच दिवशी मी हे लग्न थांबविले असते."

माझ्या वडिलांचे बोलणे मला आवडले. माझ्याही मनात धैर्य निर्माण झाले. परंतु असाही विचार आला की, आपले वडील नेहमीच जगाविरहित आणि व्यवहारशून्य वर्तन करतात. विवाह बंधन असे सहजासहजी तुटत नसते. हे त्यांना समजतच नसावे. आता कोण मला आपल्या पदरात घेणार? माझ्या वडिलांनी साठी गाठली आहे. त्यांचा स्क्रू ढिला झाला आहे. सात वर्षे मी ही वेदना निःशब्द सहन केली. या कालावधीत देवदास काकांचा मृत्यू झाला आणि आणखी एक मोठा आघात झाला. डोळ्यांतील अश्रू अधिकच गर्दी करून उशी भिजवत राहिले. कोठेच आधार नव्हता. नोकरीचा तेवढा एकमेव आसरा होता. समाजातील उपेक्षा आणि उपरोधापासून मुक्ती मिळावी म्हणून मग मी अमेरिकेस अधिक शिक्षणासाठी जाण्याचे ठरविले. देवदयेने याच काळात माझ्या सासरच्यांनी मला कंटाळून घटस्फोट दिला. अभद्र आरोपप्रत्यारोपांच्या तापाशिवाय मी मुक्त झाले होते. त्यातच माझी बदली दिल्लीला झाली. तेथे कार्यालयातील एका सहकाऱ्याने माझ्यासारख्या असुंदर स्त्रीला जवळिकीचा आधार दिला. आमची मैत्री जमली पण दुधाने तोंड पोळलेली मी आता ताकही फुंकून पीत होते. आपला पूर्वेतिहास सांगून त्या सज्जनाचा पिच्छा सोडविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी माझ्या दुःखातच सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. माझ्या वडिलांजवळ त्यांनी माझ्यासाठी बोलणे केले. हा विवाहाचा प्रस्ताव साधे सरळ वृद्धपिता सहज स्वीकारतील असा त्यांना पूर्ण विश्वास होता परंतु माझ्या वडिलांनी जन्मभर अनपेक्षितपणे अनेकांना स्तंभित केले आहे. ते म्हणाले, "आपण मला पसंत आहात. परंतु माझ्या आधुनिक मुलीने आपणास दुःखी करावे असे मला वाटत नाही. आमच्या कुटुंबात असा परिपाठ आहे मी अशा प्रेमिकांनी दोनवर्षे परस्परांपासून अलग राहून प्रतीक्षा केली पाहिजे. दोन वर्षांच्या प्रदीर्घ वियोगानंतर देखील जर विवाहाची तीच इच्छा राहिली तर त्यास संमती देण्यात अडचण येणार नाही. तेव्हा सुमित्राला अमेरिकेस जाऊद्या आणि मध्यंतरी जर एखाद्या योग्य महाराष्ट्रीय मुलीशी तुम्हाला विवाह करावा वाटला तर तुम्ही मोकळे आहात" माझ्या मित्राला, शांत सरळ वृत्तीच्या रामदास गांधीकडून अशा परखड उत्तराची अपेक्षा नव्हती. परंतु हे सारे संभाषण इतक्या सभ्यपणे झाले होते की, त्यात वावगे म्हणण्यासारखे काही नव्हते मी परदेशात गेले तेथे पीएच.डी. च्या महत्त्वाकांक्षेत पूर्णतया गुरफटून गेले. लग्न करण्याची इच्छाच नव्हती लग्नासंबंधीची ही माझी अनिच्छा मी माझ्या मित्राला व आईवडिलांना पत्राने कळविली. तेव्हा माझ्या वडिलांनी मला लिहिले, "असा सज्जन मुलगा पुन्हा पुन्हा भेटणार नाही. त्याला ताटकळत ठेवणे उचित नव्हे. तो तर आणखी दहा वर्षेही तुझी वाट बघत राहील. परंतु प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते. पीएच.डी. नंतरही करता येईल. संसार सुरू करण्यास अधिक विलंब करणे ठीक नाही" या पत्रानंतर डॉ. मिस् गांधी या उपाधीचा मोह सोडून मी स्वदेशी परतले. लग्नाची तयारी

अशी विशेष काही करावयाची नव्हती पण मला आणि माझ्या भावी पतीला दोनतीन आठवडे काही काम होते. त्यानंतरचा म्हणजे २६ जानेवारी हा दिवस विवाहासाठी निश्‍चित करण्यात आला. पत्रिका इ. काही पाहिली नव्हती की, ब्राह्मणास काही विचारले नव्हते. आम्हाला जी सोयीची होती तीच तारीख ठरविली गेली. आमच्या बृहद्‌गांधी परिवारात मात्र या पुनर्विवाहाने भलतीच खळबळ माजली होती. ज्यांनी आजवर माझ्या विषयी कधी काहीच आस्था दाखविली नव्हती असे एकानंतर एक, अनेकजण मला भेटायला आले आणि उपदेश करू लागले. 'अजून नीट विचार कर. पुन्हा भांडणतंटे करून बदनामी तर नाहीना ओढवून घेणार? अजून वेळ गेलेली नाही नीट विचार कर. विनाकारण ही विषय वासना का?' आमच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या स्त्रियांनीही मला पुन्हा नीट विचार करण्यास, संयमाने वागण्यास सांगितले. त्यांचे म्हणणे असे की, दुसऱ्या विवाहात एवढा उत्साह कशाला? मला वाटते की, माझ्या वडिलांचा जर आग्रह नसता तर सुधारक गांधी परिवाराने मला कधी साथ दिली नसती. माझा वडिलांनी आपल्या निर्धाराने व उत्साहाने सारे आयोजन केले. राष्ट्रपती राजेंद्र बाबू, उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् आणि प्रधान मंत्री प. जवाहरलाल नेहरू व त्यांची कन्या इंदिरा गांधी यांना माझ्या वडिलांनी समक्ष जाऊन विवाह समारंभाचे निमंत्रण दिले. राजेंद्र बाबू आणि त्यांची पत्नी राजवंशी देवी आणि इंदिरा गांधी यांनी आपले मित्र रामदास गांधींच्या कन्येला व जावयाला घरी बोलावून त्यांचे स्वागत केले. अर्थमंत्री मुरारजी देसाई माझ्या वडिलांचे कारावासातील स्नेही होते. त्यांच्या घरी गजानन रघुनाथ कुलकर्णी बरोबर माझा विवाह झाला. 'साठी बुद्धी नाठी' अशा माझ्या वडिलांनी हे अघटित घडवून दाखविले होते. बदनामी आणि त्यामुळे झालेल्या निर्वासनापासून त्यांनी मला वाचविले होते. माझ्या जीवनातील विषप्राशन करून माझ्यावर सुखामृताचा वर्षाव केला होता मी पुन्हा जिवंत होऊन उठले होते. माझ्या प्रिय पतीनी, उदारता, आदर आणि त्यालाही अधिक म्हणजे विश्वासाने व अविचल प्रेमाने माझा सात वर्षांचा अग्निशाप दूर करून मला निष्कलंक बनविले होते. श्रीरामाने अहिल्येचा उद्धार केला होता. श्रेष्ठ सारस्वत ब्राह्मण असलेल्या माझ्या पतीने माझे दुर्भाग्य दूर करून मला सौभाग्यवतीचे परमसुख प्राप्त करून दिले होते. त्यांच्या धर्मनिष्ठ मातापित्यांनी व बंधूभगिनींनी मला आपलेसे करून कृतकृत्य करून टाकले. आज माझ्या विवाहाला पंचवीस वर्षे होत आहेत. मी एवढ्या सुखाची कधीकाळी अधिकारी होऊ शकेन यावर विश्वास करणे केवळ अशक्य होते. आमची दोन जुळी मुले आहेत, रामचंद्र आणि श्रीकृष्ण दोघेही इंजिनीयर होऊन मुंबईत काम करीत आहेत. मुलीविना आमचा संसार अपुरा राहिला असता म्हणूनच जणू ईश्वरी वरदानासारखी एक कन्या आहे. सोनाली. अत्यंत नम्रतेने मला सांगावेसे वाटते की, आम्ही सुखी आहोत. हा सारा माझ्या वडिलांच्या शुभाशीर्वादाचाच मंगलमय परिणाम आहे. आम्ही त्यांच्या योग्य व्हावे हीच निरंतर प्रार्थना आहे.

रामदास गांधींचा मुलगा, माझा भाऊ कनू याला आम्ही कान्हा म्हणतो. शाळा कॉलेजात त्याचे नाव 'कनू'च नोंदविण्यात आले. लोकमान्य टिळक आणि ना. गोखले यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या पुण्याच्या पुण्यभूमीत इंजिनीयर बनून कनूने मुंबईत नोकरी धरली होती. नोकरीला लागून दोनचार दिवसही झाले नव्हते अशावेळी एका भीषण दुर्घटनेत कनूचे तीन सहकारी ठार झाले, सुदैवाने कनू मात्र त्यातून बचावला तो बेशुद्ध झाला होता आणि त्याच्या घराचा वा मात्यापित्याचा कोणालाही पत्ता नव्हता. परमेश्वरच सारे सांभाळतो हेच खरे. एका अपरिचित गृहस्थाने कनूला आपल्या परिचित शेजारी कुटुंबात येता जाताना बघितले होते. मुंबईच्या धावत्या जगातही ते अपरिचित गृहस्थ कार्यालयीन वेळेनंतर रात्री १० वाजता त्या शेजारच्या घरी गेले. हे लोक हरिलाल काकांचे सोयरे होते. त्यांनी मनूबहेन मश्रूवालाला ही बातमी कळविली. पत्ता काढीत काढीत कर्तव्यनिष्ठ मनूबहेन अर्ध्या रात्री इस्पितळात पोहोचली. तिथे एखाद्या सामान्य मजुराप्रमाणे कनू जमिनीवर बेशुद्ध पडलेला होता. मनूबहेनने डॉक्टरला कनूचे नांव सांगितले. मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना कळविण्यात आले आणि आमच्याकडेही नागपूरला तार करण्यात आली. मी त्यावेळी विनोबांसह चार महिन्यांसाठी भूदान यात्रेत गेले होते. चार दिवसांनंतर कनूने डोळे उघडले आईवडिलांनी केलेल्या शुश्रूषेने कनू वैतरणीच्या ऐलतीरावरून परतला होता. काही दिवसांनी पूर्ण बरे वाटल्यावर तो पुन्हा कामावर जाऊ लागला. बऱ्याच महिन्यांनी माझ्या वडिलांकडून कळाले की, तार मिळताच आई आणि ते मुंबईच्या गाडीने निघाले होते. मुलगा जिवंत घरी आहे की नाही, याचीही कल्पना नव्हती. सारा काही ईश्वरावर भार होता. मी विचारले, "रात्री झोपू शकला होता का?" "चिंता करीत जर रात्रभर जागे राहिलो असतो तर दुसऱ्या दिवशी आजारी कनूची सेवा करण्याऐवजी आजारी पडून आम्हीच बोझ बनून गेलो असतो. म्हणून रामनामाचा जप करीत कान्हाला व स्वतःला प्रभूच्या स्वाधीन केले.

इस्पितळात कनू अजून बेशुद्धच होता. तो शुद्धीवर येतो की नाही ते दोन दिवस सांगणे शक्य नव्हते तरीही धीर सोडून पदरात काय पडले असते? धीर धरून शांतवृत्तीनेच अशा प्रसंगाला तोंड देणे श्रेयस्कर होते. "केवढा संयम; केवढी ईश्वरशरणता; किती सुंदर हे जीवनदर्शन. त्यांच्या या वृत्तीनेच माझ्या आईवडिलांना अनेक संकटप्रसंगांतून निभावून नेले आहे. कनू नंतर अमेरिकेत उच्चशिक्षण घेण्यासाठी गेला आणि गेली पंचेवीस वर्षे तो बोस्टनला स्थायिक झाला आहे. त्याचा विवाह एका गुजराती स्त्रीबरोबर झाला असून ते दोघेही सुखी आहेत. स्वदेशाशी अथवा स्वदेशवासीयांशी त्यांचा काही संबंध उरलेला नसल्यामुळे त्यांचे जीवन आपले वेगळेच अस्तित्व बाळगून आहे. त्यांना संतती मात्र नाही.

कान्हा आणि माझी धाकटी बहीण उषा यांना माझ्या पित्याचे सुंदर रूप लाभले आहे. उषा मणिलाल काकांची विशेष लाडकी होती. ते म्हणत असत की, उषाचे नाकडोळे इंग्रजासारखे आहेत. वस्तुतःच उषा एक अत्यंत आकर्षक सुंदर स्त्री आहे. एके काळी तिचे संगीताचे ज्ञान इतके चांगले होते की, एखादे चित्रपटातील गाणे ऐकताच ती त्याचे नोटेशनही सांगत असे. एकदाच ऐकलेले गीतही लागलीच जसेच्या तसे म्हणून दाखविणे तिला जमत असे. आता मोठेपणी मात्र, काही संकोचाने तर काही अन्य कामांतील व्यग्रतेने ती आपली संगीतसाधना विसरून गेली आहे. तिचा आवाजही आता पहिल्यासारखा राहिलेला नाही. नाकडोळ्यांचा रेखीवपणा आणि घनदाट काळेभोर केस मात्र आजही पूर्ववत आहेत. बी. ए. पास झाल्यानंतर तिचा विवाह, हरीश गोकाणी नावाच्या हसतमुख उदार मनाच्या व्यक्तीशी झाला. उषाच्या लग्नात आमच्या आईने बहुधा पाचशे रुपयांचा खर्च केला असावा. वडिलांना निमंत्रणपत्रिकांचे अवडंबर पसंत नव्हते. तेव्हा माझी आई आणि लक्ष्मीकाकींनी सांगितले की, त्या हातांनीच पत्रिका लिहून देतील. दोघींचीही अक्षरे सुंदर होती. मीदेखील या लेखनात सहभागी झाले होते. पत्रिकांसाठी खादी भांडारातून हाताने बनविलेला पिवळ्या आणि गुलाबी रंगाचा कागद आला होता. रात्रंदिवस खपून सारी निमंत्रणपत्रे हातांनी लिहिण्यात आली होती. अशारीतीने वडिलांची इच्छा आणि सामाजिक प्रथा दोन्हीही सांभाळल्या गेल्या होत्या. माझ्या आईने उषाला तिच्या लग्नात शकुनाची एक रेशमी साडी दिली होती. हरीशचे वडील मोठे उत्साही होते. त्यांनी आपल्या लक्ष्मीसारख्या सुनेला २५ हजारांहून अधिक मोलाचे अलंकार स्त्रीधन म्हणून दिले होते. एका महिलेने आईला विचारले, "सोयऱ्यांनी तर एवढे सारे दिले आहे. काकी तुम्ही काय दिलेत?" एकक्षणही न थांबता आईने उत्तर दिले, "मी माझी मुलगी दिली आहे." बाबूभाई गोकाणी ही अत्यंत उदारमनाचे, समजूतदार गृहस्थ होते. ते म्हणाले, "बरोबर आहे! अशी सुशिक्षित सुंदर मुलगी रामदासभाईनी आम्हाला दिली आहे. आम्ही कृतार्थ आहोत. यापेक्षा अधिक आता कशाचीच आवश्यकता नाही."

उषा आणि हरीशला दोन मुले आहेत. मोठा मुलगा आनंद डॉक्टर असून मुंबईत प्रॅक्टिस करीत आहे. धाकटा मुला संजय वडिलांचा कारखाना बघतो आणि नायलॉनधाग्याचा धंदा करतो. आनंदच्या लग्नानंतर काही महिन्यातच हरीशला अचानक मृत्यू आला. त्याच्या जाण्याने रामदास गांधींच्या परिवारात मोठीच उणीव निर्माण झाली आहे. हरीश केवळ जावई न राहता गांधी कुटुंबाच्या सर्वांत वडील मुलासारखेच बनले होते. आणि या भावनेनेच मोठ्या आनंदाने व मुक्त हस्ताने पारिवारिक जबाबदाऱ्या सांभाळीत होते. आता संजय त्यांचे काम सांभाळतो आहे. उषेला सार्वजनिक कार्याची बरीच आवड आहे. महाराष्ट्र बालकल्याण परिषदेची ती अध्यक्ष असून आपल्या कामासाठी ती प्रसिद्ध आहे. उषेची दानत एवढी चांगली आहे की, बालकल्याणाच्या कार्यासाठी ती लाखो रुपये गोळा करते पण कुठे

एक पैही इकडे तिकडे होत नाही. या कामासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासाचा टॅक्सीचा वा टेलिफोनचा खर्च ती स्वतः करते आणि सार्वजनिक निधी पवित्र मानून त्यातून स्वतःसाठी काही घेत नाही आजकाल ही वृत्ती दुर्मिळच! आजकाळ तर जे निधी गोळा होतात त्यामधला अर्धा पैसा असा तसाच खर्च होतो, हा सार्वजनिक अनुभव आहे. उषाच्या या विलक्षण साधेपणामुळे मुंबई शहरात तिची ख्याती आहे.

आमच्या घरातील सारेचजण विनोदप्रिय आहेत. बापूजींतही हा गुण होता. उषामध्ये विनोदाची ही आवड अधिकच प्रकट आहे. ती नकला इतक्या चांगल्या करते की, तिच्या सहवासात येणारी व्यक्ती सदा हसत राहाते आणि तणावमुक्त होऊन वावरू लागते. आमच्या आजीची स्वच्छता आणि तिची विशिष्ट शैली ही उषाने जोपासली आहे. तिने आता पन्नाशी ओलांडली असली तरी तिच्या मनात व शरीरात आळसाला थारा नाही. यामुळेच सुंदर घर संसाराबरोबरच सार्वजनिक कार्याची जबाबदारीही ती यशस्वीपणे सांभाळीत असते.

आमची आई निर्मला गांधी सेवाग्राम आश्रमात असते. तिने सेवाग्राम प्रतिष्ठानचे अध्यक्ष व्हावे अशी लोकांची इच्छा असली तरी आईला कोणत्याही पदाचा लोभ नाही. ती सर्व कामांत निरपेक्ष सहकार्य करीत असते आणि सत्ता स्पर्धेपासून मात्र अलिप्त असते. त्यामुळेच ती विशेष लोकप्रिय आहे. ती कस्तुरबा ट्रस्टची सदस्य असल्यामुळे ते काम लक्षपूर्वक करीत असते. देशभरातील लहानलहान कस्तुरबाकेंद्रांना भेटी देऊन ती त्यांच्या अडचणी दूर करीत असते व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवीत असते. सेवाग्राम आश्रमात येणाऱ्या हजारो लोकांना ती गांधीजींचे प्रतीक वाटते आणि ही जबाबदारी ती कायावाचा मनेंकरून यशस्वीपणे निभावीत असते. मी काही म्हटले तर आईच्या प्रेमाने केलेली ती अतिशयोक्ती वाटेल पण वस्तुतः आमची आई आपल्या विख्यात सासऱ्याच्या श्रेष्ठ परंपरेची उत्कृष्ट प्रतीक आहे. आपल्या चिंतन मननाने ती बापूजींच्या जीवनदर्शनात समरसून गेलेली आहे यामुळेच देशाच्या हिताहिताविषयी निर्मला गांधी स्वाभाविकपणेच जागरूक असते. कोठेही काही अनावश्यक खर्च आढळला तर तिचा आत्मा प्रतिकाराला सज्ज होतो. मला अनेकदा विचारीत असते की, "अमुक एका अवडंबराचा उपयोग काय? आम्हा गरीब देशवासीयांनी असा देखाव्यासाठी खर्च का करावा?" मी तिला गप्प करीत असते. अशा संयमाच्या गोष्टी आजच्या समाजात कोणालाच मानवणे शक्य नसल्यामुळे बिचाऱ्या आईने उगीच कष्टी होऊन उपयोग काय असे मला वाटते. काहीतरी सांगून मी तिची समजूत काढते पण मलाही मनातून जाणवत असते की, तिचे म्हणणे खरे आहे.

१९६३ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ्. केनेडी यांची हत्या झाल्यानंतर त्यांच्या कबरीवर आपल्या तरुण अध्यक्षाच्या स्मृती प्रीत्यर्थ त्या राष्ट्राने अखंड ज्योतीची स्थापना

केली. १९६४ मध्ये भारताचे प्रथम प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्या स्मृत्यर्थही अशी अखंड ज्योत स्थापन करावी असे भारत सरकारला वाटले. देशवासी यांना ही योजना कितपत पसंत होती, सांगता येत नाही. परंतु अखंड ज्योतीचा हा प्रस्ताव स्वीकारला गेला. एकदा नेहरू म्युझियमच्या रक्षकाला मी विचारलेही होते की, 'या अखंड ज्योतीसाठी रोज किती तेल जळते '? त्याने सांगितले की, 'बहुधा मोहरीचे १६ किलो तेल रोज जळत असावे.' त्यानंतर १९७१ मध्ये बांगलादेशासाठी झालेल्या संघर्षात धारातीर्थी पडलेल्या भारतीय जवानांच्या स्मृतीसाठी, दिल्लीच्या इंडियागेटवर अखंड ज्योतीची स्थापना झाली. हेही ठीकच झाले, कारण सैनिकांचेही देशाच्या जीवनात विशेष स्थान असते, नंतर १९७७ मध्ये, इंदिरा गांधींचे आणीबाणीतील सरकार हटवून देशाने जनता पार्टीचे सरकार निवडून दिल्लीला पाठविले. मोरारजी देसाई या नव्या सरकारचे प्रधानमंत्री झाले. जनता पक्षाच्या सरकारने आपल्या गांधीवादीत्वाची साक्ष म्हणून राजघाटावर अखंड ज्योतीची योजना केली हे खरे म्हणजे फारच झाले! तीस वर्षांपासून राष्ट्रपित्याची समाधी जर अंधकार सहन करू शकत होती तर या दरिद्रनारायणासाठी दरिद्री देशाच्या उपयोगाच्या महाग तेलाचा अखंड धूर करण्याची काही गरज नव्हती. ही नक्कल होती आणि ती अगदी व्यर्थ, हिणकस आणि अनावश्यक होती. पण मोरारजी देसाईंचे सरकार कसलीच मौलिक सुधारणा करू शकले नाही. काँग्रेसची नक्कल करण्यातच ते सरकार उद्ध्वस्त झाले. परंतु बापूजींच्या समाधीवर विनाकारण पैशाचा दुरुपयोग व्हावा हे निर्मला गांधींना सहन झाले नाही. त्यांनी मोठ्या तर्कशुद्ध पद्धतीने मोरारजी देसाईंना पत्र लिहिले की, 'महात्मा गांधींना अखंड ज्योतीची आवश्यकता नाही.' बापूजी निर्मला गांधींचे श्वशुर होते. ते आपल्या घरात काटकसरीचा आग्रह धरीत होते आणि ते योग्यच होते. पण मोरारजी भाईंमध्ये बहुधा असे नैतिक धैर्य नसावे. नव्या सरकारच्या नव्या उत्साहात आणखी एक मशाल मात्र जळू लागली. आज दिल्ली हे जगातील एकमेव असे महानगर आहे जेथे एकाच वेळी तीन तीन मशाली सतत जळत आहेत! अखंड ज्योतीच्या पावित्र्याचेच त्यामुळे अवमूल्यन झाले आहे. अखंड ज्योतीचे महत्त्व विस्मरणात गेले असून, सामान्य जनांच्या चेष्टेचा मात्र तो विषय बनला आहे. मात्र आमच्या आईमध्ये समाजातील रूढ परंपरेपेक्षा निराळा विचार करण्याची व त्याप्रमाणे आचरण करण्याची शक्ती आहे. त्यामुळेच तिने प्रधानमंत्र्यांना हे पत्र लिहिले होते. अपरिग्रह आणि निःस्पृहता अंगी बाणल्यामुळे निर्मला गांधींचा साधेपणा हे ढोंग न वाटता त्यांना शोभून दिसते. गांधीजींच्या निसर्गोपचार पद्धतीची माझी आई कट्टर पुरस्कर्ती आहे. त्यामुळेच सध्याच्या वृद्धावस्थेत ही तिची स्फूर्ती, उत्साह आणि तिचे आकर्षण टिकून आहे.

# १२

# देवदास गांधी

गांधीजींच्या चौथ्या आणि अंतिम पुत्राचे नाव देवदास गांधी होते. त्यांचा जन्म ५ मे, १९०० ला आफ्रिकेतील दरबान शहरी झाला. हरिलाल, मणिलाल आणि रामदास हे त्यांचे तीन मोठे भाऊ, त्यांच्यापेक्षा क्रमाने १२, ८ आणि दोन वर्षांनी वडील होते. रामदासप्रमाणेच देवदासचे बालपणही आफ्रिकेत गेले होते. लहानपणापासूनच देवदासमध्ये चातुर्य आणि स्फूर्ती होती. माझे वडील सांगत की, जोहान्सबर्गला ट्रॉयविलच्या घरात असताना त्यांचे सँडल्स तुटल्यामुळे बापूजी त्याच्यासाठी नवे सँडल्स घेऊन आले तेव्हा देवदासनेही नवीन सँडल्सचा हट्ट धरला. त्याला सांगण्यात आले की, त्यांचे सँडल्स अजून चांगले आहेत, आताच नव्याची गरज नाही. त्यानंतर देवदासने कोणाच्या नकळत कात्रीने सँडलची एक पट्टी तोडून टाकली आणि बापूजींजवळ जाऊन तो म्हणू लागला, "बघा, माझे सँडल्सही वापरता येत नाहीत. मलाही नवे सँडल्स आणा" देवदासच्या या पराक्रमाने त्याला नवे सँडल्स आणून देणे अनिवार्य झाले. देवदास तेव्हा पाच वर्षांचा होता. जोहान्सबर्गमधील घर १९०६ मध्ये बंद करण्यात आले. त्यानंतर आपल्या आई आणि भावाबरोबर तोही फिनिक्समध्ये राहू लागला. शेतात काम करणे, झाडावर चढणे, फुले तोडणे, फळे तोडून खाणे आणि नासधूस करणे तसेच झाडाच्या फांदीवरून नदीत उडी घेणे आणि पोहणे हे फिनिक्समधील देवदासचे आवडते उद्योग होते. त्यांची वहिनी, हरिलालची पत्नी गुलाब भाबी, अत्यंत सुशील, सुशिक्षित आणि शालीन होती. तिने देवदासला लिहिण्या-वाचण्यास शिकविले तसेच गुजराती साहित्याचा विशेषतः काव्याचाही त्याला परिचय करून दिला. गुलाब भाबी आपल्या दिरांवर खूप प्रेम करीत असे आणि लहानगा देवदास तर तिला पुत्राप्रमाणेच होता. हरिलाल भाई तुरुंगात जाताना, नेहमीच देवदाससाठी एखादे खेळणे पाठवीत असत. हरिलाल भाईंची मुलगी रात्री आपल्या देवदास काकापेक्षा ८ वर्षांनी लहान होती. परंतु या काका पुतणी मध्ये फार प्रेम होते. एकदा तुरुंगात जाताना हरिलाल भाईंनी देवदाससाठी मिठाई आणि भोवरा पाठविला. पतीच्या वियोगात गुलाब भाबी तर रडत होती. परंतु देवदास आणि रामीने मात्र पोटभर मिठाई खाऊन मनसोक्त भोवरा फिरविला होता, असे स्वतः देवदासच सांगत असत.

फिनिक्समधील घरात जेवण साधे असे पण घरात फळे, भाज्या, मध आणि सुक्यामेव्याची मात्र काही कमतरता नव्हती. या सर्व वस्तू तेथेच बागेत उत्पन्न होत व त्यांवर काही बंधनही नसे. त्या काळी बापूजी दूध न घेता फलाहार करीत होते. त्यामुळे कोठी घरात पोतेभर भुईमुगाच्या शेंगाही पडून असत. देवदास काकांना सुक्यामेव्याचा भलताच नाद होता आणि जन्मभर तो टिकून राहिला. त्यांच्या दिल्लीच्या घरी रात्री ११ वाजता जेवणानंतर पेशावरहून आणविलेले सुके मेवे आम्ही सर्वच जण अत्यंत आवडीने खात असू. फिनिक्समध्ये देवदासचे खिसे नेहमी सुक्यामेव्यांनी भरलेले असत. एकदिवस कुणाच्या नकळत देवदासने कोठी घरातील भुईमुगाच्या शेंगांच्या पोत्यात हात घातला आणि त्याचवेळी हरिलाल भाईंनी त्याला रंगेहात पकडले. थोडा बहुत मार निश्चितच बसला असणार, पण त्या घरातील भावांत खूप प्रेम होते आणि देवदासचे सारेजण लाड करीत.

फिनिक्सचा मुक्काम हलल्यावर सारेजण टॉलस्टाय फार्मवर राहावयास गेले होते. तेथे शरीरश्रमावर भर असल्यामुळे देवदासही अर्धामैल अंतरावरील झऱ्यातून कावडीने पाणी आणीत असे. त्याबरोबरच लाकडे फोडणे, घर बांधणे, चूल फुंकणे, भांडी घासणे, कपडे धुणे आणि अनेकदा स्वयंपाक करण्याचेही काम तो करीत असे. वयाच्या ११व्या वर्षीच देवदास एक जबाबदार मेहनती मुलगा बनला होता. 'इंडियन ओपिनियन'च्या छापखान्यातील काम शिकण्यासाठी बापूजींनी देवदासला परत फिनिक्सला पाठविले होते. त्या काळात गांधीजींना बिनमिठाच्या जेवणाची सवय लावावयाची होती, त्यामुळे देवदासला आठवडाभर बिनमिठाचे अन्न खाऊन, दुपारच्या तळपत्या उन्हात, दोन घंटे शेतात खोदकाम करावे लागले होते. उरल्यावेळेत छापखान्याचे काम करावे लागे आणि मिस् श्लेषिनकडून थोडेबहुत इंग्रजी, गणित शिकावे लागे. पूर्ण एक वर्षभर अशी अंगमोड मेहनत करून देवदासने जणू सत्याग्रही साधनाच केली होती. रविवारी मीठ खाण्याची मोकळीक असे. त्या दिवशी चवदार स्वयंपाक बनत असे आणि देवदास चापून सहा दिवसांचे उट्टे काढीत असे. माझ्या वडिलांनी सांगितले होते की, याच दिवसांत एकदा देवदासला हिरवी मिर्ची खाण्याची इच्छा झाली. मुलांनी मिर्ची खाऊ नये असे सांगितल्यावर तर तो हट्टालाच पेटला तेव्हा बापूजींनी त्याला हिरवी मिर्ची खाण्याची परवानगी तर दिली पण सांगितले, बशीभरून ज्या मिर्च्या ठेवल्या आहेत, त्या सर्व खाल्ल्या पाहिजेत. देवदासने दोनचार मिर्च्या तर आवडीने खाल्या परंतु बापूजींच्या आज्ञेनुसार बशीतल्या साऱ्या मिर्च्या संपविताना त्याच्या नाकाडोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या आणि त्याचा गोरा चेहरा लालबुंद झाला. एकदा असेच, कस्तुरबाने भरली वांगी केली होती. आणि देवदासचा तर तो बिनमिठाचा दिवस होता, पण आपणही भरली वांगी खाणार, नसता जेवणच करणार नाही असा त्याने हट्ट धरला. बापूजी म्हणाले,

'एकदा केलेली प्रतिज्ञा मोडता येत नाही'. देवदासने जेवण घेतले नाही तेव्हा बापूजी आणि कॅलन बाखनीही जेवण घ्यायचे नाकारले. या वादात मोटीबानेही जेवण घेतले नाही. सायंकाळी पाच वाजता देवदासने वांगी खाण्याचा हट्ट सोडला तेव्हा कुठे चौघांनीही त्या दिवशीचे जेवण घेतले. एकीकडून असा संयमाचा डाच आणि दुसरीकडे वांडपणा पुरेपूर असूनही देवदास मोठा गोड मुलगा होता आणि त्याची कर्तव्यनिष्ठा व परिश्रम करण्याची शक्ती कमालीची होती. १९१३ मध्ये, फिनिक्समधील सारे वयस्क लोक सत्याग्रह करून तुरुंगात गेले होते. मागे उरलेल्यांत केवळ दोन मोठी माणसे होती आणि मिस् श्लेषिन मधून मधून येत असे. या बिकट परिस्थितीत १२ वर्षांच्या देवदासने एखाद्या जबाबदार प्रौढ व्यक्तीप्रमाणे छापखान्याचे काम सांभाळले होते आणि त्यामुळे 'इंडियन ओपिनियन' खंड न पडता निघत राहिले होते. आश्रमातील मुलांचे मनोरंजन व्हावे म्हणून या काळात मिस् श्लेषिनने कथालेखनाची एक स्पर्धा आयोजित केली होती. देवदासने या स्पर्धेत एक स्वप्नकथा लिहिली होती. पऱ्यांच्या जगात त्याने बघितलेल्या गोष्टींचे व त्याने काय केले त्याचे वर्णन त्या कथेत होते. देवदासची कहाणी सर्वोत्कृष्ट ठरली होती आणि प्रथम क्रमांकाचा पुरस्कार म्हणून त्याला एक गोष्टींचे पुस्तक बक्षीस मिळाले होते.

१९१४ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर मोटीबा खूपच आजारी झाली होती. केपटाऊनमध्ये मणिलाल काका आणि बापूजी तिची सेवा-शुश्रूषा करीत होते. मृत्यू आला तरी डॉक्टरचे उपचार न घेण्याचा मोटीबाने निश्चय केला होता. या आजारातून ती वाचेल अशी कोणालाच आशा नव्हती. देवदास या दिवसांत फिनिक्समध्ये छापखान्याचे काम करीत होता. कर्तव्यपरायण देवदास आपले काम सोडून आईच्या भेटीलाही जाऊ शकत नव्हता. आईच्या गंभीर आजाराची त्याला सतत धास्ती वाटत होती. त्यावेळी गुपचूप एका कोपऱ्यात जाऊन देवदास रडत असे पण कसली तक्रार मात्र करीत नसे. त्यावेळी बापूजींनी देवदासला एक सुंदर पत्र लिहिले होते. या पत्रात त्यांनी मृत्यूची अनिवार्यता आणि आत्म्याची अमरता स्पष्ट करून, मृत्यूचा शोक न करता, आपला आत्म्याशी संबंध राखला पाहिजे असे लिहिले होते. सारे उपाय करूनही जर 'बा'चा मृत्यू झाला तर शोक करू नये आणि साधुतेची व उदासीन वृत्ती अंगी बाणवावी असेही त्यांनी कळविले होते. साधुता म्हणजे संसार सोडून रानावनात वा डोंगरदऱ्यांमध्ये भटकणे नाही तर साधुतेचे मर्म शुद्ध चारित्रामध्ये आहे. उदासीन वृत्तीने राहावयाचे म्हणजे कोणत्याच गोष्टीत रस न घेता जगावयाचे असे नाही तर, 'विषयांतून इंद्रिये काढून घेऊन' अनासक्त वृत्तीने व संसाराविषयी मोह न बाळगता राहावयाचे. बापूजींनी असे लिहिले की, बाच्या आजारपणापासून हे सारे जर देवदास शिकू शकला तर

खरा भक्तिभाव प्रकट केला असे होईल. १४ वर्षाच्या मुलाला अशा अनासक्तीसंबंधी पत्र लिहिणे हे बापूजींचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे.

१९१३ मध्ये गोपाळकृष्ण गोखले दक्षिण आफ्रिकेत गेले होते. त्यावेळी देवदास विविध खेळांत आणि लांबवर धावण्यात पटाईत होता. गोखल्यांच्या सन्मानार्थ झालेल्या विविध कार्यक्रमांत धावण्याच्या शर्यतीत देवदासला प्रथम क्रमांक मिळाला होता. गोखल्यांनी देवदास आणि रामदासला एक प्रश्न विचारला होता. "समज, तुमचे आईवडील तुमच्या दोन्ही बाजूने चालत आहेत आणि तुम्ही मधोमध आहात. अशावेळी जर अचानक समोरून एखादा वाघ आला तर तुम्ही कोणाचे आणि कसे रक्षण कराल? जर तुम्ही आईला वाचवाल तर वाघ वडिलांना खाईल आणि वडिलांना वाचवाल तर तो आईवर झेप घेईल. अशा स्थितीत तुम्ही काय कराल?" रामदास आणि देवदास या धर्मसंकटाच्या प्रश्नाचे काहीच उत्तर देऊ शकले नाहीत तेव्हा बापूजी म्हणाले, "मी स्वतःला वाघासमोर झोकून घेईन म्हणजे आई-वडील दोघेही वाचतील."

१९१४ मध्ये देवदास भारतात आला आणि प्रथम आपल्या भावांबरोबर, शांतिनिकेतन इत्यादी स्थळी थांबून नंतर कोचरब आश्रमात गांधीजींबरोबर राहू लागला. त्यावेळी गांधीजींनी एक अस्पृश्य कुटुंब आश्रमात घेतले होते आणि आश्रमातील अनेकांना ते अत्यंत क्लेशदायक वाटत होते. परंतु या बाबतीत देवदासची भूमिका मात्र अत्यंत समजूतदारपणाची होती. हे आमूलाग्र परिवर्तन त्याने सहजपणे स्वीकारले. आश्रमातील हरिजन कुटुंबाच्या अस्तित्वाने, रूढीग्रस्त अहमदाबाद निवासी खवळून उठले होते. कोचरब आश्रमातील विहिरीच्या मालकाने हरिजन दूधाभाईशी भांडण सुरू केले होते. त्यावेळी देवदासने मोठ्या कौशल्याने हे भांडण मिटविले आणि आश्रमातील पाण्याची सोय सुरळीत चालू ठेवली होती.

साबरमती आश्रमात प्रथम महादेव देसाई व त्यानंतर तीन वर्षांनी प्यारेलालजी, बापूजींचे सेक्रेटरी म्हणून आले होते. या दोघांबरोबरही देवदासची विशेष मैत्री होती. त्यांच्या बरोबर वावरल्याने त्याचा खूप विकास झाला. माझे वडील सांगत असत की, प्यारेलालजी आणि देवदास यांच्यात गाढ मैत्री होती. देवदास मोठे विनोदप्रिय होते. हसणे आणि हसविणे ही त्यांची विशेषता होती. माझी आई सांगत असे की, आश्रमात सर्वजण रोज आपले कपडे स्वतःच धुऊन टाकीत असत. मात्र देवदासभाईंचे कपडे तीन तीन दिवस बादलीत तसेच भिजत पडत असत. आईला सवड मिळाली की, ती त्यांचे कपडे धुऊन टाकीत असे. परंतु तीनचार दिवस कपडे पडून राहिल्यावर जेव्हा वापरायला दुसरे कपडे राहत नसत तेव्हा

देवदास म्हणत, "चला प्यारेलाल, आपण दोघे घरी जाऊन आपले कपडे धुऊन टाकू". आणि त्यानंतरच ते कपडे धुतले जात असत.

याच काळात पं. मोतीलाल नेहरू, अलाहाबादेत 'इंडिपेंडंट' हे वृत्तपत्र चालवीत असत. प्रारंभी चिंतामणी शास्त्री त्याचे संपादक होते. जेव्हा शास्त्रींना अलाहाबादेत राहणे शक्य नाहीसे झाले तेव्हा मोतीलालजी अत्यंत चिंतित झाले. तेव्हा, 'इंडिपेंडंट'चे काम करण्यासाठी व मोतीलालजींना साहाय्य करण्यासाठी बापूजींनी महादेव देसाईंना अलाहाबादेस पाठविले होते. त्यानंतर देवदासनाही अलाहाबादेस पाठविण्यात आले. महादेवभाईंना सरकारने अटक केली तेव्हा देवदास काका त्या वृत्तपत्राचे संपादन करू लागले. देवदास गांधीमुळे मोतीलालजींना मोठाच आधार लाभला होता. शेवटी देवदास काकांनाही सरकारने पकडून नैनीच्या तुरुंगात टाकले होते. देवदास काका विशेष करून उत्तर भारतातील तुरुंगांतून राहिले. १९२२ च्या आंदोलनात त्यांना पंजाबच्या आज पाकिस्तानात असलेल्या गुजरात शहराच्या जेलमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांना या तुरुंगात फार कष्ट सोसावे लागले परंतु फिनिक्स आश्रमात तयार झालेल्या या सत्याग्रही तरुणाने ते सारे कष्ट हसत हसत झेलले. मोटीबा बिचारी चिंता करीत असे की 'माझा देवा कसा असेल?' परंतु त्या गरीब आईला इतक्या लांब मुलाच्या भेटीसाठी जाणेही शक्य नव्हते. एकदा पं. जवाहरलाल नेहरूंबरोबर देवदास काकांना अटक झाली आणि नाभा संस्थानच्या जेलमध्ये त्यांना ठेवण्यात आले. संस्थानांतील तुरुंगामधील अव्यवस्था, अस्वच्छता आणि तेथील जुलूम व क्रूर वागणूक अत्यंत असह्य असे. एक महिनाभर ते या जेलमध्ये राहिले असावेत. जवाहरलालजी आणि देवदास काका दोघेही मलेरिया घेऊन तेथून बाहेर आले होते.

इंदूरमध्ये साहित्य परिषद भरली होती. बापूजी या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. देवदास काका त्यावेळी हरिहर शर्मांबरोबर राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्यासाठी दीर्घकाळ मद्रासला राहिले होते. राष्ट्रभाषा प्रचारसमितीच्या आद्य प्रचारकांत व प्रणेत्यांत देवदास काकांचे नाव अग्रगण्य आहे. प्रचारसमितीच्या कार्यालयात त्यामुळेच आजही तरुण देवदास गांधीचे छायाचित्र लावलेले असते. मद्रासमधील या वास्तव्यात देवदास काकांनी तमिळ भाषेचे चांगले ज्ञान करून घेतले होते. फिनिक्स आश्रमापासूनच रामदास व देवदास, दोघांनाही तमिळ बोलता येत होते परंतु मद्रासमध्ये देवदास काकांनी तमिळमध्ये लेखन करण्याचेही शिकून घेतले. तमिळ भाषेतील पत्रे वाचताना मी त्यांना स्वतः बघितले आहे. याच काळात देवदास काकांचा राजाजींची कनिष्ठ कन्या लक्ष्मी हिच्याशी परिचय झाला आणि हळूहळू या परिचयाचे प्रणयात रूपांतर झाले. आपल्या मुलीने एका परप्रांतीय वणिव पुत्राशी विवाह करावा हे

आरंभी तरी राजाजींना फारसे पसंत नव्हते आणि राजाजींना त्रास व्हावा असे काही करण्यास त्यामुळे बापूजींचेही मन होत नव्हते. परंतु लक्ष्मी आणि देवदासने मोठ्या धैर्याने व दृढतेने प्रसंगाला तोंड दिले तेव्हा राजाजींचा विरोध कमी झाला.

१९३३ मध्ये लक्ष्मी आणि देवदास यांचा पुण्यात विवाह झाला. आपल्या धाकट्या भावाच्या विवाहसमयी माझे वडील उपस्थित होते. परंतु माझ्या आईला मात्र बापूजींनी या लग्नासाठी पुण्यास येऊ दिले नाही. लग्नात पाहुण्यांची गर्दी वाढवून विनाकारण अधिक खर्च करणे, समाजसुधारक बापूजींना मान्य नव्हते व आपल्या तत्त्वाची अमलबजावणी त्यांनी आपल्या या सुनेपासून सुरू केली. लग्नानंतर तीन दिवसांनी मला आणि एक वर्षाच्या कनूला बरोबर घेऊन माझी आई पुण्यास गेली होती. आमची लक्ष्मी काकी मोठी सुंदर होती. तिचा वर्ण गोरा, अंगकाठी सडपातळ आणि केस काळे, लांब आणि घनदाट होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दक्षिणेतील ब्राह्मण कन्येची श्रेष्ठ अभिजात सुसंस्कृतता प्रकट होत होती. त्यांचे उठणे, बसणे, बोलणे सारेच मोठे शालीन आणि मोहक होते. त्या स्वतः विदुषी होत्या आणि आपले पिता राजगोपालाचारी यांच्या पुस्तकांचा हिंदीत सुंदर अनुवाद करीत. त्यांनी हिंदीत अनुवादित केलेले 'दशरथ नंदन श्रीराम' हे एक श्रेष्ठ पुस्तक असून किशोरवयीन मुलांच्या पाठ्यक्रमात ते समाविष्ट केले पाहिजे असे माझे मत आहे. त्यामुळे, 'रामायण' या आपल्या देशातील महाकाव्याची कथा मुलांना सहजगत्या कळेल आणि त्यांच्यावर चांगले संस्कार घडतील. लक्ष्मीकाकी आणि देवदास काकांमध्ये अपार प्रेम होते. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत दोघांच्याही मनातील ही प्रीती अक्षुण्ण राहिली होती. काकी अत्यंत चतुर, समजदार आणि वृत्तीने उदार होती. त्यांनी गुजराती सासर आपलेसे केले होते आणि सर्वांना निभावून घेत आपला संसार चालविला होता.

माझी आई आणि देवदासकाका या दीरभावजयीतही मोठा जिव्हाळ्याचा आणि आदराचा संबंध होता. माझ्या आईवडिलांच्या विवाहाची सारी व्यवस्था देवदास काकांनीच अंगावर घेतली होती. रसिक वृत्तीच्या देवदास काकांना आपल्या साऱ्याच भावजयांविषयी प्रेम होते परंतु बहुधा दीर्घकाळ आश्रमात एकत्र राहिल्यामुळे निर्मला गांधींविषयी त्यांना विशेष आत्मीयता होती. आमच्या मोटीबाचा पराकोटीच्या स्वच्छतेचा आग्रह सर्वज्ञात आहे. प्रत्येक दिवशी त्यांचे स्वयंपाकघर साबणाने धुतले जात असे. त्याकाळी जमिनीवर बसून जेवण्याची प्रथा होती आणि जेवणाचे ताट समोर एका लाकडी पाटावर मांडले जात असे. जेवणात वापरलेले सारे पाट मोटीबा जेवणानंतर धुऊन घेत असे. हे काम बरेच कठीण असे. नवीन सून म्हणून आलेली माझी आई सासूच्या इच्छेनुसार हे सारे काम मोठ्या नेटकेपणाने करीत असे. यात वेळ जाणे आणि थकवा येणे स्वाभाविक होते. मात्र याबद्दल

तिने कधी तक्रार केली नाही. मात्र देवदास गांधीच्या सूक्ष्म नजरेतून आपल्या भावजयीचे हे कष्ट सुटत नसत. तेव्हा मोटीबाला ते मोठ्या भोळेपणाचा आव आणून म्हणत असत, "बा, इतक्या वेळेस पाट धुतल्याने त्यांना पडसे येईल. त्यांना उगीच एवढा त्रास देऊ नकोस". त्यावर मोटीबा आणि माझी आई दोघीही खळखळून हसत आणि थकवा दूर पळून जाई. कधीकधी पाट स्वच्छच असल्यामुळे ते न धुतले तरी चालत असे, पण आमची आई सांगत असे की, आमचे वडील तर गंभीर प्रकृतीचे असल्यामुळे या बाबतीत त्यांचा आधार मिळण्यासारखा नसे. देवदास काका मात्र वेळी अवेळी तिला पूर्ण साहाय्य करीत. ते दोघे आदर्श दीरभावजय होते. देवदास काकाही मला सांगत असत की, "आपल्या घराच्या दोन चाव्या आहेत. एक नागपुरात राहते (निर्मला गांधी) आणि दुसरी दिल्लीत (लक्ष्मी गांधी).

गोलमेज परिषदेच्यावेळी महादेव देसाई, प्यारेलालजी आणि मीराबहेनप्रमाणेच देवदासकाकांना देखील बापूजी लंडनला बरोबर घेऊन गेले होते. लंडनमध्ये बापूजींचे बहुतेक सारे व्यक्तिगत काम काका सांभाळीत असत. बापूजींसह देवदास काका रोमारोलाँच्या घरीही गेले होते.

१९२७ मध्ये देवदास काका डॉ. अन्सारी यांच्याबरोबर जामिया मिलियात राष्ट्रभाषेचे काम करीत होते. त्यावेळी हरिलाल काकांचा दुसरा मुलगा रसिक यालाही ते आपल्याबरोबर दिल्लीस घेऊन गेले होते. रसिकभाई मोठे दिल खुलास आणि 'मस्त मौला' तरुण होते. ते जामिया मिलियात चरखा चालवायला शिकवीत असत. तिथे त्यांना टाइफॉईड झाला. देवदास काकांनी खूप उपाय केले परंतु रसिकचा मृत्यू झाला. आपण रसिकला वाचवू शकलो नाही. याचे देवदासकाकांना फार दु:ख आणि विषाद वाटला. हरिलाल काका आणि बापूजींनी त्यावेळी देवदास काकांचे सांत्वन केले होते. हरिलाल काकांची ही उदारता लक्षणीय म्हटली पाहिजे!

१९३३ मध्ये घनश्यामदास बिर्लांच्या आग्रहावरून देवदास काका दैनिक 'हिंदुस्थान टाईम्स' मध्ये काम करू लागले. आपल्या कुशल व्यवस्थापनाने त्यांनी थोड्याच दिवसांत 'हिंदुस्थान टाइम्स'ला राष्ट्रीय वृत्तपत्राच्या श्रेणीत आणून सोडले होते. प्रेसमधील कोणतेही काम असे नव्हते की, जे काकांना स्वत:ला माहीत नव्हते अथवा करता येत नव्हते. त्यामुळे त्यांना प्रेसमध्ये विशेषज्ञाचे स्थान प्राप्त झाले होते. 'हिंदुस्थान टाइम्स' त्यांना आपले वृत्तपत्र वाटत होते. स्वातंत्र्याच्या लढाईचे ते एक मुखपत्र होते. काकांच्या नेतृत्वाखाली 'हिंदुस्थान टाइम्स' वस्तुत:च एक राष्ट्रीय वृत्तपत्र बनले होते. सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर निर्भयपणे टीका करणारे असे हे वृत्तपत्र होते. महायुद्धाच्या काळात सरकाने वृत्तपत्रांवर नियंत्रण

लावले होते. परंतु देवदासकाकांच्या सूचनेवरून संपादकांची एक समिती स्थापन करण्यात आली होती आणि तिच्या मार्गदर्शनाने स्वेच्छेनेच वृत्त प्रकाशित करताना मर्यादापालन होत असे. अशारीतीने, वृत्तपत्रीय स्वातंत्र्याच्या रक्षणात देवदास गांधींनी पुढाकार घेतला होता. गांधीपुत्र देवदासवर त्याकाळी इंग्रजसरकारचे सतत लक्ष असे. परंतु दिल्लीत राहूनच देवदास सरकारच्या पंजातून बचावत राहिले आणि 'भारत छोडो' आंदोलनास साहाय्यही करीत राहिले. त्याकाळी ते दिल्ली काँग्रेस समितीच्या निकट संपर्कात राहून काम करीत होते आणि दिल्लीतील आमचे घर तेव्हा सत्याग्रही व आश्रमवासीयांसाठी धर्मशाळाच बनले होते. काका-काकींनी सर्वतऱ्हेच्या पाहुण्यांचे सदैव स्वागत केले आणि अनेकप्रकारे साहाय्य केले. अनेक तऱ्हेच्या व्यग्रतेतही देवदास काकांचा कधी तोल जात नसे आणि प्रसन्नता कधी हरपत नसे. कधी हसून, कधी गोड शब्दात झिडकारून तर कधी उपहास-उपरोधाचा आधार घेऊन ते काम करवून घेत असत. ते कधीच उद्विग्न होत नसत. परंतु गरज पडेल तेव्हा संतापाचे सोंग आणून आपला रोष प्रकट करू शकत होते. आपला प्रेस, आपले वृत्तपत्र आणि आपले कुटुंब हेच त्यांचे जग होते. त्यातच ते संतुष्ट होते आणि रात्रंदिवस काम करूनही कधी थकत नव्हते. प्रत्येक दिवशी रात्री २।। वाजता वृत्तपत्राची पहिली प्रत प्रेसमधून बाहेर पडत असे. ती समग्र वाचून तिच्यातील मुद्रणदोष सुधारून आणि छपाईचा अंतिम आदेश देऊनच काका घरी परतत असत. पूर्ण पंचवीस वर्षे देवदास काकांनी दिवसरात्र एक करून या प्रेसमध्ये काम केले. लहानपणी आफ्रिकेत असताना मिळालेल्या चांगल्या आहारामुळे काकांची प्रकृती उत्तम होती आणि म्हणूनच हे कष्ट ते सहन करू शकत होते. वेळी अवेळी काम करण्याबद्दल माझे वडील देवदास काकांना नापसंती दाखवीत पण हलक्या आवाजात. मात्र स्वतः एक साप्ताहिक चालविणाऱ्या मणिलाल काकांना देवदास काकांचा हा नियमित अनियमितपणा सहन होत नसे. ते देवदास काकांना रागावत. परंतु देवदास काका इतके आनंदीवृत्तीचे व गोड स्वभावाचे होते की, मणिलाल काकांची दटावणी ते हसून टाळून देत. पंचवीस वर्षांच्या अशा अखंड कामाच्या व्यापाने सुदृढ शरीरही थकून तक्रार करू लागते, मात्र देवदास काका आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्षच करीत राहिले.

बहुतेक वाचकांना एकेकाळचे मुंबईचे 'ब्लिट्झ' हे साप्ताहिक परिचित असेल. भडक आणि अतिशयोक्त बातम्या छापणे ही ब्लिट्झचे संपादक करंजिया यांची नेहमीची पद्धत राहिली. सदैव सत्तेला साथ देऊन, इकडचे तिकडचे खरे खोटे वृत्तान्त ब्लिट्झमधून देण्यात

ते प्रवीण होते. कायद्याचे बारकावे आणि गुंतागुंत त्यांना चांगल्यारीतीने अवगत असल्यामुळे तर लोक त्यांना वचकून असत. आणि कोणी काही बोलत नसे. १९५४-५५ मध्ये 'ब्लिट्झ'ने देवदास गांधीवर बेजबाबदार पत्रकारितेचा आणि चारित्र्यहीनतेचा आरोप केला आणि त्याच आशयाची व्यंगचित्रेही प्रसिद्ध केली. अशा तऱ्हेचे निराधार आरोप सहन करणे कठीण होते. त्या पेक्षाही अशा लेखनाने समाजाची हानी होत असते. वृत्तपत्रांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रशिक्षण होऊ शकते परंतु ही वृत्तपत्रेच जर आपले कर्तव्य विसरून लोकांना भडकवीत राहिली तर समाजात तणाव वाढून अराजकतेला निमंत्रण दिल्यासारखे होईल. या भूमिकेतूनच देवदास काकांनी एका निष्ठावान व प्रामाणिक नागरिकाच्या नात्याने 'ब्लिट्झ'चे मालक आणि संपादक श्री करंजिया यांच्यावर मुंबईच्या हायकोर्टात अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला. अशा निराधार आरोपांची देवदास गांधींना काही भीती नव्हती. दिल्लीतील आणि साऱ्या देशातील लोकांना देवदास गांधींची निर्भय पण न्यायनिष्ठ पत्रकारिता चांगली परिचित होती. मात्र 'ब्लिट्झ' सारखी वृत्तपत्रे अनेकदा निर्दोष नागरिकांना बरबाद करीत असतात. अशा अनीती आणि अन्यायाचा सामान्यलोक प्रतिकार करू शकत नाहीत. असा खटला चालविण्याचे कौशल्यही त्यांना अवगत नसते व तेवढे साहसही त्यांच्यात नसते. यासाठी धैर्य हवे असते तसाच पैसाही हवा असतो. बिचारे सामान्य लोक मन मारून गप्प बसतात. आज काल तर दररोजच कोणा ना कोणा व्यक्तीची बदनामी करणारे वृत्तान्त प्रसिद्ध होत असतात. परंतु ते कोर्टात जाऊ शकत नाहीत, कारण बहुतांशी असे बदनामीकारक आरोप निराधार नसतात. देवदास गांधींच्या संदर्भात असे काहीच नव्हते. त्यांच्यात नैतिक धैर्य होते आणि त्यांचे चारित्र्य इतके निष्कलंक होते की, त्याबाबतीत कसल्या शंकेला वा भीतीला जागा नव्हती. त्याबरोबरच अशा कामात आवश्यक असणारे कौशल्यही त्यांच्या अंगी होते. त्यांनी हा अब्रुनुकसानीचा खटला एखाद्या धर्मयुद्धाच्या दृढसंकल्पाने केला होता. आमचे दिल्लीचे घर आणि कार्यालय सारेच या खटल्याच्या तयारीत तनमनाने गुंतले होते. मीदेखील नव्यानेच वकिलीची परीक्षा पास केली होती. मला काही विशेष कळत होते असे नव्हे पण वकिलांच्या चर्चा मात्र मी अवश्य ऐकत असे. याखटल्यात देवदास गांधी जिंकले आणि परिणामी करंजिया साहेबांना लेखी माफी मागावी लागली. त्याशिवाय दहा हजार रुपये दंड आणि तीस हजार रुपये दाव्याचा खर्च म्हणून करंजियांना द्यावे लागले होते. त्यांचा प्रेस जप्त करण्याचाही आदेश निघाला होता परंतु याबाबतीत मात्र करंजियांनी पूर्वसिद्धता करून ठेवली होती. 'ब्लिट्झ'चा छापखाना श्रीमती करंजियांच्या नावे नोंदलेला होता. देवदास गांधी विरुद्ध 'ब्लिट्झ' हा खटला अत्यंत गाजला आणि 'ब्लिट्झ'च्या खोट्या प्रचारावर प्रथमच

अंकुश लागला होता. आमच्यावर करण्यात आलेले लांच्छदनास्पद आरोप जाहीरपणे खोटे असल्याचे सिद्ध झाले याचा आम्हा सर्वांना अत्यंत आनंद झाला होता. आमच्या मानमर्यादेला कुठलाही धक्का लागला नव्हता परंतु हा विजय अत्यंत महाग पडला होता. या खटल्याच्या चिंतेने आणि खोट्या आरोपांच्या आघाताने काकांची प्रकृती आतून ग्रासली होती. खटला जिंकल्याच्या दुसऱ्याच दिवशी काकांना मधुमेह झाल्याचा डॉक्टरांचा रिपोर्ट मिळाला. मधुमेह सामान्यतः आनुवांशिक रोग समजला जातो. देवदास काकांच्या पूर्ण परिवारात कोणालाही मधुमेह झाला नव्हता आणि त्यांच्यासारखे आरोग्यसंपन्न बालपण तर क्वचितच कोणाला लाभत असावे. माझे वडील आणि मणिलाल काका यांची चिंता खरी ठरली होती. पंचवीस वर्षांच्या परिश्रमांनी देवदास काकांची वज्रकाय प्रकृती झिजून झिजून ठिसूळ बनली होती. परंतु मोहनलाल गांधींचे पुत्र आजाराला घाबरतही नसत व त्यांची पर्वाही करीत नसत. देवदास काकाही पूर्ववत काम करीत राहिले. तेच अर्ध्यारात्री भोजन करणे, ब्रह्ममुहूर्तावर झोपणे आणि तीच धावपळ करणे पुन्हा सुरू झाले. यावेळी काका माझ्या आईला म्हणाले होते, "मी आणखी दोन वर्षे जगेन अधिक नाही" माझ्या आईने सेवाग्राम आश्रमात काही दिवस राहाण्याची अनेकदा इच्छा व्यक्त केली होती. आश्रमातील नियमित दिनचर्येने व पथ्य पाण्याने देवदास काकांची प्रकृती सुधारेल असे तिला वाटत होते. बापूजी जिवंत असते तर, 'हिंदुस्थान टाइम्स' च्या या अनियमित जीवनातून त्यांनी काही दिवसांसाठीतरी निश्चितच आपल्या देवदासला बाहेर नेले असते. परंतु बापूजी नव्हते आणि माझ्या आईवडिलांचे म्हणणे कोणी ऐकले नाही. काका आणि काकी हवापालटासाठी म्हणून मद्रासला गेले आणि तेथून म्हैसूर बंगलोर करीत मुंबईला परतले. त्या दिवसांत मी माझे दुःख लपवीत, मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात उप जिल्हाधिकाऱ्याचे काम करीत होते. काही कामानिमित्त मला मुंबईस जावे लागले होते. मुंबईत शनिवार आणि रविवार दोन दिवस मी देवदास काकांजवळ राहिले. ते इतके अशक्त झाले होते की, सदरा घालण्याची शक्तीही त्यांच्यात राहिली नव्हती. देवदास काका मला सर्वाधिक प्रिय होते. माझे आईवडील आणि काका यांत मला काही अंतर जाणवत नव्हते. मुंबईतील कार्यालयीन काम संपवून उरला वेळ मी काकांच्या जवळ राहिले. त्यांची सेवा करणे मला सदैव मनापासून सुखावीत असे. काकाही अत्यंत प्रेमळ आणि उदार होते. तेही म्हणत की, "अशी मुलगी कोणाला लाभणार आहे?" रविवारी रात्रीच्या ट्रेनने मला परत छिंदवाड्यास जावयाचे होते, परंतु काकांच्या आग्रहाखातर मी आणखी एक दिवस मुंबईत थांबले. बाहेर कोणाची भेट घेण्याची ओढ नव्हतीच, त्यामुळे सारावेळ काकांबरोबरच राहिले. त्यांच्या अशक्तपणाची मला चिंता वाटली खरी पण

त्याच्या भीषण परिणामाची मला कल्पना नव्हती. छिंदवाड्यातील निसर्गसौंदर्य आणि वृत्तपत्रे अथवा टेलिफोनच्या प्रभावाने निरामय असलेले तेथील जीवन यांचे रसभरित वर्णन करून मी काकांना लालचावले होते. त्यांनी माझी सूचना मान्य केली आणि दोन महिन्यानंतर दिवाळीच्या सुमारास काकींसह छिंदवाड्याला येऊन माझ्याकडे राहण्याचे कबूल केले. या आश्वासनाने प्रसन्न होऊन आनंदित मनाने सोमवारच्या गाडीने मी छिंदवाड्यास परतले.

१८५७ च्या प्रथम स्वातंत्र्यसंग्रामाच्या शताब्दी समारंभाच्या जिल्हाभरातील कार्यक्रमांचे आयोजन माझ्या नियंत्रणाखाली व्हावयाचे होते. सारे काही विसरून मी त्या व्यवस्थेत गढून गेले होते. छिंदवाड्यास परत येऊन ४८ तासही झाले नव्हते तोच मुंबईहून फोन आला की, काका आता या जगात नाहीत. इतक्या लौकर काकांना मृत्यू येऊ शकेल यावर माझा आणि माझ्या आईवडिलांचा विश्वासच बसत नव्हता. आम्ही तर स्वप्न पाहत होतो की, माझे वडीलच दीडदोन महिन्यांनी दिल्लीला जाऊन काका आणि काकींना छिंदवाड्यास घेऊन येतील आणि येथे नियमित आहारविहार आणि सेवाशुश्रूषेने त्यांची प्रकृती सुधारता येईल. मुंबईचा फोन आला तेव्हा मी पुन्हा पुन्हा विचारले, "काका आजारी आहेत ना?" परंतु फोनवरील त्या क्षीण आवाजात, माझ्या वेड्या मनाला काका जिवंत असल्याची आशा करावी असा कुठलाच संभ्रम नव्हता. आईवडिलांप्रमाणेच देवदास काकांचीही अद्वितीय सेवा करून कृतार्थ व्हावे अशी माझी तत्कालीन उदास व खिन्न मनःस्थितीत आकांक्षा होती. काकांचा प्रत्येक शब्द मला वेदवाक्यासारखा होता आणि त्यांची प्रत्येक हालचाल मला अत्यंत आकर्षक व अनुकरणीय वाटत असे. कधीकधी माझी काकी याबद्दल लाडाने माझी चेष्टाही करीत असे, पण मला त्याची  पर्वा वाटत नव्हती. माझे वडील आणि देवदास काकांचे परस्परांवर अपार प्रेम होते आणि चुलत्यांनी आपल्या पुतण्यांचे मार्गदर्शन करण्याची आमच्या कुटुंबातील परंपराच होती. या आधुनिक युगात पुतण्याऐवजी माझ्यासारखी पुतणी काकांना सर्मर्पित होती. देवदास काकांच्या एकेका शब्दाखातर कुठलाही त्याग वा बलिदान करण्यास मी सिद्ध होते. आता तेच काका मला अर्ध्या वाटेत सोडून निघून गेले होते. स्वतःच्या जीवनात मिळविलेले सारे काही, आदर, प्रेम, समर्थन, सेवा कोणाच्या चरणी मी आता अर्पण करू शकणार होते? आपले कोसळलेले जीवन पुन्हा उभे करण्याचा मी केवढ्या कसोशीने प्रयत्न करीत आहे हे आता कोण जाणणार? आणि मला तर माझ्या कर्तृत्वाचे देवदास काकांकडून प्रमाणपत्र हवे होते. जीवनसंघर्षात कोणत्याही आघातात मोडून न पडणाऱ्या मातीचीच मीही बनलेली आहे हे दाखवून देण्यासाठी आता बापूजीही राहिले नव्हते. बापूजींच्या जागी माझ्यासाठी काका होते. त्यांच्या मृत्यूनंतर मी आतल्याआत खचून गेले. माझ्या वडिलांचे दुःख तर बघवत नव्हते. त्यांचा अंतिम प्रेमळ सहोदर सखा

त्यांना सोडून निघून गेला होता. वर्षभरापूर्वीच १९५६ मध्ये मणिलाल काका हे जग सोडून गेले होते. ते पक्षाघाताने आजारी असल्यामुळे त्यांच्या मृत्यूची तशी काहीशी पूर्वकल्पना होती. परंतु देवदास काका तर अंतिम क्षणापर्यंत काम करीत होते. आणि अनपेक्षितपणेच आपल्या कुटुंबीयांना शोकात बुडवून निघून गेले होते. मुंबईला जाऊन काकींजवळ राहावे असे मला वाटत होते. आम्ही सारेच या वज्राघातात समभागी होतो. काकीचे दुःख तर अकथनीयच होते. माझ्या सहृदय जिल्हाधिकाऱ्यांनी माझी व्यथा कमी व्हावी म्हणूनच मला १८५७ च्या शताब्दी समारंभाच्या कामातून मुक्त केले नाही. माझ्या आईवडिलांनी ठरविले की, आता लक्ष्मी काकीला एकटी राहू न देता घरातले कोणीतरी तिच्याजवळ राहावे आणि त्यासाठी एकदोन महिन्यानंतर मीच दिल्लीला जाणे योग्य होईल. बाह्यतः मी स्वतःला सावरले तरी काकांच्या आठवणीने मी रात्र रात्र रडत असे. माझ्या आशाआकांक्षा जागीच राहिल्या होत्या. आता जीवनात आईवडील काय ते उरले होते. पण ते देवदास काका थोडेच होते? नियतीची गती विचित्र असते. आज कोणी असते आणि उद्या नसते! काळ मात्र पुढे जातच असतो. हे कालचक्र कधी थांबत नसते. माझ्या बाबतीतही तेच घडत होते. पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा शताब्दी समारंभ धूमधडाक्यात साजरा झाला. लोकांनी माझ्या कार्यकुशलतेचे कौतुक केले. जिल्हाधिकारी संतुष्ट होते कारण आमच्या जिल्ह्याचा कार्यक्रम उत्कृष्ट ठरला होता परंतु माझ्या हृदयाचा हाहाकार मात्र शांत होत नव्हता. दिवसातले असे एकही काम नसावे जेव्हा मला काकांची आठवण येत नसेल. आज या घटनेला तीस वर्षे होत आली आहेत तरीही घरसंसारातील, कार्यालयातील वा सार्वजनिक जीवनातील अनेक लहान मोठी कामे करीत असताना मला काकांचे स्मरण झाल्याविना राहत नाही.

क्वचितच एखाद्या पुतणीला आपल्या काकांकडून एवढे काही मिळाले असावे. वागणे बोलणे तर लहान मुले आपल्या वडीलधाऱ्यांकडूनच शिकत असतात. माझ्या काकांनी मला फळे कशी कापावीत ते शिकविले होते. विशेषतः एकही दाणा फुटू न देता डाळिंब कसे कापावे, फोनवर कसे बोलावे आणि शब्दाशब्दातील बारकावे ओळखून त्यांचा वापर कसा करावा, हे सारे त्यांनीच शिकविले होते. आमच्या घरात शब्दकोशाला फार महत्त्व होते. हिंदी, गुजराती, इंग्रजी आणि संस्कृत शब्दकोश मेजावर समोरच ठेवलेले असत. कोणत्याही शब्दातील मूळ धातू, त्याची व्युत्पत्ती आणि त्याच्या अपभ्रंशाची चर्चा चालत असे आणि दोनचार शब्दकोश बघणे, वाचणे, ऐकणे आणि विचारविनिमय करणे ही नेहमीची पद्धत होती.

माझे काका गाणेही चांगले गात असत. त्यांनी मला दोन इंग्रजी प्रार्थना आणि अनेक हिंदी व गुजराती भजने शिकविली होती. मी सतत तर त्यांच्याबरोबर नसे. शाळा कॉलेजात असताना लहान सुट्यांत दिल्लीला काका-काकी जवळ आणि मोठ्या सुट्या नागपूरला आई-वडिलांजवळ

घालवीत असे. दहा-पंधरा दिवसांच्या अल्पावधीतही देवदास काका मला खूप काही शिकवीत असत. वैशिष्ट्य असे की, या शिक्षणाला टेबल, खुर्ची, कागद पेन्सिल अथवा नियमित वेळाची गरज नसे. दिवसाचे चोवीस तास आम्ही सारेजण एकच असू. रात्रीदेखील काकांची चारी मुले आणि मी एका मोठ्याशा खोलीत काका-काकीबरोबरच झोपत असू आणि अनेकदा माझ्या काकांनी एखाद्या वत्सल मातेप्रमाणे माझ्या अंगावर पांघरूण घातले होते. आम्ही सिमल्याला गेलो होतो तेव्हा तेथे पिसवांचा खूप त्रास होता आणि माझे काका डास आणि पिसवा डसू नयेत म्हणून रात्री झोपताना माझ्या हातापायांना व चेहऱ्याला घासलेट चोळीत असत. आमच्या सर्वांगीण विकासाकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. असा कोणताच विषय व कोणतेच क्षेत्र नव्हते ज्यात त्यांनी मला काही शिकविले नाही. काकांचे अनुकरण करणे म्हणजेही साक्षात शिक्षणच होते. माझ्यासाठी काका म्हणजे पराकोटीचे जिवंत प्रतीक होते. ते जे कोणते काम करीत ते मोठ्या कौशल्याने व सिद्ध हस्ते करीत असत. त्यांच्या तोंडी एका पदाच्या दोन ओळी अनेकदा असत. "सईसी ईलम बडा नफीस। जामे लगत है बक्सुआ छत्तीस" याचा अर्थ असा की, घोड्याचा खरारा करणे मोठ्या कौशल्याचे काम आहे. घोडा नखशिखांत सुंदर होण्यातच त्याचे साफल्य असते." काका जेव्हा एखाद्या गोष्टीचा विरोध करीत तेव्हा तोही इतका मधुर असे की, आम्हाला कधी तो बोचत नसे. मात्र चेष्टा विनोदातही ते आमचे प्रशिक्षण जागरूकतेने करीत असत. एखादी गोष्ट आमच्या हातून करवून घेताना म्हणत, "हे तर खरारा वासल्याचे सेवेच काम आहे. बघूया कोण करू शकतो ते" किंवा "हे तर शिस्तीचे काम आहे. येथे सुस्ती चालणार नाही."

१९४५ मधील लॉर्ड वॅव्हेलच्या सिमला कॉन्फरन्सच्या वेळी बापूजी आणि देशाचे इतर प्रमुख नेते सिमल्याला गेले होते त्यावेळी देवदास काकाही परिवारासह दोन महिने सिमल्याला थांबले होते. मलाही बरोबर नेले होते. या सिमल्याच्या मुक्कामात काकांच्याबरोबर डोंगर टेकड्यांवरून भरपूर भटकण्याची, अनेक लोकांना भेटण्याची आणि वागण्या-बोलण्याच्या रीतीभाती बघण्याची अपूर्व संधी मला लाभली होती. असे वाटत होते की, एखाद्या अखंड जागृत जगात सतत ज्ञानग्रहण चालू आहे. आज तीस वर्षांनंतरही माझे देवदास काका माझ्या मनाच्या स्मृतिकोषात जिवंत आहेत. मनातल्या मनातच आम्हा काका-पुतणीच्या गप्पा गोष्टी होतात. त्यातूनच मला कधी टोमण्यांच्या रूपाने तर, कधी चेष्टेच्या माध्यमातून अनेकदा काकांचे आश्वासन आणि प्रोत्साहन लाभते. माझ्या वडिलांप्रमाणेच देवदास काकाही माझ्या जीवनाचे दीपस्तंभ होते. आज ते नसले तरी सूक्ष्मरूपाने ते माझ्या अंतर्मनात दीपस्तंभाप्रमाणे स्थिर आहेत.

## १३

# पत्रकार देवदास

३ ऑगस्ट, १९५७ च्या रात्री देवदास गांधींचे मुंबईत निधन झाले. आपण आता फार तर दोन वर्षे जगणार आहोत असे मधुमेह झाल्याचे कळाल्यावर ते आपल्या वहिनी निर्मला गांधींना वारंवार म्हणत असत. आपल्या आजाराच्या परिणामाची जाणीव होऊन त्यांनी चित्रगुप्ताकडे दोन वर्षांची मुदत मागितली होती की, काय कुणास ठाऊक? ही त्यांची इच्छा एवढी न्याय आणि तर्कसंगत होती की, त्यांच्या इच्छेप्रमाणेच घडून आले. देवदास काकांमध्ये वस्तुस्थितीच्या यथार्थ आकलनाची विलक्षण शक्ती होती. दोन वर्षांच्या या अवधीत त्यांनी कदाचित आपल्या मनाची तयारी केलीही असेल, पण आम्हा कुटुंबीयांना मात्र त्यांचा हा वियोग असह्य होता. वयोवृद्ध राजाजी आपल्या जावयाच्या अकाल निधनाने खचून गेले. देशातून आणि परदेशातून अनेक सांत्वनपर शोकसंदेश आले होते. परंतु त्यांनी गेलेली व्यक्ती परत थोडीच येणार असते? आमच्या कुटुंबाची ही हानी भरून न येणारी होती.

मृत्यूच्या वेळी देवदास गांधी प्रतिभा, सत्ता, सामर्थ्य आणि ऐश्वर्याच्या परमउत्कर्ष बिंदूवर होते. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांचे श्रेष्ठ स्थान होते. जगप्रसिद्ध रॉयट्ट या वृत्तसंस्थेच्या ते संचालकपदावर होते. देशातील प्रेस ट्रस्टचे ते अध्यक्ष होते. भारत सरकारचे प्रधानमंत्री आणि अन्य मंत्री त्यांचे वैयत्तिक स्नेही होते. इंग्लंडचे महान विचारवंत आणि नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ त्यांचे मित्र होते. आफ्रिकेतील आणि अमेरिकेतील काळ्या लोकांच्या स्वातंत्र्य संग्रामात देवदास काकांचे मार्गदर्शन आणि सक्रिय सहभाग असे. दिल्लीचे त्यांचे घर नेहमीच काळ्या, गोऱ्या, पिवळ्या, आर्य, अनार्य, अफगाण आणि आफ्रिकी अनाहूत पाहुण्यांनी गजबजलेले असे. दिल्लीतील विविध देशांचे राजदूत, महात्मा गांधींच्या या प्रतिभाशाली पुत्राने प्रभावित झालेले होते. विशेषतः चीन व इजिप्तचे राजदूत आणि अमेरिकेचे चेस्टर नौल्स त्यांचे व्यक्तिगत मित्र होते. देवदास काकांच्या मनात लहान मोठा, उच्चनीच हा भेदभाव नव्हता. ते सर्वांशीच विशिष्ट मर्यादेने व प्रतिष्ठितपणे वागत असत. त्यांना भेटणारा प्रत्येक जण त्यांच्या कर्तृत्वाने, बुद्धिमत्तेने व जोडीला तेजस्वी स्वाभिमानाने भारावून जात असे. त्या काळी पं. जवाहरलाल नेहरूंची इच्छा होती की, देवदास काकांनी मॉस्कोतील भारतीय राजदूताचे पद स्वीकारावे परंतु सरकारचा वरचष्मा स्वीकारणे काकांना

मान्य नव्हते. 'हिंदुस्थान टाइम्स' हे वृत्तपत्र बिर्लांच्या मालकीचे असले तरी काका जिवंत होते तोपर्यंत या वृत्तपत्राच्या व्यवस्थापनात अथवा संपादकीय धोरणात बिर्लांनी कसलाही हस्तक्षेप केला नाही. आपल्या विचारांनुसार व आदर्शानुरूप देवदास काका हे वृत्तपत्र चालवीत राहिले. व त्याचा विकास करीत गेले. देवदास काकांच्या प्रयत्नांनी 'हिंदुस्थान टाईम्स'चा वाचक वर्ग खूपच वाढला आणि देशातील पहिल्या श्रेणीच्या दोनतीन वृत्तपत्रांत त्याची गणना होऊ लागली. हिंदीतून निघणारे 'हिंदुस्थान' आणि 'हिंदुस्थान साप्ताहिक' ही वृत्तपत्रे सुरू करण्याचे श्रेयही देवदास काकांचेच होय, त्यांच्या राष्ट्रभाषाप्रेमाने सारी आडकाठी दूर करून ही दोन हिंदी पत्रे सुरू करण्यात आली होती. आज तर अनेक हिंदी वृत्तपत्रे निघत आहेत आणि लोक ती आवडीने वाचीत आहेत. मात्र १९५० च्या सुमारास हिंदीतील पत्र-पत्रिकांचे महत्त्व कमी होते. अशा परिस्थितीत देवदास गांधींनी आपल्या निष्ठेच्या आणि परिश्रमांच्या बळावर देशवासीयांना हिंदी वृत्तपत्र उपलब्ध करून दिले होते.

अशा सर्व मोठ्या कामगिऱ्या पार पाडणारे देवदास काका एक कुटुंबप्रिय व्यक्ती होते. आपल्या कुटुंबीयांच्या व मित्रांच्या घोळक्यात गप्पा गोष्टी करीत, बौद्धिक चर्चा आणि काव्य शास्त्र विनोदाचा आस्वाद घेणे ही त्यांची आवडती करमणूक असे. लोक त्यांना 'नवाब' म्हणत असले तरी, वस्तुतः ते अत्यंत साधेसुधे व मेहनती वृत्तीचे होते. साध्या साध्या गोष्टींतून जीवनाचा आनंद घेणे आणि चेष्टा विनोदाने जीवनातील जटिलता साध्य बनविणे, हा त्यांचा विशेष होता. कामाच्या इतक्या व्यापात असतानाही ते 'आता थोडा वेळ कोणी मला त्रास देऊ नका, मला एकट्याला निवांत राहू द्या' असा एकांताचा कधी आग्रह धरीत नसत. आम्ही मुले फार समजूतदार आणि शालीन होतो असे नव्हे, परंतु आमच्या काकांनी आम्हाला कधी झिडकारले नाही. महत्त्वाचे काम असल्याचे सांगून देवदास काकांनी मला अथवा अन्य कोणाला कधी पिटाळून लावले नाही. प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्येक समस्यांसाठी त्यांच्याजवळ वेळ असे. आरडाओरडा करताना, घाईगर्दी करताना अथवा आपला रोष दाखविताना मी त्यांना कधीच पाहिले वा ऐकले नाही. आता हे खरे की, शेवटच्या मिनिटापर्यंत कामात व्यस्त राहण्यामुळे जुन्या दिल्ली स्टेशनवरून गाडी पकडायची झाली म्हणजे ड्रायव्हरना गाडी भरधाव न्यावी लागे! जुन्या दिल्ली स्टेशनहून ट्रेन पकडायची असली म्हणजे मात्र आमचे काका ड्रायव्हरला सांगत, 'जरा गाडी भगाना'. कधीकधी गाडी चुकतही असे, पण तसे झाले तरी काका तो वेळ अन्य कामासाठी वापरीत असत. 'वेळ मिळत नाही' स्टेशनवरून घेऊन यायला वा पोचवायला जमणार नाही, कामे फार आहेत' हे आजकाल जो तो म्हणत असतो. परंतु काकांच्या तोंडून हे शब्द कधीच कोणी ऐकले नाहीत. बापूजींच्या चारही मुलांत मातृप्रेम आणि मातृभक्ती विशेष होती. सामान्यतः अशा यशस्वी

पित्याच्या छायेत मुले आपल्या अशिक्षित मातेला विसरून जातात पण या परिवारात असे नव्हते. प्रत्येक मुलाला आपल्या आईविषयी विलक्षण आत्मीयता वाटत असे. या मुलांनी आपला 'महात्मा' पिता देशाला दान देऊन टाकला होता. त्यांनी आपल्या मातापित्यांकडे कसली मागणी केली नाही. जमेल ती सेवा केली आणि अनेक अपरिचितांना बापूजी व मोटीबांचे सान्निध्य लाभावे म्हणून स्वतः दूर राहिले. महात्माजींच्या सान्निध्यातील या लोकांनी अनेकदा या मुलांना बाजूलाही टाकले परंतु कोणी कधी तक्रार केली नाही. आमच्या आजीबरोबर मात्र चारही मुलांचे काही वेगळेच नाते होते. तेथे कसलाच दुरावा नव्हता. या माता-पुत्रांच्या भेटीत वयस्कतेचे आवरण गळून पडत असे आणि मुले आईशी एकरूप होत असत. देवदास काकांचेही आपल्या आईवर फारच प्रेम होते. सर्वांत धाकट्या मुलाला अधिक काळ आईची मांडी लाभत असते आणि आईलाही त्याचे विशेष आकर्षण वाटतच असते. सत्याग्रहाच्या प्रारंभपर्वात देवदास काकांना आफ्रिकेत असताना आईचे सान्निध्य लाभले होते पण तिचा वियोग आणि एकाकीपणही त्यांना सोसावे लागले होते. १९०४ मध्ये मोटीबा आजारी झाली तेव्हा पाच वर्षांचा देवदास एकटा जोहॉन्सबर्गमध्ये राहिला होता.

१९१४ साली मोटीबा खूप आजारी होऊन केपटाऊनमध्ये मरणासन्न होती. तेव्हा देवदास फिनिक्स आश्रमात एकटाच होता आणि त्याच्या वाटणीचे काम करीत होता. पण उदासवाणे व अबोलपणे त्याचे काम करीत राहणे हृदय पिळवटून टाकीत असे. नंतरच्या आयुष्यातदेखील मोटीबाने वेळोवेळी देवदासकाकांची सोबत केली होती. रसिकभाईच्या मृत्यूच्या वेळी मायलेक सोबत होते. मध्यंतरी १९३५ सालच्या आसपास देवदासकाका खूप आजारी झाले होते तेव्हा मोटीबा स्वतः त्यांना घेऊन शिमल्याला जाऊन राहिली होती. आणि तिने केलेल्या सेवाशुश्रूषेनेच देवदासकाका पूर्ण बरे झाले होते. प्रवासात इकडेतिकडे जाणे व्हायचे तेव्हा मोटीबा कितीतरी वेळा दिल्लीच्या हरिजन कॉलनीच्या घरात देवदास काका काकी यांच्यासोबत राहायला जाई.

हरिलाल काकांनी धर्मांतर केले तेव्हा मोटीबा विषण्ण होती. त्यावेळी मोटीबांचे विचार स्वतः लिहून काढून, देवदास काकांनी वृत्तपत्रांतून पत्ररूपाने प्रसिद्ध केले होते. यात हरिलाल काकांना दुःख व्हावे असा हेतू नसावा, तर मुसलमान आणि ख्रिश्चन मोठ्या लोकांच्या मुलांना धर्मपरिवर्तनाच्या मोहात कसे पाडतात हे समाजाला स्पष्ट करण्याचाच उद्देश होता.

१९३९ मध्ये मोटीबा काकांच्याजवळ दिल्लीत होती. तेथे स्नानगृह लहानसे होते आणि त्यातच एका कोपऱ्यात पाणी तापविण्याचा बंब जळत असे. थंडीचे दिवस म्हणून

खिडक्याही बंद होत्या, बंबात दगडी कोळसा वापरला जात होता. एक दिवस दगडी कोळशाच्या या विषारी धुराने मोटीबा स्नानगृहात बेशुद्ध झाली. चौकस असलेल्या देवदास काकांनी मोटीबाला स्नानगृहात वेळ लागतो आहे हे ओळखून तिला हाका मारल्या पण काहीच उत्तर आले नाही. तेव्हा दरवाजा तोडून त्यांनी तिला बाहेर काढले व योग्य उपचार केले. अधिक उशीर होता तर काय अशुभ घडले असते ते देवच जाणे. पुढे मोटीबा आणि बापू आगाखान पॅलेसमध्ये कैदेत असतेवेळी रामदास व देवदास आपली सारी कामे सोडून मोटीबाला भेटण्यासाठी पुण्याला जायचे. आईवडिलांच्या संदर्भात वेळ, पैसा व श्रम यांच्या खर्चाची त्यांनी कधी पर्वा केली नाही. शेवटच्या आजारपणात देवदासकाका मोटीबांची दिवसरात्र सेवा करण्याचे, त्यांना धीर देण्याचे काम करीत होते. मोटीबाचा देवदास काकांच्या कार्यक्षमतेवर, औदार्यावर आणि सद्भावनेवर एवढा विश्वास होता की, अंतसमयी तिने साऱ्या परिवाराची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती आणि देवदास काकांनी ती सर्वतया निभावली होती. त्यावेळी नव्याने शोध लावलेल्या पेनिसिलिन या औषधाचा इलाज करून मोटीबाचे प्राण वाचवावेत अशी देवदास काकांची फार इच्छा होती. पण बापूजींनी समजाविल्यावर त्यांनी आपले म्हणणे मागे घेतले व अर्ध्या तासाने आमच्या आजीचा मृत्यू झाला. मोटीबाचा मृत्यू झाल्यावर देवदास काका एखाद्या लहान मुलाप्रमाणे ओक्साबोक्शी रडत राहिले होते. बापूजींना देवदास काकांच्या मातृभक्तीची कल्पना असल्यामुळेच त्यांनी मोटीबाच्या चितेला त्यांच्या हातून अग्नी दिला होता.

मोटीबाच्या मृत्यूनंतर, बापूजी जेलमध्ये असतानाच देवदास काकांच्या सूचनेनुसारच ठक्करबाप्पा आणि जे. आर. डी. टाटा यांनी मिळून कस्तुरबा ट्रस्ट स्थापन करण्यासाठी ७५ लाख रुपयांच्या देणग्या जमा केल्या. बापूजींच्या वाढदिवसाला ही रक्कम त्यांना भेट म्हणून देण्यात आली आणि त्यातूनच कस्तुरबा ट्रस्ट अस्तित्वात आला. देवदास काकांच्या प्रेरणेनेच जे. आर. डी. टाटा सारख्यांचे सहकार्य या ट्रस्टला लाभले आणि आजही त्याचे काम देशभर व्यवस्थित चालू असून ट्रस्टच्या मूळ निधीत चांगलीच भरही पडलेली आहे. कारण टाटांसारख्या विश्वस्तांनी या सार्वजनिक निधीची व्यवस्था चोख ठेवली होती. त्या वेळेपासून कस्तुरबांकडे 'राष्ट्रमाता' म्हणून पाहिले गेले आहे.

महात्मा गांधी आणि देवदासकाका या पितापुत्रांमध्येही काही वेगळीच जवळीक होती. जेव्हा जेव्हा बापूजी दिल्लीत असत तेव्हा तेव्हा देवदास काका न चुकता रात्री बापूजींच्या भेटीसाठी जात असत. संध्याकाळच्या प्रार्थनेत आम्ही सारी मुले व काकी सहभागी होत असू.

माझी गणती कधी मुलांमध्ये तर कधी मोठ्यांमध्ये होत असे. मी जर दिल्लीत असले तर काका मला त्यांच्या सोबत रात्री बापूजींना भेटायला घेऊन जात. पितापुत्रांत ममतेचा भाव जसा होता तसेच काका बापूजींशी राजकारणातील अनेक प्रश्नांवर मनमोकळी चर्चाही करीत. अनेकदा बापूजींची मते काकांना पटत नसत तेव्हा ते ती बोलूनही दाखवीत. पण परस्परांतील सौहार्दाला त्यामुळे बाधा येत नसे. दिल्लीत असताना बापूजी रात्रीच्या वेळी देवदास काकांच्या भेटीची प्रतीक्षा करीत असावेत. असे मला वाटते. देवदास काका आल्यावर ते विचारीत, "आज तुला यावयास बराच उशीर झाला. अजून जेवण तर केले नसशीलच? देवा, तू आपली ही सवय बदलायला हवीस". फिनिक्स आश्रमात बुधवारच्या रात्री उशिरापर्यंत 'इंडियन ओपिनियन'चे काम चालत असे पण जेवण वेळेवर उरकायचे. यावर काका नुसते हसत. अशा समजुतीच्या गोष्टी त्यांनी नेहमीच कानाआड टाकल्या होत्या आणि म्हणूनच आम्हा साऱ्यांना सोडून ते अकालीच निघून गेले होते.

बापूजींच्या शेवटच्या उपवासाला देवदास काकांनी एक लेख लिहून विरोध केला होता आणि बापूजींनी त्याला उत्तरही लिहिले होते. बापूजींच्या मृत्यूच्या वेळी काका आपल्या प्रेसमध्ये होते. बातमी कळताच ते तत्काळ बिर्ला हाऊसमध्ये आले होते पण तोवर सारे संपले होते. बापूजींचा अंत्यसंस्कार माझ्या वडिलांनी केला पण सर्व कामांमध्ये दोघे भाऊ एकत्र असत.

दिल्लीत देवदास काकांचे तर घरच होते. दिल्लीतील देवदास काकांचे घर सांभाळण्याचा सारा भार व्यवहार कुशल लक्ष्मी काकींवर होता. त्या दिवसांमध्ये काकांचे व माझ्या वडिलांचे दुःख बघवले जायचे नाही. पण मोठ्या हिंमतींने दोघे भाऊ सर्व प्रकारचे निर्णय घेत होते. आमच्या काकांचे दिल्लीचे घर म्हणजे धर्मशाळाच बनून गेली होती. प्रत्येक खोली पाहुण्यांनी भरून गेली होती. मला वाटते त्या काही दिवसांमध्ये रोज पन्नास तरी लोकांचे जेवण होत असे. जो कोणी पाहुणा येवो त्यांच्या आंघोळीपासून ते जेवण्याखाण्यापर्यंत सारी व्यवस्था ती बिनबोभाट पार पाडीत असे. कोठून या सगळ्यासाठी दाणापाणी यायचे, आम्हा कोणाला पत्ता नसायचा. पत्ता लागणार नाही इतक्या अद्‌भुत कौशल्याने ती गुणी बाई सर्व व्यवस्था करीत होती. इतका व्याप सांभाळीत असताही कधी नोकराचाकरावर रागावताना किंवा त्यांच्या कामाबद्दल तक्रारी करताना अथवा कधी कुणा पाहुण्याला टाकून बोलताना वा त्यावर नाराज होताना मी त्यांना कधी बघितले नाही. जीवनातील कष्ट आणि उद्वेगाचे कधी प्रदर्शन केले नाही. सागराच्या गंभीरतेने ती साऱ्या गोष्टी तळाशी टाकून देई. सारे काही सहन

करीत तिने पतीला सदैव साथ केली. चांगल्यातल्या चांगल्या सुखसोयी उपलब्ध असल्या तरी कसली ना कसली उणीव जाणवू शकते. तक्रारी करण्याचे, टोमणे मारण्याचे अनेक प्रसंग दैनंदिन जीवनात येऊ शकतात. परंतु लक्ष्मी काकींनी कधीच असे काही केले नाही याची मी साक्षी आहे.

बापूजींच्या मृत्यूनंतर देवदास काकांनी गांधी स्मारक निधीचे सदस्य या नात्याने काम तर केलेच शिवाय देशविदेशात पत्रव्यवहार करून बापूजींची छायाचित्रे, चित्रफिती आणि पत्रे गोळा करून त्यांच्या आधारे 'व्हॉईस ऑफ इंडिया' (भारताचा आवाज) नावाचा एक चित्रपटही तयार केला होता. या कामात काका रात्रंदिवस गढून गेले होते आणि एका चित्रपट निर्मात्याच्या इच्छेनुसार पूर्ण तीन तासांचा हा चित्रपट तयार करण्यात आला होता. त्या काळी आमचे घर म्हणजे एक लहानसा स्टुडिओच बनला होता. पार्श्वगायक आणि पार्श्व निवेदकांची घरी वर्दळ असे. या चित्रपटात जुन्या चित्रफितींच्या व छायाचित्रांच्या आधारे बापूजींचा जीवनपट प्रकट करण्यात आला असून बापूजींच्या जीवनावरील हा पहिलाच चित्रपट होय.

देवदास काकांचे तसे तर आपल्या तीनही भावांवर सारखेच प्रेम होते पण त्यातही माझ्या वडिलांशी त्यांची जवळीक अधिक होती. एकतर त्या दोघांच्या वयात केवळ दोनच वर्षांचे अंतर होते आणि दोघांचा जन्महही आफ्रिकेतच झाला होता. दुसरे असे की, मणिलाल काका नेहमी आफ्रिकेत असत आणि हरिलाल काका तर सारखे भटकत असत. त्यामुळे बहुधा या दोघांशी विशेष जवळीक साधण्याचा अवसरच लाभला नसावा, मात्र रामदास आणि देवदास यांच्या परिवारांत नियमित पत्रव्यवहार आणि येणे जाणे असे. मी तर जवळ जवळ अर्धावेळ काका काकींकडेच असे. माझ्या वडिलांविषयी देवदास काकांना विशेष जिव्हाळा होता. आपल्या या भावाला काही त्रास न व्हावा, त्यांच्या मनाला लागेल असे काही घडू नये याविषयी ते नेहमी दक्ष असत. आपल्या भावाच्या अशक्त प्रकृतीची देवदास काकांना नेहमी काळजी लागून असे आणि त्यासंबंधी ते नेहमी बोलत असत. त्यांच्या आग्रहावरूनच माझ्या वडिलांनी आपली नोकरी सोडून वानप्रस्थ जीवन स्वीकारले होते. माझ्या वडिलांनी काम सोडल्यावर देवदास काकांनी ५०० रु. पाठविले होते आणि सोबत पत्र लिहून माझ्या आईला विनवणी केली होती की, इत:पर प्रत्येक महिन्याला ते ५०० रु. पाठवितील ते अव्हेरू नयेत, माझे आईवडील या घटनेने सद्‌गदित झाले होते. देवदास काकांच्या साहाय्याच्या आशेने माझ्या वडिलांनी नोकरी सोडली नव्हती. एखाद्या वर्षातच मी कुठेतरी नोकरीला लागणार होते आणि तोवर आमची आई काटकसरीने घर चालवू शकणार होती. कनूला शिष्यवृत्ती मिळत असल्याने तो स्वतंत्र होता. परंतु देवदास काका आणि लक्ष्मी काकींनी मोठ्या उदारतेने, कसलाही अहंकार न बाळगता नियमितपणे आम्हाला

आर्थिक साहाय्य केले. आपल्या समाजात अनेक घरातून असे घडत असेलही परंतु आग्रहाने पैसे पाठविले आणि मनात त्यांची जाणीवही न बाळगणे व कधी कुठे त्याचा उल्लेखही न करणे अशी शालीनता मात्र क्वचितच आढळेल. देवदास काकांच्या मुलांनाही हे माहीत असेलसे मला वाटत नाही आणि माहीत असलेच तरी आपले काका काकी आपल्या आईवडिलांचे आश्रित आहेत अशी भावना त्यांनी कधी प्रकट केली नाही. देवदास गांधी आणि लक्ष्मी काकींचा हा जातिवंत अभिजातपणाच होता. देवदास काकांनी आपल्या या मोठ्या भावावर मनापासून प्रेम केले, त्याला आर्थिक साहाय्यही केले आणि ते विसरून एका धाकट्या भावाच्या शालीनतेने मोठ्या भाऊभावजयीच्या आदर सन्मानात काही उणीव भासू दिली नाही. मला या गोष्टीची जाणीव होती परंतु तरीही स्वतःबद्दल माझ्या मनात कधी हीनतेचा वा तुच्छतेचा भाव निर्माण झाला नाही. कारण माझ्या काका काकींच्या समस्त परिवाराने मला कधी याची जाणीवच होऊ दिली नाही. आमच्या मोठ्या कुटुंबांचे ऐक्य उत्कट होते, तेव्हा स्वाभिमान खंडित होण्याचा प्रश्नच नव्हता. ही सुसंस्कृत अजोड म्हणायला हवी. पाच वर्षे हे साहाय्य चालू होते आणि शेवटी माझ्या वडिलांच्या तीव्र आग्रहानंतरच काकांनी ते बंद केले होते. या भावांची विशेषता ही होती की, देवदासकाकांनी मागणी न करताच मदत पोचवली तर त्यांची मुलगे-मुली कमावती झाल्याबरोबर छोट्या भावाची मदत त्यांनी स्वतःहून बंद केली.

परिवाराबाहेरील लोकांशीही देवदास काकांचा संबंधही मोठा गोडव्याचा असे. मुळातच देवदास काकांच्या स्वभावात एक विशेष मोहकता आणि रसिकता होती. त्यांचा नजरेस लहान-मोठे, गरीब-श्रीमंत असे अंतर नसे. मुंबईतील जुन्या चाळींचे चारचार मजले चढूनही काका आपल्या गरीब मित्रांच्या भेटीस जात असत आणि हास्य विनोद करून त्यांना प्रसन्न करीत असत. त्यांच्या व्यक्तित्वाचा एक विशेष असा की, लहान मोठ्या सर्व वयाच्या स्त्रिया त्यांच्यावर मुग्ध होत असत. काकांची रसिकता विलोभनीय होती आणि म्हणून सर्व स्त्रिया त्यांचा आदर करीत आणि आवर्जून त्यांचा आवडीचे पदार्थ त्यांना खाऊ घालण्याचा आग्रह धरीत. देवदास काकांच्या बोलण्यात कधी खोटेपणा वा अतिश्योक्ती नसे आणि सामान्य व्यक्तींतील ही चांगुलपणा व क्षमता त्यांची दृष्टी हेरीत असे व काका त्यांची प्रशंसा करीत असत. त्यामुळे त्या व्यक्तींचा आत्मविश्वास वाढून त्याचा अहं सुखावत असे. अशा वृत्तीचा माणूस, मनात आणले तर साऱ्या जगाला रिझवू शकतो. आपल्या अनेक कामांच्या व्यापातही काकांना साहित्य, संगीत आणि सर्व तऱ्हेच्या कलांविषयी प्रेम होते. दिल्लीतील गंधर्व महाविद्यालयाला प्रारंभी काकांनीच प्रोत्साहन दिले होते. १९५० मध्ये आजचे जगप्रसिद्ध

पं. रविशंकर एक तरुण सतार वादक होते. ते आमच्या घरी येत असत. त्याचप्रमाणे, देशोदेशीच्या चित्रकारांना आणि शिल्पकारांनाही काका काम देववीत असत आणि त्यांच्या कलाकृतींची प्रदर्शनेही भरवीत असत. जीवनाच्या साऱ्या क्षेत्रात त्यांची पोच होती आणि त्यांतील साऱ्या समस्याही त्यांना परिचित असत.

अनेक प्रकारचे व्याप असतानाही काका मी गावाला जाताना मला सोडण्यासाठी आवर्जून स्टेशनवर येत व मी येणार असेन तेव्हा मला घ्यायलाही येत. मी तर लहानच होते. माझ्यासाठी स्टेशनवर न आले तर चालण्यासारखे होते परंतु माझ्या आईवडिलांसाठी तर ते न चुकता स्टेशनवर येत असत आणि तेथेच फलाटावर ते आपल्या वडील बंधूच्या पायांना हात लावून वंदनही करीत असत. माझ्या वडिलांचे बोलणे कमी होते परंतु त्यांच्या मनातील गोष्ट देवदास काकांना शब्दांच्या माध्यमावाचूनच कळत असे आणि आपल्या भावाच्या सुख समाधानासाठी ते सदैव सिद्ध असत. त्यांची कर्तव्यपरायणता निर्विवाद होती. समंजसवृत्ती, ऋजुता आणि मनमोकळेपणा हेही त्यांचे गुणविशेष होते. हे औदार्य व ही शालीनता कधी उणी पडली नाही.

आफ्रिकेतील फिनिक्स आश्रमात प्रभुदास गांधी हा सर्वांत उपेक्षित मुलगा होता. बहुधा सारेचजण त्याला थपडावीत असत. आपल्या आठवणींतही त्यांनी या गोष्टीचा उल्लेख केला आहे. देवदास गांधी त्यांच्यापेक्षा फारतर वर्षाभरानेच मोठे होते पण त्यांनी प्रभुदास गांधींना आजीवन मोठ्या आदराने साहाय्य व मार्गदर्शन केले होते. सन्मानाने वागविले होते. प्रभुभाई आणि त्यांची पत्नी अंबादेवी या दोघांनाही देवदास काकांचे घर रात्रंदिवस उघडे होते. आमच्या परिवारात मीही सर्वात अधिक दुबळी, रूपाने सामान्य आणि कमी समज असलेली होते. देवदास काकांनी सदैव माझे उत्साहवर्धन केले आणि लाड-प्रेमाद्वारे माझा आत्मविश्वास वाढविला. मी सोडून दुसऱ्या दहा जणींना काका आधार देऊ शकत होते पण माझ्या सारखीला आधार देऊन आपलेसे करणे, माझे प्रशिक्षण करणे मात्र केवळ तेच करू शकत होते. त्यांचे प्रेम निःस्वार्थी होते. त्यांच्या सहवासात तासभर राहणेही ज्ञानवर्धक ठरत असे. बोलता चालता ते आम्हाला जीवनातील मार्मिक गोष्टी जाणण्याची आणि त्यापासून आनंद घेण्याची अद्‌भुत कला शिकवीत असत. त्यांच्यापासून मिळालेली जीवनदृष्टी आणि जीवनाचा प्रत्येक क्षणापासून मुक्त आनंद प्राप्त करण्याची देणगी आजही आमचे जीवन मधुर बनवीत आहे. दिल्ली, मुंबई आणि मद्रासमध्ये आजही चारपाचशे अशी कुटुंबे आहेत जी देवदास काकांची रसिकता आणि त्यांचा स्वभाव विसरू

शकत नाहीत. अशा आमच्या काकांनी आपल्या जीवनाची वात दोन्ही बाजूंनी पेटवून स्वतःला संपविले होते. ५७ व्या वर्षीच त्यांना मृत्यू आला. त्यांचे व्यक्तित्व परिसासारखे होते. त्याच्या स्पर्शानेच जीवन उत्साहाने भरून जात असे. आता ते दिवसही राहिले नाहीत आणि ती माणसेही राहिली नाहीत!

देवदास काकांची तीन मुले आणि एक मुलगी आहे. तारा, मोहन आणि रामूचा जन्म १९३३ ते १९३६ या कालावधीत झाला होता. मोटीबा काही काळ या मुलांबरोबर राहिली होती. मोटीबा इतक्या साध्या, सरळ, भाबड्या स्वभावाची होती की, आगाखान जेलमध्ये असताना सर्व यातना भोगत असतानांही ती एक स्वप्न पाहावयाची, तिची फार इच्छा होती की जेलमधून बाहेर पडताच दिल्लीला जाऊन तारा, मोहन आणि रामू या आपल्या नातवांसह "भारत मिलाप" हा चित्रपट बघण्याचे तिचे स्वप्न होते. रामायणाच्या कथेवरचा तो चित्रपट, तो पाहण्यावर कोणता अक्षेप येऊ शकत होता? परंतु तिला जेलमधून बाहेर पडताही आले नाही व आपल्या नातवांना मोठे होताना बघताही आले नाही.

देवदास काकांचे पहिले अपत्य, तारा ही गौरवर्ण, उंच आणि सडपातळ स्त्री आहे. तिला साहित्य आणि भाषेत रस आहे. सातआठ भाषांत ती लिहूवाचू शकते. हिंदी, इंग्रजी, तमिळ आणि गुजराती व्यतिरिक्त, फ्रेंच, इटालियन, बंगाली, पंजाबी आणि मराठी या भाषाही तिला अवगत आहेत. तिला सतारही खूप आवडते. सतारवादनाच्या अभ्यासासाठीच ती शांतिनिकेतनात गेली होती आणि तेथेच तिचा भावी पती तिला भेटला. भाटपाड्याचे डॉ. ज्योतीप्रसाद भट्टाचार्य यांच्याशी ताराचा विवाह झाला. हा विवाह समारंभ मोठ्या धूमधडाक्याने साजरा झाला आणि त्यानंतर काही महिन्यांनीच काकांचे देहावसान झाले. ताराला एक मुलगी आणि एक मुलगा आहे. मुलगी 'सुकन्या' आपले नाव सार्थ ठरविणारी आहे. तिचा विवाह दिल्लीचे प्रसिद्ध लाला श्रीराम यांचा नातू विवेक यांच्याबरोबर झाला. ताराचा मुलगा विनायक लंडनमध्ये शिकत आहे. अलीकडेच ताराचे पती निवर्तले आहेत. ताराला खादी विषयी अपार प्रेम असून, खादीप्रचाराच्या कार्यात ती रात्रंदिवस गुंतलेली असते. पहिल्या मुलाला, मातेच्या अथवा पित्याच्या वडिलांचे नाव देण्याची दक्षिण भारतात प्रथा आहे. या प्रथेला अनुसरून देवदास काकांच्या दुसऱ्या अपत्याचे नाव राजमोहन ठेवण्यात आले. राजमोहन चांगला पत्रकार असून मद्रासमध्ये राहत आहे. एका सिंधी मुलीशी त्याचा विवाह झालेला आहे आणि त्यांना सुप्रिया व देवव्रत ही दोन मुले आहेत. मोठे प्रेमळ कुटुंब आहे.

देवदास काकांचा दुसरा मुलगा रामचंद्र मोठा साधुवृत्तीचा शिक्षक आणि विद्वान लेखक आहे. भारतीय तत्त्वज्ञानात त्याने पीएच.डी. केले आहे. तो महर्षी रमण यांचा परम भक्त आहे. स्वभावाने अगदी निःस्पृह आणि अपरिग्रही आहे. त्याला लीला ही एक कन्या असून ती ऑक्स्फर्डला शिकत आहे. डॉ. रामचंद्र गांधी आपल्या विषयात एवढे प्रवीण आहेत की, परदेशातील महाविद्यालये त्यांना सन्मानीय प्राध्यापक म्हणून निमंत्रित करीत असतात.

देवदास गांधींचा सर्वात शेवटचा मुलगा आणि महात्मा गांधींचा सर्वांत धाकटा नातू गोपाळकृष्ण, याचा जन्म आमच्या आजीच्या मृत्यूनंतर झाला. आम्हा अकरा नातवांत तो सर्वाधिक सुंदर आणि मोहक आहे. आम्ही सारेजण त्याला 'गोपू' म्हणत असतो. तो तीन वर्षांचा होण्यापूर्वीच आमच्या आजोबांचा देहांत झाला होता. ते जेव्हा दिल्लीत होते तेव्हा न चुकता गोपूशी खेळणे हे त्यांचे आवश्यक कामच होऊन बसले होते. बापूजींना मुले आवडत असत आणि गोपू तर अत्यंत सुंदर बालक होता. आपल्या बहिणीप्रमाणेच गोपूलाही अनेक भाषा अवगत आहेत. गुजराती त्याला चांगले बोलता वाचता येते. हिंदी, इंग्रजी भाषांचे त्याला चांगले ज्ञान आहे. आता तो तमिळनाडू मध्ये आय.ए.एस. अधिकारी आहे. तमिळ भाषिकांच्या पद्धतीनेच तो तमिळ भाषा लिहूबोलू शकतो. त्याचा विवाहही एका तमिळ कन्येशी झाला आहे. त्याला दोन मुली आहेत. सध्या गोपाल गांधी राष्ट्रपती व्यंकटरमण यांचे सचिव आहेत व दिल्लीत राहत आहेत.

काकांच्या मृत्यूनंतर लक्ष्मी काकी मद्रासला राहू लागली. १९८३ मध्ये तेथेच त्यांचे देहावसान झाले. त्या चांगल्या लेखिका होत्या. मातृभाषा तमिळ असली तरी त्यांना हिंदी, गुजराती आणि इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान होते आणि हिंदीतून त्या लेखन करीत.

१४

# प्रेमाची परंपरा

गांधीजींची अनेक वैशिष्ट्ये आहेत. कौटुंबिक स्तरावर आढळणारा त्यांचा एक विशेष मात्र जवळपास अन्यत्र कोठेच आढळत नाही. 'वसुधैव कुटुंबकम्' हे संस्कृत सुभाषित बापूजींनी आपल्या कुटुंबात खोलवर रुजविले होते. त्यांच्या मनात तर आपला-परका हा भेदभाव नव्हताच, पण त्याबरोबरच आपल्या पत्नीच्या व मुलांच्या मनातूनही हा भेदभाव ते दूर करू शकले होते. आश्रमातील सदस्यांनाही या दिशेने प्रवृत्त करण्याचा त्यांनी बऱ्याच हद्दीपर्यंत प्रयत्न केला होता. १९१५ ते १९४५ या तीस वर्षांतील दोन पिढ्यांना गांधीजींनी सौहार्द शिकविले होते. परिणामतः अनेकांनी, रक्ताच्या नात्याची मर्यादा ओलांडून अत्यंत अपरिचित लोकांनाही आपलेसे केले होते. या सद्भावनेचे दोन मोठे फायदे होते. एकतर आपलेपणामुळे सहजच परस्पर विश्वास वाढीला लागल्याने वातावरणात मोकळेपणा आला होता. दुसरे असे की, आपसातील संघर्ष आणि स्पर्धा कमी झाल्याने स्वातंत्र्याचे आंदोलन यशस्वी होऊ शकले. एरव्ही देशातील अनेक कार्य, भाषा, जात-पात यांनी विभागले गेलेले लोक आपसातच भांडत राहिले असते. या आपलेपणाने संयम व निष्पक्ष सद्भाव यांच्या आधारावर आपसात एकी निर्माण झाली, आणि त्या बळावरच एवढ्या मोठ्या सत्याग्रह आंदोलनाचे व्यवस्थित आयोजन शक्य झाले. स्वातंत्र्यप्राप्ती लढ्यात लाभलेल्या यशाचे मूळ या अव्यक्त पण पायाभूत शक्तीत होते. एरव्ही एवढ्या मोठ्या सत्तेविरुद्ध, निःशस्त्र नागरिकांनी लढा देणे अगदीच अशक्य होते.

देशातील सत्याग्रहींच्या हृदयात आपलेपणाच्या या भावनेने सार्वजनिक संबंधांपलीकडे जाऊन एक कौटुंबिक संबंध प्रस्थापित केला होता. प्रांतोप्रांतीचे वरिष्ठ नेते बापूजींना आपला पिता मानीत आणि व्यक्तिगत प्रश्नांतही त्यांचे मार्गदर्शन स्वीकारीत. बापूजींचा सारा परिवारही या प्रकारेच साऱ्या देशाचा परिवार बनला होता. त्यामुळे देशातील प्रत्येक कार्यकर्त्याला गांधीजींचा परिवार हा आपलाच परिवार वाटत असे. त्याच्या हितरक्षणाची जबाबदारीही तो आपले व्यक्तिगत कर्तव्य मानीत असे. अशा सद्भावनेमुळे बापूजींची मुलेही बापूजींच्या सहकाऱ्यांशी एकरूप होऊन राहत असत. आणि हीच भावना बापूजींच्या नातवंडांपर्यंतही

झिरपली. आम्हा सर्व नातवंडांना बापूजींनी साऱ्या आश्रमवासीयांशी आंतरिक जिव्हाळा बाळगण्यास शिकविले होते. त्यामुळेच अपरिचित लोकांना आपलेसे करण्यात आम्हा तिसऱ्या पिढीतील व्यक्तींना काही आडकाठी वाटत नसे.

या व्यापक सौहार्दाचा परिणाम म्हणूनच बापूजींची चारही मुले, सुना आणि नातवंडांतही एक विलक्षण एकोपा आहे. भारतातील संयुक्त कुटुंबात एकतेची ही प्रथा जुनी आहे. परंतु या संयुक्त कुटुंबांतूनही इस्टेटीच्या वाटण्यावरून ताणतणाव आणि नाराजी निर्माण होण्याचा अनुभव सामान्यत: येतच असतो. आमच्या परिवारात स्वच्छेनेच संपत्ती जमा करण्याचा प्रयत्न कोणी केला नाही आणि बापूजींनी आपल्या संपत्तीचा सार्वजनिक ट्रस्ट करून कांचन मुक्ती स्वीकारली होती. त्यामुळे त्यांच्या मुलांत व परिवारात धनाविषयी अनासक्तीची भावना आहे. प्रत्येक नातवाने व नातीने धनार्जन केले असले तरी या बाबतीत परस्पर ईर्ष्या मात्र नावाला नाही. गरज पडेल तेव्हा सारेजण साहाय्याला सिद्ध असतात आणि एरव्ही सारेजण आपापल्या विकासात मग्न असतात.

बापूजींच्या चारी मुलांमध्ये या बाबतीत मेळ राहिला. हरिलाल काकांचे जीवन कसेही असले तरी त्यांच्यात व त्यांच्या भावांत कसलेही वैमनस्य नव्हते. त्यामुळे बापूजींच्या सर्व नातवंडांना चारचार मातापित्यांचे लाड-प्रेम लाभले होते. बापूजींच्या चारही सुना एवढ्या अभिजात होत्या की, आपल्या सासऱ्यांची तत्त्वे आत्मसात करून त्यांच्या मुलांचा संसार त्यांनी चालविला होता. त्यामुळे सासू, सून, भावजय यांमधील कलहाला कधी डोके वर काढता आले नव्हते. परिणामी आम्ही सर्वजण स्वतंत्र जीवन जगत असताही समान विकास करू शकलो आणि बापूजींचा अनमोल वारसा ओळखू शकलो आमच्या साऱ्या काकांना याचे फार मोठे श्रेय आहे. हा वारसा जर आम्ही सुखकारकरीतीने उपभोगू शकलो नसू तर ती आमच्या पिढीचीच उणीव होय! वर्तमानकाळातील आम्हा सर्व गांधींमध्ये अनेक त्रुटी आहेत पण याचा दोष गांधीजींच्या पुत्रांच्या माथी लावता येत नाही. या कारणानेच या चौघांचाही या पुस्तकात स्वतंत्र उल्लेख करण्यात आलेला आहे. या अनमोल वारशाचा आदिस्रोत महात्मा गांधी होत आणि त्यांचे पुत्र या अनमोल वारशाचे केवळ वारसदार नव्हते तर त्यांचे संवर्धकही होते.

अशा परस्पर प्रेमाची आज साऱ्याच कुटुंबांना आवश्यकता आहे. असे मला वाटते. आजच्या विषम जीवनात स्थिर आणि समाधानी राहण्यासाठी प्रेमाचा हा वारसा अनमोल

आहे. या वारशाचे प्रणेते जसे गांधीजी होते तसे त्याचे वारसदार आम्ही सर्व भारतीय आहोत आणि गांधीजी जितके आमचे आत्मीय आहेत, तितकेच त्यांची पत्नी आणि त्यांचे चारहीपुत्र आमचे आत्मीय आहेत. गांधी कुटुंबांतील या पाचही व्यक्तींपासून आम्हाला काहीना काही प्रेरणा लाभू शकेल असा मला विश्वास वाटतो.

वाय ४२-११०० पु. अे[५]*-५.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

मुखपृष्ठ मुद्रण : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.